11-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-1
ABG/ D/ KTG/ 11:00

<u>**सभापतीस्थानी माननीय सभापती**</u>

**पृ.शी./मु.शी.** : तोंडी उत्तरे

**गोंदिया शहरात पसरलेले घाणीचे साम्राज्य**

**(१) * ४६१०९ श्री.राजेंद्र जैन , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया शहरातील सर्वत्र गटारे उघडे पडली असून शहरात जागोजागी कचऱ्याचे ढीग लागले असल्यामुळे शहरात दुर्गंधीचे वातावरण तयार होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शहरात नगर परिषद स्वच्छता अभियान राबविण्यास अयशस्वी ठरल्यामुळे उघडी गटारे आणि सडलेला कचरा यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंगू, मलेरिया, फायलेरिया, गॅस्ट्रो सारख्या रोगांमुळे ग्रस्त रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे शहरात प्रदूषण वाढले असून याची सखोल चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.उदय सामंत,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.राजेंद्र जैन : सभापती महोदय, गोंदिया शहरात पसरलेले घाणीचे साम्राज्य याबद्दल मी प्रश्न विचारलेला आहे. विभागाकडून प्रश्न क्रमांक १ व २ ला हे खरे नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. तसेच प्रश्न क्रमांक ३ व ४ ला प्रश्न उद्भवत नाही अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. गोंदिया शहराची परिस्थिती घाणीच्या साम्राज्यामुळे बऱ्याच दिवसांपासून बिघडलेली आहे. गोंदिया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

11-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

ABG/ D/ KTG/ 11:00

ता.प्र.क्र.४६१०९...

श्री.राजेंद्र जैन....

नगरपरिषदेकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारची मागणी गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांकडे केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे ही मागणी बऱ्याच दिवसापासून केलेली आहे. परंतु जिल्हाधिकाऱ्यांनी या बाबतीत काहीही कार्यवाही केलेली नाही. आज सभागृहात माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. गोंदिया शहरातील घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी जागा देण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात येतील काय ? गोंदिया शहरात मोठया प्रमाणात कचऱ्याचे ढीग पडलेले आहेत, त्या शहराची घनकचऱ्याची परिस्थिती अतिशय वाईट आहे. घनकचरा व्यवस्थापनासाठी नगरपरिषदेकडे मोठया प्रमाणात निधी उपलब्ध आहे. गोंदिया शहरातील घनकचरा उचलण्यासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संबंधितांना त्वरित आदेश देतील काय? गोंदिया शहरातील, तसेच गोंदिया जिल्हयातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी अधिवेशन काळात एक विशेष बैठक आयोजित करण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदय आदेश देतील काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, गोंदिया शहरात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत अशा आशयाचा प्रश्न विचारला होता, त्या प्रश्नास "हे खरे नाही" असे उत्तर दिले आहे. गोंदिया शहरातील गटारे उघडी आहेत, तेथे घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न निर्माण झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाच्या अनुषंगाने अशी माहिती दिली आहे की, गोंदिया नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा उपलब्ध द्यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली असून ती मागणी अद्याप प्रलंबित आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर घनकचरा व्यवस्थापनासाठी जागा देण्याच्या संदर्भात जे काही प्रश्न प्रलंबित असतील, या बाबतीत योग्य ती कार्यवाही करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात येतील. मुख्याधिकारी यांच्याकडून घरकचऱ्याच्या संदर्भात कार्यवाही होत नाही, त्यांच्याकडून दुर्लक्ष केले जात आहे अशीही माहिती या ठिकाणी देण्यात आली. या बाबतीत देखील शासन संबंधित प्रशासनाला योग्य ती दखल घेण्याच्या संदर्भात निर्देश देईल. सन्माननीय सदस्यांनी या अधिवेशन काळात बैठक घेण्यात यावी अशीही मागणी केली आहे. त्यांच्या मागणीच्या बाबतीत सांगू इच्छितो की, हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर गोंदिया शहरातील प्रश्नांच्या संदर्भात माझ्या स्तरावर एका बैठकीचे निश्चितपणे आयोजन केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.४६१०९...

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अतिशय नेटका प्रश्न विचारलेला आहे.गोंदिया शहरात दुर्गंधीचे वातावरण तयार होणे, तेथील गटारी उघडया असणे, घनकचऱ्याचे ढीग साचणे, या गोष्टींचा सन्माननीय सदस्यांनी प्रश्नात उल्लेख केलेला आहे. परंतु विभागाकडून "हे खरे नाही" अशा प्रकारचे उत्तर दिले आहे. हे खरे नसेल तर माननीय मंत्री महोदयांनी आता ही गोष्ट खरी आहे अशी कबुली कशी काय दिली ? त्या ठिकाणची वस्तुस्थिती पाहून सन्माननीय सदस्य प्रश्न विचारत असतात. त्या प्रश्नाचे उत्तर विभागाचे अधिकारी "हे खरे नाही" अशा प्रकारे देत असतील तर तशी उत्तरे सभागृहाची दिशाभूल करणारी ठरु शकतात. गोंदिया शहरातील गटारे बंद करण्याकरिता शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? गोंदिया नगरपरिषदेस घनकचरा व्यवस्थापनासाठी किती दिवसात जागा उपलब्ध करुन देण्यात येईल ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46109.....

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, प्रश्नामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम झाला आहे हे खरे आहे काय, मलेरिया, डेंग्यू आणि गॅस्ट्रो यासारखे रोग पसरले आहेत हे खरे आहे काय या प्रश्नाला 'हे खरे नाही' असे उत्तर दिले आहे. जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने सूचना दिल्या जातील. घनकचरा प्रकल्पासाठी जागा द्यावयाची असेल तर योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना शासनाकडून दिल्या जातील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे गोंदिया शहरामध्ये प्रदूषण वाढले आहे असे या ठिकाणी नमूद केले आहे. प्रश्न मुख्याधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेचा नसून गोंदिया शहराच्या नगरपरिषदेचा अर्थसंकल्प किती रक्कमेचा आहे, त्यातून घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची योजना राबविणे शक्य होत नसेल तर अधिक निधी उपलब्ध करुन द्यावा लागेल. मोठया शहरातील महानगरपालिकांना इतर माध्यमातून निधी उपलब्ध करुन दिला जातो. गोंदिया शहराचा अशा योजनेमध्ये समावेश करुन त्यांना अधिक निधी देण्याबाबत शासन विचार करील काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, गोंदिया शहरात घनकचरा गोळा करण्यासाठी 80 घंटागाड्या सुरु आहेत. प्रत्येक प्रभागामध्ये एका ट्रॅक्टर ट्रॉलीच्या माध्यमातून कचरा उचलला जातो. गोंदिया शहराला आर्थिक ताकद देण्यासाठी केंद्र शासनाच्या पाणीपुरवठा योजनेमधून म्हणजे युआयडीएसएसएमटी अंतर्गत गोंदिया शहराचा समावेश केला असून निधी उपलब्ध करुन दिला आहे. घन कचऱ्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना शासनाकडून लवकरात लवकर सूचना देऊ.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, राज्य सरकारला दरवर्षी केंद्र शासनाच्या घनकचरा व्यवस्थापन कायद्यांतर्गत ग्रॅंट मिळते. त्यातून नगरपरिषदांना आर्थिक सहाय्य दिले जाते. गोंदिया नगरपरिषदेला आतापर्यंत या योजनेच्या माध्यमातून किती ग्रॅंट दिली गेली? या कायद्यांतर्गत घन कचरा विल्हेवाटीसाठी जागेची मागणी केली गेली तर जिल्हाधिकाऱ्यांनी 24 तासात जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे हे खरे आहे काय?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, जागेच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने कारवाई केली पाहिजे याबाबत लवकरात लवकर सूचना दिल्या जातील. सध्या गोंदिया शहरापासून 5 कि.मी. अंतरावर क्षेपणभूमी उपलब्ध असून तेथील जागा अपुरी आहे. नगरपरिषदेला लवकरात लवकर घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून जागा देण्याबाबत लवकरात लवकर कार्यवाही केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46109..........

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून राज्य सरकारला घनकचरा व्यवस्थापनासाठी दरवर्षी ग्रँट मिळते, त्यातून गोंदिया नगरपरिषदेला आतापर्यंत घनकचरा विल्हेवाटीसाठी दरवर्षी किती ग्रँट देण्यात आली?

श्री.उदय सामंत : गोंदिया नगरपरिषदेला किती ग्रॅंट देण्यात आली याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. गोंदिया नगरपरिषदेचे क्षेत्रफळ आणि 1,32,889 लोकसंख्या विचारात घेता कचऱ्याचा प्रश्न गहन बनलेला आहे याची शासनाला जाणीव आहे. ज्या काही उपाययोजना माननीय सदस्य सर्वश्री राजेंद्र जैन, मुजफ्फर हुसेन आणि हेमंत टकले यांनी सुचविल्या आहेत त्याबाबत सविस्तर चर्चा करुन कार्यवाही केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, गोंदिया नगरपरिषद क्षेत्रातील घन कचरा उचलला जात नाही आणि क्षेपणभूमीसाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही हे माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले आहे. या सभागृहात अनेकदा क्षेपणभूमीचा प्रश्न उपस्थित केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. शहरातील घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नगरपालिकांकडे निधी उपलब्ध आहे, परंतु क्षेपणभूमीसाठी जागा उपलब्ध नाही. या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन क्षेपणभूमीसाठी वस्तीपासून किती अंतरावर जागा उपलब्ध करुन दिली जाईल? ज्या गतीने शहरे वाढत आहेत त्याच गतीने घन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जागा उपलब्ध करुन देता येत नाही.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.46109...

श्री.जयंत प्र.पाटील...

तेव्हा डंपिंग ग्राऊंडला राज्य शासनाने प्राधान्य द्यावे. जिल्ह्याच्या ठिकाणी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून जिल्हाधिकारी काम करीत असतात. त्यांना एक खास बाब म्हणून तातडीने डंपिंग ग्राऊंडसाठी जागा उपलब्ध करून देण्यासंबंधी शासन निदेश देणार आहे काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, घन कचऱ्यासंबंधी धोरणात्मक निर्णय घेण्याबाबत शासन सकारात्मक आहे. संबंधित प्रश्न हा गोंदिया शहराशी संबंधित आहे. डंपिंग ग्राऊंडसाठी जागा देण्यासंबंधी राज्य शासनातर्फे गोंदिया जिल्हाधिकाऱ्यांना निदेश देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी तपशीलवार प्रश्न विचारला आहे. डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू, मलेरिया, फायलेरिया, गॅस्ट्रो सारख्या रोगांमुळे ग्रस्त रूग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढत होत आहे हे खरे आहे काय, असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असता त्यास हे खरे नाही असे लेखी उत्तर शासनाच्यावतीने देण्यात आले आहे. मग रूग्णांची संख्या कमी झाली आहे काय, दोन व्यक्तींचा डेंग्यूमुळे मृत्यू झाला आहे ही वस्तुस्थिती आहे किंवा नाही, असल्यास, सडलेल्या कचऱ्यामुळे किती लोकांना आजाराची लागण झाली होती यासंबंधी शासनाने स्पेसिफिक उत्तर दिले तर बरे होईल असे मला वाटते.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, सप्टेंबर 2013 मध्ये डेंग्यूमुळे एका रूग्णाचा मृत्यू झाला ही वस्तुस्थिती खरी आहे. सदर मृत्यू हा तेथील गटार उघडे असल्यामुळे डासांचा प्रसार होऊन झाला असे कुठेही निदर्शनास आलेले नाही. परंतु, ही वस्तुस्थिती आहे की, तेथील गटारे उघडी आहेत. घन कचरा उघड्यावर टाकला जात आहे. त्यावर निर्बंध घालणे आवश्यक आहे. ही सगळी वस्तुस्थिती खरी असल्यामुळे जागेचा प्रश्न लवकरात लवकर सोडविणे गरजेचे आहे. जागेचा प्रश्न लवकरात लवकर सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील.

.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात बनावट रेशकार्डावर वितरित केलेल्या धान्याबाबत**

**(2) * 45234 श्री.विनोद तावडे , ॲड.आशिष शेलार , श्री.चंद्रकांत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 38012 ला दिनांक 10 एप्रिल, 2013 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सन 2012 मध्ये स्वस्त धान्य दुकानांची एकूण 71,260 निरिक्षणे घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या निरीक्षणामध्ये 54.06 लाख शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या बनावट शिधापत्रिकांवर सन 2012-13 पर्यंत किती धान्याचे वाटप करण्यात आले,

(4) सदर बनावट शिधापत्रिकांचे वितरण करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.अनिल देशमुख** : (1) हे खरे आहे.

(2) सन 2005-08, 2009-10 व सन 2011 मध्ये राबविण्यात आलेल्या अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेत ज्या शिधापत्रिकाधारकांनी विहित नमुन्यातील तपासणी अर्ज भरून दिलेले नाहीत किंवा अर्जासोबत आवश्यक ते कागदपत्र सादर केलेले नाहीत अशा एकूण 54,06,881 शिधापत्रिका धारकांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात आलेल्या आहेत. हे खरे आहे.

(3) व (4) शासनाने दिनांक 15 जुलै 2013 च्या शासन निर्णयान्वये राज्यातील अपात्र शिधापत्रिका शोध मोहिमेत अपात्र ठरलेल्या शिधापत्रिकांची चौकशी करण्याकरिता प्रत्येक महसूली विभागात विभागीय आयुक्तांना उच्च स्तरीय चौकशी करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे. त्याकरिता 6 महिन्याची मुदत देण्यात आली आहे. सदर चौकशीतून अपात्र शिधापत्रिकांद्वारे वितरीत झालेल्या धान्याचे प्रमाण तसेच अपात्र शिधापत्रिका वितरित करण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती प्राप्त होणे अपेक्षित आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, गेली अनेक वर्षे सातत्याने हा प्रश्न मांडण्याचा माझा प्रयत्न राहिला आहे. आपल्या राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, राज्यात एकूण 54 लाख शिधापत्रिका अपात्र किंवा बनावट आहेत. अपात्र आणि बनावट या शब्दाचा चांगला उपयोग माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी व त्यांच्या खात्याने केलेला आहे. अपात्र व बनावट झोपड्या या शब्दांचा उपयोग नगरविकास विभागाने देखील कधीच केला नसेल. 1 कोटी 76 लाख 19 हजार शिधापत्रिकांपैकी 54 लाख 6 हजार शिधापत्रिका ह्या अपात्र किंवा बनावट आढळतात. म्हणजे 1/3 शिधापत्रिका बनावट किंवा अपात्र आहेत. अपात्र किंवा बनावट शिधापत्रिका असो त्याचे धान्य त्या त्या रेशनिंग दुकानात जात होते. सन 2005 पासूनची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45234...

श्री.विनोद तावडे....

निरीक्षणे घेण्यात आली आहेत. तेव्हा पासून आम्ही हा विषय सभागृहामध्ये सातत्याने मांडत आहोत. माझा प्रश्न एवढाच आहे की, खाल पासून वर पर्यंत सर्व बांधले गेले आहेत. 1/3 धान्य जायचे त्याचे पुढे काय व्हायचे हे अद्याप गुलदस्त्यात आहे. ज्यावेळी आम्ही मागणी केली तेव्हा अपात्र म्हणून टाळण्यात आले. मला एक कळत नाही की, प्रत्येक गोष्टीमध्ये कोर्टाने चपराक हाणली की करायचे आणि विरोधकांनी मुद्दा मांडला की करायचे नाही असे काही शासनाने ठरविले आहे काय ? मला खरोखरच सरकारचे धोरण कळत नाही. शासनाने आता समिती स्थापन केली आहे. यासंबंधीची मागणी आम्ही गेल्या पाच सहा वर्षा पासून करीत आहोत. पण शासनाने कधीही समिती गठित केली नाही. कोर्टाने निदेश दिल्यानंतर समिती गठित करण्यात आली आहे. यासंबंधी माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. सन 2005 पासून कोणत्या पुरवठादाराकडे पुरवठ्याचे काम होते ? 1/3 शिधापत्रिका अपात्र किंवा बनावट असल्याचे निदर्शनास आले आहे. तेव्हा त्या काळात वाटप करण्यात आलेले धान्य कोणाकडे गेले आहे, त्यावेळचे पुरवठाधारक कोण होते आणि ते पुरवठाधारक व अधिकारी यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? हा माझा पहिला प्रश्न आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ४५२३४ .......**

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने रेशनकार्डचे संगणकीकरण करण्याच्या संदर्भात शासनाला तडाखा दिलेला आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यात रेशनकार्डचे संगणकीकरण होणार आहे काय ? सहा महिन्यात संगणकीकरण झाले नाही तर आम्हाला नाइलाजास्तव कोर्टात जावे लागेल.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आर्थिक पाहणी अहवालात या बाबी आढळून आलेल्या आहेत असा उल्लेख केलेला आहे परंतु मी सांगू इच्छितो की, ही बाब आर्थिक पाहणी अहवालात आढळून आलेली नाही. राज्य शासनाने आता पर्यंत सहा, सात वेळा अपात्र शिधापत्रिकेच्या संदर्भात जी शोध मोहीम राबवली होती त्या शोध मोहिमेमध्ये अपात्र शिधापत्रिकाधारक आढळून आले होते. बनावट, बोगस आणि अपात्र यामध्ये फरक आहे. समजा एक लाभार्थी काही वर्षापूर्वी पात्र असेल परंतु काही वर्षानंतर त्याचे उत्पन्न वाढले तर तो लाभार्थी अपात्र होऊ शकतो. 15 हजार ते 1 लक्ष रुपये ज्याचे वार्षिक उत्पन्न आहे अशांनाच केशरी रेशनकार्ड मिळू शकते. समजा एका व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न 1 लक्ष रुपये होते परंतु काही वर्षानंतर त्या व्यक्तीचे वार्षिक उत्पन्न 1 लक्ष रुपयापेक्षा जास्त झाले तर ती व्यक्ती केशरी शिधा पत्रिकेसाठी अपात्र होत असते. समजा एका व्यक्तीचे उत्पन्न आज 1 लक्ष रुपये असेल तर त्या व्यक्तीचे उत्पन्न 10 वर्षानंतर 1 लक्ष रुपयेच राहील असे काही नाही. त्याचे वार्षिक उत्पन्न कमी किंवा जास्तही होऊ शकते. वार्षिक उत्पन्नामध्ये वाढ झाली तर ती व्यक्ती केशरी शिधा पत्रिकेसाठी अपात्र ठरते परंतु ती व्यक्ती बोगस किंवा बनावट ठरत नाही. समजा माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या नावाने अमरावतीमध्ये कोणी बोगस रेशनकार्ड काढले तर ते कार्ड बोगस किंवा बनावट ठरते. परंतु अगोदर आर्थिक उत्पन्न कमी असल्यामुळे जे लाभार्थी पात्र होते त्या लाभार्थ्यांचे नंतर आर्थिक उत्पन्न वाढले असेल तर तो लाभार्थी अपात्र ठरतो. त्यामुळे जे लाभार्थी केशरी शिधापत्रिकेसाठी अपात्र झाले त्यांचे धान्य नंतर बंद करण्यात आलेले आहे.

जेव्हापर्यंत लाभार्थी पात्र होते तेव्हापर्यंत त्यांना धान्य देण्यात आले. परंतु जेव्हापासून लाभार्थी अपात्र झाले तेव्हापासून त्यांचे धान्य बंद करण्यात आलेले आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : ४५२३४ .......**

श्री. अनिल देशमुख ....

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये रेशन धान्य पोहचविण्याचे काम सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे केले जाते. महाराष्ट्रामध्ये 1 लक्ष 10 हजार रेशन दुकाने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये आहेत. या सर्वांवर मॅन्यूअली नियंत्रण ठेवणे फार अवघड आहे. त्यामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे मुंबई पासून जिल्हयापर्यंत, जिल्हयापासून तालुक्यांपर्यंत आणि तालुक्यांपासून खेडयापर्यंत संगणकीकरण करण्याचे काम आम्ही हातामध्ये घेतले असून आतापर्यंत संगणकीकरणाचे काम 90 टक्के पूर्ण झाले आहे. महाराष्ट्रामध्ये रेशन धान्याचे एकंदर 8.5 कोटी लाभार्थी आहेत. प्रत्येक लाभार्थ्याचे नाव, त्याच्या पत्नीचे नाव,त्याच्या वडिलांचे नाव, त्याच्या मुलाचे नाव, त्यांचे पत्ते आम्ही जमा केलेले आहेत. संगणकीकरणाचे काम 90 टक्के पूर्ण झालेले आहे. त्यामुळे येत्या सहा महिन्यामध्ये आताचे रेशनकार्ड रद्द करुन बार कोडेड रेशनकार्ड उपलब्ध करुन दिले जाणार आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, पात्र आणि अपात्र शिधा पत्रिकेच्या संदर्भात सन्माननीय मंत्री महोदयांनी माहिती दिलेली आहे. लाभार्थी अपात्र झाल्यानंतर संबंधित रेशन दुकानाचा कोटा कमी झाला होता की, पूर्वी इतकाच होता ? अपात्र आणि बोगस यामध्ये फरक आहे हे आम्हाला सुध्दा मान्य आहे. आपल्या शोध मोहिमेमध्ये आपण 71260 निरीक्षणे केली आहेत त्या मोहिमेमध्ये आपल्याला आतापर्यंत किती बोगस रेशनकार्ड आढळून आले, बोगस शिधापत्रिका धारकांवर कोणती कारवाई करण्यात आली? जीवनदायी योजनेमध्ये सुध्दा अशाच प्रकारे एक बोगस कार्ड सापडलेले आहे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये आतापर्यंत 35 बोगस रेशनकार्ड सापडलेली आहेत. ही 35 बोगस रेशनकार्ड ज्या दुकानाच्या माध्यमातून किंवा ज्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून देण्यात आली होती त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहेत. शासकीय रेकॉर्ड प्रमाणे महाराष्ट्रात आतापर्यंत केवळ 35 बोगस रेशनकार्ड आढळून आलेली आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. आपल्याकडे बोगस रेशनकार्डच्या संदर्भात माहिती असेल तर त्यासंदर्भातही चौकशी केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री.अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45234....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात फक्त 35 बोगस रेशनकार्डस सापडतात ? ....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्री महोदयांनी अधिकृतपणे 35 बोगस रेशनकार्डस आहेत असे उत्तर दिलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे असे सन्माननीय सदस्यांना वाटत असेल तर त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांना माननीय मंत्री महोदयांविरुध्द हक्कभंग प्रस्तावाची सूचना देता येते. माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरात दुरुस्ती करावी असे मी त्यांना कसे सांगणार ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण मला माननीय मंत्री महोदयांविरुध्द हक्कभंग प्रस्ताव दाखल करण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, मी, आपणास माननीय मंत्री महोदयांविरुध्द हक्कभंग दाखल करण्याची परवानगी दिलेली नाही तर नियमातील तरतूद सांगितली आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करण्याचे जाहीर केलेले आहे. अन्न सुरक्षा योजनेतील लाभार्थ्यांना नवीन रेशनकार्ड देणार की अस्तित्वात असलेल्या रेशनकार्डावर धान्य देणार,शासन नेमकी कोणती यंत्रणा राबविणार आहे, या योजनेची सुरुवात राज्यात 1 जानेवारी 2014 पासून करणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अन्न सुरक्षा योजना ही महत्वाची योजना केंद्र सरकार आणि राज्य सरकार राबवित आहे. राज्यात एकूण 8 कोटी 77 लाख लाभार्थी आहेत. त्यापैकी 7 कोटी लाभार्थ्यांना अन्न सुरक्षा योजनेंतर्गत दोन रुपये दराने गहू, तीन रुपये दराने तांदूळ आणि एक रुपया दराने ज्वारी अशा स्वस्त दरात धान्य उपलब्ध करुन देणार आहे. या योजनेचा शुभारंभ या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात करणार आहोत. या योजनेंतर्गत 7 कोटी लाभार्थ्यांना स्वस्त दरात धान्य देणार आहोत. परंतु ज्या उर्वरित 1 कोटी 77 लाख लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही त्यांना राज्य शासन 1100 कोटी रुपये खर्च करुन सध्याच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे ,अेपीएलच्या दरामध्ये धान्य देणार आहे.

..2..

ता.प्र.क्र.45234....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आर्थिक पाहणी अहवालामध्ये "बोगस रेशनकार्डस" असा शब्द वापरलेला आहे आणि त्या संदर्भात त्यांनी फूड ॲन्ड सिव्हील सप्लाय कन्झ्युमर्स प्रोटेक्शन डिपार्टमेंट गर्व्हमेन्ट ऑफ महाराष्ट्रचा रेफरन्स दिलेला आहे. त्या अहवालामध्ये म्हटले आहे की, आपल्या राज्यात कुणाचे उत्पन्न वाढेल अशी परिस्थिती नाही. तरी देखील आपण उत्पन्न वाढले असे गृहीत धरु. बीपीएलधारक एपीएलमध्ये गेला म्हणजे बीपीएलधारकांची संख्या कमी झाली पाहिजे. परंतु आर्थिक पाहणी अहवालामध्ये एपीएलधारक कमी झालेले आहेत. मग आपण उत्पन्नामध्ये वाढ झाली असे कसे म्हणू शकता ? याचा अर्थ माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. दुसरे म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनात सांगितले होते की, नवी मुंबई येथे 450 बोगस रेशनकार्डस सापडली आणि ती आम्ही रद्द केली. असे असताना आता माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, 35 बोगस रेशनकार्डस् साडपली.याचा अर्थ मागे दिलेले उत्तर खरे, आता दिलेले उत्तर खरे की माननीय मंत्री महोदयांचा संख्येतील एक आकडा वाचायचा राहून गेला, याबाबत ते स्पष्टीकरण करतील काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी येथे बीपीएल आणि अेपीएल कार्डधारकांचा उल्लेख केला. बीपीएलधारकांचे उत्पन्न वाढले म्हणून बीपीएल धारकांची संख्या कमी झाली. यामध्ये वेटींगलिस्टवर राहते. केंद्र सरकारने प्रत्येक राज्यासाठी बीपीएलधारकांचा कोटा ठरवून दिलेला आहे. आपण तो कोटा कमी करु शकत नाही किंवा त्यामध्ये वाढ करु शकत नाही. आजच्या तारखेला बीपीएल कार्डधारकांची संख्या 43 लाख आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45234....

श्री.अनिल देशमुख....

त्यातील 10 हजार एपीएलच्या यादीमध्ये गेले तर बीपीएलच्या यादीतील जे प्रतीक्षा यादीवर असतात ते बीपीएल मध्ये येतात. त्यामुळे या बाबतचा जो कोटा असतो तो मेंटेन करावा लागतो. इतरही सर्व राज्यांना तो कोटा मेंटेन करावा लागतो. मी निदर्शनास आणून देतो की, राज्यामध्ये बीपीएलचे 42 लाख लाभार्थी आहेत. सन्माननीय सदस्यांनी दुसरा मुद्दा नवी मुंबईत 350 बनावट रेशन कार्ड सापडल्याबाबतचा मांडला. मी त्यांना सांगू इच्छितो की, ते रेशन कार्ड बनावट नव्हते. या बाबत तक्रार आली होती परंतु ते रेशन कार्ड बनावट नव्हते. मी पुन्हा एकदा सांगतो की, महाराष्ट्रात फक्त 35 बोगस रेशन कार्ड आजच्या तारखेपर्यंत सापडलेले आहेत.

-----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील परेल-शिवडी डिव्हिजन येथील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाचे काम अर्धवट ठेवून विकासकांनी रहिवाशांना सदनिकेचा ताबा घेण्याबाबत केलेली जबरदस्ती**

**(३) * ४६५८१ श्री.विनायकराव मेटे , श्री.नरेंद्र पाटील , श्री.किरण पावसकर , श्री.दिपकराव साळुंखे-पाटील , श्री.हेमंत टकले , श्री.अनिल भोसले , श्री.संदिप बाजोरिया , श्री.जयवंतराव जाधव , श्री.सतीश चव्हाण , श्री.रमेश शेंडगे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : तारांकत प्रश्न क्रमांक ४२४४९ ला दिनांक १७ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परेल-शिवडी डिव्हिजन येथील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाचे काम अर्धवट ठेवून विकासकांनी रहिवाशांना सदनिकेचा ताबा घेण्याबाबत केलेल्या जबरदस्तीसंदर्भात संबंधित मंत्री महोदयांना पत्रव्यवहार केल्यानंतरही कोणतीच कार्यवाही होत नसल्यामुळे मा.राज्यमंत्री, श्री.सचिन अहिर यांनी प्रत्यक्षात उक्त गृहनिर्माण संस्थेची पाहणी रहिवासी, विकासक व म्हाडाचे संबंधित अधिकारी यांच्यासमवेत दिनांक ३ सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रसंगी मा.मंत्री महोदय व रहिवाशांसमक्ष विकासकाने रहिवाशांना त्यांच्या संस्थेच्या नावे कॉर्पस फंड देण्याचे तसेच संरक्षण भिंत, मंदिर, उद्‌वाहनाचे काचेचे दरवाजे व खिडकी, वेल्फेअर सेंटर, तसेच सभासदांना सुविधा देण्याचे मान्य केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असतानाही दिनांक ४ सप्टेंबर, २०१३ रोजी वा त्यासुमारास विकासकाने रहिवाशांसमवेत घेतलेल्या बैठकीत उपरोक्त मान्य केलेल्या बाबी मान्य केल्या नसल्याचे सांगून कॉर्पस फंड हा म्हाडाकडे जमा केला जाईल व इतर गोष्टींची संबंधितांना विचारणा करुन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल, असे उत्तर देऊन रहिवाशांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने तत्काळ चौकशी करुन रहिवाशांना न्याय देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे ?

**श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण न करता विकासकाने भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केल्याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी दि. ३ सप्टेंबर, २०१३ रोजी सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ तसेच मंडळाचे अधिकारी व प्रकल्पाचे विकासक यांचे सोबत प्रकल्पाला भेट दिली.

(२), (३) व (४) विकासकाने रहिवाशांस द्यावयाच्या सुविधांबाबत चर्चा झाल्याचे, ज्यामध्ये सभासदांनी सहकार्य केल्यास संरक्षण भिंत बांधून देण्याचे आश्वासन विकासकाने दिल्याचे तसेच विकासकाने ॲल्युमिनीयमच्या सरकत्या पॅनलच्या खिडक्या दिल्याचे नमूद करुन उर्वरित सुविधांबाबत बैठकीमध्ये ठोस निर्णय न झाल्याने राज्यमंत्री, गृहनिर्माण यांनी रहिवासी व विकासक यांना स्वतंत्र बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याबाबत सूचना दिल्याचे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत कळविण्यात आले आहे.

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, हा प्रश्न मुंबईतील परेल-शिवडी डिव्हिजन येथील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेबाबतचा आहे. हा प्रश्न गेल्या अधिवेशनात सुध्दा चर्चेला आला होता. गेल्या अधिवेशनात सुध्दा या प्रश्नाला अशाच प्रकारचे मोघम उत्तर दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर व इतर सन्माननीय सदस्यांनी त्यावर विविध प्रश्न विचारले होते. गेल्या अधिवेशनात या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये आणि आजच्या उत्तरामध्ये फार फरक नाही. त्या संस्थेतील रहिवासी त्यांचे गाऱ्हाणे सरकार आणि म्हाडाकडे मांडत आहेत. असे असताना म्हाडा किंवा मंत्री महोदय संबंधित विकासकाबरोबर बैठका घेत आहेत. त्या बैठकांमध्ये निश्चितपणे चर्चा होऊन निर्णय होतात. परंतु त्या निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणी होत नाही. आजच्या लेखी उत्तरामध्ये सुध्दा अशा प्रकारची चर्चा झाल्याचे नमूद केले आहे. माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी दिनांक 3 सप्टेंबर, 2013 रोजी चर्चा केली असून, त्या संदर्भात आश्वासन दिले आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, माननीय राज्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये जे आश्वासन दिले होते ते सरकार पूर्ण करुन घेणार काय, तसेच त्या संस्थेतील रहिवाशांना न्याय देणार काय, असल्यास किती दिवसांत न्याय देण्यात येईल ?

श्री.सचिन अहिर : महोदय, विकासकाला इतर कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. करारनाम्यामध्ये भाडेकरुंना ज्या बाबी देण्याचे नमूद केलेले आहे त्या बाबींची जोपर्यंत पूर्तता होत नाही तोपर्यंत विकासकाला अन्य कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. पूर्तता होईपर्यंत विकासकाला अन्य कोणतीही परवानगी देणार नसल्यामुळे त्यांना पुढील काम सुरु करण्याचा प्रश्नच येणार नाही.

ॲड.आशिष शेलार : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, विकासकाला पुढची कोणतीही परवानगी दिली जाणार नाही. प्रश्न क्रमांक 2, 3, व 4 च्या लेखी उत्तरामध्ये "....सभासदांनी सहकार्य केल्यास संरक्षण भिंत बांधून देण्याचे आश्वासन विकासकाने दिल्याचे तसेच विकासकाने ॲल्युमिनियमच्या सरकत्या पॅनलच्या खिडक्या दिल्याचे....." असे नमूद केले आहे. यावरुन दोन महत्त्वाच्या गोष्टी विकासकाने पूर्ण केल्या नाहीत असे लेखी उत्तरावरुन निदर्शनास येते. त्यामुळे या दोन गोष्टी विकासक कधीपर्यंत पूर्ण करुन देणार आहे ? रहिवासी आणि विकासक यांच्यामध्ये मेळ झाला नाही म्हणून सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

पुनर्रचना मंडळ यांच्याकडे तक्रारी केल्यामुळे माननीय राज्यमंत्री महोदय तेथे गेले. माननीय राज्यमंत्री आणि सभापती, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्याकडे बैठक होऊनही त्या संदर्भातील तक्रारीचे निवारण झाले नाही. लेखी उत्तरात नमूद केले आहे की, रहिवाशी आणि विकासक यांना स्वतंत्र बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, सरकार स्वत:ची जबाबदारी झटकून टाकण्याची भूमिका घेत आहे काय ?

श्री.सचिन अहिर : महोदय, आपण पार्ट ऑक्युपेशन दिलेले आहे. जे भाडेकरु ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहत आहेत ते जोपर्यंत हक्काच्या घरात जाणार नाहीत तसेच ट्रान्झिट कॅम्प जोपर्यंत डिमॉलीश होणार नाही तोपर्यंत संरक्षण भिंत करता येणार नाही. त्यामुळे संरक्षण भिंतीचा प्रश्न राहिलेला आहे. मी स्वत: भाडेकरुंचे प्रश्न सोडविण्यासाठी गेलो होतो. भाडेकरु, विकासक आणि सभापती यांची बैठक घेतली होती. परंतु त्या ठिकाणी करारनाम्याच्या व्यतिरिक्त मागणी येऊ लागली. लोकांची मागणी होती की, पूर्वी कॉर्पस फंड कमी होता तो आता वाढवून द्यावा. काहींची मागणी होती की, त्या भागात काही करता येईल काय, अशा प्रकारच्या विविध मागण्या येऊ लागल्या. त्या आपल्या अधिकारात नाहीत. त्यामुळे मी सूचना दिल्या की, करारनाम्या व्यतिरिक्त मागण्या असतील तर विकासक आणि भाडेकरुंनी एकत्रित बसून सामोपचाराने काही तरी ठरवावे. ज्या बाबी करारनाम्यामध्ये आहेत त्यांचे तंतोतंत पालन करणे क्रमप्राप्त केले आहे. विकासक जोपर्यंत करारनाम्यातील बाबी पूर्ण करणार नाही तोपर्यंत त्यांना पुढील कोणतीही परवानगी दिली जाणार नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46581 ....**

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मी माननीय राज्यमंत्र्यांचे आभार मानेन की, मागील अधिवेशनात हा प्रश्न विचारल्यानंतर त्यांनी बैठक आयोजित केली. आता ते म्हणत आहेत की, पुढील परवानग्या दिल्या जाणार नाहीत. विकासकाला भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर आता कोणती परवानगी शिल्लक राहिलेली आहे ? जानेवारी, 2013 पासून आजपर्यंत संक्रमण शिबिरात राहणाऱ्यांना त्यांचे भाडे मिळालेले नाही. त्यांना 50 हजार रूपये प्रति घर कॉर्पस फंड दिला पाहिजे, तो मिळालेला नाही. त्यांना वेलफेअर सेंटर बांधून देतो, असे त्याने सांगितले होते, ते बांधलेले नाही. आता आपल्याकडून कोणतीही परवानगी शिल्लक राहिलेली नाही. आपण तिकडे जाऊन बैठका देखील घेतल्या आहेत. त्या नंतरही मार्ग निघणार नसेल आणि रहिवाशांना द्यावयाच्या सुविधा विकासक देणार नसेल तर त्यावर तातडीने काय कारवाई करणार आणि ज्या गोष्टी देण्याच्या ठरल्या आहेत त्या रहिवाशांना किती दिवसांत मिळणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, भाडे दिलेले नाही, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. विकासकाने त्यांना भाडे देणे क्रमप्राप्त आहे. त्यांना भाडे दिले नसेल तर त्याच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. महिनाभरात त्यांचे भाडे देण्यास विकासकाला भाग पाडले जाईल. कॉर्पस फंड देण्याच्या बाबतीत माझ्यासमोर चर्चा झाली. विकासकाने हे मान्य केले. पण सोसायटी तयार होईल त्यावेळी कॉर्पस फंड दिला जाईल. आज सोसायटी प्रस्तावित आहे. जोपर्यंत सोसायटी तयार होणार नाही, तोपर्यंत अकाऊंट उघडले जाणार नाही, कॉर्पस फंड दिला जाणार नाही. विकासकाचे एक पत्र मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडे आले की, मी कॉर्पस फंड म्हाडाला देण्यास तयार आहे. पण आम्ही स्पष्ट भूमिका घेतली की, म्हाडाकडे कॉर्पस फंड घेऊन ठेवण्याची कोणतीही तरतूद नाही. त्याने सोसायटी लवकरात लवकर करणे क्रमप्राप्त आहे. रहिवाशांनी देखील त्याला सहकार्य केले पाहिजे. सोसायटी झाल्यानंतर 1 महिन्यात कॉर्पस फंड दिला जाईल. वेलफेअर सेंटरची तरतूद केली आहे. ते देण्यास विकासकाला भाग पाडले जाईल.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46581 ....**

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, जेव्हा अशा स्वरूपाच्या गृहनिर्माण सोसायट्या स्थापन होतात, तेव्हा विकासक येतात आणि काम करतात. त्यावेळी विकासक व रहिवाशी यांच्यामध्ये करार केले जातात. त्यामध्ये एरिया, उंची, बालकनींची संख्या व इतर सुविधा अशा अनेक बाबी अंतभूर्त असतात. करारात कायद्यांतर्गत अशा सर्व विशेष बाबी टाकलेल्या असतात. ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करतेवेळी त्यामध्ये कंडिशन्स टाकल्या पाहिजेत की, अशा बाबी अंतर्भूत आहेत. कारण ना हरकत प्रमाणपत्र घेऊन विकासक मनपाकडे आराखडे मंजूर करण्यास जातो, त्यावेळी ज्या बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत त्या त्यामध्ये घेत नाही. मग त्यातून वाद निर्माण होतात. ना हरकत प्रमाणपत्रामध्ये या सर्व गोष्टी अंतर्भूत करून त्या स्वरूपाचे ना हरकत प्रमाणपत्र मनपाला देणार का ? कॉर्पस फंडाच्या बाबतीत मंत्री महोदयांनी सांगितले की, म्हाडामध्ये अशी तरतूद नाही. म्हाडाच्या नियमात तरतूद केली पाहिजे की, कॉर्पस फंड डिपॉझिट म्हणून म्हाडाकडे जमा करावा, जेणेकरून रहिवाशांची पुढील काळात फसवणूक होणार नाही. कारण आपण म्हणता की, सोसायटी झाल्यावर कॉर्पस फंड दिला जाईल. पण सोसायटी केव्हा होणार ? सोसायटी ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर होणार. ऑक्युपेशन सर्टिफिकेट मिळाल्यानंतर जर त्याने कॉर्पस फंड दिला नाही तर कोर्टाची वेगळी प्रक्रिया सुरू होईल. त्यामुळे कॉर्पस फंड म्हाडाकडे डिपॉझिट म्हणून घेण्याची प्रोव्हिजन आपण करणार का ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, होय. दोन्ही चांगले विषय आहेत. दोन्हींचा विचार निश्चितपणे केला जाईल आणि तसे नियमांमध्ये अंतर्भूत करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील परेल-शिवडी डिव्हिजन येथील रत्नसिंधु सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या निमित्ताने एक बाब मला लक्षात आणून द्यावयाची आहे. अनेक ठिकाणी इमारतींचा विकास 5-10 वर्षे चालतो. विकासक-रहिवाशी यांचे संबंध अत्यंत खराब झालेले असतात. विकासक रहिवाशांना जुमानत नाहीत. शासकीय यंत्रणांचे कुठेही नियंत्रण नसते. त्यामुळे अनेक ठिकाणी असे वादविवाद निर्माण होत आहेत. शासनाने या संदर्भात काही नियम तयार करून विकासकांवर नियंत्रण करण्याच्या संदर्भात काही व्यवस्था करणार का ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 46581 ....**

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, आपल्याला माहीत असेल की, या संदर्भात विधानसभा व विधानपरिषदेत मोफा कायद्यांतर्गत सुधारणा आणली आहे. महाराष्ट्र गृहनिर्माण, 2012 हा चांगला ऐतिहासिक कायदा आणला आहे. माननीय राष्ट्रपती महोदयांकडे तो कायदा स्वाक्षरीसाठी प्रलंबित आहे. सदर कायद्याला मंजुरी मिळाल्यानंतर भाडेकरूंच्या हिताचे सर्व विषय निश्चितपणे होतील. भाडेकरूंच्या प्रश्नांच्या बाबतीत त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाईल.

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ पूर्वी श्री.कांबळे 11:35

**राज्यात मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याबाबत**

**(4) * 45189 श्री.सुभाष चव्हाण , श्री.अमरनाथ राजूरकर , श्री.संजय दत्त , ॲड.जयदेव गायकवाड , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले ,श्री.दिपकराव साळुंखे-पाटील , श्री.किरण पावसकर , श्री.विक्रम काळे , श्री.राजेंद्र जैन , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.विनायकराव मेटे , श्री.राम पंडागळे , श्री.जयवंतराव जाधव, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मागासवर्गीयांचा दीड लाखांपेक्षा अधिक पदाचा अनुशेष असून अद्याप भरला गेला नाही तो भरण्यासाठी विशेष मोहिमेला मुदतवाढ देण्यात यावी अशी मागणी मागासवर्गीय संघटनेतर्फे करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरतीच्या विशेष मोहिमेस राज्य शासनाने 31 मार्च, 2014 पर्यंत मुदतवाढ दिल्याचे माहे ऑगस्ट, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने याची दखल घेऊन मागासवर्गीयांचा अनुशेष विशेष मोहिमेच्या प्रक्रियेमुळे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) होय, मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याच्या विशेष मोहिमेस शासन निर्णय दिनांक 21 ऑगस्ट, 2013 अन्वये दिनांक 31 मार्च, 2014 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(3) या संदर्भात सर्व प्रशासकीय विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, राज्यातील शासकीय सेवेमधील मागासवर्गीयांचा अनुशेष हा महत्वाचा विषय आहे. दिनांक 12 मार्च, 2014 रोजी माझी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची 6 वर्षांची मुदत पूर्ण होत आहे. या कालावधीमध्ये मी आतापर्यंत 3 वेळा हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. परंतु तिन्ही वेळा मला शासनाकडून मिळालेल्या उत्तरातून माझे समाधान झालेले नाही. आजही या प्रश्नाला दिलेले उत्तर संपूर्ण चुकीचे आहे. शासनाने मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याची सुरुवात केल्यानंतर आजतागायत किती पदे भरलेली आहेत, या प्रश्नाला मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यासाठी दिनांक 31.3.2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे असे उत्तर देण्यात आले आहे. शासनाने मुदतवाढ दिली असली तरी हा मागासवर्गीयांवरील अन्याय आहे. त्यांच्या जागा भरण्यासाठी शासन ठोस पावले उचलणार आहे काय, मार्च, 2014 पर्यंत मागासवर्गीयांची 100 टक्के पदे भरण्यासाठी शासन खबरदारी घेणार आहे काय ?

2...

NTK/ D/ KTG/

ता.प्र.क्र.45189.........

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न यापूर्वीही उपस्थित करण्यात आला होता. दिनांक 13.4.2011 रोजीच्या जी.आर.नुसार मार्च, 2012 पर्यंत अनुशेष भरण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर दिनांक 2.8.2011 च्या जी.आर.मध्ये दिनांक 31.3.2012 पर्यंत गट 'अ' व 'ब' चा अनुशेष भरण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या. गट 'अ', 'ब', 'क' व 'ड' च्या पदांचा अनुशेष सरळसेवा व पदोन्नतीद्वारे भरण्यासाठी शासनाने विशेष मोहीम घेतली होती. त्यावेळी राज्यामध्ये सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 41,678 पदांचा अनुशेष होता. विशेष मोहीम अंतर्गत 14,221 पदे भरली होती व 27,457 पदांचा अनुशेष शिल्लक राहिला होता. दिनांक 10.4.2012 च्या जी.आर.नुसार दिनांक 31.3.2014 पर्यंत हा अनुशेष भरण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

सभापती महोदय, मध्यंतरी वित्त विभागाच्या जी.आर.मध्ये मंजूर पदांपैकी केवळ 3 टक्के पदे भरण्याची परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे सरळसेवेद्वारे अनुशेषांची पदे भरण्यास विलंब झााल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे दिनांक 28.2.2013 रोजीच्या जी.आर.नुसार गट 'अ', 'ब', 'क' व 'ड' च्या पदांसाठी 3 टक्क्यांची अट शिथिल करुन घेतलेली आहे. लाड, पागे समितीच्या शिफारशीनुसार अपंगांची पदे, जेथे 35 पदांपेक्षा कमी पदे आहेत तेथेही ही अट शिथिल करुन घेतलेली आहे. दिनांक 21.8.2013 च्या जी.आर.नुसार दिनांक 31.4.2014 पर्यंत अनुशेष भरण्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे. तसेच राज्यामध्ये शासकीय कार्यालयामध्ये नियमित भरती करण्यासाठी दिनांक 30.9.2013 अखेरपर्यंत 10,25,104 पदे होती. त्यापैकी 8,96,809 पदे भरलेली आहेत. दिनांक 1.4.2012 ते 30.9.2013 या कालावधीमध्ये 1,74,536 पदे भरलेली आहेत. त्यापैकी 50 टक्के पदे मागासवर्गीयांची भरलेली आहेत. उर्वरित अनुशेष भरण्यासाठी विशेष मोहीम घेऊन हा अनुशेष लवकरात लवकर दूर करण्यासाठी शासनामार्फत सर्व प्रकारे प्रयत्न करण्यात येत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.शिगम.......

ता.प्र.क्र.45189...

श्री. भाई गिरकर : अनुशेषाची आकडेवारी हजारात होती ती आता लाखामध्ये गेली आहे. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले की, 37 हजार पदांच्या अनुशेषा पैकी 10 हजार पदे भरलेली असून 27 हजार पदे भरावयाची आहेत. त्यांनी वित्त विभागाच्या जी.आर.चा उल्लेख केला. वित्त विभाग हा शासनापासून वेगळा नाही. तेव्हा शासन म्हणून ही 27 हजार पदे केव्हा भरण्यात येणार आहेत ?

प्रा. फौजिया खान : 2011मध्ये 27 हजार पदे रिक्त होती. त्यानंतर अनेक पदे भरण्यात आलेली असून त्याची माहिती घेण्यात येत आहे. 2011 नंतर खूप मोठ्या प्रमाणावर भरती झ ाालेली आहे. 19.11.2013 रोजी सर्व जिल्हा परिषदांना तसेच सर्व विभागांना पत्र पाठवून भरती संबंधीची माहिती देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ही माहिती संकलित होत आहे. मोठ्या प्रमाणावर पदे भरण्यात आलेली आहेत.

श्री. माणिकराव ठाकरे : सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न या सदनामध्ये उपस्थित केलेला आहे. मागासवर्गीयांची पदे भरण्यासाठी 21 ऑगस्ट 2011 पर्यंतची मुदत 31 मार्च 2014 पर्यंत वाढविलेली आहे. या पदांची भरती करीत असताना आर्थिक अडचणीमुळे काही निकष लावले जातात. तेव्हा कोणत्याही प्रकारचे निकष न लावता एक कालबद्ध कार्यक्रम आखून 31 मार्च 2014 पर्यंत 27 हजार पदे भरली जातील काय ?

प्रा. फौजिया खान : या रिक्त पदांमध्ये सरळसेवेची, पदोन्नतीची तसेच अ, ब, क आणि ड या संवर्गातील पदे आहेत. विविध ठिकाणी या पदांची भरती होते. भरती संबंधी सर्व कॅटगरीच्या पदांबाबत सर्व विभागांचे निकष राहाणार आहेत. निकष न लावता ही भरती करता येणार नाही. विभागाने मागासवर्गीयांची पदे लवकरात लवकर भरण्याच्या सूचना दिलेल्या असून त्या प्रमाणे भरती होत आहे.

श्री. रामनाथ मोते : एका बाजूला अनुशेष भरण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे असे सांगितले जात आहे तर दुस-या बाजूला अ,ब,क आणि ड या संवर्गातील पदे भरण्यासाठी बंदी घातलेली आहे. हा अनुशेष दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. अनुशेष भरण्याची मुदत 31 मार्च 2014 पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. अ,ब,क आणि ड या संवर्गामध्ये मागावर्गीयांची जी जी रिक्त पदे आहेत ती पदे भरण्यासाठी सर्व निर्बंध बाजूला ठेवून स्पेशल ड्राईव्ह घेण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45189...

प्रा. फौजिया खान : प्राप्त परिस्थितीमध्ये खात्याच्या कार्यकक्षेत जे काही शक्य आहे त्यानुसार स्पेशल ड्राईव्ह घेत आहोत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : मागासवर्गीयांच्या अनुशेषाच्या अनुषंगाने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. दिनांक 31.3.2014 पर्यंत संपूर्ण अनुशेष भरण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे असे माननीय राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. मी आणखी एक-दोन सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची परवानगी देतो. त्या प्रश्नावरील माननीय राज्यमंत्री महोदयांच्या उत्तरानंतर काय करायचे ते ठरविण्यात येईल.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45189....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सुरुवातीला उत्तर देताना सांगितले की, मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्यासाठी विशेष मोहीम राबविली गेली. 2011-2012 वर्षअखेर एकूण अनुशेषापैकी 16 हजार पदांची भरती केली गेली अशाही प्रकारचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिले आहे. मागावर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्यासंदर्भात शासन प्रयत्नशील आहे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. शासनाने मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याच्या बाबतीत दिनांक 31 मार्च, 2014 पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढीस आता फक्त चार महिन्याचा अवधी राहिलेला आहे. या चार महिन्यांच्या कालावधीत अनुशेषाची 27 हजार पदे कशा पध्दतीने भरली जाणार आहेत, "अ""ब""क"आणि "ड" प्रवर्गातील पदोन्नतीची जी पदे आहेत, त्यात आडकाठी येण्याचे काही कारण नाही. ती कालबध्द पदोन्नतीची पदे आहेत. त्या पदांमध्ये पदोन्नती देण्यामध्ये कसलीही अडचण असू नये. त्यासाठी वित्त विभागाचा संबंध येत नाही. येत्या चार महिन्यात अनुशेषाची तह 27 हजार पदे रिक्त आहेत, ती भरण्यासाठी कोणत्या प्रकारचे प्रयत्न शासनाकडून केले जाणार आहेत, पदोन्नतीची पदे भरण्यासंदर्भात देखील शासनाकडून तत्काळ निर्णय घेण्यात येईल काय ? पदोन्नतीची पदे शासनाने तत्काळ भरली तर हा रिक्त पदांचा 27 हजाराचा आकडा आहे, तो बराच कमी होईल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही 27 हजार पदे आज शिल्लक नाहीत. दिनांक 21.3.2013 पर्यंत अनुशेष भरण्यासंदर्भात मुदतवाढ दिली होती, त्यावेळची ही आकडेवारी आहे. त्यानंतर शासनाने एक वर्ष अनुशेषांच्या पदांची भरती केली आहे. त्या भरतीत बरीच पदे भरली गेली असतील. त्यामुळे 27 हजार पदांचा आकडा निश्चितपणे कमी झालेला असेल. परंतु त्या कालावधीत भरती केल्या गेलेल्या पदांची माहिती आम्हाला सभागृहासमोर आणता आली नाही. परंतु ही माहिती गोळा करण्यात येत आहे. अनुशेष भरती संदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारचे निर्बंध घातलेले नाहीत. 3 टक्क्यांची अट होती, ती सुध्दा शिथील करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी पदोन्नतीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला आहे, त्या कामाला देखील गती देण्यात येईल.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मला एक गोष्ट अतिशय दु:खदपणे नमूद करावीशी वाटते. महाराष्ट्राकडे पुरोगामी आणि आधुनिकतेकडे जाणारे राज्य म्हणून पाहिले जाते. माननीय मंत्री महोदया वारंवार सांगता आहेत की, 27 हजार पदांचा आकडा हा मार्च, 2013 पर्यंतचा आहे. आतापर्यंत अनुशेषाची किती पदे भरली आहेत व किती पदे रिक्त आहेत याची विभागाला माहिती नाही अशीही माहिती त्यांच्याकडून देण्यात आली आहे. मागासवर्गीयांची शासकीय सेवेतील अनुशेषाची मार्च, 2014 पर्यंत एवढी पदे अव्हलेबल आहेत याची माहिती शासन कधी सांगणार, अनुशेषाची किती पदे भरली व किती रिक्त आहेत या विषयी माहिती गोळा करण्याचे काम अजून दोन वर्षापर्यंत चालणार आहे काय, ही माहिती कधी पर्यंत गोळा केली जाईल ? दिनांक 31 मार्च, 2014 पर्यंत विशेष मोहिमेंतर्गत अनुशेषांची पदे भरण्याबाबतचा विषय आहे. यासंदर्भात उत्तर देताना माननीय मंत्री महोदया सांगत आहेत की, मागासवर्गीयांचा शासकीय सेवेतील अनुशेष लवकरात लवकर भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल. माहिती नाही, लवकरात लवकर करु अशा प्रकारची उत्तरे देणे योग्य नाही. मागासवर्गीयाचा शासकीय सेवेतील अनुशेष भरण्याबाबत शासनाने जे धोरण ठरविलेले आहे, ते बरोबर नाही. मागासवर्गीयाचा शासकीय सेवेतील अनुशेष कधीपर्यंत पूर्णपणे भरण्यात येईल ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी या ठिकाणी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मला असे वाटते की, या प्रश्नाबद्दलची सविस्तर माहिती माननीय राज्यमंत्री महोदयांनी दिलेली आहे. अनुशेषाच्या पदांच्या आकडेवारीमध्ये काही साशंकता राहिलेली आहे असे मला वाटते. मी पहिल्यांदा सभागृहाला आश्वासित करु इच्छितो की, मागासवर्गीयांची अनुशेषाची सर्वच्या सर्व पदे निश्चितपणे भरण्याचा शासनाचा निर्धार आहे. मागासवर्गीयांच्या अनुशेषाची सर्व पदे भरली जावीत म्हणून विशेष मोहिमेची मुदत आम्ही वारंवार वाढवून दिलेली आहे. ही मुदत मार्च, 2014 पर्यंत वाढवून देण्यात आली आहे. आकडेवारी बद्दल संभ्रम आहे. या बाबतीत मी पुन्हा स्पष्ट करु इच्छितो की, मार्च, 2013 पर्यंत मागासवर्गीयांचा अनुशेषाचा आकडा 27 हजार एवढा होता. अनुशेष भरती प्रक्रियेसंदर्भातील माहिती वेगवेगळया विभागाकडून घ्यावी लागते. ती माहिती जिल्हा, तालुका पातळीवरुन घ्यावी लागते. त्यामुळे ही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

माहिती तत्काळ मिळत नाही. या बाबतची ऑनलाईन माहिती नाही, हा आपला एक विकनेस आहे. परंतु या बाबतीत ऑनलाईन माहिती उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती आहे. या बाबतची माहिती नोव्हेंबर आणि डिसेंबर पर्यंत देण्यात यावी अशी मागणी दोन वेळा संबंधित विभागांकडे केलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45189...... श्री.पृथ्वीराज चव्हाण......

जून, 2012 पर्यंतची आकडेवारी 26 हजारापर्यंतची आहे. त्यानंतर अंदाजे माहिती प्राप्त झाली, त्यातील निम्म्यापेक्षा जास्त पदे भरली गेली आहेत. निश्चित माहिती प्राप्त झाल्यानंतर वस्तुस्थिती समोर येईल. मी सभागृहाला नम्रपणे सांगू इच्छितो की, ज्या ज्या अडचणी होत्या त्यात अ,ब,क,ड; 3 टक्के व 35 जागांपेक्षा कमी जागा असणे या संदर्भात अडचण होती. सर्वच्या सर्व अटी व शर्ती शिथिल केल्या आहेत. कोणतीही अट राहिलेली नाही. मला विश्वास आहे, मार्च 2014 पर्यंत बहुतेक पदे भरली जातील. शासन सर्वच्या सर्व पदे भरण्यासाठी कटिबध्द आहे.

सभापती महोदय, अमुक अमुक अडचणीमुळे पदे भरता येत नाहीत असे मला सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले तर ती अट शिथिल केली जाईल. वेळोवेळी सर्व अटी शिथिल केल्या आहेत. कोणतीही अट राहिलेली नाही. प्राधान्याने पदे भरली जातील हे मी सांगू इच्छितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे शहरातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्याबाबत

**(५) * ४५९१५ श्री.मोहन जोशी :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकसभेत फेरीवाले संरक्षण विधेयक संमत झाले असले तरी मागील २४ वर्षात पुणे महानगरपालिकेने फेरीवाल्यांचे सर्वेक्षणच केलेले नसल्यामुळे पालिकेकडे अधिकृत-अनधिकृत फेरीवाल्यांची माहिती नसल्याचे स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरात अधिकृत-अनधिकृत ५० हजार पथारीची संख्या असूनही जवाहर नेहरू नागरी पुनरुत्थान योजने अंतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेले हजारो गाळे पालिकेकडे पथारीचे सर्वेक्षण नसल्यामुळे आणि नियमावलीतील त्रुटीमुळे विलंब होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळले, चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, फेरीवाल्यांचे सर्वेक्षण, त्यांचे पुनर्वसन आणि गाळे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?
**श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही. पुणे महानगरपालिकेकडून शहरातील फेरीवाल्यांचे यापूर्वी सन २००७ व सन २००९ व सन २०१२ मध्ये सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.
(२),(३) व (४) जवाहर नेहरु नागरी पुनरुत्थान योजनेअंतर्गत पुणे शहरातील पथारीवाल्यांचे पुनर्वसनासाठी पुणे महानगरपालिकेकडून पाच विविध ठिकाणी एकूण ११७८ ओटे बांधण्यात आलेले आहेत. पुणे शहरातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण, २००९ लागू करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याबाबत शासनाने दिनांक २१.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये ठरवून दिलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन महानगरपालिकेकडून करण्यात आले असून, सदरचे ओटे लाभार्थ्यांना वाटपाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, युपीएच्या अध्यक्षा आदरणीय श्रीमती सोनीयाजी गांधी आणि पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी राष्ट्रीय फेरीवाला धोरण 2009 मध्ये मंजूर केले होते. मागील संसदेच्या अधिवेशनामध्ये दिनांक 6 सप्टेंबर, 2013 रोजी लोकसभेने कायदा मंजूर केला. फेरीवाला धोरणाला अनुसरुन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार राज्य शासनाने या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय दिनांक 21 ऑक्टोबर, 2013 रोजी घेतला, त्याबद्दल मी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे मनापासून अभिनंदन करतो. महाराष्ट्रातील नागरीकरणामध्ये फेरीवाला हा एक महत्वाचा घटक आहे. फेरीवाल्यांच्या दृष्टीने शासनाने घेतलेल्या निर्णयामध्ये अनेक गोष्टी नमूद केल्या आहेत. त्यासाठी भारतीय संविधानाच्या कलम 14, 19, 19(अ) व 41 नुसार फेरीवाल्यांना आपला चरितार्थ कोणत्याही अडचणी व शोषणाशिवाय करण्याचा अधिकार दिलेला आहे. रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा येणार नाही आणि फेरीवाल्यांचा उदरनिर्वाह होईल यासाठी मी दोन प्रश्न उपस्थित करु इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी......... ता.प्र.क्र.45915.....

सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये शासनाने म्हटले आहे की, आम्ही तीन वेळा सर्वेक्षण केले. पुणे महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणानुसार एकूण अधिकृत व अनधिकृत फेरीवाल्यांची संख्या किती आहे? सर्वोच्च न्यायालयाच्या गाईडलाईन्स नुसार शासनाने ऑक्टोबर, 2013 मध्ये घेतलेल्या निर्णयाला अनुसरुन राज्यातील किती महापालिकांनी या धोरणाची अंमलबजावणी केली आहे? अद्याप या धोरणाची अंमलबजावणी न केलेल्या महापालिकांवर शासन कोणती कारवाई करणार आहे? जेएनएनयुआरएम अंतर्गत पुणे शहरामध्ये 1178 गाळे बांधून तयार आहेत. शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार सर्व लाभार्थ्यांना शासनाने सर्वेक्षण करुन ओळखपत्र वाटप करायचे आहे. हे सर्व काम डिसेंबर अखेर शासन पूर्ण करणार आहे का?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय पुणे महापालिकेपुरता मर्यादित हा विषय असल्यामुळे इतर महापालिकांची आकडेवारी या प्रश्नाच्या उत्तरामध्ये नमूद केलेली नाही. पुणे महापालिकेने फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करुन चार प्रकारे संख्या मांडली आहे. फेरीवाल्यांचे स्टॉल परवानाधारक, स्थिर, बैठे व गटई असे हे वर्ग आहेत. अधिकृत 7742 फेरीवाले असल्याचे म्हटले आहे. नंतर पुन्हा एकदा सर्वेक्षण झाले. त्यात अधिकृत आणि अनधिकृत असे 10276 फेरीवाले असून एकूण 18018 इतके फेरीवाले पुणे शहरामध्ये आहेत.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाच्या गाईडलाईन्सप्रमाणे पुणे महापालिकेचे सर्वेक्षणाचे काम केव्हा पूर्ण होईल असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे. याबाबत मी सभागृहाला खात्री देतो की, 20 डिसेंबर पर्यंत सर्वेक्षणाची निविदा फायनल होईल आणि तीन महिन्यात फेरीवाल्यांचे सर्वेक्षण केले जाईल. 1178 ओटे बांधून तयार आहेत. तीन महिन्यानंतर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर वर्षाची सिनियॉरिटी निश्चित करुन ओटे वाटपाचे काम पूर्ण केले जाईल.

-----------

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भुलेश्वर येथील मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर अनधिकृतरित्या केलेले बांधकाम**

**(6) * 45592 श्री.किरण पावसकर , श्री.हेमंत टकले , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.नरेंद्र पाटील , श्री.जयवंतराव जाधव , श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी , श्री.दिपकराव साळुंखे-पाटील , श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील भुलेश्वर येथील महानगरपालिकेचा सीटी सर्व्हे क्रमांक 1164 हा भूखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असतांना तेथे अनधिकृत सहा मजली इमारत बांधून तयार झाली असून सदर इमारतीचा व्यवसायिक स्वरुपात वापर सुरु झाला असतानाही महापालिका प्रशासनाने सदर विकासकावर कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर खेळाच्या आरक्षित भूखंडावर इमारत उभी करणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच इमारतीचे सर्व बांधकाम पूर्ण होईपर्यंत कोणतीच कारवाई न करणाऱ्या महापालिकेतील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे,

(4) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (1) हे खरे नाही. सदरहू ठिकाणी अनधिकृत काम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यावर, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित विकासकास मनपा कायदा कलम 354 (अ) अन्वये काम थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली. परंतु सदर विकासकाने या कारवाई विरोधात शहर दिवाणी न्यायालयात मुंबई महानगरपालिकेविरोधात खटला दाखल केला. तसेच मा.उच्च न्यायालयात या कार्यालयाच्या निष्कासनाच्या आदेशाविरोधात अपील दाखल करण्यात आले होते. मा.उच्च न्यायालयाने सदर विकासकाला सदर बांधकामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाची रीतसर परवानगी घेण्याबाबत व तोपर्यंत चालू बांधकाम थांबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार संबंधित विकासकाने सदर बांधकाम नियमित करण्याबाबतचा प्रस्ताव महानगरपालिकेस सादर केला असता, सदर प्रस्ताव फेटाळला. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुन:श्च सदरहू विकासकाविरोधात एम.आर.टी.पी. कायद्याअंतर्गत कारवाई सुरु केली होती व त्यावेळी चालू असलेल्या बांधकामावर दि. 18.01.2012 रोजी निष्कासनाची कारवाई करण्यात आली. परंतु, सदर विकासकाने मा.शहर दिवाणी न्यायालयाचे एल.सी.सूट नं. 116/2012 अन्वये 'जैसे थे' स्थिती कायम करण्याबाबतचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केले. मा.शहर दिवाणी न्यायालाचे 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याबाबतचे आदेश असताना देखील सदर विकासकाने बांधकाम चालू ठेवल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सदर विकासकाविरोधात न्यायालयीन आदेशाचा अवमान केल्याप्रकरणी खटला दाखल करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत सदरहू प्रकरण शहर दिवाणी न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे मा.न्यायालयाच्या पुढील आदेशानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(2) प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(3) सदर प्रकरणी संबंधित महापालिका अधिकाऱ्यांची खात्यांतर्गत चौकशी सुरु आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45592...

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना उत्तरामध्ये बदल करावयाचा आहे काय, असा प्रश्न मी आपल्या अनुमतीने विचारत आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, उत्तर छापल्या प्रमाणे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबईतील भुलेश्वर येथील महानगरपालिकेचा सीटी सर्व्हे क्रमांक 1164 हा भूखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असतांना तेथे अनधिकृत सहा मजली इमारत बांधून तयार झाली असून सदर इमारतीचा व्यवसायिक स्वरुपात वापर सुरु झाला असतानाही महापालिका प्रशासनाने सदर विकासकावर कोणतीही कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,? असा प्रश्न विचारला असता शासनाने हे खरे नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. पुढे असेही नमूद करण्यात आले आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत संबंधित विकासकास मनपा कायदा कलम 354 (अ) अन्वये काम थांबविण्याची नोटीस बजावण्यात आली आहे. हे खरे नसेल तर मग आपण नोटीस का बजावली आहे ? त्यानंतर महानगरपालिकेने दिवाणी न्यायालयामध्ये खटला दाखल केला आहे. जर हे खरे नाही तर मग खटला का दाखल केला आहे ? आपण लेखी उत्तरामध्ये असेही नमूद केले आहे की, मा.उच्च न्यायालयाने सदर विकासकाला सदर बांधकामासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभागाची रीतसर परवानगी घेण्याबाबत व तोपर्यंत चालू बांधकाम थांबविण्याचे आदेश दिले होते. आपण उत्तरामध्ये हे खरे नाही असे म्हणत आहात तर मग दिवाणी न्यायालय, उच्च न्यायालय यांचा संदर्भ का दिलेला आहे. त्याही पेक्षा एल.सी.सूट नं 116/2012 अन्वये "जैसे थे" स्थिती कायम करण्याबाबतचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केले आहे, असे देखील नमूद केले आहे. अशा पद्धतीची बांधकाम, उल्हासनगर, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिकेच्या क्षेत्रात दिसून येत आहेत. मुंबईतील कॅम्पाकोला कंपनीच्या जागेवर देखील अशाच प्रकारे अनधिकृत बांधकाम झाले आहे. अशा प्रकारे खेळाच्या मैदानासाठी राखून असलेल्या भूखंडावर सहा मजली इमारती उभी राहिलेली आहे. त्यामुळे माझी लेखी उत्तरालाच हरकत आहे. तरी देखील मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, खेळाच्या मैदानावर सहा मजली इमारत उभी राहते. दिवाणी व उच्च न्यायालयातर्फे "जैसे थे" अशा प्रकारचे आदेश मिळत आहेत. आपण अशा प्रकारे अधिकाऱ्यांना पाठीशी घालतात व लोकप्रतिनिधींच्या नावाने ओरडा होतो. भुलेश्वर सारख्या भागामध्ये एवढे मोठे प्रकरण झाल्यानंतर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45592...

श्री.किरण पावसकर...

जे अधिकारी याला कारणीभूत आहेत त्यांच्यावर आज पर्यंत कोणतीही कारवाई का करण्यात आली नाही ? आजही या प्रश्नासंबंधातील लेखी उत्तर देताना सभागृहाची दिशाभूल केली जात आहे. त्यासाठी आपण कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी एक गोष्ट प्रामुख्याने निदर्शनास आणून देतो. खेळाच्या मैदानावर इमारत उभी आहे काय असा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला आहे. सदरहू भूखंड हा खेळाच्या मैदानासाठी आरक्षित नसून मनोरंजनासाठी आरक्षित करण्यात आला आहे. मनोरंजनासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर इमारत उभारण्यात आलेली आहे, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. त्यामुळेच एमआरटीपी ॲक्टनुसार कारवाई सुरू आहे. जवळ जवळ 3 ते 4 वेळा ही इमारत पाडण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते. परंतु, श्री.गिरीष जैन या विकासकाने न्यायालयात जाऊन स्थगिती मिळविली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हा भूखंड खेळाच्या मैदानासाठी आरक्षित होता.

**सभापती** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, चुकीची माहिती पटलावर येत आहे.

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, वस्तुस्थिती अशी आहे की, तेथे सहा मजली इमारत बांधण्यात आली आहे. त्यानंतर उच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने ज्येष्ठ वकिलांच्या मार्फत आपले म्हणणे न्यायालयात मांडलेले आहे. त्यानंतरची वस्तुस्थिती मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, कोर्टाचा आदेश असतानाही विकासकाने आपल्या मता नुसार त्या इमारतीच्या गाळ्यांमध्ये लोकांनासुद्धा आणून ठेवले आहे, ही वस्तुस्थिती मुंबई महानगरपालिका व शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. न्यायालयाचा अवमान केला म्हणून आम्ही पुन्हा 15 दिवसात विकासकाच्या विरोधात न्यायालयामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करीत आहोत. या प्रकरणी न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर सदर इमारत पाडण्यासंबंधातील कारवाई केली जाईल.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.45592...

**सभापती** : मी माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर मी आपणा सर्वांना पूरक प्रश्न विचारण्यास संधी देणार आहे. माननीय मंत्र्यांचे उत्तर आपण ऐकले पाहिजे. ज्याप्रमाणे माननीय मंत्री आपला प्रश्न ऐकून उत्तर देतात त्याप्रमाणे आपण त्यांचे उत्तर देखील ऐकले पहिजे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:45592...**

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात मी एवढे सांगू इच्छितो की,अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात शासनस्तरावर आणि महानगरपालिकेच्या स्तरावर कारवाई सुरु होती. दिनांक 5/4/2011 रोजी उच्च न्यायालयाने हे प्रकरण जैसे थे ठेवण्याचे आदेश दिलेले आहेत. असे असतानाही स्वत:च्या अधिकाराचा वापर करुन विकासकाने त्या ठिकाणी लोकांना ठेवण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे येत्या 15 दिवसाच्या आत कोर्टाचा अवमान झाला या कारणास्तव सिनिअर लॉयरच्या माध्यमातून पुन्हा एकदा प्रतिज्ञापत्र सादर केले जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे. परंतु हा प्रश्न अत्यंत गुंतागुतीचा आणि सभागृहाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असल्यामुळे या प्रश्नासाठी मी पाच मिनिटांचा वेळ वाढवून देत आहे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, सदर जागा खेळाच्या मैदानासाठी आरक्षित होती. खेळाच्या मैदानावर बांधकाम करता येत नाही असे राज्य शासनाचे धोरण आहे. आरजीपीजीच्या पॉलिसीला अद्याप पावेतो राज्य शासनाने मान्यता दिलेली नाही. त्यामुळे आरजीवर ज्या विकासकाने बांधकाम केले त्याला 354-अ ची नोटीस देऊन एका अर्थाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी मदत केली असे माझे म्हणणे आहे. कलम 354-अ हे प्लॅन अप्रूव्हलला गेल्यानंतर लागू होऊ शकते. सुरुवातीला कलम 351 किंवा 355 अनुसार एमआरटीपीची नोटीस का दिली नाही ? त्या जागेवर अनाधिकृत बांधकाम होत आहे हे बघण्याचे ज्या अधिकाऱ्याचे काम होते त्या अधिकाऱ्याने आरजीवर होणारे बांधकाम बघितले नाही तसेच चुकीच्या पध्दतीने नोटीस दिल्यामुळे कोर्टबाजी झाली. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कधी पर्यंत कारवाई केली जाणार आहे ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, या जागेवर अनाधिकृतपणे बांधकाम झाले आहे ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार व सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी बांधकाम सुरु असतांना कारवाई का केली नाही असा प्रश्न उपस्थित केला असून त्यासंदर्भात सखोल चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर तीन महिन्याच्या आत कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, जी बांधकामे गैरकानुनी आहेत, अनाधिकृत आहेत ती कामे अधिकृत करण्याची अधिकाऱ्यांची मोडस ऑपरेंडी होत चालली आहे. खरे म्हणजे या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.:45592...**

श्री. भाई जगताप...

प्रकरणात कलम 354 ची नोटीस लागूच शकत नाही. संबंधित अधिकाऱ्याने कलम 351 व 355 च्या नोटीसेस का दिल्या नाहीत ? या प्रकरणामध्ये संबंधित अधिकारी कोण आहे याची माहिती माननीय मंत्री महोदयांनाही असेल. संबंधित अधिकाऱ्याने या प्रकरणात कोर्टाचा अवमान करुन माणसे घुसवलेली आहेत. 354 ची नोटीस दिल्यामुळे माणसे घुसवता आली आहेत. जर कलम 351 ची नोटीस दिली असती तर माणसे घुसवण्याची संधी मिळालीच नसती. त्यामुळे ज्या अधिकाऱ्यांनी कॉन्स्परन्सी करुन नोटीस दिली आहे अशा अधिकाऱ्यावर तत्काळ निलंबनाची कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. उदय सामंत : सभापती महोदय, विकासकावर कारवाई करण्याचे प्रकरण उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. या विषयाच्या संदर्भात शासन गांभीर्याने विचार करीत असून शासनाच्या निदर्शनास आले आहे की, या ठिकाणच्या आरक्षणाच्या जमिनीवर फार मोठी इमारत बांधलेली आहे. संबंधिताने हा जो काही प्रकार केला आहे त्यासंदर्भात चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रश्नासाठी आपण वेळ वाढवून दिल्याबद्दल आम्ही आभारी आहोत. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय गोल गोल उत्तर देत आहेत. आमचे कायद्याचे ज्ञान तोकडे असेल तर माननीय मंत्री महोदयांनी आमचे कायद्याचे ज्ञान तोकडे आहे असे सांगावे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ MMP/ पूर्वी श्री.जुन्नरे.. 12:05

ता.प्र.क्र. 45592...

श्री.भाई जगताप ....

त्यांना कलम 351 आणि 355 ची नोटीस का दिली नाही, नियम 354 ची नोटीस देणारा अधिकारी आपल्यासमोर असताना चौकशी करण्याची आवश्यकता का आहे, तेव्हा संबंधित अधिकाऱ्याला सात दिवसात निलंबित करणार काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी येथे वारंवार सांगितले आहे की, कितीही मोठा अधिकारी असला तरी त्याला शासन पाठीशी घालणार नाही. कोणत्या अधिकाऱ्याने हे कृत्य केले याची चौकशी करावी लागेल आणि चौकशीअंती त्याच्यावर कारवाई केली जाईल.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, चुकीची नोटीस द्यायची, कोर्टातून स्टे घ्यायचा आणि निकाल लागेपर्यंतच्या कालावधीत इमारत बांधून पूर्ण करायची अशी मोडस ऑपरेन्टी आहे. माझा प्रश्न आहे की, ही जागा शासनाच्या मालकीची आहे की खाजगी मालकीची आहे. जर खाजगी मालकीची असेल तर ती जागा ॲक्वायर करणार काय आणि शासनाच्या मालकीची जागा असेल तर संबंधित अधिकारी आणि बिल्डरवर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ?

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, ही जमीन निर्मल राठोड या मालकाची आहे. त्या जमिनीवर मनोरंजनासाठी मैदान असे आरक्षण आहे. गिरीष जैन या विकासकाने ती जमीन ताब्यात घेऊन त्यावर बांधकाम केलेले आहे. त्याच्यावर जी काही कारवाई करावयाची आहे ती सर्व प्रोसीजर उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. सन्माननीय सदस्यांच्या ज्या काही भावना आहेत त्याच भावना शासन म्हणून माझ्यादेखील आहेत. या प्रकरणी कोणत्याही अधिकाऱ्याला पाठीशी घातले जाणार नाही. संबंधितांवर तीन महिन्यात कारवाई करण्यात येईल असे मी सांगितले आहे. तरी देखील लवकरात लवकर या प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय गांभीर्याने घेतला पाहिजे. मुंबईतील कॅम्पाकोला इमारतीचे उदाहरण आपल्यासमोर आहे. मुंबईतील पीजी आणि आरजीची मैदाने आपल्या डोळ्यासमोर बळकावली जात आहेत. कलम 354 ची नोटीस जाणीवपूर्वक दिलेली आहे. कारण कोर्टात केस गेली की, त्याचा निकाल लागण्यास उशीर होतो आणि त्याचा फायदा अधिकारीवर्ग घेत आहे. माझा प्रश्न आहे की, नियम 354 ची नोटीस देणाऱ्या अधिकाऱ्याला हे अधिवेशन संपण्यापूर्वी निलंबित करणार काय ? अन्यथा आम्ही बाहेर बसू.

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 45592...

श्री.उदय सामंत : सभापती महोदय, मी अगोदर सांगितले आहे की, अधिवेशन संपण्यापूर्वी कारवाई करण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर व जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन

**मु.शी.**: विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर व जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव

श्री.अजित पवार ( उप मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी पुढीलप्रमाणे अभिनंदनाचा प्रस्ताव मांडतो.

"विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर व जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल ही विधानपरिषद त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे."

भारताचा विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर यांचा जन्म दिनांक 24 एप्रिल, 1973 रोजी मुंबई येथे झाला. लहानपणापासून क्रिकेटची आवड असणाऱ्या श्री.तेंडुलकर यांनी गुरु श्री.रमाकांत आचरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय जिद्द, चिकाटी, नियमितपणा व अथक परिश्रम करुन दिनांक 15 नोव्हेंबर, 1989 रोजी वयाच्या 16व्या वर्षी पाकिस्तान विरुध्दच्या कसोटी सामन्यात पदार्पण केले. तेव्हापासून आजवर या विश्वविक्रमवीराची बॅट अखंड तळपत राहिली. श्री.तेंडुलकर यांनी जागतिक क्रिकेटच्या इतिहासात स्वकर्तृत्वाने विशेष स्थान प्राप्त केले आहे. क्रिकेट विश्वातील सर्व खेळाडू त्यांच्याकडे प्रेरणास्थान म्हणून पाहतात.

श्री.सचिन तेंडुलकर यांनी आपल्या क्रिकेट कारकिर्दीत 463 एक दिवसीय सामन्यात 49 शतके व कसोटी क्रिकेटमध्ये 200 सामन्यात 51 शतके झळकावत शतकांचे शतक करण्याचा विक्रम आपल्या नावावर नोंदविला आहे. त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये 15 हजार 921 धावा तर एक दिवसीय सामन्यात 18 हजार 426 धावा करुन आपल्या क्रिकेटच्या एकूण 24 वर्षाच्या कारकिर्दीत 34 हजार 347 धावांचे उत्तुंग शिखर पार करीत दुहेरी विश्वविक्रम नोंदविला. त्यांनी एक दिवसीय सामन्यात 96 अर्धशतके तर कसोटी क्रिकेटमध्ये 68 अर्धशतके अशी एकूण 164 अर्धशतके तर कसोटी सामन्यात 46 तर एक दिवसीय सामन्यात 154 असे एकूण 200 बळी मिळविले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ पूर्वी श्री.अजित.... 12:10

श्री.अजित पवार....

आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या इतिहासात कसोटी आणि एक दिवसीय सामन्यात सर्वाधिक धावांचे विश्वविक्रम एकाच फलंदाजाच्या नावावर नोंदविले जाण्याची पहिलीच वेळ आहे.

श्री.सचिन तेंडुलकर आणि क्रिकेटमधील विक्रम हे एक समीकरण होऊन गेले. जवळ जवळ सर्वच विक्रम त्यांनी आपल्या नावावर नोंदवून खेळाडूंपुढे एक प्रकारचे आव्हानच ठेवले आहे. सचिन तेंडुलकर यांची फलंदाजी म्हणजे आबाल-वृध्दांना मोहून टाकणारी संजीवनी ठरली आहे. क्रिकेटशिवाय आणखी किती तरी सामाजिक आशयाचे पैलू श्री.सचिन तेंडुलकर यांनी जोपासले आहेत. 26/11 च्या मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर त्यांनी झळकविलेले शतक मुंबईतील हल्ल्यांना समर्थपणे तोंड देणाऱ्या पोलीस अधिकारी, जवान, कमांडोज् व फायर ब्रिगेडचे अधिकारी/कर्मचारी यांना अर्पण करुन सामाजिक बांधिलकी जपली होती.

या विश्वविख्यात खेळाडूने क्रिकेटमध्ये केलेल्या असामान्य कामगिरीसाठी महाराष्ट्र राज्याचा "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार, "अर्जून" पुरस्कार, "विस्डेन" पुरस्कार, "राजीव गांधी खेलरत्न" पुरस्कार, "पद्मश्री" पुरस्कार आणि 2008 साली "पद्मविभूषण" पुरस्कार या सारख्या अनेक पुरस्कारांनी त्यांचा गौरव केला आहे. दिनांक 16 नोव्हेंबर, 2013 रोजी श्री.सचिन तेंडुलकर यांनी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर आपल्या कारकिर्दीतील 200 वा कसोटी सामना खेळून क्रिकेट मधून निवृत्ती घेतली आहे. सचिन नावाच्या झंझावाताने गेली 24 वर्षे केवळ भारतीयांच्याच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांवर मोहिनी घातली आहे.

क्रिकेट क्षेत्रात गेली दोन तपे शेकडो मैदाने गाजवणारा व क्रिकेट विश्वात रोज नवनवे उच्चांक प्रस्थापित करणारा विक्रमादित्य निवृत्त होत असताना त्यांच्या क्रिकेट क्षेत्रातील या देदीप्यमान कारकिर्दीची दखल घेऊन भारत सरकारने देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" पुरस्कार देऊन त्याचा गौरव केला. वयाच्या अवघ्या 40 व्या वर्षी "भारतरत्न" पुरस्कार मिळविणारा क्रीडा क्षेत्रातील हा पहिला खेळाडू आहे हा ही नवा ऐतिहासिक विक्रम सचिनच्याच नावावर नोंदविला गेला आहे.

क्रिकेटमधील या विश्वविक्रमी असामान्य क्रिकेटपटूला देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

महोदय, आता मी दुसरा अभिनंदनपर प्रस्ताव मांडतो.

"जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल ही विधानपरिषद त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे."

भारताच्या पहिल्या आणि महत्त्वाकांक्षी मंगळ मोहिमेचे शिल्पकार व जागतिक किर्तीचे थोर रसायनशास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव. ऊर्फ चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांचा जन्म दि.30 जून, 1934 रोजी बंगळूर येथे झाला. लहानपणापासूनच विज्ञानाची विलक्षण आवड असणाऱ्या राव यांनी अतिशय जिद्दीने एम.एस्सी., पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर डॉ.लिबर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया या ठिकाणी रसायनशास्त्रामधील संशोधन कार्यास सुरुवात केली. 1960 मध्ये भारतात आल्यानंतर त्यांनी आय.आय.टी., कानपूर, आयआयएस, बेंगलोर या संस्थांमध्ये पदार्थ विज्ञान आणि पदार्थ रसायन या विषयात अथक संशोधन केले. त्यानंतर पुरदुई, ऑक्सफोर्ड, केम्ब्रिज कॅलिफोर्निया, सांता बार्बरा या विद्यापीठांत मानद प्राध्यापक म्हणूनही काम केले. गेल्या दोन दशकापासून त्यांनी हायब्रिड मटेरियल यासह अनेक नॅनो मटेरियलमधील संशोधनात फार मोठे योगदान दिले. त्यांनी 1400 शोधनिबंधांबरोबर 45 पुस्तकांचे विपुल लेखनही केले आहे. ऑक्साईड धातूच्या परिवर्तनीय गुणधर्मावरील त्यांचे संशोधन जागतिक पातळीवर स्वीकारले गेले तर एलए2, सीयूओ4 यासारख्या द्विआयामी ऑक्साईडच्या संशोधनाने तर त्यांची किर्ती जगभर पसरली.

नंतर श्री.कांबळे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

संशोधन कार्याबरोबर त्यांनी बंगळूर येथे जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स सायंटिफिक रिसर्च ही संस्था स्थापन करून 125 पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, त्यांनी इंटरनॅशनल सेंटर फॉर मटेरियल सायन्स या संस्थेचे संचालक तर पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्यांनी चीन आणि भारत या दोन देशांतील वैज्ञानिक सहकार्य वाढविण्यात फार मोठे योगदान दिले आहे. गेल्या पाच दशकांपासून रसायन शास्त्रातील संशोधन आणि विज्ञान विकासामधील अद्वितीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना दोन डझनहून अधिक विद्यापीठांनी "डॉक्टरेट" पदवी देऊन गौरवले आहे. एवढेच नव्हे तर अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या डॉ. राव यांची "मिस्टर सायन्स ऑफ इंडिया" अशीच ओळख आहे. वैज्ञानिक क्षेत्रातील त्यांच्या या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मविभूषण पुरस्कारांनी यापूर्वीच सन्मानित केले आहे.

डॉ. राव यांनी अभ्यासूवृत्ती, कुशाग्र बुध्दिमत्ता, चिकाटी व असामान्य कर्तृत्व यांच्या जोरावर रसायन शास्त्रात क्रांतिकारी संशोधन करून भारताचा नावलौकिक जगभरात वाढविला आहे. त्यांच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी भारत सरकारने त्यांना "भारतरत्न" ह्या देशातील सर्वोच्च पुरस्काराने गौरविल्याबद्दल आपणा सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. त्यांच्या पुढील संशोधन कार्यास हार्दिक शुभेच्छा देतो.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री यांनी विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर व जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ. सी. एन. आर. राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल विधानपरिषद मन:पूर्वक अभिनंदन करीत आहे, अशा प्रकारचा जो प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील महान व्यक्तिमत्वांपैकी महर्षी धोंडो केशव कर्वे, पांडुरंग काणे, विनोबा भावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लता मंगेशकर, भीमसेन जोशी या 6 जणांना "भारतरत्न" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे आणि श्री. सचिन तेंडुलकर यांना मिळालेला हा सातवा "भारतरत्न" पुरस्कार आहे. स्वाभाविकपणे आपणा सर्वांना त्याचा वेगळा अभिमान नक्कीच आहे. श्री. सचिन तेंडुलकर यांची लोकप्रियता, त्यांनी त्यांच्या क्रिकेट कारकिर्दीत मिळविलेले यश, त्यात निर्माण केलेले विक्रम यांची सर्वांना माहिती आहे. त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत विक्रम केले, घावांचा डोंगर उभा केला, खेळातील शिस्त स्वत:च्या आयुष्यात बाणवली, या सर्व गोष्टींचा विचार करता, ते विश्वविक्रम करणारे केवळ एक लोकप्रिय किकेटपटूच नाहीत तर त्या पलीकडेही श्री. सचिन तेंडुलकर खूप काही आहेत.

महोदय, श्री. सचिन तेंडुलकर यांचे क्रिकेटमधील स्थान वेगळेच आहे. आपल्याला आश्चर्य वाटेल की, सन 1987 मध्ये भारत विरूध्द इंग्लंड या दोन देशांत वर्ल्ड कपच्या सेमी फायनलमध्ये श्री. सचिन तेंडुलकर हे त्या स्टेडियमवर बॉल बॉय म्हणून काम करीत होते आणि श्री. सचिन तेंडुलकर यांच्या शेवटच्या मॅचमध्ये त्यांचा मुलगा हा बॉल बॉय म्हणून काम करीत होता आणि त्याअर्थी ती त्याच्या पदार्पणाची एक सुरूवात म्हटली जाऊ शकते. श्री. सचिन तेंडुलकर यांनी भारतीय संघाचे कप्तानपद भूषविले. त्यांच्या लक्षात आले की, या जबाबदारीमुळे आपल्या बॅटिंगवर परिणाम होत आहे. एकदा नंबर एकला गेल्यानंतर सुध्दा सहजपणे दुसऱ्याच्या कप्तानपदाखाली काम करणे आणि तितकेच किंवा त्याहूनही अधिक चांगले परफॉर्म करणे याला मनाची वेगळी उंची लागते.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

ती उंची सचिन तेंडुलकर यांच्या कामामध्ये होती. क्रिकेटमध्ये येणाऱ्या अनेक तरुण मुलांना मला सचिन तेंडुलकर व्हावयाचे आहे असे वाटत असते. सचिन व्हावयाचे आहे म्हणजे काय ? सचिन तेंडुलकर यांच्याविषयी आपण बोलतो, वाचतो, ऐकतो, केव्हा तरी त्यांना भेटलो होतो. त्यांच्याबरोबर बोलण्यातील एक गोष्ट मला आर्वजून आठवते. शेन वॉर्न हा लेगस्पिनर भारतात प्रथमच येणार होता. भारतात येण्यापूर्वी त्याने जगातील अनेक देशातील सामन्यांमध्ये जबरदस्त बॉलिंग केली होती. त्या बॉलिंगसमोर कोणताही बॅटस्मन टिकला नव्हता. शेन वॉर्न भारतात आल्यानंतर सचिन तेंडुलकरची काय अवस्था होईल अशा प्रकारची चर्चा क्रिकेट जगतामध्ये सुरु होती. शेन वॉर्नचे हे आव्हान सचिन तेंडुलकर यांना माहीत होते. म्हणून सचिन तेंडुलकर यांनी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यापूर्वी एक महिना अगोदर भारतातील 10 टॉप स्पिनर्सना मुंबईत बोलविले होते. वांद्रे येथील एमआयजी क्लबमध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था केली होती. रोज सकाळी 5.30 वाजता आल्यानंतर 6.30 पर्यंत वॉर्मिंगअप् करुन झाल्यावर उजेड आल्यानंतर 6.30 ते 12.30 पर्यंत 10 लेगस्पिनर्स फक्त बॉलिंग करीत असत व सचिन तेंडुलकर नेटमध्ये बॅटिंगची प्रॅक्टिस करीत असे. अशा प्रकारची प्रॅक्टीस ते करीत होते. दुपारी 12.30 ते 1.30 पर्यंतच्या जेवणाच्या सुट्टीनंतर पुन्हा सायंकाळी 5.30 पर्यंत ते नेट प्रॅक्टिस करीत होते. अशा प्रकारे एक महिना प्रॅक्टिस केल्यामुळे शेन वॉर्नच्या बॉलिंगची अपेक्षेप्रमाणे अतिशय वाईट अवस्था झाली होती. सचिन तेंडुलकरच्या बॅटिंगसमोर शेन वॉर्न निष्प्रभ ठरला होता. मला वाटते की, ही जिद्द, चिकाटी, मेहनत, शिस्त त्यांच्या अंगी होती म्हणून तसे घडले होते. सचिन तेंडुलकर या कर्तृत्वामुळेच यशस्वी झाले होते. त्याच्या पाठीमागे त्यांची अफाट मेहनत आहे.

एकदा एमआयजी क्लबमध्ये दुपारच्या जेवणाच्या वेळी वरच्या रेस्टॉरण्टमध्ये आम्ही 2-4 जण एकत्र बसलो असताना सचिन तेंडुलकर यांच्या घरचा डबा आला होता. त्यांचा तो डबा खूप मोठा होता. त्यावेळी आम्ही त्यांना असे विचारले की, आपण एकत्र जेवणार आहोत हे तुम्हाला आधीच कसे समजले ? त्यावेळी त्यांनी हा डबा माझ्यासाठी आला आहे, तुमच्यासाठी तुम्ही वेगळे जेवण मागवावे असे सांगितले होते. त्यावेळी सचिन एका वेळी 24 फुलके खात असल्याचे समजले. आम्ही त्याबाबत विचारले तर त्यांनी असे म्हटले की, मुंबई महानगरपालिकेतील रस्त्यावर काम

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.विनोद तावडे....

करणारा मजूर एक दिवसाचे काम करतो त्याच्या चौपट आम्ही काम करतो. दिवसातून आम्ही 500 वेळा बॅट वरखाली करतो. तुम्ही फक्त 10 वेळा ती बॅट वरखाली करुन बघा. या सर्वासाठी त्यांना ठराविक डाएट, कार्बोहायड्रेटस्‌ची आवश्यकत असते. इतकी ताकद बॅटिंगसाठी असावी लागते असे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे क्रिकेटसाठी आपले संपूर्ण आयुष्य प्लॅन करणे आवश्यक असते. सगळ्यात महत्वाचे म्हणजे, राजकीय क्षेत्रात, सिने क्षेत्रात असलेल्या माणसांच्या डोक्यात हवा गेल्यामुळे माणसातील माणूसपण हरविलेले असते. त्यांच्याबरोबर क्रिकेट क्षेत्रात आलेले अनेक खेळाडू त्या दर्जाचे होते, पण सचिन तेंडुलकर यांनी आपल्या जीवनामध्ये माणुसकी, व्हॅल्यूज टिकविल्या आहेत. त्यामुळे त्यांचे मोठेपण अधिक आहे असे मला वाटते. त्यांच्या साध्या साध्या गोष्टींकडे व्हॅल्यूज म्हणून पाहता येईल.

मच्छर मारण्याच्या बॅटमधून क्रिकेटचा बॉल बाहेर येतो अशी पेप्सीची एक जाहिरात होती. क्रिकेट क्षेत्राचे असे अवमूल्यन होऊ नये यासाठी त्यांनी करोडो रुपयांच्या ऑफरची ती जाहिरात नाकारली होती. यावरुन खेळाविषयी त्यांची कमिटमेण्ट दिसून येते. अनेक खेळाडूंना जाहिरातीच्या माध्यमातून करोडो रुपये मिळत असल्याचे आपण पाहत असतो. पण क्रिकेटशी आपले नाते किती खोलवर आहे ते त्यांनी दाखवून दिले आहे.

सचिन तेंडुलकर सेवानिवृत्त झाल्याच्या दिवशी सगळ्या क्रिकेटप्रेमींच्या डोळ्यात पाणी होते. ते पाणी घरंगळत खाली येत होते. त्यावेळी त्यांनी पिचला नमस्कार केला होता.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

या 22 यार्डाच्या पिचला तो मंदिर समजत असे. आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे कोणत्याही प्रकल्पाच्या कामाच्या सुरुवातीची कुदळ मारण्यापूर्वी भूमातेचे पूजन करण्यात येते. या प्रमाणे सचिनने क्रिकेटच्या 22 यार्डाच्या पिचला शेवटच्या क्षणी वाकून वंदन केले. अशी आदर्श मूल्ये सचिनने जोपासलेली आहेत. या मूल्यांनी त्याला अधिक मोठे केले आहे. मुंबईमधील त्याच्या बंगल्यावरुन काही वाद निर्माण झाले होते. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांनी त्याला त्याबाबतीत मदत केली होती. त्यावेळी सचिन तेंडुलकरने सांगितले की, "मला मुंबई महानगरपालिकेचा एकही पैसा बुडवायचा नाही किंवा कोणतेही नियमबाह्य काम करावयाचे नाही." नाहीतर आपल्या ग्लॅमरचा फायदा घेऊन कोणीही चार गोष्टी त्याच्या मनाप्रमाणे करुन घेतल्या असत्या. परंतु सचिनने आपल्या लौकिकाचा कोणताही उपयोग करुन घेतलेला नाही. मी माझ्या क्षेत्रामध्ये कितीही महान असलो तरीही मी एक सामान्य माणूस आहे अशा प्रकारचे सचिनचे वागणे आहे.

आता क्रिकेटमध्ये खूप स्पर्धा वाढलेली असून अनेक तरुण खेळाडू पुढे येत आहेत. या खेळाडूंना संधी मिळावी यासाठी रणजी ट्राफीसारख्या मॅचेसमधून 11 ऐवजी 15 खेळाडूंची निवड केली गेली पाहिजे असा आग्रह सचिनने एमसीएकडे धरलेला आहे. आपल्या यशाचे श्रेय त्याने आपल्या आईला दिले आहे. तसेच आपल्या पत्नीच्या सहभागाला देखील त्याने तितकेच महत्व दिलेले आहे. आपल्या शेवटच्या भाषणामध्ये त्याने त्याच्या बहिणीने दिलेल्या बॅटचा देखील अतिशय भावुकतेने उल्लेख केला. Sachin was very much clear. आपण क्रिकेटच्या क्षेत्रामध्ये कितीही उंचीवर पोहोचलो तरी जीवनमूल्ये विसरायची नाहीत, माणुसकी विसरायची नाही हे तत्व त्याने अंगीकारलेले आहे.

क्रिकेटमधील निवृत्तीनंतर जीवनामध्ये थोड्याशा मोकळेपणाने वावरावे, पत्नी, मुले यांच्यासाठी वेळ द्यावा, सर्वसामान्य माणसासारखे जीवन जगावे असा मनोदय त्याने आपल्या भाषणामध्ये व्यक्त केला होता. परंतु त्याला "भारतरत्न" हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्यामुळे काही निर्बंध येणे स्वाभाविक आहे.

सचिन हा सामाजिक कार्याशी केवळ पैसे देण्यामुळे जोडला गेलेला नाही. प्रत्येक मॅचमध्ये एक माणूस भारताचा तिरंगा घेऊन फिरायचा. त्याला विविध संस्थाकडून स्पॉन्सर केले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

एनडीटीव्हीने शाळेतील मुलींच्या गळतीचा सर्व्हे केला त्यावेळी युरेनल नसल्यामुळे मुलींची गळती होते असे लक्षात आल्यानंतर त्याबाबतीत सुरु केलेल्या मोहिमेमध्ये सचिनने ॲम्बॅसेडर म्हणून भूमिका बजावली.

बॉलरचा पाय कसा पडतो हे पाहून तो कसा बॉल टाकेल हे ओळखण्याची क्षमता सचिनमध्ये होती.

...नंतर श्री. गिते...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

अशा प्रकारचे कर्तृत्व असून सुध्दा आपल्यातील माणूसपण, आपल्यातील मूल्यांचा ऱ्हास होऊ न देणे या सगळया कारकिर्दीमध्ये एकही कॉन्ट्रॉव्हर्शल स्टेटमेंट न देणे हे तत्व त्यांनी पाळले. अनेक प्रसंग आले. काही प्रसंगाचे आम्ही साक्षीदारही होतो. त्यांनी कोणत्याही गोष्टीबाबत कधीही कॉन्ट्रॉव्हर्शल स्टेटमेंट केलेले नाही. भारतातील महान खेळाडूला, भारतातील एका नागरिकाला, विशेषत: आपल्या महाराष्ट्रातील महान खेळाडूला "भारतरत्न" पुरस्कार देऊन सन्मानित केले त्याबद्दल विधानपरिषद सभागृहाच्या माध्यमातून त्यांचे आपण मन:पूर्वक अभिनंदन करीत आहोत.

सभापती महोदय, एकाच दिवशी दोन "भारतरत्न" पुरस्कार घोषित झाले. त्यातील एक खेळाडू म्हणून लोकप्रिय आहे. त्याच्या खेळाच्या लोकप्रियतेमुळे त्याचे नाव, त्याचे कर्तृत्व, त्यांच्या चांगल्या गोष्टी हया स्वाभाविकपणे मार्केटमध्ये सेल व्हावयाच्या. पण श्री.सचिन तेंडुलकर यांच्या इतकेच कर्तृत्व नव्हे तर त्याही पेक्षा अधिक मोजता येईल एवढे कर्तृत्व शास्त्रज्ञ डॉ.चिंतामणी नागेश रामचंद्र राव यांच्याकडे असल्यामुळे त्यांना देखील " भारतरत्न" पुरस्कार घोषित केला गेला. विशेष म्हणजे भारतरत्न पुरस्कार 40 वर्ष वयाच्या श्री.सचिन तेंडुलकर यांना घोषित झाला आणि 89 वर्ष वयाच्या डॉक्टरांनाही "भारतरत्न" पुरस्कार घोषित झाला. श्री.सचिन तेंडुलकर हे महाराष्ट्रातील आहेत, डॉ.चिंतामण राव यांचे कुटुंब शिवाजी महाराजांच्या सैन्यासोबत सारा वसुलीसाठी दक्षिणेकडे गेले आणि कोलार येथे स्थायिक झाले. त्यांच्या कुटुंबीयांचे कुलदैवत कोल्हापूरची अंबाबाई आहे. या दोन्ही व्यक्ती भारतीय आहेत. त्यातल्या त्यात या दोन्ही व्यक्ती महाराष्ट्रातील असल्यामुळे त्यांच्या विषयी अभिनिवेश नकळत आपल्या सगळयांच्या मनात असणे स्वाभाविक आहे.

सभापती महोदय, डॉ.चितामण राव यांनी दीड हजाराहून अधिक शोध निबंध लिहिले आहेत. या गोष्टीचा माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार साहेबांनी देखील उल्लेख केला. 1500 पेक्षा अधिक शोध निबंध लिहिणे, त्यांचे विषय शोधणे हे खूपच कठीण काम आहे आणि ते काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडले आहे. त्यांच्या शोध निबंधांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळालेली आहे, ही अतिशय गौरवाची बाब आहे. डॉ.चिंतामण राव यांच्या बाबतीत वृत्तपत्रात लिहून आले होते की, ते मोबाईल आणि ई-मेलचा वापर करीत नाहीत. डॉ.चिंतामण राव हे आंतरराष्ट्रीय स्तरातील शास्त्रज्ञ असूनही ते मोबाईल, ई-मेल, वॉटस्-ॲप याचे गुलाम झाले नाहीत. म्हणून

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

त्यांना त्यांच्या क्षेत्रात काम करण्यासाठी वेळ मिळाला असावा. ते वॉटस्-अप यांचे गुलाम झाले असते तर त्यांना शोध निबंध लिहिण्यास कदाचित वेळ मिळाला नसता. डिजिटल मिडियाच्या जगात आंतरराष्ट्रीय दर्जाचा शास्त्रज्ञ मोबाईल आणि ई-मेल पासून दूर राहू शकतो या विषयी मला खरोखरच आश्चर्य वाटते. डॉ.राव हे संशोधक आहेतच. अफाट कष्ट घेणारे खरे शिक्षक म्हणून त्यांचा मोठा परिचय आहे. दिवसाच्या 24 तासातील 1 मिनिट सुध्दा वेळ वाया जाणार नाही या पध्दतीचे नियोजन करणारा माणूस म्हणून विद्यार्थ्यांमध्ये त्यांची ओळख होती. देशात विज्ञानाची पायाभरणी करुन त्यावर कळस चढविला पाहिजे अशी त्यांची मानसिकता आहे. विद्वान माणसे स्पष्ट असतात, तसे ते स्पष्ट आहेतच...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

पण सहजपणे सगळ्यांमध्ये मिसळणारे म्हणून डॉ.राव त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये परिचित आहेत. संशोधनासाठी वेळ कुठून आणायचा असा प्रश्न त्यांना कधी पडला नाही. वयाच्या 80 व्या वर्षी सुध्दा ते प्रयोगशाळेमध्ये जाऊन संशोधनाचे काम करीत होते. ही कमिटमेंट संशोधनाच्या क्षेत्रासाठी आहे. अशा प्रकारचा ध्यास घेतल्यामुळे अनेक संशोधनात्मक गोष्टी त्यांच्या हातून घडल्या आहेत. 50 हजार सायटेशन वाट्याला आलेले डॉ.राव हे एकमेव भारतीय संशोधक आहेत.

सभापती महोदय, सचिन तेंडुलकर यांनी क्रिकेट खेळामध्ये शतकांचा रेकॉर्ड केला आहे, त्याच पध्दतीने डॉ.राव यांनी 50 हजार सायटेशनचा रेकॉर्ड केला आहे. नॅनो मटेरियल विषयातील त्यांचे मार्गदर्शन असेल किंवा त्यांचे ॲकॅडमिक फिल्डमधील यश विचारात घेऊन भारत सरकारने त्यांचा यथोचित गौरव केला आहे. सचिन तेंडुलकर आणि डॉ.राव यांना भारतरत्न हा सर्वोच्च सन्मान पुरस्कार देऊन बॅलेन्स सांभाळला आहे. खेळातील पहिला भारतरत्न पुरस्कार ध्यानचंद यांना दिला पाहिजे असे मत अनेकांनी व्यक्त केले आहे. लोकशाहीमध्ये प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यांचे कर्तृत्व सर्वांना मान्य आहे. परंतु त्यामुळे सचिन तेंडुलकर यांचे महत्व कमी होत नाही. एकाच दिवशी सचिन तेंडुलकर आणि डॉ.सी.एन.आर.राव यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करुन भारत सरकारने यथोचित पाऊल उचलले आहे. त्यामुळे डॉ.राव यांचे सुध्दा या सभागृहात मी मनापासून अभिनंदन करतो आणि त्यांच्या पुढील शोधकार्याला शुभेच्छा देतो. सचिन तेंडुलकर यांना आयुष्यातील उर्वरित क्रिकेट खेळाबाहेरील विक्रम करावयाचे असतील तर ते करण्यास सदिच्छा व्यक्त करतो.

--------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी मांडलेल्या अभिनंदनाच्या प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर फक्त गटनेत्यांनी आपले विचार मांडावेत असे असले तरी डॉ.राव यांच्या संदर्भात मी बोलणार असलो तरी सचिन तेंडुलकर यांच्या संदर्भात माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना विचार मांडण्यास अनुमती द्यावी.

**सभापती** : फक्त गटनेत्यांनी बोलायचे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर आणि जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांचा आगळावेगळा राष्ट्रीय बहुमान झालेला आहे. सचिन तेंडुलकर यांच्या गौरवाच्या संदर्भात अभिनंदन प्रस्तावामध्ये महत्वाचे मुद्दे नमूद केलेले आहेत. त्यांच्या संदर्भात प्रत्येकाला बोलावे असे वाटण्याचे कारण म्हणजे त्यांनी देशाकरिता आपल्या जीवनात उत्तुंग कामगिरी करुन ठेवली आहे. ते मराठी भाषिक असल्यामुळे महाराष्ट्राला खास अभिमान वाटला पाहिजे असे त्यांचे व्यक्तिमत्व आहे. सचिन तेंडुलकर यांना क्रिकेट खेळातील विक्रमाबद्दल सर्वोच्च सन्मान मिळत असताना, शिखराच्या पलीकडील हिमालयाची उंची गाठली असताना माझे पाय मातीमध्ये आहेत हे सांगणारा स्वभाव मराठी माणसाला भावणारा आहे. हा स्वभाव देशाला मार्गदर्शन करणारा आणि जे जे या क्षेत्रामध्ये उत्तुंगता गाठतील त्यांनी या त्यांच्या वागणुकीपासून धडा घ्यावा असे त्यांचे अभिमानास्पद वर्तन आहे.

सभापती महोदय, औचित्य साधून काही गोष्टी घडत असतात. आपल्या देशाकरिता मी खेळतो ही भावना तीव्र असते. त्या खेळातील निवृत्तीच्या काळात त्याच खेळाने त्यांना सन्मान मिळवून देणे हे महत्वाचे आहे.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

श्री.सचिन तेंडुलकर यांनी किती धावा केल्या ? श्री.सचिन तेंडुलकर हे जागतिक विक्रमाच्या पलीकडे गेले आहेत. कोणाच्याही लक्षात रहाव्यात अशा धावांची नोंद केली आहे. आपल्या देशाला 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वातंत्र्य मिळाले. श्री.सचिन तेंडुलकर यांची एकूण धावसंख्या 15847 एवढी आहे. असे भाग्य लाभणारा तो पहिला खेळाडू असेल. श्री.सचिन तेंडुलकर हे भारतासाठी खेळत होते. ते भारताची संस्कृती राखत होते. ते फार मोलाचे आहे. श्री.सचिन तेंडुलकर यांना वयाच्या 40 व्या वर्षी भारतरत्न पुरस्कार मिळाला ही कौतुकास्पद बाब आहे. त्यांचे कौतुक करीत असताना माझ्या मनामध्ये काही शंका निर्माण झाल्या आहेत. देशव्यापी कर्तृत्व करणाऱ्यांच्या बाबतीत केंद्र सरकारने एवढी सतर्कता का दाखविली नाही हा देखील प्रश्न मला पडतो. क्रिकेट या खेळाचा भारतरत्न पुरस्काराच्या नियमावलीमध्ये समावेश नसताना देखील नियम बदलले गेले. नियम बदलून त्यांना पुरस्कार दिला त्याबद्दल कौतुकच आहे.

या देशातील संपूर्ण दलित जनतेचा कोंडलेला श्वास मुक्त करणाऱ्या आमच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना हाच पुरस्कार मिळण्याकरिता 34 वर्षे थांबावे लागले. हे मला कुठे तरी नमूद करावेसे वाटते. देश घडविणाऱ्या व्यक्तिंना अशा प्रकारे वंचित रहावे लागत असेल तर ते चुकीचे आहे. यात फक्त खेळाचीच उत्तुंगता महत्त्वाची ठरणार आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो. पंडित जवाहरलाल नेहरू यांना त्यांच्या मृत्यू नंतर एक वर्षाने हा सन्मान मिळाला. श्री.लाल बहादूर शास्त्री यांना देखील ते गेल्यानंतर एक वर्षांनी हा सन्मान मिळाला. कामराज योजना संपूर्ण हिंदुस्थानात गाजली. सरकार निष्काम असेल तेव्हा प्रशासन कसे कार्यक्षम करावे अशा प्रकारची निर्णय क्षमता श्री.कुमारस्वामी कामराज यांनी निर्माण केली. त्यांना देखील त्यांच्या मृत्यूनंतर एक वर्षाने हा पुरस्कार मिळाला. आचार्य विनोबा भावे यांना त्यांच्या मृत्यू नंतर एक वर्षाने हा पुरस्कार मिळाला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मृत्यू नंतर 34 वर्षांनी हा सन्मान मिळाला. गेले महिनाभर सरदार वल्लभभाई पटेल किती मोठे होते यावर चर्चा सुरू होती. त्यांना देखील हा पुरस्कार त्यांच्या मृत्यू नंतर 41 व्या वर्षी मिळालेला आहे. श्री.जयप्रकाश नारायण यांनी तर स्वातंत्र्यानंतर दुसरी क्रांती करून दाखविली होती. त्यांना देखील त्यांच्या मृत्यू नंतर 20 वर्षांनी पुरस्कार मिळालेला आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

श्री.सचिन तेंडुलकर यांना हा पुरस्कार दिल्याबद्दल संपूर्ण देशाला त्याचे कौतुक आहे. वयाच्या चाळीसाव्या वर्षी हा पुरस्कार मिळविणारे ते एकमेव आसामी असावेत. हा देखील एक कौतुकाचा विषय आहे. परंतु, या देशाकरिता संपूर्ण आयुष्य पणाला लावणाऱ्यांना वंचित ठेवण्यात येते तेव्हा दु:ख वाटते. समाजकार्याचे मोल भविष्यामध्ये तेवढ्याच तोलामोलाने मोजले पाहिजे असे मला वाटते.

श्री.सचिन तेंडुलकर यांच्यावर बोलण्यासारखे खूप आहे. माझा क्रिकेटशी संबंध फक्त बघण्यापुरता आणि आनंद घेण्यापुरता मर्यादित आहे. श्री.अजित पवार हे अभिनंदनाचा ठराव मांडत असताना कोणी तरी म्हणाले की, श्री.अजित पवार क्रिकेट खेळतात काय ? शेवटी आपल्याला आपले कर्तव्य पार पाडावेच लागते.

सभापती महोदय, लोकसत्ता या दैनिकाने अंधश्रद्धेवर केलेली टिपणी फार महत्त्वाची आहे. विधान भवन ते विधी भवन पर्यंत अंधश्रद्धेच्या बिलाचे काय होणार अशी चर्चा सुरू असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या अंधश्रद्धेच्या बिलासंबंधी काही सांगणारे महाराष्ट्रातील जे सर्व संबंधित आहेत, त्यांना मी माझ्या उद्याच्या भाषणात सत्य साईबाबांवर केलेली टीका सांगणार आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सत्य साईबाबांवर ज्यांनी टीका केलेली आहे त्यासंदर्भात मी जादूटोणा विधेयकाच्या वेळी विचार मांडणार आहे. आयपीएल स्पर्धा सुरु असतांना सत्य साईबाबा त्या ठिकाणी गेले असतांना सचिन तेंडूलकर त्यांच्या जवळ जाऊन बसला होता व ही सर्व माहिती मीडियाने टीव्हीवर दाखवली होती. सभागृहापुढे आज भारतरत्नाचा प्रस्ताव आलेला आहे तो कोणी तयार केला आहे याची मला माहिती नाही. सत्य साईबाबा हे सचिन तेंडलुकरचे गुरु होते असे म्हटल्यानंतर आपल्याला वाईट का वाटते हे मला समजत नाही.(अडथळा) या देशाचा सर्वोच्च असा पुरस्कार सचिन तेंडुलकर यांना मिळाला असला तरी भारतरत्न पुरस्कार मिळालेल्यांनाही श्रध्दा असतात हे आपण कसे काय विसरता ? सचिन तेंडूलकर यांनी सत्य साईबाबाच्या पुतळयासाठी 25 लाख रुपये दिले असल्याची माहिती भारतरत्न श्री. सचिन तेंडुलकर यांनी जाहीर केली होती.

भारतरत्न श्री. सचिन तेंडुलकर यांचे कोणकोणते आदर्श घ्यावेत यासाठी सभागृहात चर्चा सुरु आहे. सचिन तेंडुलकर यांच्या स्वभावाचे, त्यांच्या वागणुकीचे,त्यांच्या दानधर्माचे, त्यांच्या कर्तृत्वाचे आदर्श काय आहेत यासंदर्भात येथे चर्चा सुरु आहे. भारतरत्न श्री. सचिन तेंडुलकर यांचे अभिनंदन करीत असतांना आम्हाला अभिमान वाटतो, गौरव वाटतो तसेच ते मराठी असल्यामुळे आम्हाला त्यांचा खास अभिमान वाटतो.

सभापती महोदय, भारतरत्न श्री. सचिन तेंडुलकर हे शिवसेना प्रमुखांचे लाडके होते. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, मी मुंबईचा महापौर होतो त्यावेळी संपूर्ण भारतीय क्रिकेट टीम माझ्या घरी जेवणासाठी आली होती. या टीमला हॉटेलमधील नाही तर घरी तयार केलेले जेवण देण्यात आले होते. परंतु या गोष्टीचे आम्ही कधी भांडवल केले नाही. सचिन तेंडुलकर माझ्या घरी जेवण करुन गेला त्याचे फोटोही मी काढले नाही. दुसऱ्याच्या मोठेपणावर आपले मोठेपण दाखवण्यापेक्षा त्याच्या मोठेपणाला सलाम मारणे, त्याचा आदर करणे हे फार महत्वाचे असते.

सभापती महोदय, या देशाला आगळे वेगळे महत्व भारतरत्न डॉ सीस.एन.राव यांनी प्राप्त करुन दिले आहे. भारत देश इतर देशांपेक्षा कमी नाही हे त्यांनी जगाला दाखवून दिले आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

डॉ. राव यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्या फार महत्वाच्या आहेत. त्यांना तुम्ही कितीही गौरविले तरी सुध्दा त्यांनी देशाच्या संदर्भात आपल्या व्यथा मांडल्याच होत्या. डॉ. राव यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर शिक्षण आणि विज्ञान यावरच देशाचे भवितव्य अवलंबून आहे असे त्यांनी सांगितले होते.

सभापती महोदय, आता देशाची जी काही प्रगती दिसत आहे ती सेन्सेक्स आणि व्यापारावर दिसत आहे. सेन्सेक्समध्ये तेजी आली आणि बाकीच्या क्षेत्रात अंधार असेल तर ते या देशाचे चांगले लक्षण नाही. संपत्तीपेक्षा विज्ञाना करिता आणि शिक्षणा करिता या देशात सन्मान असला पाहिजे असे डॉ.राव यांनी भारतरत्न पुरस्कार मिळाल्यानंतर सांगितले होते.

सभापती महोदय डॉ.सी.एन.आर.राव यांना भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्याचा मी या ठिकाणी उल्लेख करणार आहे. असभ्य व हेळसांड करणाऱ्या नेत्यांची संभावना त्यांनी इडियट म्हणून केली होती. त्यांचे हे म्हणणे सर्व राजकारण्यांसाठी नव्हते तर त्यात त्यांची जी व्यथा होती ती फार महत्वाची होती. भारतरत्न डॉ.सी.एन.आर.राव यांनी कधीही मोबाईल वापरला नव्हता. मला जो काही क्षण मिळतो आहे तो अभ्यासासाठी खर्च करता आला पाहिजे यासाठी त्यांनी कधीही मोबाईल वापरला नाही. "भारतरत्न" डॉ.सी.एन.आर.राव यांनी म्हटले आहे की, दुदैवाने विज्ञानासाठी जितका निधी आवश्यक आहे तितका दिला जात नाही.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आमची विज्ञानातील गुंतवणूक एक टक्क्यावरुन दोन टक्क्यापर्यंत गेली पाहिजे एवढीच त्यांनी अपेक्षा केली. इतकी टक्केवारी केल्यास आम्ही सूर्यापर्यंत झेप घेऊ असा त्यांचा म्हणण्याचा अर्थ होता. कमी उपलब्धी आहे आम्ही मंगळापर्यंत जी काही झेप घेत आहोत हे सांगत असताना त्यांनी आपली व्यथा मांडली.

देशात शिक्षण असले पाहिजे, विज्ञान असले पाहिजे त्याच बरोबर विज्ञानाबरोबर सरकारला देश भक्कम करायचा असेल तर त्यासाठी भक्कम आर्थिक पाठबळ दिले पाहिजे असे ते सांगत होते आणि त्या दृष्टीकोनातून त्यांनी राजकारण्यांना "इडीयट" म्हटले. त्यांनी राजकारण्यांना इडीयट म्हटलेल्या व्यक्तीच्या संदर्भातील प्रस्ताव या सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री व वित्तमंत्री श्री.अजित पवार यांनी मांडला आहे आणि हा प्रस्ताव मांडत असताना त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढत असताना उद्याच्या अर्थसंकल्पामध्ये शिक्षणाकरिता भरीव तरतूद नक्की होईल का ? शिक्षकांबद्दल नेहमी आक्रोश करणारे आमचे शिक्षक आमदार आमचे सहकारी आहेत त्यांचा आक्रोश कमी होईल का ? हा या सर्व सन्मान मांडण्याचा मतितार्थ नोंदविला तर आपण खऱ्या अर्थाने प्रस्तावाला न्याय दिला अशा प्रकारची भूमिका डॉ.सी.एन.राव यांची आहे.

श्री.अजित पवार (बसून) : शिक्षकांच्या पगारावर नाही परंतु संशोधनासाठी देईन.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री बरोबर बोलले कारण वैज्ञानिक तयार होण्याकरिता तो शिकावा लागतो, शिकविण्याकरिता शिक्षक लागतो आणि चांगला शिक्षक असेल तर विद्यार्थी वैज्ञानिक बनतो. त्यामुळे शिक्षणाच्या संदर्भात जे काही अभिप्रेत आहे ते त्यांनी करावे.

सभापती महोदय, डॉ.राव जे बोलले ते मला महत्वाचे वाटते. आपल्याकडे 26.11 ची घटना घडल्यानंतर आपण खूप आक्रोश केला. खूप जागरुकता दाखविली. मुंबई आणि देशाला वाचविण्यासाठी काय करता येईल हे आपापल्या परीने सांगण्याचा प्रयत्न केला. तज्ज्ञांनी सांगितले की, मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे बसवा. तसेच अन्य काही बाबी सांगितल्या. परंतु मागील पाच वर्षात त्या उणिवा आपण भरुन काढू शकलो नाही. तंत्रज्ञान आणि विज्ञानासाठी निधी मिळाला नाही तर काय घडते हे डॉ.राव यांच्या इडियट शब्दामध्ये आहे हे मी येथे मुद्दाम नमूद करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, डॉ.राव हे मोठे वैज्ञानिक, मंगळापर्यंत झेप घेणारे. परंतु आपले मंगळयान यशस्वी होण्याकरिता श्रीमती विद्या चव्हाण या त्या यानाची प्रतिकृती घेऊन तिरुपती येथे जाऊन त्यांनी साकडे घातले, तेव्हा श्रध्देचा आणि अंधश्रध्देचा विषय कसा जोडायचा हे तुम्ही पाहा.

सभापती महोदय, मी मघाशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पासून विनोबा भावेपर्यंतच्या माझ्या भावना मांडल्या. त्यांचाही सन्मान वेळेत झाला पाहिजे हा महत्वाचा विषय आहे.

सभापती महोदय, दैनिक लोकसत्ताच्या अग्रलेखामध्ये जे नमूद केलेले आहे ते मी वाचून दाखवितो. "सचिन आणि प्रा.सीएनआर राव यांच्यासारख्या संशोधकांस एकाच पंगतीत बसवून त्यांच्या मुखी भारतरत्न पदाचा घास भरवण्याचा निर्बुध्दपणा आपल्याकडे होऊ शकतो. राव यांची सारी हयात विज्ञान संशोधनासाठी गेली आणि तसाठी कोणतीही मानमरातब वा कौतुक पदरात पडण्याची शक्यता नसतानाही ते आपले काम करीत गेले. ते करण्यात त्यांना आंनद होता. त्या आनंदात भारतासारख्या विज्ञानदुष्ट देशाचे काही भले व्हावे अशी इच्छा होती. त्याचमुळे अत्यंत कमी मोबदल्यात ते आपले मूलगामी काम करीत राहिले. सचिनबाबत असेच म्हणता येईल काय असा प्रश्न लोकसत्तेतील अग्रलेखात उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, डॉ.राव यांनी जे म्हटले आहे ते मला मोलाचे वाटते. मघाशी माननीय उप मुख्यमंत्री पगाराबद्दल बोलले त्या संदर्भात त्यांचे उद्‌गार आहेत म्हणून मी ते येथे मुद्दाम नमूद करु इच्छितो. " चीनच्या प्रगतीबाबत बोलताना डॉ.राव म्हणाले की, आपण आपला दोष कबूल केला पाहिजे, भारतीय कठोर परिश्रमामध्ये कमी पडतो. आपण चिनी माणसासारखे नाही. आपण आला दिवस साजरा करतो. आपण त्यांच्यासारखे देशभक्त नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

जर थोडा जास्त पैसा मिळत असेल तर आपण देश सोडून परदेशात जाण्यासाठी एका पायावर तयार असतो", असे श्री.राव म्हणाले होते. म्हणून योग्य पगार असलेल्या शिक्षकांना आणि वैज्ञानिकांना सन्मान मिळाला पाहिजे, हा या वाक्यातील संदेश आहे. मला या उभयतांच्या अभिनंदनपर प्रस्तावावर विचार व्यक्त करण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

महोदय, श्री.सी.एन.आर.राव यांना भविष्यातील चांगला वेध घेण्यासाठी संधी मिळो अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच श्री.सचिन तेंडुलकर यांच्या निवृत्तीनंतरही त्यांच्या माध्यमातून पुन्हा विक्रमी क्रिकेटपटू निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांना परमेश्वराने द्यावे अशी परमेश्वराकडे सर्व श्रध्दा ठेवून भक्तीभावे विनंती करतो आणि येथेच थांबतो.

महोदय, पुन्हा एकदा माझ्या स्वत:च्या, माझ्या विधिमंडळ पक्षाच्या आणि सहकाऱ्यांच्या वतीने उभयतांना भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन करतो व येथेच थांबतो.

जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.अजित पवार यांनी विक्रमादित्य श्री.सचिन तेंडुलकर आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ श्री.सी.एन.आर.राव यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावाच्या समर्थनार्थ बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

महोदय, सचिन हा हिमालया एवढा मोठा खेळाडू आहे किंवा तो विक्रमादित्य आहे म्हणून त्याला भारतरत्न पुरस्कार मिळाला असे नाही. गेल्या 25 वर्षांत सचिन तेंडुलकरने संपूर्ण देशवासीयांना निरतिशय असा आनंद दिला आहे. एवढेच नव्हे तर देशवासीयांच्या दु:खावर फुंकर घातली आहे. आपल्या अप्रतिम खेळामुळे या देशातील तरुणांना मोहीत केल्याबद्दलचा त्याचा हा सन्मान केला गेला आहे. खेळाडू किंवा सिनेमातील मंडळी दानधर्म करतात की नाही, सामाजिक काम करतात की नाही, याबद्दल अनेकदा प्रश्न उपस्थित केला जातो. परंतु मी सचिन तेंडुलकर बाबत सांगू इच्छितो की, सचिन तेंडुलकर हे आपल्या मिळकतीचा काही हिस्सा गरीब विद्यार्थ्यांना सातत्याने देत असतात. सचिन तेंडुलकर यांनी 200 अनाथ विद्यार्थ्यांना दत्तक घेतले आहे. या 200 विद्यार्थ्यांचा दरवर्षी शिक्षण आणि जेवण्याखाण्याचा खर्च त्यांच्याकडून केला जातो. श्री.सचिन तेंडुलकर यांच्या सासू श्रीमती अनाबल मेहता या शिक्षण क्षेत्रात काम करीत आहेत. त्यांच्या संस्थेला सुध्दा ते तितकीच मदत करतात. सचिन तेंडुलकर हे खेळाडू म्हणून जितके मोठे आहेत तितकेच माणूस म्हणून सुध्दा मोठे आहेत, हे मला आवर्जून सांगणे गरजेचे आहे. सचिन तेंडुलकर यांच्या माणुसकीचे अनेक किस्से लोकांनी मैदानात आणि मैदानाबाहेर सुध्दा बघितले आहेत. साहित्य-सहवास येथील वॉचमनची सुध्दा ते आठवण ठेवतात आणि वानखेडे स्टेडियमवरील माळ्याची सुध्दा ते तितकीच आठवण ठेवतात. ते केवळ अर्जुन या आपल्या मुलाच्याच पाठीशी उभे असतात असे नाही. एखादा नवीन मुलगा खेळत असेल, पृथ्वी हा मुलगा खेळत असेल किंवा अन्य कोणी नवीन खेळाडू खेळत असेल तर ते त्यांना सांगतात की, मी तुच्या पाठीमागे उभा आहे. तुला जी मदत लागेल ती मला सांग. अशा अनेक गोष्टी आहेत.

महोदय, सचिन तेंडुलकर यांनी संघाचे कप्तानपद सोडले परंतु या देशातील सर्व खेळांचे कप्तानपद खऱ्या अर्थाने सचिन तेंडुलकर यांच्याकडे होते. या देशवासीयांना त्यांनी जो आनंद दिला त्याला तोड नाही. त्या आनंदासाठी ते भारतरत्न या पुरस्कारासाठी पात्र ठरतात. या





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

व्यतिरिक्त त्यांनी अन्य कोणतीही समाजसेवा केली नसती तरी चालले असते, एवढा मोठा आनंद त्यांनी आपल्या खेळातून दिला आहे.

महोदय, 60-70 वर्षांपूर्वी मुंबईच्या विधानपरिषद सभागृहामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, मी सर्वप्रथम भारतीय आहे आणि शेवटी सुध्दा भारतीय आहे. मुंबईमध्ये जेव्हा वाद निर्माण झाला तेव्हा सचिन तेंडुलकर यांना त्या बाबत विचारण्यात आले. त्यांनी सांगितले की, मी मराठी आणि महाराष्ट्रीय असण्याचा मला जरुर अभिमान आहे. पण मी सर्वप्रथम भारतीय आहे. त्यांचे हे उद्‌गार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या सभागृहात काढलेल्या उद्‌गाराशी जुळणारे आहे म्हणून ते महान आहेत. सचिन तेंडुलकर यांना भारतरत्न मिळण्याचा आनंद या देशातील सगळ्या सीमा, प्रांत, भाषा, जात, डोंगर, दऱ्या पार करुन सर्वांनाच झाला हे नमूद केले पाहिजे.

महोदय, श्री.राव यांचे काम एका बंद प्रयोग शाळेतील आहे. ते मैदानात कधीच नव्हते. कारण खेळ, सिनेमा आणि राजकारण ही क्षेत्रे लोकांमध्ये असतात. शास्त्रज्ञ बंद खोलीत काम करीत असतो. परंतु शास्त्रज्ञ जे काम करतो ते पिढ्यानपिढ्या पुढच्या समाजाला उपयुक्त ठरत असते. श्री.राव यांनी केलेल्या कामामुळे त्यांना जगभर भारतीय विज्ञानाचे प्रतीक म्हणून ओळखले जाते. परंतु श्री.राव यांनी जे दुःख आणि वेदना व्यक्त केली त्याकडे या राज्याने, सभागृहाने आणि राज्य सरकारने लक्ष घातले पाहिजे. सभागृहाच्या नेत्यांनी श्री.राव यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. परंतु श्री.राव यांनी शिक्षण आणि संशोधनाबद्दल जी अपेक्षा व्यक्त केली त्या बाबत आपण काय करणार आहोत, आज आपल्याकडे शिक्षण आणि संशोधनावर होणारा खर्च किती आहे ? आपल्याकडे शिक्षणावर केवळ 2.38 टक्के खर्च केला जातो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

डॉ. सी. एन. आर. राव असे म्हणतात की, सर्व देशाचा संशोधनावरील खर्च 1 टक्क्यापेक्षा कमी आहे. ही स्थिती असेल तर मंगळावर यान पाठवून चालणार नाही. देशातील करोडो जनतेला विज्ञानाचा फायदा व्हायचा असेल तर संशोधन होण्यासाठी लागणारा खर्च दिला पाहिजे. शास्त्रज्ञ निर्माण होण्याआधी आवश्यक असलेले मूलभूत शिक्षण सर्वदूर पोहचले पाहिजे. परंतु, ते आपण करीत नाही. खेळासाठी तरी कुठे पैसे देतो ? कोणी तरी खेळाडू मोठा होतो, ऑलिम्पिक गाजवतो, एशियाड गाजवतो आणि मग त्याला एक कोटी रूपयांचे बक्षीस जाहीर करण्यात येते. पण खेळाडू मैदानात तयार व्हावा यासाठी तुम्ही एक रूपया सुध्दा खर्च करीत नाही. आपल्या राज्यातील खेळावरचा खर्च 0.005 टक्के इतकाही नाही. माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख या ठिकाणी आहेत, त्यांनीच खेळाडूला पहिल्यांदा एवढे मोठे बक्षीस देणे सुरू केले. मी त्यांची जरूर आठवण करतो. आपण 100 रूपयांत नाही तर 1000 रूपयांत 5 पैसे खर्च करतो. एक सचिन कशाला हजारो सचिन खेळू द्या, फुलू द्या. आपण त्यासाठी लागणारा खर्च का करीत नाही ? एखादी मुलगी नेमबाजीमध्ये पुढे गेली की तिला मंत्रालयात नोकरी दिली जाते. तुमच्यामुळेच ते झाले. पण एकालाच का ? आपल्या राज्यात खेळाडू निर्माण करायचे असतील तर आपण पावले उचलली पाहिजेत.

राज्यामध्ये दरवर्षी शिक्षकांची 17 हजार पदे निर्माण होतात. मग त्यामध्ये शारीरिक शिक्षक का नको ? दरवर्षी 1000 शारीरिक शिक्षक नाही तर 500 शारीरिक शिक्षक भरा. हे 500 शारीरिक शिक्षक बीएड, बीपीएड झालेले नसले तरी चालतील. आपल्या राज्यातील जो खेळाडू राज्य स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर खेळला असेल त्याला तुम्ही थेट शिक्षकाची नोकरी द्या आणि त्याला सांगा की, तू उत्तम कोच बन. तो अतिशय चांगला कोच बनेल. कारण त्याला बँकेत नोकरी दिली, तहसीलदार केले तर तो ती नोकरी करू शकत नाही. खेळही त्याला सोडावा लागतो. तहसीलदार करून त्याचा खेळ मरतो, त्याचा खेळ तिकडेच संपतो. तो दुसऱ्याकडे पोहचत नाही. त्या शिक्षकाला हजारो सचिन निर्माण करायचे असतील तर आपण यासाठी काही तरी केले पाहिजे. प्रत्येक जण सचिन होऊ शकत नाही, राहुल द्रविड होऊ शकत नाही, आगरकर होऊ शकत नाही. राज्यातील राज्य स्तरावरील, राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू बाबत विचार करणे गरजेचे आहे. माननीय सभापती महोदयांनी मागील वेळी आठवण केली होती. सभागृहात सांगितले होते की, पंजाबच्या .2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या खेळाडूला थेट डायरेक्टर केले. मग आपण शिक्षक का करू शकत नाही ?

सभापती महोदय, शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कमी आहे. शिक्षणासाठीचा मूलभूत खर्च हा प्रश्न शिक्षकाचा नाही. शिक्षणाचा प्रश्न शिक्षकाच्या अंगाने मांडला जातो. चांगला, उत्तम शिक्षक असेल तर त्याला चांगला पगार द्यावा लागेल आणि चांगला पगार दिल्याशिवाय शिक्षणाच्या क्षेत्रात कोणीही येणार नाही, हे आपण लक्षात घ्या. गेल्या 10-15 वर्षांत आपण महाराष्ट्र मागे नेला आणि याचे मुख्य कारण शिक्षणाकडे प्रचंड दुर्लक्ष झाले. माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात आणि बाहेरही दुःख व्यक्त केले. ते जेव्हा विज्ञान मंत्री होते तेव्हा त्यांनी सन 1996 मध्ये इन्स्पायर ॲवॉर्ड देणे सुरू केले. देशभर असा कार्यक्रम सुरू केला. ही आपल्या विद्यमान माननीय मुख्यमंत्र्यांची देण आहे. त्यांनी हे यासाठी केले, कारण आपल्याकडे सायन्स एक्झिबिशनमध्ये फक्त एक्झिबिशन मांडले जाते. पण शास्त्रज्ञ निर्माण करण्यासाठीची व्यवस्था केली जात नाही. त्यामुळे त्यांनी तो प्रयोग सुरू केला. आपल्याकडे डॉक्टर, इंजिनिअर होतात. परंतु, शास्त्रज्ञ कोणीही होत नाही. संशोधनासाठीचा खर्च होत नाही. त्यामुळे संशोधन होत नाही. आपल्या संशोधनासाठीचा खर्च करायचा असेल तो शाळेत करावा लागेल. शाळेत अशा प्रकारचे वातावरण, पर्यावरण पाहिजे असेल तर सर्वदूर खेड्यांपाड्यांतील शाळांना, तंत्र-विज्ञानाच्या संस्थांना प्रचंड प्रमाणाता अनुदान द्यावे लागेल. 10 वर्षांनी 5 टक्के अनुदान देणे, ही फसवणूक झाली. 10 वर्षांनी शास्त्रज्ञ निर्माण करून हे होणार नाही. आपल्या राज्यात 5 च्या वर देखील शास्त्रज्ञ नाहीत. स्वतः माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, एच इंडेक्समध्ये फक्त नारळीकर, माशेलकर, गोवारीकर आहेत. श्रीराम भट होते पण ते वारले आहेत. पाचवा माणूस नाही, बाकीचे तंत्रज्ञ आहेत. राज्याने ज्याला आपण प्युअर वैज्ञानिक म्हणतो असा पाचवा शास्त्रज्ञ निर्माण केलेला नाही. आपल्याला तो करायचा असेल, हजरो सचिन निर्माण करायचे असतील तर बजेटमधील अर्धा टक्का नको, किमान 5-6 टक्के द्यावे लागतील. आपण ते देणार की नाही, की अर्ध्या टक्क्यावर बोळवण करणार. अभिनंदनाचा प्रस्ताव मांडणे फार सोपे आहे. सभागृह अभिनंदन करीत आहे ते, सचिन, राव यांना तेव्हाच पोहचले, जेव्हा शासन खेळासाठी, शिक्षणासाठी, संशोधनासाठी, राज्याचे माननीय अर्थमंत्री

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

बजेटमध्ये भरीव तरतूद करतील, किमान 6 टक्के तरतूद करतील आणि त्याच दिवशी अभिनंदनाला आम्ही पात्र होऊ, असे मी मानतो. मी एवढे बोलून येथेच थांबतो. धन्यवाद !

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी विश्वविख्यात सचिन तेंडुलकर व थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरन" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडलेला आहे. त्या प्रस्तावाचे समर्थन करण्यासाठी व त्याला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी व अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपली मते मांडलेली आहेत. सचिन तेंडुलकर यांच्याविषयी दिवसभर बोलले तरी दिवस पुरणार नाही अशी परिस्थिती आहे. हे खरे असले तरी मी यापूर्वीच्या वक्त्यांच्या मुद्यांची पुनरावृत्ती न करता केवळ 1-2 गोष्टी या निमित्ताने नमूद करु इच्छितो. भारताची काही बलस्थाने आहेत, त्यांच्यामुळे भारत देश ओळखला जातो. भारताने फार कमी क्षेत्रामध्ये स्वत:ची ओळख व सत्ता निर्माण केली आहे. सर्वसामान्य कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या सचिन तेंडुकर नावाच्या तरुण मुलाने क्रिकेटमध्ये असामान्य कामगिरी करुन ती सत्ता जगभर प्रस्थापित केलेली आहे, असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरु नये. सचिन तेंडुलकर यांच्याविषयी बोलत असताना एक वाक्य त्यांच्या नावाला चपखलपणे बसते. जगाच्या क्रिकेटच्या क्षितिजावरील भारताचा तळपता सूर्य असे वर्णन केले तर त्यामध्ये अतिशयोक्तीचा लवलेश सुध्दा सापडणार नाही. सचिन तेंडुलकर यांना व्यक्तिगतरित्या मिळालेला सन्मान हा देशातील 125 कोटी भारतीयांना दिलेली भेट आहे. क्रिकेट जगतातील मागील 24 वर्षातील प्रत्येक क्षण अमूल्य आहे. त्यामुळे त्यांना इतक्या कमी वयामध्ये मिळालेला देशातील हा सर्वोच्च पुरस्कार म्हणजे एक रेकॉर्डच आहे असे म्हणावे लागेल. म्हणून मी भारत सरकारचे आभार मानतो. भारत सरकारने वयाची मर्यादा न पाहता, मागील काळातील संदर्भ न पाहता योग्य वेळी, योग्य व्यक्तीचा सन्मान केल्याबद्दल मी भारत सरकारचे मनापासून अभिनंदन करतो.

सचिन तेंडुलकर यांनी स्वत:च्या आयुष्यात कसे वागावे याबाबत आपण बोलत असता. त्याचवेळी त्यांनी समाजाला काय दिले आहे, देशाला काय दिले आहे, जगाला काय दिले आहे हे देखील महत्वाचे आहे. आम्ही सर्वजण स्तुती करीत असतो, आम्ही मराठी आहोत म्हणून कदाचित तो दोष असू शकेल, माझा स्वत:चा तो दोष असेल. हा जो करंटेपणा आपण.............

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

कशासाठी करतो असा प्रश्न मला स्वत:ला नेहमी पडतो. आपण त्यांच्या कामाची स्तुती करीत असताना, देशासाठी दिलेल्या योगदानाची स्तुती करीत असताना करंटेपणा का दाखववावा असा प्रश्न मला स्वत:ला विचारावासा वाटतो.

मला या निमित्ताने दोन प्रसंग आठवतात. सचिन तेंडुलकर यांनी पाकिस्तानच्या टीमबरोबर क्रिकेटच्या खेळाची सुरुवात केली होती. त्या देशातील वकार युनुस सारख्या आग ओकणाऱ्या बॉलरचा एक बाऊन्सर त्याच्या नाकावर आदळला होता. त्यामुळे ते रक्तबंबाळ झाले होते. सगळ्यात कमी वयाचा खेळाडू असा त्याच्याकडे बघण्याचा पाकिस्तान क्रिकेटपटूंचा दृष्टीकोन होता. स्वत: वकार युनुसने त्यांचे वर्णन केले होते. ते सर्वांनी पाहिले असेल. युनुसचा बॉल नाकाला लागल्यानंतर नाकातून भळाभळा रक्त वाहत असताना ते रक्त पुसून टाकत वकार युनुसचा दुसरा चेंडू सीमापार केला होता. क्रिकेटच्या क्षितिजावर तळपणाऱ्या सूर्याच्या आयुष्याची ती एक नांदी होती. असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:10

श्री. भाई जगताप ..

अशा उत्तुंग व्यक्तिमत्वाचा गौरव देशाचा सर्वोच्च पुरस्काराने करण्यात आलेला आहे हे अतिशय योग्य झालेले आहे. मीडियामधून सचिन तेंडुलकर यांच्या वयाचा उल्लेख वारंवार करण्यात आला. अर्थात आपल्या देशामध्ये सर्वांना विचाराचे स्वातंत्र्य आहे. माझे मित्र सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी याठिकाणी शेन वॉर्नचा किस्सा सांगितला. सचिनने ॲड करताना तारतम्य आणि नियम पाळलेले आहेत. आज त्यांना जी काही प्रसिध्दी मिळालेली आहे ती क्रिकेटमुळे मिळालेली आहे याचे भान त्यांनी सतत ठेवलेले आहे. क्रिकेटला आणि आपल्या कारकिर्दीला कोणी नाव ठेवील अशा पध्दतीने आपल्या 24 वर्षाच्या कारकिर्दीमध्ये सचिन केव्हाही वागले नाहीत. एक खेळाडू म्हणून आपली सामाजिक बांधिलकी आहे, मुलांशी आपली बांधिलकी आहे, जगातील मुलांशी आपली बांधिलकी आहे हे ते विसरले नाहीत. म्हणून युनिसेफचा ब्रॅण्ड ॲबॅसेडर म्हणून दुसरी इनिंग त्यांनी सुरु केलेली आहे. देशातील 125 कोटी लोकांच्या त्यांना शुभेच्छा आहेत. जगभरातील लोकांच्याही त्यांना शुभेच्छा असतील.

माझ्या शालेय आणि कॉलजमधील जीवनामध्ये माझा क्रिकेटशी संबंधी आलेला असल्यामुळे त्या खेळातील बारकावे मला माहीत आहेत. सन्माननीय सदस्य आणि विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी शेन वॉर्नचा किस्सा या ठिकाणी सांगितला. त्याचा पुढचा किस्सा मी सांगतो. शेन वॉर्नने असे सांगितले होते की, "सचिन तेंडुलकर मला बेधडक मारत आहे अशा प्रकारची स्वप्ने मला पडत होती." क्रिकेट खेळावर असलेले त्याचे प्रभुत्व हे यामुळे सिध्द होते. यापेक्षा मी अधिक बोलणार नाही. भारतरत्न या सर्वोच्च पुरस्कारासाठी सचिन तेंडुलकर यांची झालेली निवड अतिशय योग्य आहे. त्यांना हा सन्मान दिल्याबद्दल मी भारत सरकारचे अभिनंदन करतो.

भारताचे दुसरे सुपुत्र डॉ. सी.एनआर.राव यांच्या बाबतीत मी असे म्हणेन की ते भारताचे एक बलस्थान आहेत. आपण भारत महासत्ता बनण्याची स्वप्ने पहातो ती कोणाच्या जीवावर ? भारताने अवकाशात घेतलेली झेप, मंगळावर पाठविलेले यान या गोष्टींमुळे भारत आता महासत्ता होण्याच्या दिशेने कूच करीत आहे असा विश्वास जगामध्ये निर्माण झालेला आहे. यामध्ये माननीय डॉ. सी.एन.आर.राव यांचा सिंहाचा वाटा आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी बोलताना सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, अंधश्रद्धेला श्रद्धेचा मुलामा देणाऱ्या लोकांचा शास्त्रावरचा विश्वास वाढलेला आहे. हा उल्लेख ऐकून

..2..

श्री. भाई जगताप....

जरा बरे वाटले. एखाद्या गोष्टीमध्ये काही शोधण्यापेक्षा ती गोष्ट आहे की नाही हे ठरविण्याआधी ती आहे म्हणून सातत्याने सांगायचे आणि त्याला श्रद्धेचा मुलामा द्यायचा अशा लोकांचा शास्त्रावरचा विश्वास वाढलेला आहे ही फार आशादायी गोष्ट आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

काही मंडळी संशोधनाला अधिक महत्व दिले पाहिजे अशा प्रकारची चर्चा करतात, ती चर्चा योग्य आहे. संशोधनाच्या कामासाठी बजेटही वाढवून दिले पाहिजे ही गोष्ट देखील योग्य आहे. परंतु शास्त्राचा पाठपुरावा करीत असताना कोठे तरी आम्ही मागे बघून शास्त्राला कोठे तरी मुलामा देण्याचा प्रयत्न करीत नाही ना अशी शंका कोणाला येऊ नये असे मला वाटते. या देशातील दोन सुपुत्रांनी जगात महासत्ता होण्याची एक कामगिरी केली आहे, त्या कामगिरीमध्ये मोठे योगदान दिलेले आहे. या दोन महान सुपुत्रांचा देशात सर्वार्थाने मोठा असलेला "भारतरत्न"पुरस्कार देऊन केंद्र सरकारने गौरव केलेला आहे. त्यांना "भारतरत्न" पुरस्कार दिल्याबद्दल मी केंद्र सरकारचे अभिनंदन करतो आणि या दोन महान सुपुत्रांना माझ्या कुटुंबीयांतर्फे, माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो. धन्यवाद.

--------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर आणि जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल सभागृहाचे नेते, राज्याचे उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी अतिशय महत्वाचा ठराव सभागृहासमोर मांडलेला आहे. त्या ठरावास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, पहिल्यांदा शास्त्रज्ञ डॉ.राव यांच्या संदर्भात मी काही विचार या सभागृहात मांडणार आहे. डॉ.राव हे "भारतरत्न" पुरस्कार मिळविणारे चौथे वैज्ञानिक आहेत. "भारतरत्न" पुरस्कार कोणाला कोणत्या वर्षी मिळाला याचा अनुक्रम पाहिला तर सर सी.व्ही.रामन यांना 1954 मध्ये, डॉ.एम.विश्वेश्वरय्या यांना 1955 मध्ये, डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना 1997 मध्ये आणि त्यानंतर 2013 मध्ये डॉ.राव यांना हा पुरस्कार मिळालेला आहे. या सगळया कालखंडातील मधील प्रदीर्घ कालावधी बघितला तर आपल्याला सहज लक्षात येईल की, आपण विज्ञानाचा आणि संशोधनाचा पुरस्कार करावयास पाहिजे, त्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर वैज्ञानिक काम करतील याकडे लक्ष दिले पाहिजे.

डॉ.राव हे मुळात शिक्षक आहेत. त्यांच्या शिकविण्याची हातोटी वेगळीच होती. या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी या सभागृहात माहिती दिली आहे. शाळेतील शिक्षक वर्गामध्ये आल्यानंतर शिकविण्यास सुरुवात करतो. विज्ञानाचा विषय विद्यार्थ्यांना जवळचा वाटावा म्हणून काही तरी गोष्टी त्यांना करुन दाखवाव्या लागत होत्या. हातात बर्फाचा मोठा तुकडा घेऊन डॉ.राव हे वर्गात यावयाचे. विद्यार्थ्यांची उत्सुकता त्यावेळी ताणली जावयाची. या बर्फाच्या तुकडयाचे डॉ.राव काय करणार ? डॉ.राव वर्गात आल्यानंतर तो बर्फाचा तुकडा खाली टाकून द्यावयाचे. बर्फाचा तुकडा जमिनीवर पडल्यावर त्या बर्फाचे असंख्य बारीक बारीक तुकडे होत असत. विद्यार्थी त्यांच्याकडे बघत रहावयाचे आपण यातून काय शिकायचे. या बर्फाच्या विघटनातून डॉ.राव यांचा थर्मोडायनामिक्सचा तास सुरु व्हावयाचा. विज्ञानाशी आपुलकी, विज्ञानाशी जवळीक करणे हे शिक्षकालाच जमू शकते. शिक्षक जर उत्तम संशोधक असेल तर तो काय करु शकेल याचे उत्तम उदाहरण म्हणजे डॉ.राव यांच्याकडे आपल्याला बघता येईल.

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

आज त्यांचे वय 80 वर्षाचे आहे. म्हणजे 60 वर्षापूर्वी वयाच्या 20 व्या वर्षी पहिला शोध निबंध त्यांनी लिहिला आणि त्या नंतरच्या काळात 50 पुस्तके, 1600 शोध निबंध इतकी भरगच्च कामगिरी त्यांच्या नावावर आहे. केंद्र स्तरावर वैज्ञानिक संशोधनाबाबत त्यांनी स्व.इंदिरा गांधी, राजीव गांधी, देवेगौडा आणि गुजराल या माजी पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार मंडळावर काम केले आणि डॉ.मनमोहन सिंग यांच्या समितीमध्ये ते आजही सल्लागार म्हणून काम करीत आहेत. हे सगळे करीत असताना त्यांनी विज्ञान, शिक्षण आणि संशोधनासाठी या देशात आजपर्यंत सगळ्यात मोठी कामगिरी केली आहे. आज आय.आय.टी.बरोबर तुलना करता येऊ शकतील अशा पाच प्रमुख भारतीय विज्ञान आणि शिक्षण संस्था सुरु करण्यासाठी त्यांचे फार मोठे योगदान आहे.

सभापती महोदय, कोणी तरी म्हटले आहे की, शास्त्रज्ञ हे बंद प्रयोगशाळेत काम करीत असतात. त्यामुळे समाजाला त्याचे ताबडतोब प्रत्यंतर येते किंवा येत नाही अशी अवस्था आहे. मंगळावर यान पाठविण्याचा निर्णय होतो त्यावेळी देशातील सगळे लोक अभिमानाने या क्षेत्राकडे बघतात. भारत जगातील पाच-सहा राष्ट्रांच्या यादीत जाऊन बसणार आहे ही खात्री पटते त्यावेळी शास्त्रज्ञ बंद खोलीत प्रयोग करीत असला तरी देशातील सर्वसामान्य माणसांना अभिमान वाटावा अशा किती तरी गोष्टी तो घडवू शकतो हेच त्याच्या मोठेपणाचे एक द्योतक असते.

सभापती महोदय, अतिशय साधी राहणी, साध्या विचाराने आपली मार्गक्रमणा करुन वयाच्या 80 व्या वर्षी डॉ.राव कार्यरत आहेत. खरे म्हणजे त्यांना देण्यात आलेला भारतरत्न पुरस्कार विचारात घेता विज्ञानाधिष्ठित समाज निर्मिती हे राज्याचे ध्येय असेल तर संशोधनावर भर देण्यासाठी अधिकाधिक काय करता येईल याकडे सुध्दा आपण लक्ष देऊ शकतो असे मला वाटते. केंद्र सरकारमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान हे एक मंत्रालय आहे. आपल्या राज्यात उच्च शिक्षण खाते आहे. आपल्याला देखील या विज्ञानावर अधिक भर देण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान व संशोधन या नावाचे वेगळे खाते निर्माण करता आले आणि त्यासाठी डॉ.राव यांचे मार्गदर्शन आपण घेतले तर त्यामध्ये आपल्याला निश्चितपणे चांगले आशादायी चित्र निर्माण करता येईल. नवीन वैज्ञानिकांची पिढी घडविण्याचे काम त्यातून करता येऊ शकते.

सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी डॉ.नेल्सन मंडेल यांच्या निधनाबद्दल याच सभागृहात शोकप्रस्ताव संमत केला. आज अभिनंदन प्रस्तावावर बोलत असताना मी डॉ.नेल्सन मंडेला यांच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

पुस्तकाबद्दल सांगू इच्छितो. Climbing the limitless ladder, the life in chemistry हा ग्रंथ त्यांनी त्यांच्या आजपर्यंतच्या वाटचालीबद्दल लिहिला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, या पुस्तकाचे भाषांतर व्हावे आणि ते सर्व शाळांमध्ये वितरित करावे अशा पध्दतीचे ते पुस्तक आहे. डॉ.राव यांचा भारतरत्न पुरस्कार देऊन झालेला गौरव हा या देशातील वैज्ञानिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व लोकांचा गौरव आहे. कारण विज्ञानातील संशोधनाचे काम कोणा एका व्यक्तीचे नसते. त्यासाठी वैज्ञानिकांची टीम तयार करावी लागते. त्या संपूर्ण टीमचे हे कौतुक आहे. म्हणून हा पुरस्कार मिळाल्यानंतर मनात दुखरी भावना त्यांनी व्यक्त केली असली तरी ती भावना व्यक्त करताना त्यांच्या म्हणण्याचा भाग आपण जो घ्यायचा तो एवढाच होता की, आता वैयक्तिक स्तरावर काही मिळवायची भावना त्यांच्या मनामध्ये नाही. एकूण समाजाचे आणि देशाचे भले व्हावे याकरिता त्यांनी विचार मांडले. ते निश्चितच दिशादर्शक ठरतील. म्हणून मी माझ्या पक्षाच्या वतीने मनापासून डॉ.राव यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, क्रिकेटपटू सचिन रमेश तेंडुलकर यांचाही भारतरत्न पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे. या संदर्भात आतापर्यंत अनेक माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. सचिन रमेश तेंडुलकर यांचे अभिनंदन करताना मला विशेष आनंद वाटतो. रमेश तेंडुलकर नावाच्या मोठ्या साहित्यिकाच्या घरात जन्म घेतलेला हा मुलगा आहे.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

मराठमोळा आहे म्हणून त्याचा अभिमान वाटणे स्वाभाविक आहे. पण श्री.सचिन तेंडुलकर हा महाराष्ट्राचा, देशाचा, नाही तर आता जागतिक नागरिक झाला आहे. क्रिकेट नंतर युनोचा दूत म्हणून काम करण्याचे त्याने ठरविले आहे ही देखील मोठी आनंदाची गोष्ट आहे.

या अभिनंदनाच्या ठरावावर बोलत असताना थोड्याशा वेगवेगळ्या वाटांनी सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत, नव्हे आपल्या मनातील भावनांना वाट करून दिली आहे. रामायणावर आपला विश्वास आहे की नाही हे मला माहीत नाही. रामायणातील कथा आपण नेहमी वाचतो. कोणी दोघांनी चांगले काम केले तर काय, राम-लक्ष्मणाची जोडी आहे असे आपण नेहमी आदराने बोलतो. श्री.सचिन तेडुंलकरांनी निरोपाच्या भाषणात सांगितले की, मी क्रिकेटमध्ये एवढा मोठा झालो याच्या मागे माझा भाऊ श्री.अजित असून तो माझ्या पेक्षा चांगले क्रिकेट खेळत होता. त्याने मला घडविण्यासाठी त्याग केला आहे. सचिन आणि अजित ही राम-लक्ष्मणाची जोडी आहे जेव्हा सचिनने ही बाब सांगितली तेव्हा आपल्याला कळले की, या माणसाचे पाय जमिनीवर किती घट्ट रोवलेले आहेत.

क्रिकेट असो किंवा आपली जीवनशैली असो. काही गोष्टी ह्या महत्त्वाच्या असतात. कमिटमेंट, कॉन्फिडन्स, आणि कंट्रोल याबाबत मैदानावरचा आणि मैदाना बाहेरील कोण आदर्श असेल तर तो श्री.रमेश सचिन तेंडुलकर. आपल्या अवतीभोवती वेदना देणाऱ्या घटना घडत असताना, कुठे तरी आनंद मिळावा, दिलासा मिळावा म्हणून देखील सचिन तेंडुलकरचा खेळ पाहणारे कोट्यवधी आहेत. अशा प्रकारे श्री.सचिन तेंडुलकर यांनी क्रिकेटच्या माध्यमातून आनंदाचे कोट्यवधी क्षण आपल्या पर्यंत पोहोचविले आहेत. त्यातून उतराई होणे महत्त्वाचे आहे. सचिनचा शेवटचा सामना हा रोमहर्षक क्षण होता. सचिनचा शेवटचा सामना मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर होता. तेव्हा प्रत्येकाच्या मनामध्ये सचिन तेंडुलकरचे मैदानावरील क्रिकेटच्या पांढऱ्या व रंगीत वेशातील दर्शन होणार नाही, तो पुन्हा मैदानावर मॅच खेळण्यासाठी येणार नाही अशी एक खंत, हळहळ होती. तेव्हाच एक बातमी आली की, श्री.सचिन तेंडुलकर यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. म्हणजे निवृत्तीच्या क्षणी आपल्या सर्वांच्या भावना उचलंबळून आल्या होत्या. त्याचे एकत्रीकरण होऊन एक मोठा, अधिक व्यापक आनंदाचा क्षण श्री.सचिन तेंडुलकर यांच्यामुळे आपणा सर्वांना मिळाला.

..2

श्री.हेमंत टकले

आपण सर्वजण सचिनची कामगिरी बघण्यासाठी सामने बघतो. शाळेतील कोणत्याही गोष्टी आपल्याला पाठ होत नाहीत. पण कुणालाही विचारावे की, सचिन तेंडुलकरच्या सेन्चुरीज किती झाल्या आहेत, त्याचे एकूण रन्स किती आहेत, एकूण किती सामने कोणकोणत्या देशामध्ये खेळले आहेत, किती दौरे केले आहेत, फर्स्ट क्लास मॅचेसमध्ये किती रन्स झाले आहेत, त्याचे उत्तर पटकन मिळेल. अशा प्रकारे श्री.सचिन तेंडुलकर यांनी एक आगळे वेगळे आकड्यांचे विश्व आपल्या भोवती त्याने निर्माण केले आहे. माणूस म्हणून कसे वागावे याचे देखील त्यांनी उदाहरण घालून दिले. आपल्याला अतिशय उच्च दर्जाचे पद मिळाल्यानंतर, मान-सन्मान मिळाल्या नंतर, गौरव मिळाल्या नंतर माणूस म्हणून कसे रहायचे असे जर कोणी विचारले तर आपल्याला सचिनचे उदाहरण देता येईल. श्री.सचिन तेंडुलकर यांनी आपल्या सहृदयी वर्तनाने,कर्तृत्वाने क्रिकेट गाजवले असून आपले नाते कायमचे जमिनीशी जोडलेले आहे.

श्री.सचिन तेंडुलकर यांच्या संपूर्ण कारकिर्दीवर आपण नजर टाकतो तेव्हा असे लक्षात येते की, त्याच्या बरोबर खेळण्याचे, त्याच्या बरोबर ड्रेसिंग रूममध्ये जाण्याचे भाग्य मिळाले यात धन्यता मानणारे देखील कित्येक खेळाडू आहेत. श्री.सचिन तेंडुलकर सर्वांना हवेहवेसे वाटणारे आहेत. त्यांचे मार्गदर्शन सर्वांना हवे आहे. एक क्रिकेटीयर म्हणून सर्व गोष्टी त्यांच्याकडे आहेत. मानवी मूल्यांची जाण असलेला, मूल्य जपणारा, सामाजिक बांधिलकीचे भान जपणारा माणूस सर्वश्रेष्ठ ठरतो. हे सर्व गुण श्री.सचिन तेंडुलकर यांच्यामध्ये असून ते त्यांनी आपल्या खेळातून आणि वागण्यातून दाखवून दिलेले आहे. एवढेच नव्हे तर हे सर्व गुण त्यांनी आपल्या कर्तृत्वावर सिद्ध केलेले आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

सचिन तेंडुलकर यांनी जे काही श्रेय मिळवले आहे ते त्याने स्वत:कडे कधीच घेतले नाही. त्याने हे श्रेय कधी आई-वडिलांना, कधी भावाला,कधी काका-काकूंना तर कधी पत्नीला दिलेले आहे. या सर्वांच्या पलीकडे जाऊन तो गुरुपुढे नतमस्तक होतो व आचरेकर सरांमुळे मी घडलो असे जेव्हा तो जाहीरपणे म्हणतो त्यावेळेला या देशात ज्या काही पंरपरा सुरु आहेत त्यामध्ये आपले गुरु, आपले पालक, आपले नातेवाईक या सर्वांना आदराच्या ठिकाणी मांडून मी जो काही आहे तो या सर्वांमुळे आहे, तुम्ही मला योग्य मार्ग दाखवला त्यामुळेच मी आज हिमालयापेक्षा ऊंच शिखरावर जाऊ शकलो अशा प्रकारची अतिशय नम्रतेची जाणीव सचिन तेंडुलकरने जपलेली आहे. सचिन तेंडुलकर यांना भारतरत्नाचा सन्मान मिळाला आहे. त्यांच्यामुळे क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक येण्याची संधी लोकांना मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर व जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ. सी.एन.आर.राव यांना भारतरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल आपण त्यांचे अभिनंदन करीत असल्यामुळे मी माझ्या पक्षाच्या वतीने दोन्ही भारतरत्नांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व माझे विचार येथेच पूर्ण करतो.

-----------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहाचे नेते माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर व जागतिक किर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ. सी.एन.आर.राव यांना देशातील भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे व इतर सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. भारताचे विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर यांना लहानपणापासून क्रिकेटची विलक्षण आवड होती. त्यांनी अथक परिश्रम, जिद्द, चिकाटी व अतिशय मेहनत घेऊन गुरुवर्य रमाकांत आचरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक 11 नोव्हेंबर, 1989 रोजी वयाच्या अवघ्या 16 व्या वर्षी पाकिस्तान विरुध्दच्या कसोटी सामन्यात पदार्पण केले. तेव्हापासून अविरतपणे 24 वर्षे या विश्वविक्रम विराची बॅट अखंडित तळपत राहिली. कसोटी आणि एक दिवसीय सामन्यामध्ये धावा आणि शतकांचा विश्वक्रम त्यांच्या नावावर नोंदला गेला आहे. त्यांनी आपल्या 24 वर्षाच्या कारकिर्दीत 200 कसोटी सामन्यात 21 शतके आणि 461 एक दिवसीय सामन्यात 49 शतके मिळून 34347 धावांचे उत्तुंग शिखर पार करीत दुहेरी विश्व विक्रम करुन ऐतिहासिक कामगिरी केली आहे. सचिन तेंडुलकर यांनी क्रिकेटमधील सर्वच विक्रम आपल्या नावावर नोंदवून खेळाडूंपुढे एक आव्हानच ठेवले आहे.

विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री. सचिन तेंडुलकर हे क्रिकेट क्षेत्रात महान खेळाडू आहेतच पण त्याच बरोबर एक सुसंस्कृत व विनम्र व्यक्ती म्हणूनही त्यांनी जगभर लौकिक मिळविला आहे. यातूनच भारतीय संस्कृतीचे दर्शन साऱ्या जगाला घडविले आहे. ते एक आदर्श खेळाडू म्हणूनच पुढील पिढयांना प्रोत्साहन देत राहतील. क्रिकेटपटू म्हणून यशाच्या आणि प्रसिध्दीच्या झोतात असतांनाही त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली आहे. महाराष्ट्राच्या या महान सुपुत्राने आपल्या आईला शेवटचा क्रिकेट सामना पहाता यावा म्हणून 200 वा सामना मुंबई येथील वानखेडे स्टेडियमवर व्हावा अशी विनंती केली होती. यातूनच त्यांचा कुटुंबवत्सलपणा दिसून येतो. एवढेच नव्हे तर हा सामना मुंबईत घेऊन एका अर्थाने निवृत्ती बरोबर आपल्या मायभूमीचे ऋणही त्यांनी फेडले.

या विश्वविख्यात खेळाडूंने क्रिकेटमध्ये केलेल्या असामान्य कामगिरीसाठी त्यांचा "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार, "अर्जुन" पुरस्कार, "विस्डेन" पुरस्कार, "राजीव गांधी खेलरत्न" पुरस्कार, "पद्मश्री" पुरस्कार व "पद्मविभूषण" पुरस्कार, यासारखे अनेक पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** .....

आहे. सचिन तेंडुलकर नावाच्या झंझावाताने गेली 24 वर्षे केवळ भारतीयांच्याच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांवर मोहिनी घालून शेकडो मैदाने गाजवून नवनवे उच्चांक करुन क्रिकेट क्षेत्रातून निवृत्ती घेत असतांनाच त्यांच्या देदिप्यमान कारकिर्दीची दखल घेऊन दिनांक 16 नोव्हेंबर, 2013 रोजी भरत सरकारने देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. अवघ्या वयाच्या 40 व्या वर्षी "भारतरत्न" पुरस्कार मिळविणारा क्रीडा क्षेत्रातील हा पहिला खेळाडू आहे हाही ऐतिहासिक विक्रम सचिनच्याच नावावर नोंदविला गेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

क्रिकेटमधील या विश्वविक्रमी असामान्य क्रिकेटपटुला देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो.

त्याच बरोबर भारताच्या पहिल्या आणि महत्वाकांक्षी मंगळ मोहिमेचे शिल्पकार व जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांनाही त्यांच्या विज्ञान क्षेत्रातील अलौकिक कामगिरीबद्दल भारत सरकारने देशातील सर्वोच्च असणारा "भारतरत्न" पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

डॉ.चिंतामणी नागेश रामचंद्र ऊर्फ डॉ.सी.एन.आर.राव यांचा जन्म दिनांक 30 जून 1934 रोजी बंगळूर येथे झाला. लहानपणापासूनच विज्ञानाची विलक्षण आवड असणाऱ्या राव यांनी अतिशिय जिद्दीने एम.एस्सी., पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण घेत असतानाच 1400 शोधनिबंधाबरोबर 45 पुस्तकांचे विपुल लेखनही केले. तसेच त्यांनी डी.लिबर यांच्या मार्गदर्शनाखाली युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिर्फोनिया या ठिकाणी रसायनशास्त्रातील संशोधन कार्यास सुरुवात केली. 1960 मध्ये भारतात आल्यानंतर त्यांनी आय.आय.टी, कानपूर, आयआयएस, बेंगलोर या संस्थांमध्ये पदार्थ विज्ञान आणि पदार्थ रसायन या विषयात अथक संशोधन केले. संशोधन कार्याबरोबर त्यांनी बंगळूर येथे जवाहरलाल नेहरुन सेंटर फॉर ॲडव्हान्स सायंटिफिक रिसर्च ही संस्था स्थापन करुन 125 पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी इंटरनॅशनल सेंटर फॉर मटेरियल सायन्स या संस्थेचे संचालक तर पंतप्रधानांच्या वैज्ञानिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष म्हणूनही कार्य केले. त्यांनी चीन आणि भारत या दोन देशातील वैज्ञानिक सहकार्य वाढविण्यात फार मोठे योगदान दिले आहे.

गेल्या पाच दशकापासून रसायनशास्त्रातील संशोधन आणि विज्ञान विकासामधील अद्वितीय कामगिरीची दखल घेऊन त्यांना दोन डझनहून अधिक विद्यापीठांनी "डॉक्टरेट" पदवी देऊन गौरविले आहे. एवढेच नव्हे तर अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळालेल्या डॉ.राव यांची "मिस्टर सायन्स ऑफ इंडिया "अशीच ओळख आहे. वैज्ञानिक क्षेत्रातील त्यांच्या या योगदानाबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री, पद्मविभूषण पुरस्कारांनी यापूर्वीच सन्मानित केले आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...

डॉ.राव यांनी रसायनशास्त्रात क्रांतिकारी संशोधन करुन भारताचा नावलौकिक जगभरात वाढविला आहे. त्यांच्या विज्ञान क्षेत्रातील योगदानासाठी भारत सरकारने त्यांना "भारतरत्न" ह्या देशातील सर्वोच्च पुरस्काराने गौरविल्याबद्दल आपणा सर्वांच्या वतीने मी त्यांचे अभिनंदन करतो.

"विश्वविख्यात क्रिकेटपटू श्री.सचिन तेंडुलकर व जागतिक कीर्तीचे थोर शास्त्रज्ञ डॉ.सी.एन.आर.राव यांना "भारतरत्न" हा देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा अभिनंदनपर प्रस्ताव या सभागृहाने एकमुखाने संमत केला आहे."

प्रस्ताव सर्वानुमते संमत झाला.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत</u>**

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या राज्यातील ज्येष्ठ नेत्या श्रीमती मेधा पाटकर आणि ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी काल साखर कारखाने आणि सहकार क्षेत्रातल्या एका महाघोटाळ्या संबंधी काही आरोप केलेले आहेत. त्या आरोपाच्या तपशिलात मी जात नाही. परंतु ज्या कारणासाठी या सभागृहात चर्चा झाली पाहिजे तेवढे कारण मी येथे सांगणार आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये सहकाराच्या क्षेत्रातून समाजवाद आणण्याचे स्वप्न स्व.यशवंतराव चव्हाण यांनी पाहिले होते आणि त्यातून साखर कारखानदारी आणि सहकाराचे क्षेत्र कसे वाढले याचे आपण स्वत: एक साक्षीदार आणि प्रत्यक्ष पाईक राहिलेले आहात म्हणून मी त्याबद्दल काही सांगत नाही.

सभापती महोदय, या सहकार क्षेत्रात स्वत:हून बुडविलेले कारखाने पुन्हा खाजगी माध्यमातून लिलावाद्वारे विकत घ्यायचे व त्याचे खाजगीकरण करायचे असा उद्योग गेल्या काही काळात झालेला आहे. त्यामुळे या प्रश्नाचे गांभीर्य वाढत आहे. यामध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील सदस्य आहेत. मी नोटीस दिली नसल्यामुळे त्यांची नावे घेणार नाही. परंतु त्यांनी असे आरोप केले की, यामध्ये सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील दिग्गज नेते गुंतले असल्याचे किंवा त्यांनी खाजगीकरणाच्या माध्यमातून कारखाने घेतले. ही हातमिळवणी आहे की मॅच फिक्सिंग आहे, या राज्याच्या विकासासाठी सहकार क्षेत्र नाकाम ठरल्यामुळे खाजगीकरणाच्या मार्गाचा अवलंब करण्यासाठी दोघांनी मिळून केलेला विधायक प्रयत्न आहे हे मला माहीत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित..... 13:40

श्री.कपिल पाटील.....

ही लूटमार आहे, त्या शेतकऱ्यांची फसवणूक आहे की, त्या शेतकऱ्यांच्या भल्यासाठी अवलंबलेला एक नवा मार्ग आहे, याचा खुलासा दोन्ही बाजूच्या नेत्यांनी करणे आवश्यक आहे. अन्यथा या सभागृहाबद्दल, सभागृहातील सर्वपक्षीय ज्येष्ठ नेत्यांबद्दल जनतेमध्ये आणि महाराष्ट्रामध्ये वाईट संदेश जाईल आणि तो सभागृहाला अप्रतिष्ठा आणणारा ठरेल. सरकारने आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सांगितले पाहिजे की, आम्ही काही गैर केलेले नाही. त्यांनी गैर केले नसेल तर त्याचा खुलासा होईल. परंतु त्यांनी गैर केले असेल तर त्यांची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. न्यायालयीन चौकशी करण्यासाठीच मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. आपण ती स्वीकारावी आणि दोन्ही बाजूच्या नेत्यांना खुलासा करण्याची संधी द्यावी अशी मी विनंती करतो.

महोदय, लोकशाहीमध्ये ज्यांच्यावर आरोप होतात त्यांना खुलासा करण्याची संधी दिली पाहिजे या मताचा मी आहे. जर यामध्ये काही चुकीचे झाले असेल तर ते न्यायालयीन चौकशीमध्ये सिध्द होईल. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे नेहमी शेतकऱ्यांची बाजू घेतात. मला खात्री आहे की, ते या वेळी सुध्दा शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहतील. ते लुटमारांच्या बाजूने उभे राहणार नाहीत. मी माननीय सदस्य श्री.रावते साहेब आणि माननीय सभापती यांच्याबद्दल अत्यंत विश्वासाने बोलतो. माननीय सभापती यांनी त्यामुळेच मला या सूचनेवर बोलण्याची संधी दिली.

महोदय, राज्यात सहकार क्षेत्र उभारण्यात अनेकांनी गाडून काम केले. कै.जयवंतराव भोसले यांचा काल उल्लेख केला. सहकार क्षेत्रातील व्यक्तिमत्वापैकी ते एक आहेत. राज्यातील अनेक सहकार धुरिणांनी महाराष्ट्राच्या समाजवादाचा पाळणा सहकाराच्या माध्यमातून फुलविला. परंतु तो आज खाजगीकरणाच्या माध्यमातून पळविला जात आहे. सहकार क्षेत्रामध्ये जनतेचा आणि सरकारचा पैसा आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे भागभांडवल आहे. किंबहुना या राज्याच्या बजेटचा सुध्दा त्यामध्ये हिस्सा आहे. परंतु त्या पैशाची लुटमार होत असेल तर ते राज्याचे नुकसान करणारे आहे. ही गंभीर बाब आहे. या ठिकाणी या विषया व्यतिरिक्त अन्य कोणताही महत्त्वाचा मुद्दा असू शकत नाही. मी पुन्हा एकदा विनंती करतो की, मी म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेला अनुमती देऊन त्यावर चर्चा करण्यास सुरुवात करावी.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये अत्यंत ज्वलंत आणि महत्त्वाचा विषय उपस्थित केला आहे. मी सुध्दा अनेक वेळा माझ्या भाषणात सहकारी साखर कारखान्याच्या विक्री बाबतचा उल्लेख करतो. परंतु त्या बाबतचे स्पष्टीकरण वा खुलासा प्राप्त होत नाही. परंतु या प्रकरणी माननीय मुख्यमंत्र्यांनी जो निर्णय घेतला आहे त्याबद्दल मी त्यांचे खास अभिनंदन करतो. काल श्रीमती मेधा पाटकर यांच्या माध्यमातून आंदोलन झाले. सहकारी कारखान्याच्या विक्री संदर्भात 'टाईम्स ऑफ इंडिया' या वर्तमानपत्रात आलेल्या बातमीच्या माध्यमातून हा विषय या ठिकाणी मांडण्यात आला आहे. वास्तविक पाहता मी त्यांच्याशी फोनवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु तो होऊ शकला नाही. मुळात या संपूर्ण प्रकरणाची माझ्याकडे माहिती आहे. कारखान्यांच्या विक्रीमध्ये खरोखरच घोटाळा झाला असेल तर तो शोधणे गरजेचे आहे. या व्यवहारामध्ये निश्चितपणे काही तरी घोटाळा झालेला असावा, काही तरी गैर पध्दतीने होत असावे म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी एक निर्णय घेतला. मी त्यांना व्यक्तिगत भेटलो तेव्हा सुध्दा त्यांचे अभिनंदन केले होते. त्यांनी निर्णय घेतला की, या पुढे कोणताही कारखाना विक्रीला काढता येणार नाही.

महोदय, श्री.विलासकाका उंडाळकर आणि अन्य एका व्यक्तीचा कारखाना 15 वर्षांच्या लीजवर चालविण्यासाठी देऊन व कारखान्यावरील कर्ज फेडून शेतकऱ्यांचा कारखाना शेतकऱ्यांना चालविण्यासाठी देण्याचा निर्णय घेतला. याबद्दल मी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. महोदय, पूर्वीच असा निर्णय घेतला असता तर शेतकऱ्यांचे कारखाने शेतकऱ्यांकडेच राहिले असते आणि कर्जही फेडता आले असते. हा विषय अतिशय गंभीर आहे. आजच्या घडीला शेतकऱ्यांची मालमत्ता आणि कारखाने लयाला गेले आहेत. ते खाजगीकरणाकडे गेले आहेत. जाणूनबुजून कारखाने बंद पाडून खाजगीकरणाच्या माध्यमातून विक्रीला काढण्याचे षडयंत्र केले जात आहे काय याचा खुलासा चर्चेच्या माध्यमातून झाला पाहिजे.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे म.वि.प. नियम 289 अन्वये या विषयावर चर्चा करण्याबाबतचा आग्रह कशासाठी धरत आहेत ? या विषयी माननीय खासदार श्री.राजू शेट्टी यांचे आंदोलन झाले. आम्ही माननीय पंतप्रधानांना सुध्दा भेटलो होतो. शिवाय आता ऊस दर ठरविण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतचे विधेयक पुढील आठवड्यात सभागृहासमोर मांडले

..3..



SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित..... 13:40

श्री.दिवाकर रावते....

जाणार आहे. त्या विधेयकावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा अशी मी विनंती करतो. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: दोन्ही बाबतीत पुढाकार घेतला असल्यामुळे त्यांनी विधेयकाच्या निमित्ताने समर्पकपणे उत्तर दिले तर....

नंतर श्री.कांबळे....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या महाराष्ट्रात सहकार क्षेत्राच्या माध्यमातून निर्माण झालेली लिलाव पध्दत भविष्यात बंद होईल आणि शेतकऱ्यांच्या सहकारातून निर्माण झालेले सर्व वैभव पुन्हा एकदा जागेवर थांबेल, अशी अपेक्षा आहे. मी या गोष्टीचे समर्थन करीत असताना एवढेच सांगेन की, म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्ताव नव्हे पण आम्हाला विधेयकावर मात्र सविस्तर बोलण्याची संधी द्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढील आठवड्यात हे विधेयक आणतो असे सांगितले आहे. ते विधेयक आणणार आहेत. त्यांनी ते विधेयक आणावे, अशी मी विनंती करतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 च्या माध्यमातून सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यानुसार सभागृहात चर्चा झ ााली तर बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतील. हल्ली एक फॅशन झाली आहे की, आरोप करताना, सर्व पक्ष, असे बोलायचे. आता नाथाभाऊ खडसेंनी कारखाना घेतलाच नाही. पण उचलली जीभ लावायची टाळ्याला. छापायला त्यांची मंडळी बसलेलीच आहेत आणि त्यामुळे अनेकांवर अन्याय पण झाला आहे. मेधाताईंनी मांडलेला मुद्दा अतिशय योग्य आहे की, ज्यांचे अगोदर कारखाने होते, त्यांनी ते भ्रष्टाचारात बुडविले आणि मग खाजगी म्हणून विकत घेतले. ते कारखाने त्यांनीच घेतले एवढ्यापुरत्या त्या बोलल्या असत्या तर ते व्हॅलिड होते. आता गडकरी साहेबांनी कारखाना घेतला, आधी तो त्यांचा कधी नव्हताच. सहकारी नव्हता, शेअरही नव्हता. तो कारखाना 5 वर्षे बंद पडला तेव्हा तेथील शेतकरी म्हणत होते की, आमची वाट लागली आहे. त्यांना वाचवण्यासाठी कारखाना घेतला. त्याकरिता आपले पैसे घातले आणि तरी पण उचलायची जीभ लावायची टाळ्याला. त्यामुळे या संदर्भात सभागृहात चर्चा झाली तर खरे दोषी कोण आहेत, हे समजेल. हल्ली सरसकट फॅशन झाली आहे की, ऑल पार्टी भ्रष्टाचारात चालली आहे, असे म्हणायचे. मग त्यालाही हल्ली प्रतिसाद मिळतो. या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली तर त्यातून खरे काय आहे, तेही बाहेर येईल. आपल्याला पॉलिसी म्हणून काही दुरूस्ती करायची असेल तर तीही आपण सभागृहात करू शकता. त्यामुळे ही चर्चा झाली पाहिजे, असे आम्हाला आग्रहाने वाटते.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. कारखाने घेतले आहेत. कारखाने ज्या पध्दतीचे विकत घेतले, त्यामध्ये एकटा मी विरोध करणारा एमएससी बँकेचा संचालक होतो. विलासकाका होते आणि दिलीप देशमुखही होते. पण पक्षाच्या मर्यादा असतात. आघाडी सरकारमुळे त्यांना बोलण्यावर बंधन होते. कारखाने बुडविताना एमएससी बँकेचीही भूमिका कशी संशयास्पद होती, याची पण चर्चा या ठिकाणी झाली पाहिजे. या कारखान्यांना पैसे उशिरा गेले, म्हणून ते बुडाले, अशीही परिस्थिती यामध्ये आहे.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांचे जरूर अभिनंदन करीन की, 25 वर्षे कारखाने चालविण्यास देऊन, मागाहून ते शेतकऱ्यांच्या मालकीचे करण्याचे धोरण त्यांनी केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी ते 17 वर्षांवर आणले. त्यांनी त्याचा अभ्यास केला. मी त्यांना 2-3 वेळा भेटलो होतो आणि सांगितले होते की, राज्य शासनाची या संदर्भातील भूमिका समजली पाहिजे. हे एवढ्यापुरते मर्यादित नाही. कारखाने बुडविताना या कारखान्यांत वेगळ्या तऱ्हेचे झालेले, भ्रष्टाचार, नोकरभरती, त्यावर असलेले अधिकारी आणि त्यावेळचे ऑडिट, या सर्व बाबींची देखील चौकशी झ ााली पाहिजे. अर्बन बँकेच्या बाबतीतील मुद्दा देखील यामध्ये आहे. ते प्रामुख्याने चर्चेमध्ये आले पाहिजे. यावर संचालक मंडळच नाही. वेगळे ऑडिट झाले, तपास झाला. त्यामध्ये वेगळया प्रकारची भूमिका असेल. तो विषय चर्चेला आल्यावर जरूर आपण यावर बोलू.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

आम्हाला एक बॅंकर म्हणून अनुभव आलेला आहे. काही लोकांनी बॅंकेच्या पैशांची परतफेड लवकर केली आहे, काही लोकांनी परतफेड केली नाही. काही कारखान्यांचा कर्मचारी वर्ग, त्या ठिकाणी होत असलेला प्रशासकीय खर्च, कारखान्यांची केलेली विक्री हा सर्व व्यवहार संशयास्पद आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटल्याप्रमाणे या विक्रीची चौकशी झाली पाहिजे. जयंत पाटील हे कारखान्याचे चेअरमन होते. त्यांनी व त्यांच्या मुलानेच एक खाजगी कंपनी स्थापन करुन ते कारखाने अल्प किंमतीमध्ये विकत घेतले आहेत. त्या व्यवहाराची या सभागृहात गंभीरपणे अग्रक्रमाने चौकशी झाली पाहिजे. आज ना उद्या ही सर्व प्रकरणे कोर्टात जाणार आहेत असे आपण सभागृहात बोलतो. कोर्टाने दिलेला निर्णय आपण मान्य करतो. या प्रकरणांबाबत कोर्टाकडून निर्णय येऊ लागले तर ते बरोबर होणार नाही. म्हणून जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्याचे मी समर्थन करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, श्रीमती मेधा पाटकर यांनी यासंबंधी परवा जे काही भाष्य केलेले आहे त्याबाबत या सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे. सहकार क्षेत्राबाबत जर अशा प्रकारे आरोप प्रत्यारोप केले जात असतील तर ते योग्य नाहीत. वास्तविक पाहता या देशामध्ये महाराष्ट्र राज्याने सहकार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे. दुर्दैवाने या क्षेत्रात काही ठिकाणी गैरप्रकार झाले आहेत, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळे या विषयावर सदनामध्ये चर्चा झाली पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. या सूचनेबाबत मी माझा निर्णय जरुर देणार आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सभागृहात अतिशय महत्वाचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. श्रीमती मेधा पाटकर मला काल भेटल्या असाही त्यांनी उल्लेख केलेला आहे. श्रीमती मेधा पाटकर श्री.अण्णासाहेब हजारे यांच्यासमवेत काही महिन्यापूर्वी मला भेटल्या होत्या. त्यावेळी त्यांनी सहकारी साखर कारखान्यांच्या विक्रीसंबंधी आक्षेप घेतला होता व मला निवेदनेही दिली होती. त्यावेळी मी त्यांना.........

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

असे सांगितले होते की, राज्य मध्यवर्ती बँकेच्या सर्व व्यवहारांची सहकार विभागामार्फत चौकशी चालू आहे. त्या मागेही मला भेटल्या होत्या त्यावेळीही मी त्यांना असे सांगितले होते की, सहकार कायद्याच्या कलम 83 अंतर्गत ही चौकशी चालू झालेली आहे. काल मी या चौकशीचा आढावा घेतला तेव्हा मला अशी माहिती देण्यात आली आहे की, ही चौकशी अंतिम टप्प्यात आली आहे. बहुतेक या महिनाभरामध्ये चौकशीचा अहवाल सादर होईल. तो अहवाल आल्यानंतर त्यात सहकारी साखर कारखान्यांच्या विक्रीचाही संबंध आहे. ज्या सहकारी साखर कारखान्यांना राज्य मध्यवर्ती बँकेने कर्ज दिले होते त्या कारखान्यांच्या विक्रीच्या व्यवहारासंबंधी आक्षेप आहेत. त्याबद्दल चौकशी चालू आहे. याबाबतचा अहवाल आल्यानंतर शासनामार्फत जबाबदारी निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. ती कारवाई सहकार कायद्यातील तरतुदीनुसार पुढील काळात निश्चित चालू होईल असे मला असे वाटते. आता या विषयावर सभागृहात चर्चा चालू करावयाची असेल तर शासनाची काही हरकत नाही. आपण वेळ दिला तर माननीय सहकार मंत्र्यांबरोबर चर्चा इ ाल्यानंतर यासाठी वेळ निश्चित करता येईल. पण मला असे वाटते की, सहकार खात्यामार्फत नियम 83 अंतर्गत राज्य मध्यवर्ती बँकेची चौकशी चालू आहे त्याचा अहवाल आल्यानंतर आणखी अर्थपूर्ण चौकशी करता येईल. आपण जो अंतिम निर्णय घ्याल तो सरकारला मान्य असेल.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना दिलेली आहे तो विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये नाही. तरी देखील त्यांनी उपस्थित केलेला विषय अत्यंत महत्वाचा आहे. या विषयावर मी चर्चा नाकारीत नाही. सन्माननीय मुख्यमंत्री आणि सन्माननीय विरोधी पक्षनेते यांच्या बरोबर चर्चा करुन या विषयावरील चर्चा कधी घ्यायची हे मी ठरवीन.

सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्य यांनी काल नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची जी सूचना दिली होती तीच सूचना त्यांनी आज देखील दिलेली आहे. काल देखील मी निर्णय देताना सांगितले होते की, प्रथम नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. ती चर्चा एक दीडतास चालेल. त्यानंतर बरोबर 3.30 वाजता नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा सुरु होईल. ती चर्चा सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत करण्यात येईल. आवश्यकता वाटली तर चर्चेची वेळ वाढविता येईल.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**"आदर्श"चा अहवाल सभागृहाला सादर करण्यासंबंधी न्यायालयीन निदेशाबाबत**

**पॉईण्ट ऑफ इन्फॉर्मेशन**

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. आज आम्ही वृत्तपत्रामध्ये अशी बातमी वाचली की, "आदर्श"चा अहवाल शासन या अधिवेशनामध्ये मांडणार असून तो मांडण्याचे निर्देश शासनाला कोर्टाने दिलेले आहेत. मला आता असे प्रामाणिकपणे वाटू लागले आहे की, आपण विधिमंडळाचे विषय हे न्यायसंस्थेकडे सोपवायला लागलो आहोत. मागील अधिवेशनामध्ये हा विषय मी उपस्थित केला होता त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी सांगितले होते की, आम्ही तो अहवाल सभागृहापुढे मांडणार आहोत. परंतु नंतर अचानकपणे निर्णय बदलला आणि तो अहवाल मांडण्यात आला नाही. राज्याचे निवृत्त झालेले मुख्य सचिव यांनी सांगितले की, असे अनेक अहवाल पडलेले आहेत. अहवाल सभागृहामध्ये मांडलाच पाहिजे असे नाही. सभापती महोदय, माझ्या सारख्या कार्यकर्ता हा विधिमंडळातील लढाई ही विधिमंडळाची आयुधे वापरुन लढत असतो. माझी शासनाला एवढीच विनंती आहे की, आपण न्यायसंस्थेला विधिमंडळावर हावी होऊ देऊ नये. परंतु परिस्थिती अशी आहे की, आम्हाला या ठिकाणी न्याय मिळत नाही. आम्ही न्यायालयात गेल्यानंतर सरकार "होय" म्हणते. मग सरकार या सदनामध्ये "होय" का म्हणत नाही ? "आदर्श"चा अहवाल सभागृहामध्ये मांडण्यात येईल असे सरकारने न्यायालयामध्ये ॲफिडेव्हीट केलेले आहे काय ? तसे असेल तर न्यायालयात "होय" म्हणण्या आधी सभागृहामध्ये "होय" म्हटले असते तर निदान आमची लाज तरी वाचली असती. सरकारला न्यायालयात 11.00 वाजता ॲफिडेव्हिट करायचे होते. त्याच्या आदल्या दिवशी सभागृह चालू होते. अशा प्रकारे आपण विधिमंडळाचे पावित्र्य का कमी करीत आहात ? "आदर्श" बाबत सरकारने न्यायालयात कोणते ॲफिडेव्हिट केलेले आहे काय हे कृपा करुन आम्हाला अवगत करावे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये स्पष्टपणे भूमिका मांडण्यात आली होती की, त्या अहवालावर अभ्यास चालू असून त्यावर ॲक्शन टेकन रिपोर्ट करण्याचे काम चालू आहे. तोपर्यंत काही सदस्य कोर्टात गेले. त्यामध्ये विधिमंडळाचेही काही सन्माननीय सदस्य होते. त्यांनी कोर्टामध्ये प्रश्न उपस्थित केला. त्या ठिकाणी तेच उत्तर

..3..



MSS/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्यात आले, जे मी विधिमंडळामध्ये दिले होते, की हा अहवाल विधिमंडळामध्ये सादर करणार आहोत. या पलीकडे काही सांगितलेले नाही. हा अहवाल या अधिवेशनामध्ये सादर केला पाहिजे असे आदेश कोर्टाने दिलेले आहेत. अहवाल सभागृहाला सादर करण्याची शासनाची भूमिका आहे हे मी पूर्वीच सभागृहाला सांगितलेले आहे. त्यामुळे कोर्टाच्या आदेशामुळे आम्ही काही नवीन करणार आहोत असे काही नाही. अहवाल सभागृहामध्ये सादर करण्याची आमची भूमिका आहे आणि हीच भूमिका मी यापूर्वीही विशद केली होती. त्याप्रमाणे अहवाल विधिमंडळाला सादर होईल.

श्री. विनोद तावडे : कमिशन ऑफ इन्क्वायरी ॲक्टप्रमाणे सहा महिन्यामध्ये ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर झाला पाहिजे. हे आम्ही पावसाळी अधिवेशनामध्ये आपल्या निदर्शनास आणले होते. कोर्टाने कायद्यानुसारच आपणास आदेश दिलेले आहेत. हा कायदा आम्ही सांगितला तर ते आपणास रुचत नाही. कारण सोनारानेच कान टोचावे लागतात. यामुळे आपण न्यायसंस्थेला विधिमंडळावर हावी होऊ देता हेच यातून सिद्ध झाले आहे हेच मला येथे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते.

**सभापती** : आजचे सभागृहापुढील कामकाज पाहता आज मध्यंतराची सुट्टी आपण घेणार नाही. कालच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी सूचना पुढे ढकलाव्या लागल्या. आजच्या कामकाजपत्रिकेवरील सूचना देखील मी पुढे ढकलीत आहे. कालच्या आणि आजच्या अशा दोन्ही दिवसाच्या लक्षवेधी सूचना उद्या सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत घेण्यात येतील.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला येथील विमानतळाच्या विस्तारीकरणाचा प्रस्ताव शासनाकडे अनेक दिवसापासून प्रलंबित असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे, नागो पुंडलिक गाणार यांनी "शासनाने प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत गोंधळ निर्माण करणारे आदेश काढलेले असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "नागपूर शहर व जिल्हयात डासांचा उपद्रव पसरला असून ताप,डेंग्यू तसेच मलेरियाने रुग्ण ग्रस्त असणे, नागपूर मेडिकल रुग्णालयात आवश्यक ते मेडिकल कीट उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "निम्न वर्धा प्रकल्पग्रस्तांचा देय असलेला मोबदला देण्यास अधिकाऱ्यांकडून होत अलेली टाळाटाळ" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या समस्येचे निराकरण न करता शासनाने गासीखुर्द प्रकल्पाच्या पाण्याची पातळी वाढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे निर्माण झालेला धोका " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार,सर्वश्री विनोद तावडे, भाई गिरकर यांनी "न्यू-लिंक रोड अंधेरी (पश्चिम) मुंबई येथे लक्ष्मी औद्योगिक वसाहत असून तेथे मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे केलेली असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---------

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी काल नियम 93 सूचना दिली होती आणि आजही दिली होती. मी सदरहू सूचना वेळेत दिलेल्या होत्या. तरी माझी नियम 93 ची सूचना मान्य केली गेली नाही हे बरोबर नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना सांगू इच्छितो की, आपण नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. खामगाव-चिखली-जालना या रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम गेल्या पाच वर्षात के.टी.कन्स्ट्रक्शन कंपनीने पूर्ण न करणे या विषयासंबंधी सूचना दिली आहे. मला अशी माहिती देण्यात आली आहे की, दिनांक 2 ऑगस्ट, 2013 रोजी नियम 93 अन्वये सूचनेचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवलेले आहे. तरी देखील मी ही बाब तपासून घेतो. वस्तुस्थिती तशी नसेल तर नियम 93 अन्वये ही सूचना उपस्थित करण्यास मी परवानगी देईन.

-----------

3...



ABG/ D/ D/ KTG/ प्रथम श्री.शिगम 14:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जमीन सुधारणा परियोजना (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL NO. IX OF 2013.**

**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND IMPROVEMENT SCHEMES ACT.)**

श्री.राजेंद्र मुळक ( संसदीय कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 9 महाराष्ट्र जमीन सुधारणा परियोजना अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि. प. वि. क्रमांक 9 मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्यांच्या मुद्दयासंबंधी.

**सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी औचित्याचे मुद्दे दिलेले आहेत. ते मुद्दे उद्या मांडले तर बरे होईल असे मला वाटते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास मला आजच परवानगी द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला देखील माझा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी आजच संधी द्यावी अशी माझी देखील आपणास विनंती आहे.

**सभापती** : दोन्ही सन्माननीय सदस्यांचे औचित्याचे मुद्दे आजच ऐकून घेतले जातील. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी आपला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात 3 लाख बांधकामे अनियमितपणे उभारली गेली आहेत. ही बांधकामे नियमित करण्याबाबत कायद्यात बदल करणे आवश्यक आहे. त्यासाठी काल शिवसेना-भारतीय जनता पक्ष व आरपीआयच्या वतीने विधानभवनावर मोर्चा आणला होता. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आमच्या शिष्टमंडळाला आश्वासन दिले की, एमआरटीपी ॲक्ट, महाराष्ट्र जमीन महसूल कायदा आणि ग्रामपंचायत कायद्यात बदल करुन ही बांधकामे नियमित करण्याचे प्रयत्न केले जातील. यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्र आणि पुणे जिल्हयात अनेक सामान्य लोकांना दिलासा देता येईल. ज्यांची स्वत:च्या नावावर जमीन आहे, 7/12 उतारा स्वत:च्या नावावर आहे त्यांच्या नावावरील घरे नियमित करण्याच्या संदर्भात ही विधेयके आहेत. याबद्दल धोरणात्मक निर्णय झाला आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक भूमिका घेतली आहे त्याबद्दल मी त्यांचे औचित्याच्या मुद्याद्वारे या प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छिते.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अदाकार ए आझम, अझीम ए शान, अभिनयाचे महामेरु आदरणीय युसुफ खान तथा दिलीपकुमार यांचा आज 91 वा वाढदिवस आहे. ज्वारभाटापासून सुरु झालेल्या या अभिनयाच्या यात्रेत सिनेसृष्टीच्या या बादशहाने मोजकेच चित्रपट अभिनित केले. परंतु 'या सम हा' अशी त्यांची ओळख आहे. त्याना महाराष्ट्र भूषण हा पुरस्कार द्यावा आणि भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारस करावी इतके त्यांचे महान व्यक्तिमत्व आहे. मी केवळ त्यांच्या अभिनयापुरते सांगत नसून अनेक चित्रपट अभिनेते आणि अन्य क्षेत्रातील माणसे सुध्दा सामाजिक काम करतात. दिलीपकुमार आणि सायराबानो हे दाम्पत्य सुध्दा सामाजिक काम करतात याबद्दल मी बोलत नाही. दंगलीच्या काळात धार्मिक सलोखा यासाठी त्यांनी काम केले. मुस्लीम समाजातील मागासवर्गीय, मुस्लीम ओबीसी आणि दलित मुस्लीमांचे प्रश्न ऐरणीवर आणण्यात सगळ्यात मोठा वाटा कोणाचा असेल तर तो दिलीपकुमार यांचा आहे. त्यांची या कामावरील प्रेरणा होती ती थेट डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना दिलीपकुमार तरुण होते तेव्हा भेटले होते. त्यांची प्रेरणा आणि विचार त्यांनी कृतीत आणला. दिलीपकुमार हे भारतीय चित्रपट सृष्टीचे, भारतीय संस्कृती व ऐक्य आणि सलोख्याचे प्रतीक आहेत. म्हणून मी राज्य शासनाकडे या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करतो की, दिलीपकुमार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार द्यावा आणि भारतरत्न पुरस्कारासाठी शिफारस करावी.

**सभापती** : सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना मी सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. दिलीपकुमार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार द्यावा आणि त्यांचा अन्य राष्ट्रीय सन्मान व्हावा अशी माननीय सदस्यांची अपेक्षा आहे, ती पूर्ण होईल या दृष्टीने आपण प्रयत्न करावा.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सूचना अतिशय चांगली आहे. अशी अनेक महत्वाची मंडळी राहिली आहेत, त्यांच्याबरोबर यांचाही सन्मान करु.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**सभापती** : आता कामकाजपत्रिकेवरील अनुक्रमांक सात वर दाखविलेला सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व इतर यांचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. या प्रस्तावावरील चर्चा दुपारी 3.30 वाजता थांबविण्यात येऊन सन्माननीय विरोधी पक्षनेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी विदर्भातील अतिवृष्टीच्या अनुषंगाने दिलेल्या प्रस्तावावरील चर्चा सुरु करण्यात येईल. मध्यंतरीच्या काळात नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा केव्हा पूर्ण करावयाची याबाबत सभागृहाला अवगत केले जाईल. यानंतर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन आणि वीज क्षेत्रातील कामांना होत असलेला विलंब दूर करणे

**मु.शी.**: विदर्भ व मराठवाड्यातील सिंचन आणि वीज क्षेत्रातील कामांना होत असलेला विलंब दूर करणे याबाबत सर्वश्री माणिकराव ठाकरे, मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री रमेश शेंडगे, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, हेमंत टकले, सुभाष चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्याचा सर्वांगीण विकास होत असताना विदर्भातील बहुतांशी जिल्ह्यांचा असलेला अनुशेष, सन २०१२-१३ पासून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाअंतर्गत अभियंत्यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असल्याने, सिंचन प्रकल्पांसाठी महामंडळाकडे उपलब्ध असलेल्या कोट्यावधी रुपयांच्या निधीपैकी अंदाजे रुपये १,८०० कोटी इतका निधी अद्यापही अखर्चित असणे, विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्पाची सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्रकरणेही दोन-दोन वर्षापासून प्रलंबित असणे, तसेच, सिंचन प्रकल्पाचे पाणी खाजगी प्रकल्पांना दिले असणे, विदर्भातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून कृषी पंप विद्युत पुरवठ्यासंबंधी ॲप्लीकेशन पेड पेन्डिंग व ॲडव्हाईज पेड पेन्डिंग यासंबंधी शेतकऱ्यांमध्ये संभ्रम असणे, कृषी वीज पंप विद्युत पुरवठा, विद्युतीकरण इत्यादी कामांच्या निविदा काढण्याचे अधिकार स्थानिक स्तरावर नसल्याने कामांना प्रचंड विलंब होत असणे, तसेच, विदर्भात मोठ्याप्रमाणात लोडशेडींगचा प्रश्न असणे, अमरावती जिल्ह्यातील ६,५०० कृषी वीजपंपांचा अनुशेष निवारण्यासाठी रुपये ४५ कोटी अद्यापही देण्यात न येणे, या सर्व बाबींबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन कार्यवाही व उपाययोजना करण्याची आवश्यकता विचारात घेण्यात यावी."

नंतर श्री.भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, आज विदर्भामध्ये अधिवेशन होत आहे. संयुक्त महाराष्ट्र झाला त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण व विदर्भातील सन्माननीय नेत्यांनी एकत्रितपणे विदर्भासंबंधी करार केला. त्याला नागपूर करार असे नाव देण्यात आले. येथील अनुशेष दूर करण्यासाठी वर्षातून एकदा विदर्भात अधिवेशन घेण्यात यावे असे नागपूर करारात नमूद करण्यात आले होते. तेव्हा पासून सातत्याने दरवर्षी विदर्भामध्ये हिवाळी अधिवेशन नागपूर येथे होते. याला फक्त एकच अपवाद आहे. 1962-63 मध्ये भारताचे चीन सोबत युद्ध झाले होते. त्यावर्षी नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होऊ शकले नाही. हा अपवाद बाजूला ठेवला तर सातत्याने नागपूर येथे हिवाळी अधिवेशन होत आहे. आपण दरवर्षी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे घेत आहोत. येथे बजेट सेशन का होऊ नये याचा कराराच्या दृष्टीने विचार करण्यात यावा अशी माझी विनंती आहे. संयुक्त महाराष्ट्र होत असताना महाराष्ट्रातील उर्वरित भाग पुढारलेला असल्यामुळे, तेथे अनेक प्रकल्प झाल्यामुळे, उद्योग आले असल्यामुळे विदर्भ मागासलेला राहील अशी भीतीची भावना विदर्भातील नेत्यांच्या आणि जनतेच्या मनामध्ये निर्माण झाली होती. त्यावेळी विदर्भामध्ये सिंचनाची व्यवस्था नव्हती. बेरोजगारीचे प्रमाण मोठे होते. इतर राज्यां सोबत जाताना आपण कुठे तरी कमकुवत राहू, विदर्भ मागासलेला राहील अशी भीती तत्कालीन विदर्भातील नेत्यांना आणि जनतेला वाटत होती. आपणा सर्वांना माहिती आहे की, नागपूर करार हा घटनेतील 371 व्या तरतुदीनुसार करण्यात आला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

सभापती महोदय, या करारामुळेच संयुक्त महाराष्ट्र उदयास आला. सिंचन आणि इतर बाबीच्या संदर्भात सुरुवातीच्या काळात मोठया प्रमाणात बॅकलॉग असल्यामुळे दांडेकर समितीची स्थापना करण्यात आली. त्यावेळेस दांडेकर समितीला घटनात्मक दर्जा दिला गेला नव्हता. त्यावेळेस कलमाचा वापर सुध्दा करण्यात आला नव्हता. 371 कलम लागू न करता, घटनात्मक दर्जा न देता आपणच आपल्या स्तरावर बॅकलॉग भरुन काढून सर्व क्षेत्रात समानता आणू शकलो तर ते एक चांगले पाऊल होईल यासाठी मधल्या काळात प्रयत्न झाले होते. दांडेकर समिती निर्माण केल्यानंतर बॅकलॉग काढण्याची पध्दत अस्तित्वात नव्हती. बॅकलॉगची माहिती सभागृहाला देण्याची पध्दतही नव्हती किंवा वेगळया प्रकारचा बॅकलॉग काढण्याचीही पध्दत त्यावेळी नव्हती. त्यामुळे विदर्भातील आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी दांडेकर समितीला घटनात्मक दर्जा देण्याची मागणी केली व तशा प्रकारचा निर्णय घेतला गेला. माननीय राज्यपाल महोदयांच्या हातामध्ये काही घटनात्मक निर्णय दिले गेले. त्या काळात दांडेकर समितीने योग्य प्रकारे बॅकलॉग काढला नसल्यामुळे अनेक क्षेत्र वंचित राहिली अशी चर्चा झाली व त्यामुळे अनुशेष निर्देशांक समिती निर्माण करण्यात आली व या समिती मार्फत विदर्भाचा तसेच मराठवाडयाचा 1993 पर्यंतचा बॅकलॉग किती आहे तो काढण्यात आला. कलम 371 च्या अनुषंगाने 1994 पासून आर्थिक बॅकलॉग काढण्यास सुरुवात झाली. 1994 पासून आर्थिक निकष काढण्याची आपली पध्दत होती . विदर्भातील जनतेची आणि मराठवाडयातील जनतेची बॅकलॉग भरला जावा अशी इच्छा होती. परंतु प्रशासकीय दृष्टिकोनातून पाहिजे तशी तरतूद करण्यात आली नाही. त्यावेळेस साधारणत: 9 विषयावरील बॅकलॉग काढण्यात आला होता. 9 विषयापैकी 70 टक्के बॅकलॉग सिंचनाचा होता व इतर बॅकलॉग 30 टक्के होता हे सर्व राज्याला माहिती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आज सभागृहात येणार नव्हते परंतु विदर्भाच्या प्रस्तावाची चर्चा होणार असल्यामुळे ते आज या सभागृहात आलेले आहेत. या ठिकाणी केवळ माननीय मंत्री श्री. पतंगराव कदम हेच उपस्थित आहेत. या प्रस्तावामध्ये महत्वाचा मुद्दा हा सिंचनाचा आहे. या ठिकाणी सिंचन मंत्री, कृषी मंत्री, ऊर्जा मंत्री उपस्थित नाहीत. सिंचनावर चर्चा सुरु असतांना सिंचन मंत्री उपस्थित नाहीत त्यामुळे सिंचन मंत्री येईपर्यंत सभागृहाची बैठक स्थगित करण्यात यावी अशी विनंती आहे. ...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, विदर्भाच्या प्रस्तावामध्ये सिंचनाचा विषय महत्वाचा असतांना सिंचन मंत्री सभागृहात उपस्थित नाही. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सिंचन मंत्र्यांना सभागृहात बोलवावे व माननीय सिंचन मंत्री येईपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : माननीय सिंचन मंत्र्यांना निरोप देण्यात आला असून ते थोडयाच वेळात सभागृहात दाखल होतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे या सभागृहाचे जेष्ठ सदस्य असून ते महाराष्ट्र कॉंग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. विदर्भात अधिवेशन सुरु असून विदर्भाच्या बॅकलॉगच्या संदर्भात चर्चा सुरु आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील...

त्यावेळी सभागृहात त्या त्या विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित असणे आवश्यक आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या व्यक्तिगत अपमानाचा हा भाग नाही. परंतु विदर्भाच्या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, आपल्या पक्षाच्या नेतृत्वाकडे पाहण्याचा दृष्टीकोन असे सर्व प्रश्न निर्माण होतात. विदर्भावर वारंवार असा अन्याय का होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या ठिकाणी मांडलेला मुद्दा बरोबर आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्हाला हे प्रत्येक अधिवेशनामध्ये का सांगावे लागत आहे ?

**उप सभापती** : मी संबंधित विभागाच्या मंत्री महोदयांना येथे उपस्थित राहण्याबाबत निरोप दिलेला आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विदर्भातील सिंचन आणि अनुशेषाचा मुद्दा आहे. विदर्भात अधिवेशन होत आहे. सिंचनाचा विषय इमोशनली घेतला पाहिजे पण तो घेतला जात नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे विभागाचे मंत्री येईपर्यंत आपण सभागृहाची बैठक स्थगित करावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अधिवेशन सुरु होण्यापूर्वी मी येथे आले होते. प्रत्येकजण तुम्हा आम्हास विचारतो की, या अधिवेशनातून काय मिळाले ? अशा वेळी आपण जे काही प्रश्न मांडतो ते ऐकून त्यावर उत्तर देण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. सभागृहात विभागाचे मंत्री उपस्थित नसतील तर ठराविक लेखी उत्तर वाचून दाखविले जाते.

**उप सभापती** : मी सभागृहाची बैठक दुपारी 2.30 पर्यंत स्थगित करतो.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.22 ते 2.30 पर्यंत स्थगित झाली. )

--------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, या प्रस्तावातील दोन्ही विषय विदर्भाप्रमाणेच संपूर्ण राज्याच्या दृष्टीने सुध्दा तितकेच महत्त्वाचे आहेत. यातील अनुशेषाचा विचार केला तर दोन्ही विषय विदर्भाच्या दृष्टीने फारच महत्त्वाचे आहेत. अतिशय महत्त्वाच्या विषयांवर सभागृहामध्ये चर्चा सुरु असताना संबंधित विभागांच्या मंत्री महोदयांनी उपस्थित राहावयास पाहिजे होते. परंतु ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज काही वेळ स्थगित करावे लागले. ही बाब संबंधित माननीय मंत्री आणि शासनाने गांभीर्याने घेतली पाहिजे एवढेच या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

महोदय, सिंचनाचा अनुशेष काढण्यासाठी अनुशेष निर्देशांक समिती स्थापन करण्यात आली. त्या समितीने विदर्भ आणि मराठवाड्यामध्ये सिंचनाचा 70 टक्के अनुशेष काढला. उर्वरित 8 विभागांतील अनुशेष केवळ 30 टक्के निघाला. सुरुवातीच्या काळात हा अनुशेष भरुन काढण्यासाठी कोणताही घटनात्मक दर्जा नव्हता. परंतु माननीय राज्यपालांनी घटनेच्या 371 व्या कलमान्वये अनुशेष भरुन काढण्यासाठी एक समिती स्थापन केली. तद्नंतर माननीय राज्यपालांनी वेळोवेळी अनुशेष दूर करण्यासंदर्भात निर्देश दिले. माननीय राज्यपालांनी 2001 मध्ये राज्य सरकारला असे निर्देश दिले की, 5501 कोटी रुपयांचा आर्थिक अनुशेष 2002 ते 2006 या कालावधीत भरुन काढला पाहिजे. माननीय राज्यपालांनी निर्देश दिल्यानंतर प्रत्यक्षात किती अनुशेष भरुन काढला हे माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगितले पाहिजे. तद्नंतर 2004 पासून 2013 पर्यंतचा अनुशेष दूर करण्यासाठी विदर्भ सिंचन महामंडळाला जो निधी दिला त्यातील किती रक्कम उक्त कालावधीत राज्य सरकारने खर्च केली हे देखील सांगितले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.कांबळे....

श्री. माणिकराव ठाकरे ....

या संदर्भातील माहिती सदनाला देणे गरजेचे आहे. हा अनुशेष आर्थिक स्तरावर काढण्यात आला. सन 1994 ला 1 हेक्टर जमीन भिजविण्याकरिता जेवढा आर्थिक अनुशेष निघत होता, तोच अनुशेष सन 2013 ला त्याच आधारावर काढणे चुकीचे आहे. दर प्रचंड वाढले आहेत, खर्च वाढला आहे. कितीतरी पटीने खर्च वाढला आहे. त्यामुळे तो अनुशेष भौतिक आधारावर काढला जावा, अशा प्रकारचे निदेश सन 2005 ला माननीय राज्यपालांनी दिले आणि तेव्हापासून विदर्भात असा अनुशेष काढण्यास सुरुवात झाली. त्या वेळचा अनुशेष लक्षात घेतला आणि आजचा खर्च लक्षात घेतला तर त्यामध्ये सुध्दा प्रत्येक वेळी 10-15 टक्क्यांची वाढ अनुशेषामध्ये झाली आहे. अनुशेष कमी झाला नाही, उलट वाढला. आपण ती रक्कम लक्षात घेतली आणि भौतिक आधारावर अनुशेष काढण्याचे माननीय राज्यपालांनी दिलेले निदेश पहायचे ठरविले तर विदर्भात कमीत कमी 45 ते 50 हजार कोटी रूपयांचा अनुशेष आजही शिल्लक आहे. नियोजनबध्द पध्दतीने, कालबध्द कार्यक्रमाच्या माध्यमातून सिंचन प्रकल्प उभे करण्याकरिता पैसे कसे देणार आहात, हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न आहे. शासन त्याकरिता कालबध्द कार्यक्रम ठरविणार आहे, या बाबतही सदनाला सांगितले पाहिजे.

आजमितीला विदर्भ सिंचन महामंडळाकडे मोठ्या प्रमाणात प्रकल्प असून त्यांची कामे थांबली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे विदर्भ सिंचन महामंडळाकडे जवळपास 1800 ते 2000 कोटी रूपये आले आहेत. आता डिसेंबर महिना सुरू आहे. पुढील 3 महिन्यांत 2 हजार कोटी रूपये कसे खर्च करणार आहात, याचेही उत्तर सदनाला मिळाले पाहिजे. विदर्भातील प्रकल्पांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या संदर्भात देखील विचार केला पाहिजे. महाराष्ट्रात 225 प्रकल्प असे आहेत की ज्यांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही, त्या 225 प्रकल्पांपैकी 65 प्रकल्प विदर्भातील आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यता दिल्याशिवाय सिंचन व्यवस्था पूर्ण होऊ शकणार नाही. आपण त्या दृष्टीनेही विचार केला पाहिजे. विदर्भातील प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची गरज आहे. आपण त्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता द्यावी. आपण या संदर्भात लक्ष घातले पाहिजे. विदर्भातील सिंचन व्यवस्था व्यवस्थित केली पाहिजे. विदर्भात निश्चितच पाणी आहे. विदर्भात चांगल्या प्रकारे नद्या वाहतात, पर्जन्यमान चांगले आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

परंतु, विदर्भातील जमीन मोठ्या प्रमाणात कोरडवाहू आहे. ते पाणी सिंचनाकरिता आणण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. दिलेला पै अन् पै पैसा विदर्भातील अनुशेषाकरिता खर्च झाला पाहिजे. मागील काळात बऱ्याच पॉवर प्रोजेक्ट्सना विदर्भातील पाणी मोठ्या प्रमाणात देण्यात आले.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

20 हजार मेगावॉटचे प्रकल्प आजही खाजगी माध्यमातून सुरु आहेत. त्या वीज प्रकल्पांना आतापर्यंत किती पाणी दिले आहे आणि पुढे किती पाणी दिले जाणार आहे ते सांगितले पाहिजे. सिंचनासाठी बांधलेल्या प्रकल्पातून वीज प्रकल्पांसाठी प्रचंड पाणी दिले जाणार असेल तर त्यातून विदर्भाचा व राज्याचा किती फायदा झाला तेही आम्हाला सांगावे.

सरकारकडून अनेक वीज प्रकल्पांना मान्यता दिल्यानंतर पाणी दिले जात आहे. 2003 मध्ये केंद्र सरकारने विधेयक सादर करुन संपूर्ण देशातील राष्ट्रीयीकरण करुन सर्वांना त्या क्षेत्रात आणण्याचा प्रयत्न केला आहे. तेव्हापासून कोणाला कोठेही वीज प्रकल्प उभा करता येतो. वीज प्रकल्प उभा करीत असताना पाण्यावर मात्र राज्य सरकारचा अधिकार ठेवला आहे. त्यामुळे आज पाणी हा सगळ्यात महत्वाचा विषय ठरलेला आहे. हे नवीन वीज प्रकल्प आजूबाजूच्या राज्यामध्ये जात नाहीत. विजेचे खाजगी प्रकल्प फक्त विदर्भातच कसे येत आहेत हा संशोधनाचा विषय आहे. वीज प्रकल्पासाठी शेतकऱ्यांचे पाणी घेतले जात आहे. एखाद्या नदीचे पाणी धरणासाठी अडविले जाते. त्या पाण्यावर खालच्या भागातील शेतकऱ्यांचा हक्क असतो. पण त्या शेतकऱ्यांच्या पाण्याचा हक्क काढून घेत असताना त्यांची पर्यायी व्यवस्था सुध्दा शासनाने केली पाहिजे. अशा प्रकारची व्यवस्था मागील विधेयकामध्ये होती. त्याप्रमाणे त्या शेतकऱ्यांचे पाणी घेणार आहोत त्यांना शासन विचारणार आहे की नाही ? ज्या शेतकऱ्यांना धरणातून पाणी मिळणार होते, त्यांना आता पाणी मिळणार नसल्यामुळे त्यांची जनसुनावणी घेऊन त्यांना पर्यायी व्यवस्थेची माहिती दिली पाहिजे. पर्यायी व्यवस्था करण्याची तरतूद आहे, त्याप्रमाणे काही ठिकाणी होत आहे, पण काही ठिकाणी ती होत नसेल तर ती का केली जात नाही ?

सन 2005 साली जल आयोग स्थापना करण्यात आला आहे. परंतु त्या संस्थेचे 2010 मध्ये पूर्ण अधिकार काढून घेण्यात आले. 2010 मध्ये कोणत्याही वीज प्रकल्पाला मंजुरी देण्याचे अधिकार मंत्रिमंडळाकडे घेण्यात आले. 2010 पर्यंत ज्या वीज प्रकल्पांना पाणी देण्यात आले त्याची जबाबदारी कोणाची होती, कोणाच्या नेतृत्वाखाली पाणी देण्यात आले याची माहिती या सदनाला मिळाली पाहिजे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, विदर्भातील प्रकल्पांच्या स्थितीकडे लक्ष दिले तर आपल्याही ते लक्षात येईल. गोसीखुर्द हा प्रकल्प 1983 सालातील आहे. त्या प्रकल्पाची किंमत 372 कोटी रुपये होती. तो प्रकल्प पूर्णत्वाकडे नेत आहोत. भविष्यात त्या प्रकल्पाचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे. परंतु त्या प्रकल्पाची किंमत 7,787 कोटी रुपये इतकी झाली आहे. 1994 सालातील वर्धा प्रकल्पाची किंमत 48 कोटी रुपये इतकी होती. आता त्याची किंमत 2000 कोटी रुपये इतकी झाली आहे. उर्ध्व वर्धा प्रकल्पाची किंमत 13 कोटी रुपयांवरुन 1400 कोटीपर्यंत गेली आहे. खडकपूर्णा प्रकल्पाची किंमत 79 कोटी रुपयांवरुन 1100 कोटीपर्यंत गेली आहे. या सर्व प्रकल्पांसाठी शासनाने आर्थिक निकषानुसार तरतूद केलेली आहे. त्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरविला होता. पण तो पैसा अनेक वेळा परत गेला व इतर भागातील कामांसाठी वापरण्यात आला. विदर्भातील भौतिक अनुशेष वाढलेला असल्यामुळे शासनाला कालबध्द कार्यक्रम ठरवावा लागेल. त्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे.....

मागच्या काळामध्ये आपण काही प्रकल्प हाती घेतले. साधारणत: 15 ते 16 लाख हेक्टर पर्यंतचे क्षेत्र ओलिताखाली येईल अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात 3 लाख 82 हजार हेक्टर एवढीच सिंचन क्षमता निर्माण झाली आणि या निर्माण झालेल्या क्षमतेचा वापर देखील अत्यंत कमी झालेला आहे. अधिकारी हे केवळ धरण बांधून पाणी अडविण्यामध्येच इंटरेस्टेड असतात. धरण बांधून झाल्यानंतर आणि त्यामध्ये पाणी साठल्यानंतर ते पाणी कालव्याच्या माध्यमातून, पाटचाऱ्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत पोहोचते की नाही हे पाहण्यामध्ये अधिकारी उत्सुक दिसत नाहीत. एकदा धरण बाधून पाणी अडले की त्यांची जबाबदारी संपते आणि मग कालवे आणि पाटचा-यांकडे दुर्लक्ष होते. अनेक सन्माननीय सदस्यांनी या सदनामध्ये पाटचा-या आणि कालव्यांच्या दुरुस्तीसाठी ठेवलेले पैसे हडप झाल्यासंबंधीचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. आपण मोठमोठी धरणे बांधल्यानंतर त्या धरणाचे पाणी शेतकऱ्याच्या शेतापर्यंत पाहोचत नसेल तर आपल्याला प्रशासकीय व्यवस्थेमध्ये सुधारणा करुन नवीन रचना करावी लागेल आणि ती करण्याची गरज आहे. हे केले तरच साठविलेल्या पाण्याचा पिण्यासाठी आणि शेतीसाठी उपयोग होईल.

सभापती महोदय, अलीकडच्या काळामध्ये शासनाने अनेक लहान मोठे प्रकल्प हाती घेतलेले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील माण, खटाव तालुक्यामध्ये, सांगली जिल्ह्यातील आटपाडी, जत तालुक्यामध्ये, सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, तसेच मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम आणि मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांच्या मतदारसंघामध्ये सिमेंटचे बंधारे घेण्यात आले. जवळ जवळ दीड हजारापेक्षा जास्त सिमेंटचे बंधारे त्या भागामध्ये घेण्यात आले. पूर्वी दगड टाकून बंधारे बांधले जात होते. त्यामुळे दगडामधून पाणी झिरपून जात होते. आता सिमेंटची छोटी भिंत बाधून बंधारे बांधण्यात येत असल्यामुळे पाण्याचा पाझर होत नाही. हे बंधारे बांधल्यामुळे जलाशयाचा मोठ्या प्रमाणावर साठा निर्माण होऊ शकला. धुळे जिल्हयातील शिरपूर तालुक्यातील सन्माननीय सदस्य श्री. अमरिश पटेल यांनी ज्या प्रकारचे बंधारे बांधलेले आहेत त्यांना शिरपूर पॅटर्न बंधारे असे नाव पडलेले असून तशा प्रकारचे बंधारे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये करण्याचा विचार आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याचेही माननीय मुख्यमंत्र्यांनी बोलून दाखविलेले आहे. राज्यामध्ये मोठ्या धरणा बरोबरच लहान लहान बंधारे बांधावे लागतील. यामुळे कालवे, पाटचाऱ्या यांच्याप्रमाणेच विहिरीच्या माध्यमातूनही चांगल्या प्रकारे सिंचन होईल. ज्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:40

श्री. माणिकराव ठाकरे...

भागामध्ये सातत्याने दुष्काळ पडतो अशा दुष्काळी भागामध्ये अशा बंधाऱ्यांच्या कामाची आखणी केलेली असली तरी ज्या भागामध्ये दुष्काळ नाही अशा भागामध्ये देखील व्यापक प्रमाणात कामाची आखणी केली तर पिण्याच्या पाण्याचा आणि सिंचनाचा प्रश्न निर्माण होणार नाही. माननीय जलसंधारण मंत्री महोदय डॉ. नितीन राऊत यांच्या विभागामार्फत जलसंधारणाची चांगली कामे करण्यात आलेली आहेत. त्यांनी देखील पाणी अडविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेतलेली आहेत. सिंचनाच्या संदर्भात सर्व विभागांनी अशा प्रकारची पावले उचलण्याची गरज आहे. विदर्भ, मराठवाड्यामध्ये देखील अशा प्रकारच्या प्रकल्पांना अधिकाधिक प्रोत्साहन दिले पाहिजे अशा प्रकारची मी सूचना करतो.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

महोदय, सिंचनाच्या अडचणीमुळे विदर्भात पीक पॅटर्न चेंज झालेला आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात कापूस व्हावयाचा, परंतु सिंचनाच्या अडचणीमुळे गेल्या चार ते पाच वर्षापासून शेतकरी सोयाबीन पिकाकडे वळावयास लागला आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या कापसाला योग्य तो भाव मिळत नसल्यामुळे तसेच कापूस पीक देखील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्टया परवडत नसल्यामुळे विदर्भातील कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होऊ लागले होते. शेतकऱ्यांना आर्थिक लाभ मिळावा, शेतकऱ्याला अधिक मिळकत मिळावी, या दृष्टीकोनातून विदर्भातील शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाची पेरणी करण्यास सुरुवात केलेली आहे. परंतु सोयाबीन पिकाचा अनुभव असा आहे की, सोयाबीन पिकाचे फार मोठया प्रमाणात उत्पन्न होते. परंतु अवेळी पाऊस पडला तर सोयाबीन पिकाची प्रचंड हानी होते. गेल्या काही दिवसांपूर्वी विदर्भात अवकाळी अतिवृष्टी झाल्याने सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात आर्थिक मदत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे.

महोदय, ठिबक सिंचनावर अधिक जोर राज्य शासन देत आहे. माननीय मुख्यमंत्री सातत्याने सांगत आहेत की, शेतकरी ऊसाचे पीक सुध्दा ठिबक सिंचन योजनेच्या माध्यमातून घेत आहेत. कापसाचे पीक सुध्दा ठिबक सिंचन योजनेच्या माध्यमातून घेऊ लागले आहेत. पूर्वी फक्त ठिबक योजनेच्या माध्यमातून फळबाग लागवड मोठ्या प्रमाणात होत होती. परंतु अलीकडच्या काळामध्ये सगळी पिके घेण्यासाठी ठिबक सिंचन योजना उपयुक्त ठरु शकते आणि चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळते हे सिध्द झाले आहे. ठिबक सिंचन योजना कपाशीसाठी अधिक फायदेशीर आहे. महाराष्ट्रात जेव्हा पासून बी.टी.कॉटन आला, तेव्हापासून विदर्भामध्ये कापसाचा ॲव्हरेज मोठया प्रमाणात वाढलेला आहे. शेतकरी ठिबक सिंचन योजना राबवित नव्हते. त्यामुळे कापसाचे क्षेत्र शिफ्ट झाले. पूर्वी कापूस पिकविण्याच्या बाबतीत विदर्भ पहिल्या क्रमांकावर होते. परंतु आता कापूस पिकविण्याच्या बाबतीत जळगावचा एक क्रमांक लागतो. यवतमाळचा नेहमी कापूस पिकविण्याच्या बाबतीत पहिला क्रमांक असावयाचा. परंतु तेथील शेतकरी आता सोयाबीन पिकाची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

पेरणी करु लागले आहेत. वाशिम,अकोला,बुलढाणा,अमरावती या भागातील शेतकऱ्यांनी सुध्दा सोयाबीन पिकाची मोठ्या प्रमाणात लागवड केलेली आहे. पूर्वी प्रमाणेच विदर्भात कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणात व्हावे म्हणून ठिबक सिंचन योजना राबविणे गरजेचे आहे.

महोदय, माझ्या पूर्वीच्या मतदार संघात बेंबळा प्रकल्प आहे. त्या प्रकल्पातून 15 ते 20 गावांसाठी एक ठिबक सिंचन योजना हाती घेतली. एका ठिकाणचे पाणी उचलले आणि ठिबक सिंचन योजनेच्या माध्यमातून 20 हजार एकरास पाणी देण्याचे काम केले आहे. पाणी देण्याचे काम देखील संगणकाच्या माध्यमातून करण्यात आले आहे. एखाद्या शेतकऱ्याने मला पाणी नको आहे असे सांगितले तर त्याचे पाणी बंद केले जाते. त्यांना सिंचन योजनेची देयके येणार नाहीत अशा प्रकारची ठिबक सिंचन योजना त्या ठिकाणी सुरु केलेली आहे. पूर्वी तो माझा मतदार संघ होता, बेंबळा प्रकल्पातून ही योजना मी पूर्वीच मंजूर करुन घेतलेली आहे. त्या योजनेवर जवळपास 350 ते 375 कोटी रुपये एवढा खर्च झालेला आहे. मला विशेषत: माननीय श्री.सुनील तटकरे साहेबांना सांगावयाचे आहे की, ही योजना पूर्ण झालेली आहे. परंतु ठिबकसाठी अजून 10 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या शेतातून ठिबकचे जे पाईप गेलेले आहेत ते जमिनीतून बाहेर आलेले आहेत, ते पाईप पूर्ववत करण्यासाठी शेतकऱ्याला कर्ज घेणे परवडत नाही. या योजनेचा लाभ घेणारे काही शेतकरी सधन आहेत, ते जास्त दराने कर्ज घेऊन ठिबकचे नवीन संच घेऊ शकतील. परंतु 70 ते 80 टक्के शेतकरी गरीब आहेत, ते जास्त दराने कर्ज घेऊन ठिबकचे संच घेऊ शकत नाहीत. त्या गरीब शेतकऱ्यांना नव्याने ठिबक संच पुरविण्यासाठी राज्य शासनाने अथवा विदर्भ सिंचन महामंडळाने 10 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध करुन दिली तर त्याचा फायदा 4500 ते 5000 शेतकऱ्यांना होऊ शकतो. शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनीतून कोणती पिके घ्यावयाची शेतकऱ्यांच्या जमिनीचा उतार कसा आहे, त्या जमिनीतून कोणते उत्पन्न जास्त प्रमाणात निघू शकते यासंबंधी सर्व्हे केलेला आहे, तसेच सर्व शेतकऱ्यांच्या जमिनींची तपासणी करुन घेतलेली आहे. शेतकऱ्यांच्या शेतावर जाण्यासाठी लहान लहान रस्ते, पूल यासंबंधीचा देखील सर्व्हे केलेला आहे. दोन ते तीन कोटी रुपये खर्च करुन शेतकऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना ट्रेनिंग देण्याची व्यवस्था करण्यात आली पाहिजे. 10 कोटी रुपया अभावी ही महत्वपूर्ण योजना अपूर्ण आहे. ठिबक सिंचन योजनेच्या माध्यमातून पिके घ्यावीत असे आपण शेतकऱ्यांना सांगतो.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

परंतु एखादा चांगल्या प्रकारचा प्रकल्प येतो त्याला प्रोत्साहन देण्याचे काम का केले जात नाही हे मला कळत नाही. मंत्री महोदयांना मी विनंती करतो की, विदर्भ सिंचन महामंडळाच्या माध्यमातून काही सूचित केले पाहिजे. विदर्भाचा भौतिक आधारावरील अनुशेष दूर करण्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरविण्यासाठी राज्य शासन पावले उचलून विदर्भातील जनतेला विश्वास देणार आहे का? पुढील दहा वर्षाच्या काळात दरवर्षी ठराविक रक्कम देऊन अनुशेष दूर करणे आणि सुधारित प्रकल्पांना मान्यता कशा प्रकारे दिली जाईल याबाबत स्पष्ट भूमिका राज्य शासनाने घेतली पाहिजे.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर यांच्या अभ्यास गटाची शासनाने नियुक्ती केली. यापूर्वी अनुशेषाच्या संदर्भात डॉ.वि.म.दांडेकर यांचा अभ्यास गट नेमण्यात आला होता. केळकर अभ्यास गटाला धोरणात्मक दर्जा मिळाल्यामुळे राज्य शासन त्या अभ्यास गटाचा अहवाल स्वीकारुन निर्णय घेईल असे आम्हाला अपेक्षित आहे. अनेक वेळेला अभ्यास गट नेमले जातात. त्या अभ्यास गटांनी सादर केलेल्या अहवालानुसार निर्णय घ्यायचा किंवा नाही हे शासन निश्चित करीत असते. परंतु डॉ.विजय केळकर यांनी दीड महिन्यापूर्वी शासनाला अहवाल सादर करुनही अद्याप तो सभागृहासमोर सादर का झाला नाही या संदर्भात मंत्री महोदयांनी स्पष्टता केली पाहिजे.

सभापती महोदय, घटनेच्या कलम 371 नुसार वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्यात आली. या कलमानुसार माननीय राज्यपालांना घटनात्मक अधिकार दिले आहेत. विदर्भ आणि मराठवाडा या मागास भागाच्या विकासाच्या अनुषंगाने हे घटनात्मक अधिकार दिले आहेत. ज्या वेळेला व्याख्या बदलण्याची भाषा केली जाते त्यावेळेला तालुका घटक मानून अनुशेष दूर करण्यासाठी निधी दिला पाहिजे. ज्या भागामध्ये पाणी नाही तेथे पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी पाण्याची साठवणूक केली पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. कलम 371 नुसार मराठवाडा आणि विदर्भाला केळकर समितीच्या माध्यमातून धक्का लागणार असेल तर ते कदापि सहन केले जाणार नाही. केळकर समितीने काय शिफारस केली आहे हे आम्हाला माहिती नाही. तालुका निकष धरला तर 371 कलमाच्या अनुषंगाने तुम्ही अनुशेष दूर करु शकता की नाही हा महत्वाचा भाग आहे. कलम 371 मुळे जो विश्वास देण्यात आला, संयुक्त महाराष्ट्राच्या वेळेला जी शाश्वती विदर्भातील जनतेला देण्यात आली त्या विश्वासाला तडा जाणार नाही अशा

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

प्रकारचा अहवाल असेल तर तो स्वीकारावा अन्यथा तो अहवाल केराच्या टोपलीत टाकण्यात यावा अशी मी मंत्री महोदयांना सूचना करतो.

सिंचन विभागाच्या संदर्भात अनेक प्रकारचे उल्लेख करता येतील. खार पाणपट्ट्याचा प्रश्न हा अकोट, दर्यापूर, अकोला, अमरावती भागात बिकट बनला आहे. त्या ठिकाणच्या जमिनीमध्ये क्षारयुक्त पाणी आहे. त्यातील रसायन बाहेर येते आणि पिकाची नासाडी होते. असे मोठे क्षेत्र महाराष्ट्रामध्ये आहे. त्या क्षेत्राकरिता वेगळ्या प्रकारे शेततलाव घेतले तर जमिनींचा ओलावा कायम राहू शकतो.

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्या जमिनीतून काही पीक काढले तर शेतकऱ्यांना उत्पन्न मिळू शकेल. महाराष्ट्रात आकोट व दर्यापूर येथील जमीन एक नंबरची आहे. त्या जमिनीला पाणी देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे मी येथे मुद्दाम नमूद करू इच्छितो.

सभापती महोदय, मी सिंचना संबंधी काही सूचना केल्या आहेत. 2000 ते 2004 पर्यंतच्या रूपये पाच हजार कोटीच्या निधी संबंधी माननीय राज्यपालांनी निदेश दिले आहेत. त्यातील किती निधी खर्च झाला आहे. सन 2003 पासून 2013 पर्यंत बॅकलॉग म्हणून किती पैसा दिला. तो पैसा येथे किती उपयोगात आणला. त्यातील किती पैसा परत गेला आहे. त्याच बरोबर आपण भौतिक आधारावर किती बॅकलॉग काढला आहे, यासाठी आपण कोणता कालबद्ध कार्यक्रम ठरवित आहात, आज आपण किती पॉवर प्रोजेक्टना पाणी दिले आहे. त्यातून एकूण किती पाणी जाणार आहे, त्या प्रोजेक्टना पाणी देण्याचे कारण काय आहे, या प्रकल्पातून महाराष्ट्राला किती वीज मिळत आहे व किती वीज महाराष्ट्रा बाहेर जात आहे, यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. यासंबंधी माननीय मंत्री महोदय समाधानकारक उत्तर देतील अशी मला निश्चितपणे खात्री आहे.

लघु-सिंचन प्रकल्पावर मी जास्त काही बोलणार नाही. जिगाव प्रकल्पासून अनेक छोट्या-छोट्या प्रकल्पांसंबंधी कित्येक प्रश्न निर्माण झालेले आहेत. हे अपूर्ण राहिलेले प्रकल्प सुव्यवस्थितपणे पूर्ण करण्याकडे आपण लक्ष द्यावे अशी मी सूचना करतो.

ज्या भागामध्ये वीज गळती आहे, विजेची वसुली कमी आहे तेथे लोडशेडिंग करण्याचा कन्सेप्ट राज्यामध्ये आणला आहे. यामध्ये आपण एक विचार केला पाहिजे. आपण संपूर्ण राज्याचा जेव्हा विचार करतो तेव्हा राज्यामध्ये कुठल्या क्षेत्रामध्ये किती वीज वापरली जाते, त्या माध्यमातून कंपनीला किती तोटा होतो याचा सुद्धा थोडा अभ्यास होण्याची गरज आहे. ज्या भागामध्ये वीज केंद्र उभे आहे त्या भागाला कसा न्याय देता येईल याचा विचार केला पाहिजे. वीज गळतीला विभाग निहाय आधार घेतला पहिजे. अमूक एका भागामध्ये वीज गळती झाली. तेथील वीज बिले भरली नाहीत असा आपण आधार घेता. जेथे वीज गळती होते किंवा वीज बिल भरले जात नाही तेथील वीज कनेक्शन तोडले जाते. विदर्भ, मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सगळ्या भागांचा विचार करता विदर्भामध्ये सर्वात जास्त महसूल विजेच्या उत्पादनातून जनरेट होतो. तरी देखील विदर्भात विजेवर कमी खर्च केला जातो. आपण नवीन निकष असा लावला आहे की, जेथे वीज गळती जास्त असेल तेथे लोड शेडिंग केले पाहिजे. बिल भरले नाही तर लोड शेडिंग केले पाहिजे. विदर्भातील शेतकरी गरीब आहे. तो कोरडवाहू शेतकरी आहे. त्यामुळे रब्बीचे थोडेसे पीक उन्हाळ्यात काढण्याचा तो प्रयत्न करतो. आपल्या शेतातील विहिरीच्या पाण्यावरच हे शेतकरी उत्पादन करीत असतात. त्यातून त्यांना जास्त काही फायदा होत नाही. येथे मोठ्या प्रमाणावर ऊस निघत नाही किंवा मुंबई-पुण्या सारखी मोठी बाजारपेठ नाही की, जिच्या माध्यमातून चांगले उत्पन्न काढता येईल व त्याद्वारे भरपूर पैसा मिळेल अशा प्रकारची व्यवस्था नाही. कापसाचे पीक साधारणत: जानेवारी, फेब्रुवारी या महिन्यामध्ये निघते. आपल्या विहिरीतून शेतकरी खरिपाच्या पिकाला 1, 2, 3, पाळयात पाणी देत असेल तर त्याने अधिक पैसे भरावेत ही कन्सेपट न पटणारी आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

ज्या भागात नगदी पिके घेतली जात नाही अशा भागातील शेतकऱ्यांनी इतर भागाप्रमाणेच विजेचे पैसे भरावेत हा जो शासनाचा कन्सेप्ट आहे तो न पटण्यासारखा आहे. त्यामुळे शेतकरी कोणत्या मालाचे उत्पादन काढत आहे, त्या उत्पादनातून त्याचा आर्थिक फायदा किती होतो याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. हा गरीब शेतकरी विजेचे किती बिल भरु शकेल याचा विचार होण्याची आवश्यकता आहे. आपण 80 टक्के वीज बिलाची रक्कम भरण्याची पध्दत ठेवली आहे. 80 टक्के विजेचे पैसे शेतकरी भरत असेल तर अशा शेतकऱ्याला विजेचे कनेक्शन जोडून दिले जाते. त्यामुळे सर्व भागातील शेतकऱ्यांनी 80 टक्के पैसे भरले पाहिजे ही जी अट घातली आहे त्यानुसार मागासलेल्या भागातील शेतकरी विजेचे 80 टक्के पैसे भरु शकत नाही. राज्यातील नागरिकांना समान न्यायाने वागवले पाहिजे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असेल तर अशा शेतकऱ्यांना प्रत्येक विभागाच्या माध्यमातून मदत केली पाहिजे. त्यामुळे सर्व विभागाने यासंदर्भात विचार करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्रात दिवसाला 8 तास वीज दिली जाते व रात्री 10 तास वीज दिली जाते. आठवडयातील 4 दिवस दिवसा व 3 दिवस रात्री वीज दिली जाते. आज अदाणी कडून जवळजवळ 3300 मेगा वॅट वीज विकत घेतली जाते. राज्य शासनाने सुध्दा आपल्या विद्युत संचाची क्षमता वाढवली आहे तसेच बाहेरच्या राज्यातून सुध्दा वीज विकत घेतली जाते. एकंदर विजेची किती गरज आहे याची डिटेल माहिती काढण्याची आवश्यकता आहे. शेतकरी विजेचे पैसे भरत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लोडशेडींग वाढवले तरी चालेल अशी माहिती कंपनीचे अधिकारी आपल्याला देत असतील तर ते योग्य नाही. खरे म्हणजे विजेच्या संदर्भात शासनाने आपल्या हातामध्ये नियंत्रण घेण्याची आवश्यकता आहे. नफा कमावण्यासाठी कंपन्या आपल्याला काही सूचना करीत असतील परंतु त्या माध्यमातून जनतेवर अन्याय होत असेल तर त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मला आठवते की, ज्यावेळेस युतीचे सरकार होते त्यावेळेस म्हणजे 1995 ते 1998 पर्यंत एकाही शेतकऱ्याला वीज कनेक्शन दिले गेले नव्हते. 1998 नंतरही एक दोन वर्ष हाच प्रकार सुरु होता. शेतकऱ्यांना कनेक्शन दिले तर तोटा होईल अशी माहिती अधिकारी देत असतील तर त्यासंदर्भातही विचार होण्याची आवश्यकता आहे. ...2...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे या ठिकाणी चुकीची माहिती देत आहेत. युती शासनाच्या काळात युती शासनाने एका वर्षात 1.30 लक्ष विजेचे कनेक्शन दिले होते.

श्री. माणिकराव ठाकरे : युती शासनाच्या काळात सरसकट कनेक्शन देण्याची पध्दत बंद होती.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आघाडी शासन आता वर्षाला 3.5 लक्ष विजेचे कनेक्शन देत आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, युती शासनाच्या सुरुवातीच्या काळात वीज कनेक्शन दिले जात होते. परंतु नंतर श्री. बन्सल असताना किती वर्षे कनेक्शन दिले जात नव्हते याची माहिती मला पूर्णपणे आहे. युती शासनाच्या काळात जे कनेक्शन दिले ते कोणत्या भागात दिले त्याचीही माहिती मी आपणास देण्यास तयार आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सुरुवातीच्या काळात अशा प्रकारे कनेक्शन दिले जात नव्हते. नंतर एक-दोन वर्षे हा प्रकार सुरु होता. मी हे सांगितलेले आहे... (अडथळा ) ....अधिवेशन सुरु होऊन दोन दिवस झालेले आहेत तेव्हा नंतरच्या कालावधीत मी आपणास ते शोधून देऊ शकतो. तेव्हा कोण खरे बोलते, कोण असत्य बोलते यावर कशासाठी चर्चा करायची ? कोणावर आरोप करायचे म्हणून मी येथे सांगितलेले नाही. अधिकाऱ्यांचे एमएसईबीबाबत काय धोरण होते ते मी येथे मुद्दाम नमूद केले आहे. पुढे असे प्रकार होऊ नयेत म्हणून शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा असाच कारभार पुढे सुरु राहील. तेव्हा त्याबाबतीत लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक उपस्थित आहेत. ते कोणताही विभाग सक्षमपणे सांभाळू शकतात याची सर्वांना जाणीव आहे. त्यामुळे काही काळजी करण्याचे कारण नाही. ऊर्जा मंत्री येथे उपस्थित नसले तरी राज्यमंत्री उत्तर देण्यास सक्षम आहेत.

सभापती महोदय, मी आपणास ट्रान्सफॉर्मरबद्दल सांगत होतो. आज प्रत्येक जिल्ह्यात 150 ते 200 ट्रान्सफॉर्मरची गरज आहे. आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये कमी क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर देतो. ज्या ठिकाणी 100 के.व्ही.च्या ट्रान्सफॉर्मरची आवश्यकता असेल त्या ठिकाणी 60 के.व्हीचा ट्रान्सफॉर्मर दिला जातो. त्यामुळे आठ दिवसात ट्रान्सफॉर्मर जळून खराब होतो आणि तो रिपेअर होईपर्यंत शेतातील पिके वाळतात अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, मला यवतमाळ जिल्ह्यामध्ये अधिकाऱ्यांकडून असे समजले की, ट्रान्सफॉर्मर घेण्याकरिता किंवा त्याची केबल वा इतर साहित्य घेण्याकरिता निधीची तरतूद नाही. यवतमाळ जिल्ह्याचा 33 कोटी रुपयांचा बँकलॉग आहे. परंतु बॅकलॉग नाही असे सांगितले जाते. अमरावती जिल्ह्यामध्ये थोड्याफार प्रमाणात निधी दिला. ट्रान्सफॉर्मरचे साहित्य खरेदी करण्यासाठी अधिकाऱ्यांना फक्त 75 हजार रुपयांपर्यंत अधिकार दिलेले आहेत. तेव्हा ही रक्कम वाढवून दिली पाहिजे. सर्वच अधिकार सेंट्रलाईज केले तर निर्णय होण्यास वेळ लागतो आणि हे शेतकऱ्यांना न परवडण्यासारखे आहे. तेव्हा मोठ्या प्रमाणावर ट्रान्सफॉर्मर जळत आहेत त्याबाबतीत लक्ष देण्याची गरज आहे.

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, सन 1948 मध्ये संपूर्ण देशामध्ये विजेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यावेळी फक्त तीन शहरांचे म्हणजे मुंबई,अहमदाबाद आणि कोलकाता या शहरांमध्ये विजेचे राष्ट्रीयीकरण केले नव्हते. आपल्या राज्यात एमएसईबीने चांगल्या प्रकारे ॲसेट उभे केले आहे. कोणत्याही राज्यामध्ये नसेल इतक्या 12 ते 13 हजार मेगावॅट क्षमतेची केंद्रे उभी केली. आपल्याला केंद्र सरकारच्या प्रकल्पाची गरज नाही. आपणच आपली वीज निर्मिती करुन त्याचे वाटप करु शकतो आणि ही पध्दत अनेक वर्षे चांगल्या पध्दतीने सुरु राहिली.

सभापती महोदय, आपल्याकडे एन्रॉन प्रकल्प आला. त्या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला चांगल्या प्रकारे वीज मिळेल अशी कल्पना होती. एन्रॉन प्रकल्पातून वीज निर्मिती सुध्दा झाली. परंतु वीज निर्मितीसाठी लागणारे इंधन पुरेसे मिळत नाही.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 15:15

श्री.माणिकराव ठाकरे....

एन्रॉन प्रकल्पाबरोबरच उरण प्रकल्पाच्या बाबतीत सुध्दा तीच परिस्थिती आहे. आजच्या घडीला राज्यात 4 हजार मे.वॅ. वीज नाफ्त्यावर अवलंबून आहे. वीज निर्मिती करण्यासाठी आवश्यक तेवढे इंधन मिळाले पाहिजे. प्रकल्पाला वीज निर्मितीसाठी इंधन मिळत नसेल तर वीज निर्माण होणार नाही. मागील काळामध्ये वीज उत्पादन करण्यासाठी आवश्यकतेपेक्षा 30 टक्के कोळसा कमी मिळाल्यामुळे विजेचे उत्पादन कमी झाले. त्यामुळे राज्यात भारनियमनामध्ये वाढ करावी लागली. या परिस्थितीवर मात करण्यासाठी किंबहुना कोळसा मुबलक प्रमाणात मिळण्यासाठी दिल्ली येथे जाऊन व नेत्यांबरोबर बैठका घेऊन पुरेसा कोळसा मिळविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. दाभोळ आणि उरण प्रकल्पामध्ये वीज निर्माण करण्यासाठी जेवढे इंधन पाहिजे तेवढे मिळविण्यासाठी केंद्रीय स्तरावर जाऊन त्यांच्याकडे त्या बाबतीत आग्रह धरला पाहिजे. नाही तर आपल्याला भविष्यात मोठ्या प्रमाणावर भारनियमन करावे लागेल. राज्यात भारनियमन वाढविण्याची गरज पडू नये यासाठी वीज कंपन्या आणि राज्य सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

महोदय, वीज नियामक आयोगाने अलीकडे सांगितले की, मागच्या वेळी वीज उत्पादन कंपनीने जो कोळसा खरेदी केला त्यामध्ये 1800 ते 2000 कोटी रुपयांचे प्रचंड नुकसान झाले. यामध्ये झालेला तोटा ग्राहकांकडून भरुन घेतला पाहिजे. त्यामुळे सहा महिन्यांकरिता उद्योगांसाठी 8.5 रुपये ते 9 रुपये प्रति युनिट दर लावला गेला. हा दर सहा महिन्यांपुरता असला तरी कोणत्याही उद्योगातून उत्पादन होत असेल आणि तो उद्योग बाहेरच्या राज्याशी स्पर्धा करीत असेल तर त्याला तो दर परवडणार नाही. सहा महिने त्या उद्योगाने बाहेरच्या राज्यातील उद्योगाशी स्पर्धा केली नाही तर तो उद्योग बाहेरच्या राज्याच्या स्पर्धेतून मागे जाईल. पर्यायाने महाराष्ट्र राज्य हे उद्योगाच्या स्पर्धेतून मागे पडेल. सहा महिन्यानंतर हा दर कमी केला तर त्या उद्योगाला मार्केट कॅप्चर करणे शक्य होणार नाही. मी तर म्हणेन की, हा निर्णय सहा महिन्यांपुरता केला असला तरी तो चुकीचा आहे असे माझे ठाम मत आहे. आजूबाजूच्या राज्यात हा दर साडेतीन ते चार रुपये प्रति युनिट आहे. गोवा राज्यामध्ये तर तो 3 रुपयांपासून पुढे आहे. आपल्या राज्यात उद्योग क्षेत्रावर एवढा भार लादणे चुकीचे आहे. या संदर्भात नेमके काय केले पाहिजे या बाबतचा निर्णय सरकारने घेतला पाहिजे. कारण हा दर अजूनही दोन महिने उद्योगांना सोसावा लागणार आहे. त्यामुळे या दरातून उद्योगांना तत्काळ रिलीफ देण्याबाबतचा निर्णय घेणे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

गरजेचे आहे. तशा प्रकारचा निर्णय सरकारने घ्यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करतो.

महोदय, यवतमाळ जिल्ह्याप्रमाणेच राज्यातील इतरही जिल्ह्यांमध्ये ट्रान्सफॉर्मरचा प्रश्न आहे. ट्रान्सफॉर्मरची पूर्तता करण्यासाठी आवश्यक तेवढा निधी देणे गरजेचे आहे. राज्यात विजेच्या कनेक्शन बाबत सुध्दा मोठ्या प्रमाणावर मागणी आहे. 60 किंवा 100 के.व्ही. कॅपॅसिटीचे ट्रान्सफॉर्मर देऊन भागणार नाही. या निमित्ताने मी मागणी करतो की, पुरेशा कॅपॅसिटीचे ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करुन द्यावे आणि त्यानंतर विजेच्या कनेक्शनची मागणी पूर्ण केली पाहिजे. महाराष्ट्रात विजेच्या कनेक्शनचे अनेक अर्ज प्रलंबित आहेत. काही जिल्ह्यात दोन-तीन हजार अर्ज प्रलंबित असून काही जिल्ह्यांमध्ये 15 ते 30 हजार अर्ज प्रलंबित आहेत. विजेच्या कनेक्शनचा विषय हा विदर्भात अत्यंत महत्त्वाचा आहे.

महोदय, ज्या वेळी तीन वीज कंपन्या निर्माण केल्या त्यावेळी माझे ठाम मत होते की, प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र वीज कंपनी असावी. विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण-खान्देश या विभागांसाठी चार स्वतंत्र वीज कंपन्या असाव्यात. त्या भागात जे काही उत्पादन होईल त्या बाबतचा अधिभार त्या कंपनीवर टाकला पाहिजे. जेणेकरुन त्या भागात समान वाटप करु शकू. परंतु ते शक्य झाले नाही. शेवटी वितरण, ट्रान्समिशन आणि प्रॉडक्शन अशा वीज कंपन्या निर्माण केल्या गेल्या.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ....

किमान मदत करण्याच्या संदर्भात समानता ठेवत असताना विदर्भातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती नजरेसमोर ठेवून आखणी करावी आणि त्याप्रमाणे मदत करावी. आज अनेक विषय होते. शेतकऱ्यांच्या संदर्भातीलही विषय होता. तसा प्रस्तावही करण्यात आला होता. मग सर्व विषय त्यामध्ये घेतले. त्यानंतर बरेच विषय कमी केले. धानाच्या संदर्भातील विषय असेल, बोनस देण्याच्या संदर्भातील विषय असेल, अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानाच्या संदर्भात समान मदत करणे असेल त्या बाबतीत कमी अधिक न करता, सोयाबीन, धान, कापूस अशा सर्व उत्पादक शेतकऱ्यांना सारखी मदत करण्याचा विषय असेल, असे अनेक विषय होते. आता ते विषय वेगवेगळ्या प्रस्तावाच्या अनुषंगाने येतील, त्यावेळी त्यावर चर्चा करू. शासन या सर्व विषयांना न्याय देण्याचे काम करील, अशी खात्री बाळगतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, "नेमेचि येतो मग पावसाळा" त्याप्रमाणे आज मी पुन्हा एकदा अनुशेषाचा विषय मांडत आहे. मला असे वाटते, हिवाळी अधिवेशन आले की, आम्ही विदर्भाच्या लोकांना काही तरी देत आहोत, हे सांगण्याकरिता हा विषय अतिशय महत्त्वाचा म्हणून मांडला जातो असे म्हटले तर काही वावगे होणार नाही. विदर्भाच्या प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात झाली, त्यावेळी एकही संबंधित माननीय मंत्री या ठिकाणी उपस्थित नव्हते. माननीय मंत्र्यांचाच अनुशेष होत असेल, विचारांचा अनुशेष होत असेल तर आम्हाला न्याय मिळेल, असा विश्वास मला आजही वाटत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी विदर्भातील अनुशेषांची चर्चा अत्यंत तळमळीने मांडली आहे. ते पक्षाचे नेते आहेत. ते सदनातील ज्येष्ठ नेते आहेत. माननीय मुख्यमंत्री पाहणीसाठी आले होते. विदर्भातील अधिवेशनात विदर्भातील विषय असावेत, असा आग्रह असतो. वेळ नसताना ते आले. परंतु, त्यांच्याच पक्षातील विदर्भातील एकही आमदार येथे हजर नाहीत, हे मी मुद्दाम निदर्शनास आणून देतो. तळमळ असलेली लोकशाही यांच्याकडे आहे, हा मुद्दा सुध्दा लक्षात आणून देतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आम्ही अनुशेषावर गळा फाडून बोलणार आणि आमचे आदरणीय मंत्री शब्दच्छल करून अनुशेष कसा कमी झाला हे सांगणार. आम्ही पुढे काय करणार आहोत, विदर्भातील विकास कसा करणार आहोत, विदर्भाला शिखरावर पोहचविण्याचे काम कसे करणार आहोत हे सांगणार आणि हे सर्व सांगितल्यानंतर पुन्हा एकदा तुमचे उत्तर ऐकल्यानंतर मागील बाजूने बाके वाजविली जाणार. मग उद्या वर्तमानपत्रात बातमी येणार की, विदर्भाला असे दिले आहे आणि बाजूलाच बातमी राहणार की, यवतमाळमध्ये 5 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. परंतु, त्या झालेल्या आत्महत्यांचे तुम्हाला काहीही दु:ख वाटत नाही. तुमच्या हृदयापर्यंत सुध्दा त्या वेदना जात नाहीत. इतक्या कोरड्या नेत्रांनी आपण विदर्भाच्या प्रश्नांवर चर्चा करीत आहोत. कोणीही गंभीरपणे घेत नाही. "नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडून गेले वारे",

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

अशी आज विदर्भाची स्थिती आहे. मी आपल्याला छोटीशी कविता म्हणून दाखविते.

"त्या मेघांनी का गरजावे, ज्यांना ओलाव्याचा सुंगधही नाही,
त्या कलिकेने का उमलावे, जिचे सुंगधाशी नातेही नाही,
त्या यौवनेने का श्रृंगारावे, जिला प्रेमाची पारखच नाही,
त्या नेत्यांनी का गहिवरावे, ज्यांच्या जवळ मानवतेचा लवलेशही नाही.
त्या नेत्यांसमोर आम्ही का बोलावे, ज्यांच्या हृदयाला पाझरच फुटत नाही."

सन्माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे साहेब, गोदावरी लवादाने आपल्याला आपल्या हक्काचे पाणी दिले. परंतु, तेही अजून मिळालेले नाही. हाच मोठा अनुशेष या ठिकाणी आहे. सन 1980 च्या निर्णयाप्रमाणे विदर्भाच्या हक्काचे 140 अब्ज घनफूट पाणी 33 वर्षांत अजूनपर्यंत अडवू शकलो नाही. त्याचे साधे नियोजनही करू शकलो नाही. 33 वर्षांत विदर्भावरील प्रेम कुठे दिसत असेल तर ते या नियोजनात दिसत आहे. पश्चिम महाराष्ट्राचे, पुण्याचे नियोजन होते, तिकडच्या लोकांचा विचार घेऊन समित्या करण्यात येतात. पण विदर्भाच्या अंगावरील कपडेही उतरविण्यास सुरूवात झाली आहे. आज विदर्भाच्या अंगावर कपडे घालण्याचे सामर्थ्य सुध्दा या नेतृत्वात नाही.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

त्यामुळे आम्हाला पुन्हा दु:खाने तोच विषय मांडावा लागतो. कठाणी, भीमकुंडा, हुमन, बुटीनाला, अंधारी, तुलतुली, निंबूघाट, कारवा या सर्व प्रकल्पांना अद्याप मंजुरी का मिळाली नाही ? वन कायदा 1983 साली आला आहे, परंतु 1972 सालातील या प्रकल्पांना मंजुरी देण्याची आमची मागणी आहे. पण या प्रकल्पांना शासनाची मंजुरी मिळत नाही. हा दोष कोणाचा आहे ? शासनाच्या वन खात्याच्या बडग्याखाली फक्त विदर्भच येतो ? लवासा प्रकल्पासाठी 20 कि.मी.पर्यंतचे जंगल कापून पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवून विदेशी पर्यटकांसाठी वेगळी सीटी निर्माण केली जाते. आज राज्याला नवीन शहराची गरज नाही, राज्यातील शेतकऱ्यांना वाचविण्याची सिंचन प्रकल्पांची गरज आहे.

विदर्भात मुबलक पाणी आहे, पण वन कायद्याचा धाक आम्हालाच दाखविला जातो. या ठिकाणी माननीय वन मंत्री बसलेले आहेत. हुमन प्रकल्पाला बफर झोन लावून तो प्रकल्प रद्द करण्यात आला. या प्रकल्पामुळे कोणते नुकसान होणार आहे याची चर्चा करण्यासाठी एक बैठक घ्यावी अशी मागणी करुनही गेले वर्षभर बैठक घेण्यासाठी मंत्री महोदयांना वेळ नाही. विदर्भातील लोकांचे अश्रू पुसण्यासाठी वेळ नाही. पण लवासासाठी 20 कि.मी.पर्यंत जंगल कापले जाते त्यासाठी वन विभागाच्या व पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नाही. विदर्भातील प्रकल्पांसाठी मात्र परवानगी लागते. कारण विदर्भातील लोक कायद्याचे पालन करणारे आहेत. आमच्याकडे ताकद नाही असे शासनाला वाटत असेल तर तेही चुकीचे आहे. विदर्भावरील अन्याय आम्ही किती दिवस सहन करावयाचा असा मला प्रश्न पडतो. विदर्भाचे सिंचन प्रकल्प वन कायद्याच्या नावाने नाकारले जातात. येथील प्रकल्प नाकारले जात असताना पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सिंचन प्रकल्प कसे उभे राहतात, त्यासाठी योजना कशा आखल्या जातात ? विदर्भातील पाणी पश्चिम महाराष्ट्रातील वैनगंगा, नळगंगा येथे नेण्याची चर्चा केली जाते. खोब्रागडी नदीचे पाणी मांजरा धरणासाठी नेण्याची चर्चा केली जाते. त्यासाठी प्रशासकीय मान्यता दिली जाते, आर्थिक तरतूद केली जाते. पण ज्या खोब्रागडी नदीवर विदर्भातील प्रकल्प अवलंबून आहेत त्यासाठी मात्र वन कायदा लावला जातो. येथील पाणी नेताना वन कायदा लागू होत नाही का ? गोसीखुर्द प्रकल्प अद्याप पूर्ण झालेला नाही.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, चंद्रपूर, गडचिरोली व मेळघाट हा आदिवासी भाग आहे. या भागात नक्षलवाद्यांनी मोठ्या प्रमाणात धुडगुस घातलेला आहे. आदिवासींवर शासनाने सतत अन्याय केल्यामुळे व तेथे विकास न झाल्यामुळे ते धुडगूस घालत आहेत. मराठवाडा व विदर्भात रस्त्यांच्या बाबतीत सुध्दा अनुशेष शिल्लक आहे. आदिवासींना रस्ते नाहीत, पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प नाहीत, वीज नाही. त्यांनी आयुष्यभर झोपडीत राहून मंत्र्यांच्या नावावर ठप्पे मारावेत अशी मानसिकता असेल तर त्यामुळे विदर्भाचा विकास कधीही होऊ शकणार नाही. आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. प्रसुतीच्यावेळी महिलांचा मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. अर्भकांचा मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. तेथील दलित लोकांना रोजीरोटीसाठी आपल्या मुलांना घेऊन गाव सोडून जावे लागते. तरीही त्या भागात सिंचन प्रकल्प होत नाहीत. तेथे पाणी उपलब्ध असतानाही सिंचन प्रकल्प होत नाहीत. अशा प्रकारे विदर्भावर अन्याय केला जात आहे.

आज विदेशी पर्यटकांसाठी रेड कार्पेट टाकले जाते. विदर्भाला मात्र दारिद्र्याच्या खाईत लोटण्याचे पाप हे शासन करीत आहे. पूर्व विदर्भासाठी हूमन हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा होता. एनटीबी म्हणून आम्ही 191 कोटी रुपये भरले आहेत. हा प्रकल्प 1972 सालातील आहे. ज्यावेळी बफर झोन आणला त्यावेळी आम्ही असे म्हटले होते की, या प्रकल्पामुळे आमचे नुकसान होणार आहे काय, त्यावेळी मंत्री महोदय व सचिवांनी या प्रकल्पामुळे विदर्भाचे नुकसान होणार नाही असे सांगितले होते. मधल्या काळात नागपूर येथे बैठक झाली त्यावेळी माननीय श्री.तटकरे यांनी बफर झोनमुळे वन खाते हूमन प्रकल्पाला मान्यता देत नाही असे सांगितले होते. बफर झोन आता जाहीर झाला आहे. हा प्रकल्प 1972 सालातील आहे. आम्ही 191 कोटी रुपये भरलेले आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे भाषण अपूर्ण राहिलेले आहे. ज्यावेळी या प्रस्तावावरील चर्चा पुन्हा सुरु करण्यात येईल त्यावेळी त्यांच्या भाषणाने चर्चेला सुरुवात होईल.

नंतर श्री.भोगले.......

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांना अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा

**उप सभापती** : मला पोलीस अधीक्षक, अकोला यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानपरिषद सदस्य डॉ.रणजित विठ्ठलराव पाटील यांना दिनांक 9 डिसेंबर, 2013 रोजी मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 69 अन्वये पी.के.व्ही.ब्रीज, अकोला येथे 10.45 वाजता ताब्यात घेऊन त्यांना त्याच दिवशी 11.45 वाजता मुक्त करण्यात आले.

-----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांना अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी घोषणा

**उप सभापती** : मला पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग पुंडलिक फुंडकर यांना दिनांक 9 डिसेंबर, 2013 रोजी मुंबई पोलीस अधिनियम 1951 च्या कलम 69 अन्वये, कोलारी फाटा, बुलढाणा येथे 11.00 वाजता ताब्यात घेऊन त्यांना त्याच दिवशी 12.30 वाजता मुक्त करण्यात आले.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदतीसाठी पॅकेज घोषित करण्याची होत असलेली मागणी

**मु.शी.**: विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत भरीव आर्थिक मदतीसाठी पॅकेज घोषित करण्याची होत असलेली मागणी याबाबत सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत,श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गो-हे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय गिरकर, नागो पुंडलिक गाणार, भगवानराव साळुंखे,वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उप सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मंत्र्यांच्या उत्तरासह तीन तासांचा वेळ दिलेला आहे. माननीय विरोधी पक्षनेते आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेते) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"विदर्भ आणि कोकणात माहे जून आणि जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भ व कोकणातील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक विहिरीसह रस्ते, पाटबंधारे प्रकल्प, ट्रान्सफॉर्मर इ.सार्वजनिक मालमत्तेचे हजारो कोटींचे झालेले नुकसान, सदर नुकसानीचा सर्व्हे उशिराने करण्यात येऊन सर्व्हे करताना बहुतांश भागात केवळ नदीच्या ठिकाणीच केलेले पंचनामे, शासनाकडून तातडीने मदत देण्यात यावी अशी आग्रही मागणी माहे जुलै, 2013 च्या अधिवेशनात केली असताना संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना त्वरित मदत करण्यात येईल, अशी माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा करुनही दिनांक 15 नोव्हेंबर पर्यंत कोणतीही मदत देण्यात न येणे, तसेच ऐन पिके काढणीच्या काळात माहे सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यामध्ये परत अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने या संकटातून वर येण्यासाठी त्वरेने हेक्टरी किमान 25 हजार रुपयांची मदत घोषित करुन वाटण्याची आवश्यकता असताना केवळ हेक्टरी 5 हजार रुपयांचीच मदत घोषित करण्यात आल्याने संपूर्ण विदर्भ व कोकणातील शेतकऱ्यांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, माहे जुलै 2013 च्या पावसाळी अधिवेशनात चर्चा करुनही वैयक्तिक स्वरुपाचे तसेच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाल्याप्रकरणी शासनाकडून अद्याप मदत प्राप्त न होणे, शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यासाठी कोणतीही चर्चा न करता किमान 6 हजार 459 कोटी रुपयांचे पॅकेज घोषित करण्याची शेतकऱ्यांकडून होत असलेली मागणी."

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, काल आम्ही नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिला व सरकारने ताबडतोब सभागृहात पॅकेजची घोषणा करावी आणि मगच आम्ही चर्चेला सुरूवात करू अशा प्रकारची मागणी केली होती. आम्ही मागणी करीत असताना विरोधकांना चर्चाच करावयाची नाही, केवळ गोंधळच घालावयाचा आहे अशा प्रकारची वक्तव्ये सत्ताधारी बाकावरील काही माननीय मंत्र्यांनी केली. आम्ही त्यांना साधा, सरळ, सोपा प्रश्न विचारला होता. आम्ही गेल्या अधिवेशनामध्ये या विषयावर सविस्तर चर्चा केली होती. त्या चर्चेला त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले होते. घोषणा केल्या होत्या. हेक्टरी रूपये 25 हजार मदत शेतकऱ्यांना द्यावी अशी आमची अपेक्षा होती. शासनाचे आमची मागणी मान्य न करता हेक्टरी पाच हजार रूपयांची मदत शेतकऱ्यांसाठी जाहीर केली. शासनाने ज्या घोषणा केल्या त्या आजतागायत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या आहेत काय ? शेतीचे जे काही नुकसान झाले त्याप्रमाणे आपण 850 कोटी रूपये द्यायला पाहिजे होता. घरांच्या नुकसानीसाठी 150 रूपये द्यायला पाहिजे होते. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सार्वजनिक मालमत्तेचे म्हणजे रस्ते, ग्रामपंचायतीचे कार्यालय, पूल इत्यादींचे रूपये 2500 कोटींचे नुकसान झाल्याचे सांगितले होते. म्हणजे एकूण 900 कोटी रूपयांची गरज असताना श्री.पंतगरावजी कदम, श्री.अजित पवार यांनी आपल्या हातामध्ये किती रूपये दिले ? श्री.अजित पवार यांनी 31 ऑक्टोबर रोजी 250 कोटी रूपये आकस्मिक निधीतून दिले आहेत. हा निधी ऑक्टोबरला द्यायचा होता तर तो जुलैला देखील देता आला असता. त्यांनी राज्याच्या बजेटमधून 250 कोटी रूपये असे मिळून 500 कोटी रूपये दिलेले आहेत. आपण 810 कोटी रूपयांची घोषणा केली होती. रूपये 2000 कोटी ही पुढची गोष्ट आहे. हा सर्व निधी जर तर आहे. हा 810 कोटी रूपयांचा निधी दिलेला नाही. घरांचे नुकसान जवळ जवळ 150 कोटी रूपयांचे झालेले आहे. ही मदत आपण दिलेली नाही.

सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आताच विदर्भाच्या विकासासंबंधी चर्चा केली आहे. त्यांनी सगळे विषय मांडले आहेत. त्याचे उत्तर कधी येईल हे माहीत नाही. श्री.माणिकराव ठाकरे हे सत्ताधारी पक्षाचे प्रदेश अध्यक्ष आहेत. आपले पोरगं कसेही असू दे..... आम्ही जनतेचे प्रतिनिधी म्हणून बसलो असल्यामुळे आम्हाला सरकारला जाब विचारावा लागेल. त्यामुळेच आम्ही काल ठणकावून सांगितले की, आधी निधीची घोषणा करावी.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मग आम्ही चर्चा करू. त्यानंतर आम्ही विरोधी पक्षातील आमदार माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यांनी सांगितले की, पुरवणी मागण्यांमध्ये 960 कोटींची तरतूद केली आहे. या मागण्या मान्य झाल्यानंतर ताबडतोब तो निधी देऊ, असे आश्वासित केल्यामुळे आम्ही आता चर्चेसाठी तयारी दर्शविली आहे. यात आमचा अविश्वास आहे असे नाही.

सभापती महोदय, माझ्याकडे एका गावातील 4-5 शेतकऱ्यांचे पत्र आले आहे. त्या पत्रात लोकांचा सरकार विषयी काय मानस आहे तो यामध्ये दिसेल. या पत्राची प्रत मी आपल्याला देतो. तत्पूर्वी या पत्रातील मजकूर मी वाचून दाखवितो. आम्हा विदर्भातील शेतकऱ्यांवर व आम जनतेवर महाराष्ट्र सरकारकडून पदोपदी अन्याय होत आहे. पूर्वी सारखा या सरकारचा व्यवहार राहिलेला नाही. दोन वर्षापूर्वी जाहीर केलेली नापिकीची आर्थिक मदत अजूनही मिळालेली नाही. यंदा पुन्हा अतिवृष्टीच्या दुष्काळामुळे शेतात पेरणीच झाली नाही. सर्वत्र झालेली पेरणी अतिपाण्याने निघाली नाही. यंदा कमीतकमी हेक्टरी चाळीस हजार रूपये मदत झाल्यास ठीक होईल. नाही तर सततच्या नापिकीने आम्हा शेतकऱ्यांच्या खाण्याची सोय राहिलेली नाही.

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

आताची मदत महाराष्ट्र सरकार त्वरित करणार नाही परंतु जर पश्चिम महाराष्ट्रात अवकाळी पाऊस पडला असता तर पश्चिम महाराष्ट्रात ताबडतोब पैशाचे वाटप सुरु झाले असते. श्री. गिरीधारीलाल काटोले, हिरालाल निकम, हसमुखलाल राठी,एम.के.लेकुरवाळे, मुकेश तडस या शेतकऱ्यांनी आपल्या पत्रात "आमचा या सरकारवर आता विश्वास राहिलेला नाही" असे म्हटले आहे तसेच त्यांनी आम्हा विदर्भातील शेतकऱ्यांना घरकुल वाटपाचेही पैसे मिळालेले नाही याचा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांची ही अवस्था कशामुळे झाली ? गेल्या 18 जुलै, 2013 रोजी प्रचंड अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीमध्ये जवळ जवळ 150 ते 200 टक्के पाऊस पडला. जुलै महिन्यात अस्मानी संकटात सापडलेला हा शेतकरी शासनाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या सुलतानी संकटामुळे उध्वस्त झाला. ऐन कापणीच्या हंगात आलेल्या अवकाळी पावसामुळे बळीराजाची परिस्थिती खूपच हलाखीची झाली. चंद्रपूर जिल्हयातील 8 तालुक्यांमध्ये 157 ते 248 टक्के पाऊस पडला. वर्धा जिल्हयातील 4 तालुक्यांमध्ये 177 ते 226 टक्के पाऊस पडला. गडचिरोली जिल्हयातील 3 तालुक्यांमध्ये 167 ते 197 टक्के पाऊस पडला. गोंदिया जिल्हयातील 2 तालुक्यांमध्ये 168 ते 223 टक्के अतिरिक्त पाऊस पडला. 65 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस पडला तर अतिवृष्टी झाली असा 1983 च्या परिपत्रकात उल्लेख आहे. विदर्भातील बहुतांशी जिल्हयांमध्ये जून,जुलै या महिन्यात सर्वसाधारण पाऊसापेक्षा जास्त पाऊस पडला होता. अकोला जिल्हयातील 4 तालुक्यात 7 वेळा 65 मि.मी.. ते 73 मि.मी.. एवढा पाऊस पडला होता. बुलढाणा जिल्हयात 12 तालुक्यात 18 वेळा 65 ते 419 मि.मी..पाऊस पडला होता. यवतमाळ जिल्हयातील 10 तालुक्यांमध्ये 31 वेळा 68 मि.मी.. ते 200 मि.मी.. पाऊस पडला होता. गडचिरोली जिल्हयातील 12 तालुक्यांमध्ये 53 वेळा 66 ते 246 मि.मी..एवढा पाऊस पडला होता. गोंदिया जिल्हयातील 7 तालुक्यांमध्ये 23 वेळा 69 ते 298 मि.मी.. पाऊस पडला व भंडारा जिल्हयात 7 तालुक्यांमध्ये 65 ते 90 मि.मी.. पाऊस 18 वेळा पडला होता. 18 जुलै रोजी पहिल्यांदा जास्त पाऊस पडला परंतु त्यानंतर अनेक वेळा जादा पाऊस पडला. चंद्रपूर जिल्हयात 15 तालुक्यांमध्ये 55 वेळा 66 मि.मी.. ते 333 मि.मी.. एवढा पाऊस पडला.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

कोकणामध्ये तर महिन्यातील 10 दिवस 65 मि.मी. पेक्षा जास्त पाऊस पडला होता. एवढा प्रचंड पाऊस सहन करण्याची क्षमता कोरडवाहू पिके व जमिनीमध्ये नसल्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले.

सभापती महोदय, मागच्या जुलै महिन्याच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आम्हाला काही आकडेवारी दिली होती व त्यानंतर केंद्र शासनाला एक अहवाल पाठविला होता. केंद्राला पाठविलेला अहवाल खरा की, सभागृहात आम्हाला दिलेली माहिती खरी ? केंद्राला खरी माहिती पाठवली असेल तर आम्हाला खरी माहिती का दिली नाही ? मी केंद्राच्या गृह खात्याकडून महाराष्ट्रातून गेलेला अहवाल मागवला आहे. आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांनी मृत्युमुखी पडलेल्या लोकांची संख्या 237 सांगितली परंतु केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अहवालात हीच संख्या 365 एवढी होती. वाहून गेलेल्या मोठया जनावरांची संख्या आम्हाला 260 सांगितली परंतु केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अहवालात हीच संख्या 1989 एवढी होती. वाहून गेलेल्या छोटया जनावरांची संख्या आम्हाला 987 सांगितली परंतु केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अहवालात हीच संख्या 1055 एवढी होती. अंशत: पडलेल्या घरांची संख्या आम्हाला 36000 सांगितली परंतु केंद्र शासनाकडे पाठविण्यात आलेल्या अहवालात हीच संख्या 147000 एवढी होती. 50 टक्क्यापेक्षा जास्त पिकांचे नुकसान झालेल्या जमिनीच्या क्षेत्राच्या संदर्भात आम्हाला 4 लक्ष हेक्टरची माहिती दिली परतू केंद्र शासनाला पाठविण्यात आलेल्या माहितीमध्ये ही आकडेवारी 16.24 लक्ष हेक्टर एवढी होती.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेल्या जमिनीचे क्षेत्र 4 लाख हेक्टर आहे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आणि राज्य सरकारने ते क्षेत्र 16.24 लाख हेक्टर आहे असे केंद्राच्या अहवालात नमूद केले आहे.यातील नेमकी खरी माहिती कोणती, याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे. केंद्रात पाठविलेली माहिती खरी असेल तर त्यावेळी आम्हाला ही माहिती का देण्यात आली नाही ? यावर आपले असे उत्तर असेल की, नंतर संख्या वाढली. अगोदर किती आकडेवारी होती आणि नंतर किती आकडेवारी झाली या संदर्भातील माहिती माझ्याकडे आहे. तेव्हा आपणास नेमके काय सांगायचे होते आणि आमच्यापर्यंत काय पोहोचविले याची माहिती आम्हाला समजली पाहिजे.

सभापती महोदय, अतिवृष्टी झालेल्या भागात मी स्वत: दौरा करुन माहिती गोळा केलेली आहे. शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे ते पाहता शासनाने घोषित केलेली मदत फारच कमी आहे.

सभापती महोदय, नागपूर विभागामध्ये 11 लाख 24 हजार 993 हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. त्यापैकी 7 लाख 46 हजार 275 हेक्टर जमिनीवरील पिकांचे 50 टक्केपेक्षा अधिक नुकसान झालेले आहे. माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री व माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी अतिवृष्टी झालेल्या भागाची हवाई पाहणी केली. हे सर्वजण अकोल्याच्या विमानतळावरुन वाशिमला गेले. तेथून विमानाने चंद्रपूरला गेले आणि तेथून विमानाने नागपूरला गेले. आम्ही हवाई पाहणी केली नाही. आम्ही गाडीने प्रवास करुन प्रत्येक तालुक्यात जाऊन माहिती गोळा केली. नागपूर विभागातील कापूस, सोयाबीन आणि संत्रा या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे आम्ही पाहिले. नागपूर विभागात 12 हजार 402 हेक्टर जमीन खरडून गेली आहे तर 1420 हेक्टर जमीन वाहून गेली आहे. ही माहिती आम्हाला तेथील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट दिली त्यावेळी दिली. नागपूर विभागामध्ये गाव, जिल्हा आणि राज्य रस्त्यांच्या एकूण 7 हजार 944 किमीचे रस्त्याचे नुकसान झाले आहे आणि ही नुकसानाची आकडेवारी 874 कोटी रुपयांच्या घरात जाते. एकूण 1078 पुलांचे नुकसान झाले. त्यासाठी 95 कोटी रुपयांचे नुकसान मिळण्याची गरज आहे. 294 पाटबंधारे प्रकल्पांना बाधा आल्यामुळे 30 कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे. जवळपास सहा शासकीय इमारती क्षतीग्रस्त झाल्यामुळे 53



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. महावितरण कंपनीचे जवळपास 27 कोटी रुपयांचे नुकसान झ ाले आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात या सर्व सार्वजनिक मालमत्तेचा उल्लेख केला होता. मी दौऱ्यात तेथील अधिका-यांना प्रत्यक्ष बोलावून त्यांच्याकडून घेतलेली वास्तव आकडेवारी येथे मांडत आहे. नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर महानगरपालिका, चंद्रपूर महानगरपालिका, नगरपरिषद गोंदिया येथील रस्ते, गटारे, लाईन्स, पूल, संरक्षक भिंती इत्यादींचे जवळपास 260 कोटीचे नुकसान झाले आहे. सार्वजनिक मालमत्तेचे एकूण 1341 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, अमरावती विभागात 1676 गावांना अतिवृष्टीचा फटका बसला आहे. अमरावतील विभागातील 10 लाख 54 हजार 154 हेक्टर जमिनीवरील शेतीचे नुकसान झाले आहे. त्यापैकी 5 लाख 29 लाख 857 हेक्टर जमिनीवरील शेतीचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झाले आहे. यामध्ये कापूस, सोयाबीन व संत्रा या पिकांचा समावेश आहे. एकूण 10 हजार 717 हेक्टर जमीन खरडून गेली तर 71 हजार जमीन वाहून गेली.

सभापती महोदय, अमरावती विभागातील रस्ते आणि शासकीय इमारतींचे नुकसान झाले आहे ही आकडेवारी 749 कोटी 61 लाखांची आहे. ही सर्व आकडेवारी अधिकाऱ्यांनी दिलेली आहे.

सभापती महोदय, कोकणात झालेल्या अतिवृष्टीमुळे 62 व्यक्ती मृत्युमुखी पडल्या तर 140 जनावरे मृत्युमुखी पडली. 2 हजार 727 घरांचे अंशत: पूर्ण नुकसान झाले आहे. 6 हजार 737 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. या अतिवृष्टीमध्ये कोळी बांधवाचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. परंतु त्यांच्या नुकसानी संबंधातील आकडेवारी उपलब्ध नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 15:50

श्री.विनोद तावडे....

जवळपास 2 हजार मत्स्य जाळे पूर्ण निकामी झाले. तसेच 112 होड्यांचे नुकसान झाले. 6700 हेक्टर मत्स्य क्षेत्र उद्ध्वस्त झाल्यामुळे कोळी बांधवांना मदत देणे गरजेचे होते. परंतु त्यांना आजपर्यंत कसलीही मदत दिलेली नाही. मी तर म्हणेन की, या परिस्थितीत सरकारने कोळी बांधवांचा विचारच केलेला नाही. किमान या परिस्थितीत तरी त्यांना सरकारने मदत देणे गरजेचे होते. शासनाने केवळ मदतीची घोषणा केली आणि त्याची अंमलबाजवणी करण्याचे काम अधिकाऱ्यांकडे सोपविले. परंतु प्रत्यक्षात ती मदत त्या व्यक्तींपर्यंत पोहोचली की नाही हे बघितले नाही. या सरकारने शेतकऱ्यांकडे पूर्णतः दुर्लक्ष केले. सुरुवातीला झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यानंतर त्यांनी नव्याने पेरणी केली. हंगामात पीक येईल अशी त्याची अपेक्षा होती. परंतु ते पीक सुध्दा आले नाही.

महोदय, मी विविध भागांचा दौरा केला. त्या दौऱ्यात आढळून आले की, शेतात सर्व ठिकाणी पाणी पसरलेले असताना एखाद्या उंचवट्याच्या ठिकाणी शेतकरी पेरणी करीत आहे. किमान तेथून तरी काही मिळते काय, या अपेक्षेने हा सर्व खटाटोप तो करीत आहे. संकटाच्या परिस्थितीचा सामना करुन काही ना काही मिळाले पाहिजे यासाठी तो प्रयत्न करीत आहे. त्यांच्या प्रयत्नांना आणि धैर्याला शासनाकडून जो प्रतिसाद हवा आहे तो दुर्दैवाने मिळत नाही. भंडारा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये धानाचे फार मोठे नुकसान झाले. धानाची कापणी सुरु असताना 25 ऑक्टोबरपासून पावसाने थैमान घातले. त्यामुळे कापणी केलेल्या धानाचे प्रचंड नुकसान झाले. काल आम्ही रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकसानीची आकडेवारीची माहिती घेतली. त्या भागात अजूनही पाऊस सुरु आहे. धानाच्या कळपा वाळविण्यासाठी त्या चार-पाच दिवस शेतामध्ये पसरुन ठेवल्या जातात. परंतु अवेळी आलेल्या पावसामुळे पसरलेल्या धानाचे फार नुकसान झाले. लाखांदूर, साकोली, लाखनी या भागात परतीच्या पावसाने पुन्हा हजेरी लावली. अवेळी आलेल्या पावसामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा व काजू पिकाला मोठा फटका बसला. उडीद, मूग पिकाला सुध्दा तितकाच फटका बसला. या परिस्थितीत सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू असे माननीय मुख्यमंत्र्यांनी वक्तव्य केले होते. परंतु त्यानुसार सरकार वागत नाही. त्यामुळेच शेतकरी अशा प्रकारचे पत्र पाठवित आहेत. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम, या सरकारबद्दल राज्यातील शेतकरी काय म्हणतात ते आपण वाचा.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, या ठिकाणी घोषणा करुन सुध्दा त्या बाबत अंमलबजावणी केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवाळी अंधारात साजरी करावी लागली. किंबहुना त्यांना काळी दिवाळी साजरी करावी लागली. शासनाच्या नाकर्तेपणामुळे शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली नाही. शेतकऱ्यांच्या घरात शासनाच्या नाकर्तेपणामुळे सण साजरे होत नसतील तर ज्येष्ठ मंत्री या नात्याने माननीय डॉ.पतंगराव कदम साहेब, आपण मंत्रिमंडळाच्या बैठकीत या बाबत आवाज उठवावयास हवा होता. आपण विचारावयास हवे होते की, सरकारने जी मदत घोषित केली आहे ती अजूनपर्यंत का पाठविली नाही ? मला वाटते आपण असा आवाज उठविला नाही. कदाचित आपण आवाज उठविला असला तरी माननीय श्री.अजितदादा पवार यांच्यासमोर तो टिकला नसेल.

महोदय, या निमित्ताने मला स्व.यशवंतराव चव्हाण यांची आठवण येते. पूर्वी राज्यातील जनतेवर जेव्हा अशा प्रकारची संकटे येत होती तेव्हा स्व.यशवंतराव चव्हाण साहेब स्वत: घटनास्थळी जाऊन व तेथे उभे राहून तेथील माणसांना धीर देत होते. त्यांची जन्मशताब्दी आपण साजरी करीत आहोत. परंतु अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांवर पैसा खर्च करीत नाही, हे दुर्दैवं आहे. त्यांचा वसा आपण हाती घ्यावयास पाहिजे परंतु तो घेतल्याचे दिसत नाही. पुण्यातील लकडीवाला पुलावरुन मी जेव्हा जातो तेव्हा लोक सांगतात की, पानशेतच्या वेळी यशवंतराव चव्हाण स्वत: तेथे उभे राहून देखरेख करीत होते. संकटाच्या वेळी त्या ठिकाणी जाऊन लोकांना मदत करण्याची खऱ्या अर्थाने गरज आहे. एखादा दौरा केल्यानंतर पुन्हा तिकडे फिरकायचे नाही अशा प्रकारे सरकार वागत असेल तर शेतकरी हे भगवान भरोसेच आहेत असे म्हणावे लागेल. ही वाईट अवस्था आहे.

माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांनी नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला. तो दौरा कसा झाला, त्या दौऱ्यात काय झाले या बाबत अनेकदा बोलले गेले. आम्ही तर माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्र्यांना अधिवेशन सोडून नुकसानग्रस्त भागाचा दौरा करा असे सांगितले. परंतु त्यांच्यापैकी एकाने दौरा केला तर त्याचे श्रेय दुसऱ्याला मिळणार नाही म्हणून दोघांनी सोबत दौरा केला. या आघाडी सरकारचे काय चालले हे मला कळत नाही.

नंतर श्री.कांबळे....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

एक वेळ लोकांना मदत उशिरा पोहचली तरी चालेल पण श्रेयाच्या धावपळीत गडबड नको. दोघे एकत्र जाऊ आणि एकत्र येऊ अशा मानसिकतेमध्ये आपण काम करणार असाल तर दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांचे नुकसान होईल. आपल्या दोघांच्या श्रेयांच्या लढाईमध्ये त्यांचे पुरते नुकसान झ ाले आहे. अतिवृष्टी झालेल्या ठिकाणच्या लोकांना प्रत्यक्ष जाऊन भेटलो. तेथील लोकांमध्ये अशी भावना होती की, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्र येथे सुका दुष्काळ पडला तेव्हा तेथील जनावरांच्या चाऱ्यासाठी 1800 कोटी रूपये खर्च केले. विदर्भातील माणसांसाठी 810 कोटी रूपये म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा येथील जनावरांची किंमत आम्हा माणसांपेक्षा दुप्पट होती. आता या प्रश्नाला काय उत्तर दिले असते ? 80 रूपयांचा चेक देताना फोटो आहेतच. तेथील लोकांची ही भावना आहे. त्यांनाही भरीव अशी मदत दिली पाहिजे. जनावरांसाठी 1800 कोटी रूपये देता आणि जिवंत माणसाला वाचविण्यासाठी फक्त 810 कोटी रूपये देता.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझी हरकत आहे. सन्माननीय सदस्य हे विरोधी पक्षनेते आहेत. संपूर्ण राज्यातील जनतेच्या बाबतीत त्यांची भावना समान असली पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रात आटपाडीला दुष्काळग्रस्तांची पाहणी करण्यासाठी ते स्वत: आले होते. त्यांनीच तेथे मागणी केली. जनावरांना जगविण्यासाठी 1800 कोटी रूपये कोटी देऊ किंवा 18 रूपये देऊ, आवश्यक ते दिले गेले आहे. त्याला विरोध आहे का ? ते उपहासाने असे का बोलत आहेत ? विदर्भाला 18 हजार कोटी नाही तर 1 लाख 18 हजार कोटी रूपये द्यावेत. ही आपणा सर्वांची भावना आहे. पश्चिम महाराष्ट्रातील लोकांना 1800 कोटी रूपये दिले असे त्यांनी टीकात्मक का बोलावे ? त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाला ते दुष्काळ मानत नाहीत का, दुष्काळी जनतेला दुष्काळी जनता मानत नाही का, याबाबत त्यांनी सांगावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणातून पश्चिम महाराष्ट्राविषयीची टीका समोर येत आहे. त्यांनी त्यांचे शब्द मागे घ्यावेत. आटपाडीला दुष्काळी भागाची पाहणी करताना मोटारसायकलवर बसून फोटो काढले. मात्र, पश्चिम महाराष्ट्राला मिळालेल्या मदतीच्या संदर्भात ते सरकारवर टीका करीत आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी विदर्भातील शेतकऱ्यांविषयी बोलत आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आम्ही विदर्भातील शेतकऱ्यांबरोबर आहोत. आमची भावना बरोबर आहे. पश्चिम महाराष्ट्रातील जनता दुष्काळात होरपळत होती आणि अजूनही होरपळत आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी टीका करू नये. पश्चिम महाराष्ट्राला 1800 कोटी रूपये का दिले, असे त्यांनी म्हणू नये.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे सभागृहात उपस्थित आहेत. मी पश्चिम महाराष्ट्राला का दिले, असे वक्तव्य केलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे साहेब सजग आहेत. आपण त्यांना विचारा. माझे वक्तव्य रेकॉर्डवर आले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील जनावरांसाठी द्यावयाची मदत 1800 कोटी रूपये आहे आणि त्याच्या निम्मी मदत विदर्भातील माणसांकरिता दिली आहे, ही भावना विदर्भातील शेतकऱ्यांनी बोलून दाखविली आहे. ते ऐकल्यानंतर तुम्हाला एवढे झोंबले असेल तर त्या लोकांचे काय होत असतील, याचा विचार करण्याची गरज आहे की नाही ? पश्चिम महाराष्ट्राला दिलेली मदत कमी करा, असे मी म्हटलेले नाही. पण दिसते असे की. माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम, पुनर्वसन मंत्री ज्या भागातील आहेत तेथील जनावरांच्या चाऱ्यासाठी 1800 कोटी रूपये मिळतात आणि सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे जे काँग्रेस प्रदेश कमिटीचे अध्यक्ष आहेत, त्यांच्या भागातील लोकांसाठी 810 कोटी रूपये मिळतात. असे अतिवृष्टी असलेल्या भागांतील लोक बोलत आहेत. मी फक्त त्यांच्या भावना सभागृहात बोलून दाखवित आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. ते विषयाची चांगल्या रीतीने मांडणी करीत होते. मला त्यांना सांगितले पाहिजे की, त्यांनी केलेल्या सूचना निश्चितच शासन ग्राह्य धरील.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राजकीय भाष्य करु नये. सन्माननीय विरोधी पक्ष नेते युती सरकारमध्ये मंत्री नव्हते. आमदार सुध्दा होते की नाही ते मला माहीत नाही. मी या निमित्ताने एकच उदाहरण देतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे त्यावेळी सहकार मंत्री होते. युतीच्या काळात विदर्भातील कापसाची बोंडे काळी पडली होती. त्यामुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी माननीय श्री.शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली विधानसभेवर 50 हजार शेतकऱ्यांना मोर्चा काढला होता. त्यावेळी आम्ही 3 दिवस विधानसभेचे कामकाज बंद पाडले होते. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी जाहीर केले होते की, 5 हेक्टरपर्यंत हेक्टरी 2500 रुपये मदत देण्यात येईल. शासनाने त्या संदर्भातील जी.आर.इश्यू केला होता. मदत देण्याची सुरुवात करण्यात आली होती. मदतीचे आकडे येण्यास सुरुवात झाली होती. यवतमाळ जिल्ह्यातून 54 कोटी रुपयांच्या मदतीचा आकडा आला, कोठे 40 कोटी रुपयांचा आकडा आला, अमरावती जिल्ह्याचा 35 कोटी रुपयांचा आकडा आला. विदर्भातील 13 जिल्ह्यातील आकडेवारी समोर आली होती. प्रत्यक्षात अमरावती जिल्ह्याला 35 कोटी रुपये, नागपूर जिल्ह्याला 15-20 कोटी रुपये देण्यात आले. नंतर शासनाने असे जाहीर केले की, शासनाला मदत करणे शक्य नाही. त्यामुळे एकाही जिल्ह्याला पैसा देण्यात आला नाही. त्यामुळे आम्ही आंदोलन केल्यानंतर श्री.मनोहर जोशी यांची गाडी आम्ही यवतमाळ जिल्ह्यात अडविली होती. त्यामुळे श्री.जोशी साहेबांनी असे जाहीर केले की, आपण एकत्र बसून मार्ग काढू. त्यावेळी 52 कोटी रुपयांपैकी यवतमाळ जिल्ह्यासाठी 2 कोटी रुपयांचा युरिया पुरविला होता. त्यावेळी आम्ही प्रत्येकाला 1 किंवा 2 पोती युरियाचे वाटप केले होते. त्यामुळे युतीच्या काळात खूप काही केले होते असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बोलू नये. केवळ तो एक प्रसंग मला आठवतो. त्यानंतर मात्र आम्हाला आंदोलन करण्याची वेळ आली नाही. युतीच्या काळात शेतकऱ्यांना पुरेशी मदत देण्यात आली नाही. पण आज शेतकऱ्यांना पुरेशी मदत दिली पाहिजे याबद्दल दुमत नाही. आजही सोयाबीन उत्पादक, धान उत्पादक, कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत आहे. विदर्भात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झ ााल्यामुळे मदतीची मागणी करावी. हे शासन शेतकऱ्यांना मदत करीत आहे. त्याबद्दल आपण दोन शब्द बोलावे. त्यामुळे हे शासन विरोधी पक्षाच्या अपेक्षेप्रमाणे शेतकऱ्यांना मदत करील.

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ D/ KTG/ MMP/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माणूस सेवानिवृत्तीकडे झुकला की त्याला जुन्या गोष्टी आठवतात तसे सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे झालेले आहे. सहा महिन्यानंतर मुदत संपल्यावर तुम्हाला मुलाबाळांना हेच सांगावे लागणार आहे. आमचे काही म्हणणे नाही. (अडथळा) म्हातारपणी अशाच गोष्टी सांगाव्या लागतात. त्यांना सुट्टी मिळणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि माझे वय सारखेच आहे. पण मी मागील 25-26 वर्षे दोन्ही सभागृहात काम केलेले आहे. त्यांना आमदार म्हणून 10-12 वर्षे झालेली आहेत. त्यांना अनुभव नसला तर त्यांनी आमच्याकडून अनुभव घेतला पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे राजकीय क्षेत्रात बुध्दिमान आहेत असे मी समजतो.

**उप सभापती** : सभागृहात अतिवृष्टीवर चर्चा सुरु आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी मागील 10-12 वर्षामध्ये जे शिकलो ते शिकण्यासाठी त्यांना 25 वर्षे लागली असावीत. मी कधीच व्यक्तिगत टीका करीत नाही. निवृत्त झाल्यानंतर अशा गोष्टी तुम्हाला सांगाव्या लागतील आणि त्याची सवय आतापासूनच आपण करीत आहात हे चांगले आहे. एवढेच मी बोललो आहे. परंतु त्यांना माझे बोलणे लागले असेल तर ते कामकाजातून काढून टाकावे. चार राज्यात काँग्रेसचे जे झाले ते आता नंतरच्या राज्यात व्हावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांना माझा मुद्दा पटलेला आहे. पश्चिम महाराष्ट्रातील जनावरांच्या नुकसानीसाठी 1800 कोटी रुपयांची मदत दिली जाते. माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम हे त्या भागातील आहेत. त्यांनी मुद्दाम दिले आहेत असे मी म्हणणार नाही. पण माननीय अर्थमंत्री त्या भागातील आहेत, पुनर्वसन मंत्री तेथील आहेत. तेथील जनावरांच्या मदतीसाठी 1800 कोटी रुपयांची मदत मिळते, पण येथील माणसांना 810 कोटी रुपयांची मदत मिळते.

नंतर श्री.भोगले......

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

ज्यावेळी हा फरक कळतो त्यावेळी तो माणूस त्याची भावना बोलून दाखवितो. ती भावना मी या ठिकाणी व्यक्त करतो. शासनाचा हा जो दुजाभाव आहे तो लोकांना बोचतो. ज्यावेळी मागील अधिवेशनात या विषयासंबंधी चर्चा केली त्यानंतर त्याची निकड इतकी व्यक्त झाली की, अधिवेशन संपल्याबरोबर ताबडतोब शासन आदेश निर्गमित होईल असे आम्हाला वाटले. 15 ऑगस्टपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करु असे पुनर्वसन मंत्र्यांनी सांगितले होते.

सभापती महोदय, अधिवेशन संपल्यानंतर 9 ते 12 ऑगस्टच्या काळात माझा पहिला दौरा झाला. काय करायचे याची सुरुवात पण झाली नव्हती. शासनाने घोषणा केली की, 15 ऑगस्टपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करणार आहोत. पहिला जीआर 14 ऑगस्ट, 2013 रोजी निर्गमित केला. 1983 च्या परिपत्रकात स्पष्टपणे म्हटले आहे की, 65 मि.मी.पेक्षा जास्त पाऊस पडल्यानंतर तेथे ताबडतोब मदत पोहोचली पाहिजे. परंतु दोन महिने उशिराने निर्णय घेण्यात आला. 14 ऑगस्टला परिपत्रक काढण्यात आले. त्यात चलाखीने उल्लेख असा केला की, मार्च 2014 पर्यंत शेतकऱ्यांना मदत मिळाली पाहिजे. शासनाची नियत खोटी असल्यामुळेच विदर्भातील जनतेची खात्री पटली की, सरकार आपल्यासाठी काही काम करणार नाही. हे सरकार इंडिया बूल्स कंपनीच्या प्रकल्पाला पाणी देईल. कंत्राटदारांची बिले काढण्यासाठी घाई करील. मंत्री आपापल्या भागातील कंत्राटदार आणि ठेकेदारांच्या विशेष फायली लगेच पोहोचवतील. परंतु हे सरकार सामान्य शेतकऱ्यांना द्यावयाची मदत मार्च, 2014 पर्यंत देईल. इतका वेळ दिला आहे तो कोणाला पटणार नाही.

सभापती महोदय, शासनाने केलेल्या घोषणाबाबत सद्य:स्थिती काय आहे हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये घोषणा केली होती की, नागपूर विभागात विजेचे खांब, डीपी, ट्रान्सफॉर्मर वाहून गेले आणि अमरावतीमध्ये वीज व्यवस्थेच्या 660 एलटी लाईन, 253 खांब, 48 ट्रान्सफॉर्मर, 57 डिस्ट्रिब्यूशन बॉक्सचे अंदाजे 3 ते 4 कोटी रुपयांचे नुकसान झाले. ही व्यवस्था तातडीने दुरुस्त करण्याचे आदेश देण्यात आले. मुख्य अभियंता, नागपूर आणि औरंगाबाद विभाग यांच्याकडून लेटेस्ट माहिती प्राप्त केली असता झालेल्या नुकसानीबाबत 31 कोटी रुपयांचे प्रस्ताव सादर करण्यात आले, त्या संदर्भात शासनाकडून आजपर्यंत एकही पैसा देण्यात आलेला नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, ताबडतोब दुरुस्तीचे आदेश दिले आहेत. परंतु त्यासाठी लागणारा पैसा मात्र अद्याप दिलेला नाही. गोसीखूर्द प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 1200 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. पुनर्वसन झाल्यानंतर लगेच पाणी साठविण्यात येईल. ते पाणी साठविण्यासाठी प्रयत्न करावे लागतील अशी घोषणा केली होती. योग्य त्या पध्दतीने पुनर्वसन न झ ााल्याने आजही पाणी साठविता आलेले नाही. ज्या अधिकाऱ्यांकडे पुनर्वसनाची जबाबदारी दिली होती त्यांनी ती जबाबदारी योग्यप्रकारे पार न पाडल्याबद्दल त्यांच्या विरुध्द कोणतीही कार्यवाही झ ाालेली नाही.

सभापती महोदय, निळ्या पूर रेषेखालील लोकांना कितीही सांगितले तरी ते तेथे परत जातात. त्यासाठी त्या भागात कायमस्वरुपी भिंत बांधून मोठया प्रमाणात पुनर्वसन करावे लागेल. ते काम आम्ही ताबडतोब करणार असे सरकारने वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याचे काय झाले?

मी दोन दिवसापूर्वी चंद्रपूरला गेलो होतो. माननीय मंत्री श्री.संजय देवतळे हे त्या जिल्हयाचे पालकमंत्री असून ते सुध्दा चंद्रपूरला गेले होते. त्यांना भेटायला आलेल्या लोकांवर पोलिसांनी लाठीमार केला. आपल्या वेदना पालकमंत्र्यांसमोर मांडण्यासाठी आलेल्या लोकांना लाठ्या खाव्या लागतात? या चंद्रपूरमध्ये वक्रतुंड चौक आहे, रहिमतनगर आहे तेथे मी गेलो होतो.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ...

रहेमत नगर ते इरई नदी पर्यंत मोठा नाला असून तो अंदाजे 4500 मीटर लांब आहे. या नाल्यावर पूर्ण पूरसंरक्षक भिंतीचे बांधकाम करण्यासाठी 8 कोटी रूपयांच्या निधीची गरज आहे. पूर संरक्षक भिंतीकरिता निधी देण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली. आज पर्यंत तेथे काहीही झालेले नाही. याचा अर्थ शासनाकडून आज पर्यंत निधी वितरित झालेला नाही. आपण लोकांना जाऊन भेटता, सभागृहामध्ये आश्वासन देता. पण त्यानंतर काहीच होत नाही.

पक्क्या घरांकरिता प्रत्येकी 70 हजार आणि कच्च्या घरांकरिता प्रत्येकी 25 हजार रूपये या प्रमाणे मदत मिळणार आहे. 36 हजार घरांचे अंशत: नुकसान झालेले आहे. त्या घरांना 15 हजार रूपयांची मदत मिळणार आहे. तशा प्रकारची घोषणा देखील केली आहे. विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात 1 लाख 47 हजार 369 घरांचे पूर्णत: अथवा अंशत: नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या घरांमध्ये किमान 6 लाख नागरिक रहात होते. या सर्व नागरिकांना शासनाने उघड्यावर राहण्यास भाग पाडले आहे. पावसाळा संपेपर्यंत कोणतीही मदत त्यांना देण्यात आलेली नाही. आपण त्यांना ताबडतोब मदत करणार होता, निवारा देणार होता. पण यातील घोषणा देखील फोल ठरली. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. त्यासंबंधी देखील काही तरी करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन देण्यात आले होते. यामध्ये 5 हजार कि.मी.रस्त्यांचे आणि 500 पुलांचे नुकसान झाले आहे. त्याचा उल्लेख मी मघाशीच केला आहे. नागपूर विभागातून तेथील मुख्य अभियंत्यांनी अतिवृष्टीसाठी झालेल्या नुकसानीची 280 कोटी रूपयांची मदत मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. त्याच प्रमाणे विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांनी सार्वजनिक मालमत्तेच्या झालेल्या नुकसानीच्या केलेल्या अहवालाप्रमाणे एकूण 874 कोटी किंमतीच्या रकमेचे नुकसान झाले आहे. या संबंधातील प्रस्ताव देऊन देखील प्रत्यक्षात अद्यापि काहीच निधी आलेला नाही. त्याच प्रमाणे अमरावती विभागाने देखील 658 कोटी रूपयांची मदत मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. परंतु, या विभागाकरिता नियमित मिळणाऱ्या देखभाल दुरूस्ती व्यतिरिक्त एक पैशाचाही निधी पुरामुळे झालेल्या नुकसानीकरिता शासनाने वितरित केलेला नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील आमदारांना 10 कोटी रूपये आणि विरोधी आमदारांना विकासकामासाठी एकही रूपया न दिल्यामुळे गत सत्रात दोन दिवस अधिवेशनाचे कामकाज बंद पडले होते. हा निधी आम्हाला देऊ नका. अतिवृष्टीमुळे जो शेतकरी संकटात सापडलेला आहे त्यांना शासन पैसे देणार आहे काय ? सगळ्या सत्ताधारी आमदारांना दिलेले 10 कोटी रूपये आपण काढून घ्यावेत. हे सगळे पैसे विदर्भात ओल्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी पाठविणार आहात काय, असा माझा या निमित्ताने आपल्याला सवाल आहे. मी माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, आपण सत्ताधारी पक्षातील आमदारांना सांगावे की, पहिले कर्तव्य हे जनतेसाठी आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांसाठी 10 कोटी रूपयांची खिरापत वाटत आहोत ती आम्ही काढून घेतली असून हा निधी शेतकऱ्यांना देत आहोत हे आपण आपल्या सन्माननीय सदस्यांना सांगावे. अशी मदत शेतकऱ्यांना दिली तर ती चुकीची होईल का, हे सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगावे. अशाने कोणत्याही विभागावर अन्याय होणार नाही. अशाने आम्ही सत्ताधारी पक्षाची खिल्ली उडवत आहोत असे आपण म्हणाल काय ?

सभापती महोदय, नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या धान पिकांसाठी प्रती हेक्टरी 7500/- रूपये आणि इतर सर्व पिकांसाठी प्रती हेक्टरी रूपये 5000/- देण्यात येतील. वैयक्तिक लाभाच्या सर्व योजनांसाठी 375 कोटी रूपये, सार्वजनिक रस्त्यांसाठी 720 कोटी रूपये आणि कायमस्वरूपी योजनांसाठी 840 कोटी रूपये अशा प्रकारे 1935 कोटी रूपये विदर्भातील एकंदरीत नुकसान झालेल्या भागाच्या विकासासाठी प्रस्तावित केले होते. आवश्यकता पडली तर या पेक्षा जास्त निधीची तरतूद निश्चितपणे केली जाईल, असे आश्वासन दिले होते. तेव्हा सत्ताधारी पक्षातील आमदारांनी बाके वाजविली होती. त्यावेळी श्री.पतंगराव कदम आपण माननीय मुख्यमंत्र्यांच्या बाजूला बसला होता.

नागपूर विभागामध्ये शेतजमिनीवरील पिकांचे 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्यामुळे केवळ धानासाठी 184 कोटी व इतर पिकांसाठी 250 कोटी रूपयांची तरतूद करण्याची आवश्यकता होती. त्याच वेळेस अमरावती विभागामध्ये 264 कोटी रूपयांची तरतूद करण्याची आवश्यकता होती.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पतंगराव कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते हे अत्यंत चांगले भाषण करीत आहेत. त्यांनी आताचे पुरवणी बजेट उघडले तर त्यांना त्यात सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळतील. तेव्हा त्यांनी जास्त त्रास घेण्याचे काहीच कारण नाही. त्यांनी फक्त तेवढे पुस्तक उघडावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.पतंगरावजी कदम यांना पुरवणी मागण्या येई पर्यंत थांबावे लागते हेच दुर्दैव आहे.

श्री.पतंगराव कदम : सभापती महोदय, शेवटी नियमाने जावेच लागते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मग या शासनाने इंडिया बुल्सला पाणी देताना कोणता नियम लागू केला आहे ? आपल्या ठेकेदारांसाठी काहीच नियम नसतात. गरीब, शेतकरी, कास्तकारांसाठी शासनाला नियम सुचतात काय ? मी कालच रात्री पुरवणी मागण्या वाचल्या. सोमवारी व मंगळवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा आहे. तेव्हा आपण सभागृहात येऊन बसावे. त्यावेळी आम्ही सर्व बाहेर काढणार आहोत. त्याची आपण चिंता करू नये. त्यावेळी आपण का बोलला नाहीत की, आम्ही इतकी वर्ष मंत्री आहोत. आम्हाला नियम माहीत आहे. आम्ही एवढेच देऊ शकतो हे का सांगू शकला नाहीत. त्यावेळी मात्र आपण जोरात भाषण केले. तेव्हा आपल्या बाजूकडील सन्माननीय सदस्यांनी जोरात बाके कशासाठी वाजविली ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

त्यावेळी तुम्हाला नियम माहिती नव्हते काय ? जनता आता मुर्ख राहिलेली नाही हे तुम्ही पक्के लक्षात ठेवा. शासनाने केलेल्या घोषणा आणि आताची सद्य:स्थिती याचीच माहिती मी या ठिकाणी देत आहे. आता आपण जे काही करीत आहात, खरे तर हे आपण त्याच वेळेस करावयास पाहिजे होते. शासन केवळ असत्य बोलण्याचेच काम करीत आहे. 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झ ालेल्यासाठी 698 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. खरडून गेलेल्या आणि वाहून गेलेल्या जमिनीसाठी 28.35 कोटी रुपयांची आवश्यकता आहे तर अमरावती येथे 24 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. 30 ऑक्टोबर, 2013 रोजी 450 कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले. परंतु बहुतांशी जिल्हयात 30 नोव्हेंबर, 2013 पर्यंत शेतकऱ्यांच्या पदरात मदत पडली नव्हती.

सभापती महोदय, विरोधी पक्ष नेते चुकीची माहिती देत आहेत असे त्यांना वाटत असेल परंतु यासंदर्भात मी शेतकऱ्यांनी लिहून दिलेले प्रतिज्ञापत्र आणलेले आहे. शेतकऱ्यांनी 1 डिसेंबर 2013 रोजी प्रतिज्ञापत्र लिहून दिलेले आहे. त्यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, माझ्या जमिनीचे क्षेत्रफळ 1236 आहे परंतु पुरामुळे व अतिवृष्टीमुळे माझी जमीन पुराने खरडून गेलेली असतांना सुध्दा मला शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला जे काही उत्तर द्यावयाचे आहे ते आपण देऊ शकता आणि 80 रुपयांचा चेकही देऊ शकता.

सभापती महोदय, नोव्हेंबर महिना संपला तरी सरकारकडून अद्यापि शेतकऱ्यांना कोणतीही मदत मिळालेली नाही. अतिवृष्टीच्या काळात वाशिम जिल्हयातील मंगरुळपीर येथे मी गेलो त्यावेळी त्या ठिकाणी झालेले नुकसान मी स्वत: पाहिले आहे. यवतमाळ जिल्हयात त्या काळात 29 व्यक्ती मृत पावल्या होत्या. सदर व्यक्तींच्या कुटुंबियांना 31 ऑगस्ट पर्यंत मदत देण्यात आली नव्हती. माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केल्या प्रमाणे 72.50 लक्ष रुपये मृत व्यक्तींना मिळणे गरजेचे होते. मेहेकर तालुक्यातील रामदास गेडाम व कळम तालुक्यातील पार्वतीबाई ऊईके या व्यक्तींचा अंगावर भिंत पडून मृत्यू झाला होता. या मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना आज पर्यंत कोणतीही मदत देण्यात आली नव्हती. (अडथळा) यवतमाळ येथे पडझड झालेल्या 13,393 घरांपैकी केवळ 478 घरांना मदत देण्यात आली व पूर्णपणे पडलेल्या 3120 घरांना 31 ऑगस्ट पर्यंत कोणतीही मदत देण्यात आली नव्हती. यवतमाळ जिल्हयातील उमरखेड येथील पंजाबराव शिंदे यांनी एक प्रतिज्ञापत्र दिले आहे.

यानंतर श्री.अजित.....

श्री.विनोद तावडे...

आपल्या पुनर्वसन नियमामध्ये म्हटले आहे की, जनावरांचे पोस्टमार्टेम झाल्याशिवाय मदत मिळणार नाही. अतिवृष्टीमध्ये वाहून गेलेल्या जनावरांचे पोस्टमार्टेम कसे करणार ? शेतकरी श्री.पंजाबराव शिंदे मला म्हणाला की, माझी म्हैस वाहून गेली. ती मला सापडली नाही तर तिचा पोस्टमार्टेम मी कोठून आणू ? जो कोणी पोस्टमार्टेमचा रिपोर्ट देत नाही त्याला शासनाकडून मदत मिळत नाही. मी अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करुन आल्यानंतर माननीय मुख्यमंत्री आणि डॉ.पंतगराव कदम यांना हे सर्व सांगितले. आपण सांगितले की, मी आताच्या आता मदत करण्यास सांगतो. मी त्या शेतकऱ्याला फोन करुन विचारले की, मदत मिळाली काय ? त्यावर त्याने मला सांगितले की, मला कोणतीही मदत मिळालेली नाही. मला लोकांनी सांगितले की, असत्य प्रमाणपत्र जोड मग मदत मिळेल. आपण चांगल्या सज्जन व्यक्तीला असत्य काम करायला भाग पाडायचे काय ? आपण यातून व्यावहारिक मार्ग काढला पाहिजे. सर्वच गोष्टी नियमावर बोट ठेवून चालत नाही. आपणास कमी पैसे वाटायला लागले तर ते बरेच आहे. पैसे कमी झालेले असतात आणि खायला कमी मिळतात, वाटले कमी की अजून मिळतात.

सभापती महोदय, यवतमाळ जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची मदत दिली गेली नाही आणि त्या अनुषंगाने मी एका शेतकऱ्याच्या प्रतिज्ञापत्राचा उल्लेख केला. त्याने प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, मी, मौजे पळशी, उमरखेड, यवतमाळ येथील कायम स्वरुपी रहिवाशी असून पळशी येथील जमीन अतिवृष्टीमुळे खरडून व चिरडून गेली आहे. मला शासनाकडून कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत मिळालेली नाही. मी अल्पभूधारक शेतकरी असून आर्थिक संकटात सापडलो आहे, त्याकरिता हे प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

सभापती महोदय, वर्धा जिल्ह्यातील देवळी तालुक्यात याच पध्दतीने जमीन खरडून गेली आहे आणि त्यांना अजूनपर्यंत नुकसान भरपाई मिळालेली नाही. मी या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांना स्वत: भेटलो. मी स्वत: अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करुन अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली आणि तो सर्व अहवाल माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे आणि डॉ.पंतगराव कदम यांच्याकडे सादर केला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, मी दौरा करताना तेथील अधिकाऱ्यांना विचारले की, आपण सर्व्हे का करीत नाही ? मला खाजगीत सांगण्यात आले की, "मदत येण्यास वेळ लागेल, घाईघाईने सर्व्हे करु नका असे आम्हाला तोंडी आदेश आहेत. आपण सर्व्हे केल्यास लोक लगेच पैसे मागतील, तेव्हा लवकर सर्व्हे करु नका." माझा प्रश्न आहे की, आपण असे आदेश दिले होते काय ? आम्हाला वरुन आदेश आले असे आम्हाला खालचे अधिकारी सांगतात. असे असेल तर शेतकऱ्यांना मदत करण्याची आपली नियत आहे काय ? या सर्व गोष्टींचा उल्लेख मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनात केला आहे. त्यानंतर काही हालचाली होतील, काही बदल होतील, असे मला वाटले होते, परंतु असे काही झालेले नाही.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे बोलले त्यावेळी मी बोलणार होतो. आपण आम्हाला जुन्या गोष्टी सांगाल, परंतु आताचे जे वास्तव आहे ते आपण समजून घेतले पाहिजे. विधानसभेचे माननीय उपाध्यक्ष प्रा.वसंत पुरके हे माननीय मुख्यमंत्री महोदयांना शेतकरी परिषदेसाठी घेऊन गेले होते. तेथे माननीय मुख्यमंत्री महोदयांना शेतकऱ्यांनी पळवून लावले. आम्हाला वाईट वाटले. मुख्यमंत्री कोणत्याही पक्षाचे असोत, परंतु ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना मदत केली नाही म्हणून शेतकऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना स्टेजवरुन पळवून लावले. या प्रकाराची आपणा कोणास लाज वाटली नाही काय ? ती सत्ताधारी पक्षाच्या सदस्याने भरविलेली शेतकरी परिषद होती म्हणजे त्यांच्या पक्षातील लोक शेतकरी परिषदेस आले असतील. असे असताना माननीय मुख्यमंत्री महोदयांना पळवून लावले जाते हे योग्य नाही. ही बाब सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या लक्षात आली नाही. कोणी चांगले काम केले असेल तर चांगले बोलावे. आपण त्या परिषदेत विचारावयास पाहिजे होते की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना कशासाठी पळवून लावता, आम्ही चांगले काम केले आहे. मग आपली जी काही अवस्था झाली असती ती आम्ही पाहिली असती. तेथे काय अवस्था झाली होती हे आम्ही टी.व्ही.वर पाहिले आहे. आज शेतकऱ्यांच्या मनामध्ये सरकारच्या विरोधात प्रचंड प्रमाणावर चीड आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, आज शेतकरी म्हणत आहेत की, कापूस आणि सोयाबीनच्या भावाबाबत बोला, पॅकेजबाबत बोला, मदतीबाबत बोला. परंतु दुर्दैवाने या पुरोगामी महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा माननीय मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांच्या सभेतून पळ काढावा लागला. याचा अर्थ सरकारचा नाकर्तेपणा ही शेतकऱ्यांच्या मनातील चीड होती. माननीय मुख्यमंत्र्यांना शेतकऱ्यांसमोर उत्तर देता आले नाही. त्यांना तेथून पळ काढावा लागला. माननीय मुख्यमंत्र्यांवर अशी नामुष्की का आली याचा विचार करण्याची गरज आहे. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या संदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. परंतु कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणतीही हालचाल केली नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात भरपूर काही सांगितले होते. त्यांनी सांगितले होते की, हवामानाचा बदल आपल्या सर्वांसमोर आहे. अतिवृष्टी होत आहे, ढग फुटीचे प्रकार आता वाढावयास लागले आहेत. उत्तराखंडमध्ये काही दिवसांपूर्वी घडलेली घटना आपल्याला माहीत आहे. हवामानात बदल होत आहेत, क्लायमेटचा हा परिणाम आहे की अजून कशाचा परिणाम आहे, या सर्वांचा अभ्यास केला पाहिजे. विदर्भातील अतिवृष्टी ही त्याचाच परिणाम आहे काय ? यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यावर भर द्यावा लागेल, असे मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात त्यावेळी सांगितले होते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शासनाने यावर आळा घालण्यासाठी कोणत्या कायमस्वरुपी उपाययोजना आखल्या आहेत ? या उपाययोजना करण्यासाठी आपण पुरवणी मागण्या किंवा बजेटची वाट पाहण्यासाठी थांबला असाल तर तसे सांगावे.

महोदय, केंद्राच्या सूचनेप्रमाणे आपण पुराचा वारंवार उपसर्ग पोहचणाऱ्या म्हणजे किमान 10 वर्षातून एकदा व फार तर किमान 25 वर्षातून एकदा अशा पूर प्रवण क्षेत्राच्या पूर रेषा लोकांना माहिती व्हाव्यात म्हणून अनेक नदी खोऱ्यांमध्ये, गावांमध्ये जमिनीवर योग्य ती चिन्हे किंवा फलक लावून या पूर रेषा लोकांच्या निदर्शनास आणण्याचा प्रयत्न केला आहे काय ? मी तर म्हणेन की, लोकांमध्ये जनजागृती करण्यात सरकारला अपयश आले आहे. वास्तविक पाहता पूर प्रवण क्षेत्रात कृषी बांधबंदिस्तीचे स्वतंत्र नियम आवश्यक आहेत. परंतु शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले आहे माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात ज्या बाबींचा उल्लेख केला होता त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी शासनाकडून एक कागद तरी हलला आहे काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

महोदय, विशेषत: नदी काठच्या शेतीच्या बांधावरील व बांधाजवळील परिसरात वृक्ष लागवड, फलोद्यानाचा विस्तार अगदी साध्या बोरी-बाभळी त्या शेतीला किती तरी मोठे संरक्षण देऊ शकतात असा समज आपल्या सर्वांचा आहे. दुर्वासारख्या जमिनीवर सहजपणे पसरणाऱ्या गवतांचे प्रकार जमिनीला नीट बांधून ठेवू शकतात, ही गोष्ट आपल्याला माहीत आहे. अशा माहीत असणाऱ्या अनेक गोष्टींच्या कामामध्ये सरकार किती लक्ष घालत आहे ?

महोदय, तंत्रज्ञानाचा अधिक प्रभावीपणे वापर करण्यात आपण अपयशी ठरलो आहोत. जपान, कोरिया, मलेशिया हे देश आपल्यापेक्षा अधिक पूरप्रवण आहेत. असे असताना त्या क्षेत्राची रचना, बांधणी, संरक्षण, पुराचे पूर्वानुमान व संदेश यामध्ये त्यांनी उत्तम प्रगती केली आहे. राज्य सरकारने या विषयामध्ये काही प्रगती केली आहे काय, या बाबतचा काही विचार केला आहे काय ? आपल्याकडे आता जे उपग्रह आहेत त्यांच्याकडून हवामानाचे संदेश पुरेसे अगोदर मिळत असतात. पुरांचे पूर्वसंदेश 48 तास अगोदर मिळण्याची व्यवस्था देशात चांगल्या पध्दतीने बसविलेली असल्यामुळे त्याचा अधिक तपशीलातील विस्तार आपल्या राज्याच्या खोरेनिहाय व्यवस्थापनाचा एक भाग म्हणून आपल्याला या पुढे विकसित करावा लागेल. कारण हा निसर्ग आहे. निसर्गाचा कोप हा होणार. परंतु त्या बाबतची पूर्व कल्पना मिळण्याची व्यवस्था आपल्याला विज्ञानाच्या माध्यमातून होऊ शकते. ती व्यवस्था झाली तर आपण हे थांबवू शकतो. सरकारने अशा प्रकारची कायमस्वरुपी व्यवस्था वजा रचना करण्याचा विचार केला आहे काय ? महोदय, या क्षेत्रात काम करणाऱ्या संघटनांना केंद्रीय जल आयोगाकडून बहुतांश मार्गदर्शन सहज मिळण्यासारखे आहे. कारण आसाम, बिहार या सारख्या राज्यात अति पूरप्रवण भागातील त्यांची पूर संदेश यंत्रणा उत्तम रितीने काम करीत असल्यामुळे त्या राज्यांत पूर्वी पेक्षा कमी प्रमाणात नुकसान होत असल्याचे आपण पाहत आहोत.

महोदय, या उपाययोजना करीत असतानाच मोठ्या धरणाची कामे गतीने पूर्ण करण्याची आवश्यकता आहे. ही कामे पूर्ण का होत नाहीत ? कारण आम्ही त्या कामातील भ्रष्टाचाराबाबत बोलतो. आम्ही भ्रष्टाचाराबाबत बोलायचे नाही काय ? तसेच असेल तर भ्रष्टाचाराचा विषय सील करुन, बाकीचे काम सुरु करा. परंतु तसे करण्याची शासनाची तयारी नाही. गोसीखुर्द, बावनथडी हे प्रकल्प मोठे असून ते तातडीने पूर्ण केले पाहिजेत. चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन प्रकल्प

..3..



श्री.विनोद तावडे....

वेळेत पूर्ण झाला असता तर त्या जिल्ह्यात जे नुकसान झाले ते कमी झाले असते असे शासनाचे उत्तर आहे. यवतमाळमधील बेंबळा प्रकल्प सुध्दा वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. या प्रकल्पांची कामे भ्रष्टाचारामुळे लांबली आहेत. माझी मागणी आहे की, हे सर्व प्रकल्प पूर्ण केले पाहिजेत. निम्न पैनगंगा प्रकल्पाबरोबर इतर प्रकल्प पूर्ण झाले असते तर आतापेक्षा कमी नुकसान झाले असते. आदरणीय श्री.अटलबिहारी वाजपेयी हे पंतप्रधान असताना त्यांनी नद्या जोड प्रकल्पाचा विचार मांडला होता. ते त्या पध्दतीची योजना सुरु करणार होते. परंतु नंतर आमच्या पक्षाचे सरकार सत्तेवर आले नाही. माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी साहेबांनी जो विचार मांडला होता त्यावर पुढच्या सरकारने कोणतीच कार्यवाही केली नाही. महोदय, किमान राज्यामध्ये अशा नदी जोड प्रकल्पाचा विचार आपण करु शकतो काय, तो व्यवहार्य आहे काय, व्यवहार्य असल्यास तो कसा आहे, तो कोठे करता येऊ शकतो, याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. अशा प्रकारच्या नदी जोड प्रकल्पाचा विचार करुन पुढच्या कालखंडात कायमस्वरुपी उपाययोजना आखू शकतो काय याचा विचार करण्याची आवश्यकता आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

मला एवढेच म्हणायचे आहे की, आपण कायमस्वरूपी योजना करू. पण आता ते झ ााल्यानंतर तुम्ही जुलैमध्ये घोषित केले, ऑगस्टमध्ये पत्रक काढले, 31 ऑक्टोबरला पैसे पाठविले, मार्च, 2014 पर्यंत देऊ म्हटले. परंतु, आज त्याबाबत जास्त करण्याची गरज आहे, हे फिरून आल्यानंतर मला पटले. स्थिती अतिशय गंभीर आहे. या आपत्तीमध्ये मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना लालफितशाहीत न अडकवता सरळसरळ अडीच लाख रूपये ताबडतोब दिले पाहिजेत. परंतु, हे आपण देत नाही. ते तेथपर्यंत पोहचत नाही. टप्प्याटप्प्याने छाननी वगैरे होते. आपत्ती निवारण योजनेमध्ये जनावरांचा मुद्दा आहे. त्याचा देखील विचार केला पाहिजे. शासनाने पडलेल्या घरांसाठी मदत जाहीर केली होती. कमी नुकसान झालेल्या घरासाठीची मदत प्रति घर अडीच हजार रूपये इतकी आहे. शासनाने सदर मदत वाढवून ती 20 हजार रूपये केली आहे. अडीच हजार रूपयांत पडलेले अधर्वट स्थितीचे घर दुरूस्त होत नाही, हे वास्तव आहे. 16,24,400 हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. शासनाने हेक्टरी 5 हजार रूपये एवढी मदत केली आहे. पण ही मदत पुरत नाही. आमची मागणी 25 हजार रुपयांच्या मदतीची आहे. आमची ती मागणी अद्यापही कायम आहे. त्यामुळे 4061 कोटी रूपयांची मदत यासाठी करावी लागेल. जनावरांसाठी 300 कोटी रूपयांची मदत करावी लागेल. या आपत्तीमध्ये 31800 हेक्टर जमीन खरडून गेली आहे, वाहून गेली आहे. एवढे मोठे संकट आले असताना शासनाने प्रति हेक्टर केवळ 25 हजार एवढी मदत जाहीर केली आहे, ती वाढवून 40 हजार रूपये करावी. कारण शेवटी जमीन खरडून जाते, त्यावेळी पुढील 2 वर्षे त्यावर कोणतेही पीक येत नाही. तुम्ही 5 हजार दिले आणि त्यामध्ये पुढील 3-4 वर्षे काहीही होणार नसेल, तर त्याची व्यवस्था करावयाची आहे. सार्वजनिक मालमत्तेसाठी 2521 कोटी ते 6909 कोटी रूपयांची गरज आहे. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, खरडलेल्या जमिनीचे नुकसान, शेतमालाचे नुकसान पाहता 6459 रूपयांचे पॅकेज दिले पाहिजे.

माननीय मंत्री महोदय, माननीय राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आपले मित्र आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. आपण माननीय राष्ट्रपतींना सांगितले पाहिजे. आपण त्यांना शुभेच्छा देताना म्हणावे की, मी पुनर्वसन मंत्री आहे, तुमच्या वाढदिवसाची भेट मी राज्याला देऊ इच्छितो.

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

अतिवृष्टी झाली, त्या ठिकाणी ओला दुष्काळ घोषित करून 6459 कोटी रूपयांचे पॅकेज माननीय राष्ट्रपतींच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे परममित्र माननीय मंत्री डॉ. पतंगरावजी कदम या राज्यामध्ये आणत आहेत, अशी घोषणा तुम्ही केली तर आपण खरे टायगरराव कदम आहात असे आम्ही तुम्हाला म्हणू. आपण ही मदत करू शकता. दिल्ली दरबारी आपले वजन आहे. माननीय श्री. अजितदादा आपले ऐकत नाहीत. आपण माननीय मंत्री श्री. सुरेश धस यांची मदत घ्या. त्यांनी माननीय माजी मंत्री श्री. प्रकाश सोळंके यांची जागा दादांना जवळ करून पटकाविली. ते सज्जन माणसाला घालवून दादांचे बोट धरून इकडे आले. अन्याय झालेल्या शेतकऱ्यांसाठी हवे असलेले 6459 कोटी रूपये फक्त खिसा झटकला तरी पटकन येतील आणि ते आपण करून दाखविले तर विदर्भ, कोकण येथील शेतकऱ्यांना आपण न्याय दिला असे होईल. 960 कोटी रूपयांच्या पुरवणी मागणीने काहीही होणार नाही. ते पुरेसे नाहीत. तुम्ही विदर्भातील शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसत आहात, प्रत्यक्षात काहीही देत नाही. तुम्हाला अधिवेशन संपवून विदर्भातून ताठ मानेने जायचे असेल तर आपण 6459 कोटी रूपयांचे पॅकेज घोषित करा नाही तर शरमेने मान खाली घालून विमानतळावर जावे लागेल, इतकेच सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे भाषण ऐकून शेतकऱ्यांच्या परिस्थितीबाबत मनापासून चिंता व्यक्त करावयास पाहिजे होती. पुरवणी मागण्यांचा संदर्भ देऊन व चर्चेतून आलेल्या मुद्यांची नोंद घेऊन आम्ही हे करणार आहोत, असा निर्धार त्यांनी व्यक्त करावयास पाहिजे होता. शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत जी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याचा दिलीपकुमार करु नका.

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्य माझ्या म्हणण्याचा विपर्यास करीत आहेत. मी मघाशी असे म्हणालो की, दिलीपकुमार यांना द्यावे व राहिलेल्या लोकांनाही मदत द्यावी.

श्री.दिवाकर रावते : त्याबद्दल आम्ही मंत्री महोदयांचे कौतुक करतो. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शासनाने वेळोवळी घेतलेले निर्णय, वारंवार जाहीर केलेली मदत याचा पूर्णपणे तपशील सांगितलेला आहे. त्यामुळे आम्ही तेच मुद्दे उपस्थित करु इच्छित नाही. पण परिस्थितीचे गांभीर्य मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. विदर्भातील अतिवृष्टी झालेल्या भागात माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री जाऊन आले. त्यांच्यानंतर मी देखील त्या भागात जाऊन आलो आहे. तिकडील परिस्थिती फार गंभीर आहे. प्रसिध्दी माध्यमांसमोर मांडण्यापेक्षा जनतेच्या व्यथा आम्ही कोठे मांडत आहोत याला फार महत्व आहे. त्यामुळे मी प्रेससमोर कधीही ते मांडलेले नाही. आत्महत्येचे सत्र जोरात सुरु आहे. कोणत्याही गोष्टीबद्दल बोलल्यानंतर त्याचा विपर्यास करण्याची पध्दत सर्वांमध्ये सुरु झालेली आहे. त्यातील वेदना, दुःख, त्यातील सामाजिक जाणिवा हे सांगताना जी चुरस असते, त्यापेक्षा त्यातून बातमी कशी निर्माण होईल. त्यातून माझ्या शेतकऱ्यांचे दुःख बाजूला जावयास नको ही भूमिका लक्षात ठेवली पाहिजे. जानेवारी महिन्यापासून ते कालपरवापर्यंत विदर्भात 732 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत.

मला कोणाचाही अपमान न करता अत्यंत नम्रपणे नमूद करावयाचे आहे की, या सरकारला भावना आहेत असे आम्हाला जाणवू लागले आहे. एक दाभोळकर गेले हे दुर्दैव आहे. दाभोळकरांच्या जाण्यामुळे भावनाविवश झालेल्या सरकारने हत्या झाल्याच्या दुसऱ्या दिवशी अध्यादेश काढला. माझी त्याबद्दल तक्रार नाही. आतापर्यंत 1000 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्यानंतर व जानेवारीपर्यंत 750 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्यानंतर ज्या कर्जबाजारीपणामुळे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

शेतकरी आत्महत्या करीत आहेत त्या सावकारी कायद्याचे विधेयकासंबंधी अध्यादेश काढण्याची मागणी मी पत्राद्वारें माननीय मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे. त्या संदर्भातील अध्यादेश काढण्याच्या जाणिवा का जाग्या होत नाहीत ? सरकारला आणखी किती शेतकऱ्यांचे बळी हवेत असा प्रश्न घेऊन मी उभा आहे. 10 हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत आणि भविष्यात 10 हजार शेतकऱ्यांचे संसार वाचविण्यासाठी शासनाने अध्यादेश काढण्याची अत्यंत आवश्यकता आहे. जादूटोणा विधेयकाला थोडासा विलंब झाला असता तरी चालले असते. काही लोक मरतात त्यांच्यासाठी तो कायदा येणार आहे. परंतु परिस्थितीच्या गांभीर्यामुळे व सरकारच्या धोरणामुळे अनेक कुटुंबे उद्‌ध्वस्त होत असताना सावकारी कायद्याचे विधेयक सरकार आणत नाही. सभागृहात विधेयक मंजूर झाल्यानंतर केंद्र सरकारने ते विधेयक फेटाळले आहे.

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

अध्यादेश काढायचा निर्णय मंत्रिमंडळात घेऊन याच अधिवेशनात कायदा आणणार की नाही हे विचारण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे. ही जाणीव तुमच्याकडे आहे की नाही हा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी वारंवार मरतो आहे त्याच्या नेतृत्वाकरिता कोणी मरणार नसेल, तुम्ही अध्यादेश काढणार नसाल तर आम्हाला शेतकऱ्यांकरिता मारा म्हणून अध्यादेश काढा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. माणूस मेल्याशिवाय, त्यांचे नेते मेल्याशिवाय सरकार हलत नाही.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी याच सरकारमधील एक मंत्री श्री.नारायण राणे कोकणात काय बोलले? आम्ही नक्षलवादी होऊ असे त्यांनी वक्तव्य केले. या सरकारची कशी परिस्थिती निर्माण झाली आहे त्याचे हे उदाहरण आहे. पोळा हा सण मोठया प्रमाणात साजरा केला जातो. गेल्या 10-12 वर्षात पोळा या सणाच्या दिवशी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, हे किती दुर्दैवी आहे. सणाच्या दिवशी एखाद्या घरी दुःखद घटना घडली तर आजूबाजूचे लोक हळहळतात. विदर्भामध्ये सातत्याने पोळा सणाच्या दिवशी सातत्याने आणि सतत शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत.

सभापती महोदय, पिंपळपूरला सदाशिव किनाके, वय वर्षे 45, विष पिऊन मेले. 60 हजार रुपयांचे सोसायटीचे कर्ज होते. 7 एकर शेती असून तीन अपत्ये आहेत. पोळा सणाच्या दिवशी पाथरी येथील नागोराव सोमैया, वय 48 वर्षे, गळ्याला फास लावून मेले. सोसायटीचे 35 हजार रुपयांचे कर्ज होते. 5 एकर शेती आहे. पिंपळखेडा येथील सुप्रा मेघराम, वय वर्षे 57, विष पिऊन मेले. 40 हजार सावकाराचे कर्ज होते. आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार त्या भागात त्याच वेळी आले होते. 13 तारखेला पिंपळखेडा गावात ते गेले होते. मी मागील वेळी सभागृहात अशी व्यथा मांडली होती की, आदरणीय श्री.शरद पवार ज्या राठोड नावाच्या शेतकऱ्याच्या घरी गेले, त्याच्या खांद्यावर आधारासाठी हात ठेवला, तो हात तेथील शेतकऱ्यांच्या आधारासाठी होता. परंतु सांगायला अतीव दुःख होते. त्यांची पाठ फिरताच काही तासात या मंत्र्यांचा त्यांना आधार वाटला नाही, विश्वास वाटला नाही म्हणून त्याने आत्महत्या केली. त्यांनी खांद्यावर हात ठेवला म्हणून आत्महत्या केली हा विषय नाही. श्री. शरद पवार साहेब या देशाचे कृषी मंत्री असताना ते ज्यांना विश्वास देतात, त्यांना तो विश्वास का वाटत नाही याचे चिंतन करुन नवीन धोरण निर्माण करणे याला राज्यकर्ता म्हणतात. हे का घडले हा प्रश्न मी तुम्हाला या निमित्ताने विचारतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, 1 हजार कोटी रुपयांचे पॅकेज मुख्यमंत्री देऊन गेले. त्या गावात मी दोन दिवसानंतर गेलो होतो. त्यांनी शेती पाहिली, त्या ठिकाणी मी गेलो होतो. आदरणीय श्री.शरद पवार त्यानंतर आठ दिवसांनी तेथे गेले होते. प्रश्न असा आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी 1 हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले, श्री.शरद पवार यांनी 1 हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. एकूण 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांकरिता जाहीर केले. या 2 हजार कोटी रुपयाच्या पॅकेजपैकी 1 रुपया सुध्दा आजपर्यंत त्यांना मिळालेला नाही. कोणत्या आधारावर शेतकऱ्यांनी जगायचे? माझ्याकडे एका शेतकऱ्यांने दिलेले पत्र आहे. आमदार गेले, मंत्री गेले की त्या भागातील शेतकरी भेटायला येतात आणि निवेदनाद्वारे आपले म्हणणे मांडतात. माझ्याकडे प्रविण शिनगारे या शेतकऱ्याने पाठविलेले पत्र आहे. त्याने या पत्रामध्ये काय सांगितले? आमच्या भागात असलेल्या एकूण 21 शेतकऱ्यांच्या कर्जाच्या संदर्भात मदतीचे धनादेश दिले आहेत. सर्व शेतकऱ्यांची नावे आहेत, त्यांचे बँक खाते क्रमांक दिलेले आहेत. बँक ऑफ इंडियाच्या शाखेवरील मदतीचे 60 हजार रुपयांचे चेक तहसीलदार यांनी दिले.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

तहसीलदाराने चेक दिल्यानंतर शेतकरी बँकेत गेले तेव्हा बँक म्हणाली की, अशा प्रकारचे चेक आमच्याकडे आलेले नाहीत. तहसीलदार, जिल्हाधिकारी यांच्याकडून चेक घेण्यासाठी शेतकऱ्यांना फेऱ्या माराव्या लागल्या. शेवटी फेऱ्या मारून शेतकरीच दमला. रूपये दोन हजारांपासून ते आठ हजारांपर्यंत चेकची रक्कम होती. मी स्वत: वर्धा जिल्हयातील सेलू येथील बँकेत गेलो होतो. त्या बँकेचे मॅनेजर रजेवर होते. ते मुंबईला राहतात. ते घरी होते. मी गेल्यानंतर ते 15 ते 20 दिवस आलेच नाहीत. अजूनही त्या शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. माझ्याकडे आलेल्या पत्राची तारीख 21 नोव्हेंबर 2013 अशी आहे. अशी परिस्थिती ग्रामीण भागामध्ये असेल तर या शेतकऱ्यांनी शासनाच्या मदतीच्या आशेवर कसे काय जगायचे ? याचे आपण उत्तर द्यावे. हे पत्र मी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना देतो. त्याचा आपण शोध घ्यावा. बँका अशा प्रकारे शेतकऱ्यांना तगवणार असतील, ठकवणार असतील तर त्याचा बंदोबस्त केला पाहिजे. चेक गहाळ झाला असेल तर जबाबदारी निश्चित करणार आहात काय ? चेक गहाळ झाला असेल तर महसूल यंत्रणेची कोणती जबाबदारी आहे ? यात जो कोणी जबाबदार असेल त्याला किमान कारणे दाखवा नोटीस द्यावी. त्याला निलंबन करावे असे मी म्हणणार नाही. आजच्या काळात निलंबन करून घरी पाठवणे हे अत्यंत वाईट आहे. संबंधिताला कारणे दाखवा नोटीस तरी द्यावी. संबंधिताला निदान कारण तरी विचारले जाईल काय ? आपण अजूनही आणखी आत्महत्या वाढण्याची वाट पहात बसणार आहात काय, असा माझा प्रश्न आहे. मी हे पत्र मुद्दाम आपल्याकडे पाठवत आहे. माननीय महसूल मंत्री आता सभागृहात उपस्थित असल्यामुळे हा प्रश्न तडीस लावतील अशी मला आशा आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री.शरद पवार हे महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सातत्याने फिरत असतात. ते पश्चिम महाराष्ट्रामध्ये, विदर्भामध्ये, मराठवाड्यामध्ये गेले. सुदैवाने म्हणा किंवा योगायोगाने म्हणा मी देखील सगळीकडे फिरतो. ते जातात म्हणून मी जात नाही. मी जातो म्हणून ते जात नाही. आम्हाला शेतकऱ्यांची दु:ख जाणून घेण्याचे एक वळण लागले आहे. म्हणून आम्ही जात असतो, सगळीकडे पहात असतो. त्यातूनच या सर्व भावना व्यक्त होत असतात.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे जमीन खरडून गेली आहे. त्यासाठी शासनाने 1960 कोटी रूपयांचे अनुदान जाहीर केले. त्याचे वाटप कधी झाले याचा खुलासा माननीय महसूल मंत्र्यांनी केला तर मला बरे वाटेल. माझ्या माहिती प्रमाणे याचे वाटप अद्याप पर्यंत खाल पर्यंत व्यवस्थितपणे पोहोचलेले नाही असा मी दावा करतो. माझा दावा आपण खोडून काढला तर मला खूप आनंद होईल. शेतकऱ्यांपर्यंत मदत का पोहचत नाही हा नेहमीच प्रश्न उपस्थित होतो.

सभापती महोदय, अतिवृष्टी झाल्यामुळे केंद्र सरकारची समिती आली. माननीय श्री.शरद पवार साहेब आल्यानंतर सर्व यंत्रणा हलते म्हणून त्यांना निश्चितच मार्क दिले पाहिजेत. त्याबद्दल कोणतेही दुमत नाही. दिनांक 11 सप्टेंबर 2013 रोजी आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी दौरा केला. एक महिन्यात मदत देण्याचे त्यांनी आश्वासन दिले. आमच्या सभागृहाचे आदरणीय नेते श्री.अजित पवार हे वाशिम येथे गेले होते. त्यांनी किती मदत देण्यात येईल याचा काहीही उल्लेख केला नाही. तुम्हाला हे सरकार भरघोस मदत करील असे आश्वासन दिले. त्याचा देखील येथे खुलासा झाला पाहिजे. येथे आल्यावर अधिकाऱ्यांशी चर्चा करून किती रूपयांची भरघोस मदत जाहीर केली हे आम्हाला कळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, परतीच्या पावसामुळे 20 लाख हेक्टरवरील सोयाबीन संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहे. काही ठिकाणी शेंगांना कोंब फुटले. हे मी, माननीय मंत्री महोदयांनी आणि स्थानिक सन्माननीय सदस्यांनी पाहिलेले आहे. हा काही नवीन विषय नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सगळी वस्तुस्थिती मांडल्यानंतर आम्हाला पुरवणी मागण्यांमध्ये डोकवायला सांगण्यापेक्षा पुरवणी मागण्या कितीच्या मांडल्या आहेत व त्या कमी पडत असल्यास काय करणार आहोत याची अपेक्षा आम्हाला उत्तरामध्ये आहे.

आदरणीय श्री.शरद पवार हे दिनांक 13 ऑक्टोबर 2013 रोजी नागपूर येथे श्री.नितीन गडकरी यांच्या कार्यक्रमाला आले होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माननीय श्री. शरद पवार साहेब आले आहेत म्हणून त्या ठिकाणी काही शेतकरी आशेने गेले होते परंतु माननीय श्री. शरद पवार साहेबांना शेतकऱ्यांच्या संदर्भात काहीही वक्तव्य केले नाही. कृषी खाते आलटून पालटून नगर जिल्हयातच आहे. ग्रामसेवक, पटवारी व कृषी अधिकारी कशा प्रकारे काम करतात याची माहिती मी या ठिकाणी देत नाही. शेवटी प्रशासन चालविताना येणाऱ्या अडचणी आता फार गंभीर झालेल्या आहेत. अधिकाऱ्यांना आता वठणीवर आणणे कठीण झाले आहे. मंत्रालयाचे नाव पूर्वी सारखे "सचिवालय" ठेवावे असे मंत्रि मंडळातील हताश मंत्री आता म्हणत आहेत. सरकारचे आता दिवस भरले आहेत असे आम्ही म्हणत नाही, तर आपण स्वत:च ते जाहीर करीत आहात. हे जे लक्षण आहे ते चांगले नाही एवढेच मला म्हणावयाचे आहे. आम्ही या ठिकाणी शेतकऱ्यांचे दु:ख मांडण्यासाठी आलेलो आहोत.

सभापती महोदय, सोयाबीन आणि कापसाच्या मदतीसाठी शासनाकडे हात मागितला आहे. शासनाने जास्तीत जास्त केंद्र सुरु होतील अशी घोषणा केली परंतु आतापर्यंत शासनाने केवळ 10कपाशी खरेदी केंद्र सुरु केली आहेत. विदर्भामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे येथील कापसाचे तसेच सोयाबीनचे पीक मोठया प्रमाणात खराब झाले आहे. कापूस आणि सोयाबीन व्यापारी अर्ध्या किंमतीत घेत आहेत. त्यामुळे आता आपण कापसाला किती भाव देणार आहात हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, ऊस उत्पादकाच्या आंदोलनामध्ये मी सुध्दा भाग घेतला होता. पश्चिम महाराष्ट्राच्या ऊस उत्पादकाकरिता आम्ही दिल्ली पर्यंत गेलो होतो. परंतु या शासनाला ऊस उत्पादक वाचवायचा नाही तर कारखानदारी वाचवायची आहे. ऊसाच्या दरा संदर्भात आम्ही माननीय पंतप्रधांनाना भेटलो, माननीय शरद पवार साहेबांनी 6 तारखेला या विषयाच्या संदर्भात एक बैठक घेऊन त्या बैठकीचा निर्णय माननीय पंतप्रधांनाकडे पाठविला. मराठवाडा, विदर्भ व खानदेश येथे 60 लाख शेतकरी सोयाबीन आणि ऊसाचे पीक घेतात. माननीय कृषी मंत्री प्रामाणिकपणे काम करतात त्याबद्दल काही वाद नाही. 60 लाख शेतकऱ्यांच्या नुकसानी संदर्भातील विषय आपण किती गांभीर्याने घेणार आहात हा माझ्या समोर प्रश्न आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, माझ्याकडे सांगण्यासारखे बरेच आहे परंतु वेळ कमी असल्यामुळे मी ते मांडत नाही. अतिवृष्टीमुळे उध्वस्त झालेल्या विदर्भ, खानदेश या भागातील कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे जे पीक नष्ट झाले त्यांना आपण नुकसान भरपाई किती देणार आहात ? हा जो शेतकरी आहे तो आपला आहे, हा शेतकरी या मातीतील आहे, हा शेतकरी पिढ्यानपिढ्या आपली जमीन कसत आहे. आपण कसले अधिकारी सांभाळत आहात ? हे अधिकारी शेतकऱ्याच्या पिकाचे खोटे पंचनामे करीत आहेत. एक वेळ आपल्या तिजोरीला भोक पडले तरी चालेल, शेतकऱ्यांना थोडे जास्त पैसे गेले तरी चालेल. परंतु खोटे पंचनामे करुन 50 टक्के नापिकी झाली असेल तर ती 51 टक्के दाखवून शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित करण्याचे काम तुमचे अधिकारी करीत आहेत. अधिकाऱ्याला काही बोलले की, लागलीच तुरुंगात टाकले जाते. सामान्य शेतकऱ्याला ज्या पध्दतीने तुरुंगात टाकले जात आहे ती पध्दत अतिशय वाईट आहे. कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे कर्जबाजारी शेतकऱ्यांनी सोयाबीन आणि कापसाला भाव मिळत नाही म्हणून वर्धा आणि चंद्रपूर येथे तीव्र आंदोलन केले होते. परंतु या शेतकऱ्यांवर लूटमार आणि दरोड्याच्या केसेस टाकण्यात आल्या. माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्या अस्तित्वाकरिता, कष्टाने आणि घामाने तयार केलेल्या मालाला योग्य दर द्या म्हणून अक्रोश करणारा शेतकरी ज्यावेळेस आक्रमक होतो तेव्हा त्या शेतकऱ्यांच्या भावनांचा आदर करा. शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करुन त्यांना तुरुंगात टाकले जाते आहे ते योग्य नाही. चंद्रपूर आणि वर्धा येथील शेतकरी पालकमंत्र्यांना भेटावयास गेले होते.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

पालकमंत्र्यांना भेटायला शेतकरी येतात आणि तुम्ही त्यांच्यावर लाठीमार करता ? मी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती करतो की, शेतकऱ्यांना जी काही मदत द्यायची ती द्या परंतु त्यांच्यावर दाखल केलेले गुन्हे ताबडतोब मागे घ्यावेत. ते खटले तातडीने रद्द करावेत. सहा महिन्यांनी खटले मागे घेऊन काही उपयोग नाही. कारण तोपर्यंत न्यायालयाच्या फेऱ्या मारणे, वकील नेमण्यासाठी त्याला कर्ज काढावे लागेल. शेती राहिली बाजूला आणि न्यायालयीन लढाईकरिता कर्ज अशी विद्रूप परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा माझी पुन्हा एकदा कळकळीची विनंती आहे की, या महिन्यापर्यंत त्यांच्यावरील खटले मागे घ्यावेत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना हमीभावाची निश्चिती देऊन त्यांच्या आत्महत्या थांबवाव्यात. गेल्या जानेवारी पासून 750 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी किती शेतकऱ्यांना एक लाख रुपयांची मदत दिली याचे उत्तर मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात द्यावे जेणेकरुन शासकीय यंत्रणा कशाप्रकारे काम करते हे देखील आम्हाला समजेल. कर्जबाजारी शेतकऱ्यांना दारुडे ठरवू नका. त्यांना घरच्या भानगडीत गुंतवू नका. शेतकऱ्यांवर कर्ज असेल तर त्याचा संसार उघड्यावर पाडू नका. त्याला मदत दिली नसेल तर तातडीने देण्यास सांगावे अशी विनंती करुन मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : आदरणीय सभापती महोदय, या ठिकाणी जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये अतिवृष्टीचे स्पष्ट विवरण आणि विवेचन केलेले आहे. गेल्या वर्षी विदर्भात चांगला पाऊस झाला आणि या वर्षी अतिवृष्टी झाली. निसर्गाचे हे दुष्टचक्र आहे. आम्ही केव्हाच चंद्रावर पाऊल टाकले आहे. काही दिवसांनी आपले यान मंगळावर स्थिर होणार आहे. पण निसर्गाच्या दुष्टचक्रावर मात करण्यामध्ये विज्ञानाला पाहिजे तेवढे यश आलेले नाही. आपणास विज्ञानाने बरेच काही दिले. परंतु विज्ञानाने अजून काही देणे बाकी आहे.

विदर्भामध्ये अतिवृष्टी झाली. विदर्भातील अतिरिक्त पाणी महाराष्ट्राच्या उर्वरित भागामध्ये वळविता आले असते तर कदाचित या अतिवृष्टीमध्ये जे पशुधन वाहून गेले, शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले, हे नुकसान आपणास टाळता आले असते.

सभापती महोदय, विदर्भातील एक कवी असे म्हणतो की,

तुझ्या डोस्क्यावर पोरी भार गवताचा पाहिला,
मले म्हसीच्या जातीचा भल्ले राग आला

मोठ्या प्रमाणावर म्हशी वाहून गेलेल्या आहेत आणि गवताचे भार मुला-मुलींच्या डोक्यावर आलेले आहेत. दुर्दैवाने असे दृश्य विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये दिसून येत आहे. शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय शोचनीय झालेली आहे.

आम्ही पान वाळलेले, पाण्यात वाहणारे,
उडताही येत नाही आणि बुडताही येत नाही

अशी शेतकऱ्यांची परिस्थिती आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

या परिस्थितीतून शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर राज्य सरकारला स्वत:चा खजिना रिता करावा लागेल. राज्य सरकारला तेवढी उदार मनस्विता दाखविण्याची गरज आहे. माननीय महसूल मंत्री या ठिकाणी बसलेले आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे. त्यांची शेती खरडून गेलेली आहे. मातीचा कणही शेतामध्ये राहिला नाही. एवढेच नव्हे तर मातीचा पोत सुध्दा बिघडला आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी त्यांच्या कुटुंबाची आर्थिक घडी पूर्व पदावर आणावयाचे ठरविले तर शेतकऱ्यांच्या आयुष्यातील तीन-चार वर्षे त्यामध्ये जाणार आहेत. या ठिकाणी महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, शासनाच्या वतीने या शेतकऱ्यांना कोणती मदत जाहीर केली जाणार आहे ?

महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात हे शेतकऱ्यांचे नेतृत्व करतात. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची त्यांना जाणीव आहे. ग्रामीण भागातून आलेले ते नेतृत्व आहे. विदर्भातील जनता आपल्याकडे आशेने पाहत आहे. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम, शेतकऱ्यांची अवस्था दात पडलेल्या आणि नखे गळालेल्या वाघासारखी झाली आहे. परंतु माननीय मंत्री महोदय, आपण लढाऊ वाघ आहात. You are the great tiger of Maharashtra. नखे गळालेल्या आणि दात पडलेल्या वाघासारखे शेतकरी आज आर्थिक बाबतीत कंगाल झालेले आहेत. या परिस्थितीत त्या शेतकऱ्यांना कसे वाचवायचे हा मोठा प्रश्न आपल्यासमोर आहे.

घाम गाळूनी मातीत ज्ञानेश्वरी फुलवितो आम्ही,
तरीच वनवास सन्याशांच्या पोरापरी.

महोदय, सिध्द बेटाच्या भावंडांची जशी अवस्था होती तशी आज शेतकऱ्यांची अवस्था झाली आहे. त्यांच्या वाट्याला जसे कारुण्य आले होते, दु:ख आले होते तशाच कारुण्य वजा दु:खात दुर्दैवाने विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी जगतो आहे. या भागातील शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन शेतीवर अवलंबून आहे आणि शेती ही निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे आपल्यासमोर विज्ञानाचे आव्हान आहे. आज सकाळी श्री.राव यांना 'भारतरत्न' पुरस्काराने गौरविल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सभागृहाने पारित केला. विज्ञान क्षेत्रामध्ये त्यांनी भरीव कामगिरी केलेली आहे. त्यामुळेच भारताने त्यांना 'भारतरत्न' पुरस्कार प्रदान केला आहे. असे असले तरी आजही अनेक प्रश्न विज्ञानाच्या समोर आहेत. आज संपूर्ण जग अतिवृष्टी, पूर, महापूर यामुळे त्रस्त आहे.

.2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ D/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 17:00

प्रा.सुरेश नवले....

अमेरिकेसारखे शक्तीशाली राष्ट्र देखील पूर आणि अतिवृष्टीमुळे त्रस्त आहे. राज्य सरकारसमोर विदर्भाच्या बाबतीत मोठी दुर्दैवी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या परिस्थितीवर मात करावयाची असेल, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील, त्यांना दिलासा देण्याची आवश्यकता असेल तर राज्य सरकारने त्यांना सढळ हाताने मदत करण्याची गरज आहे. त्यांना किती मदत करायची ते राज्य सरकारने ठरवावे.

महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यात मोठ्या प्रमाणावर कापूस पिकविला जातो. सरकारने कापसाचा हमी भाव 4 हजार रुपये जाहीर केलेला आहे. राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या कापूस पिकाच्या बाबतीत जाणीव आहे. त्यामुळेच राज्य सरकारने केंद्र सरकारकडे कापसाला 6068 रुपये हमी भाव देण्याबाबत शिफारस केली आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

फक्त राज्य शासनानेच 6068 रूपयांची शिफारस केली आहे. पण ती शिफारस केंद्र शासन स्वीकारील याची खात्री नाही. ती शिफारस केंद्र शासनाने स्वीकारावी असे वाटत असेल तर मला मंत्रिमंडळातील अनेक मान्यवरांना विनंती करावयाची आहे की, आपण मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या माननीय पंतप्रधानांना जाऊन भेटावे आणि त्यांना विनंती करावी की, विदर्भात अतिवृष्टी झाली आहे. मराठवाडा पावसाच्या छत्रछायेखाली आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना विशेषत: मराठवाडा, विदर्भ येथील शेतकऱ्यांना न्याय द्यायचा असेल तर, 6068 हजार रूपयांची राज्य शासनाने शिफारस केलेली आहे, तो भाव पांढऱ्या सोन्याला मिळाला तर मला खात्री आहे की, सर्वसामान्य शेतकरी सहजपणे चांगले जीवन जगू शकतो. मुलीचे लग्न काढले तर 3 वर्षे असेच निघून जातात. हे चित्र मराठवाड्याचे, विदर्भाचे आहे. विदर्भातील अनेक सिंचन योजना प्रलंबित आहेत. प्रशासकीय मान्यतेअभावी अनेक योजना पडून आहेत. राज्य शासनाने या निमित्ताने त्या बाबतही विचार करावा. आपण विदर्भातील शेतकऱ्यांना भरीव दिलासा देऊ शकलो तर महाराष्ट्राच्या दृष्टीने ते योग्य चित्र राहणार आहे, असे मला वाटते.

सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आमदारांना 10 कोटी रूपयांची खिरापत वाटली आहे, असा मुद्दा मांडला. मी म्हणतो की, राज्य शासनाने दूरदृष्टीने घेतलेला हा निर्णय आहे. ही काही खिरापत नाही. महाराष्ट्रातील आमदारांची पत वाढविण्यासाठी टाकलेले हे पाऊल आहे. विधानसभा मतदारसंघाच्या परिक्षेत्रातील विकास योजनांच्या माध्यमातून दळणवळणाची व्यवस्था व्हावी, गोरगरीब शेतकऱ्यांना तालुक्यापर्यंत येता यावे, सर्वसामान्य माणसाला जिल्ह्यापर्यंत येता यावे, दळणवळणाच्या माध्यमातून त्यांना राज्यांशी संपर्क करता यावा, म्हणून शासनातर्फे सन्माननीय सदस्यांना 10 कोटी रूपये देण्यात आले आहेत. ते कोणाच्याही खिशात गेलेले नाहीत. त्या मार्फत ग्रामीण भागाचा, राज्याचा विकास होणार आहे. विकासाच्या कामांवर माननीय मुख्यमंत्र्यांनी निधी दिला असेल तर मला असे वाटते की, त्याचे स्वागतच केले पाहिजे. अशा स्वागतार्ह दूरदृष्टीचे, विचारांचे हे शासन निश्चितपणे विदर्भातील शेतकऱ्यांना भरीव मदत करील. शासनाकडून वाघासारखे कार्य घडावे, अशी अपेक्षा माझ्यासारखा विधानपरिषद सभागृहात पहिल्यांदाच निवडून आलेला सदस्य करीत आहे. मी पुन्हा एकदा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले ....

शासलाला विनंती करीन, आवाहन करीन. विदर्भातील चित्र अतिशय दारूण आहे, भयावह आहे. आपण या संदर्भात भरीव मदत करावी, अशी मी राज्य शासनाला विनंती करतो. राज्य शासन क्रियाशील आहे, यावर माझा विश्वास आहे. माननीय मंत्र्यांनी जंगलामध्ये वाघांची संख्या वाढविली आहे, वातावरण निर्भय केले आहे. पर्यावरणाचा समतोल साधण्याचा हा प्रयत्न आहे. पर्यावरणाचा संमतोल साधला तर निसर्गावर चांगलाच परिणाम होणार आहे. राज्य शासनाने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांचा विचार करावा, एवढी आग्रहाची विनंती करतो आणि थांबतो. धन्यवाद !

----

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे )**

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या सभागृहाचा 14 वर्षे सभासद आहे. विदर्भातील नागपूर अधिवेशनासाठी आल्यानंतर या सभागृहात होणाऱ्या चर्चेचे विषय तेच असतात असे दिसून येते. कधी कापसाला जादा भाव मिळण्याची मागणी केली जाते, कधी विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्याची मागणी केली जाते, कधी अतिवृष्टीवर चर्चा केली जाते तर कधी सोयाबीनला हमी भाव देण्याची मागणी केली जाते. या सर्व विषयांवरील चर्चेला शासनाकडूनही तेच तेच उत्तर दिले जाते. मी या संदर्भात ग्रंथालयात जाऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला होता. विदर्भातील जनतेची व शेतकऱ्यांची फसवणूक करण्यासाठी आपण येथे येतो का असे मला वाटते. विदर्भात आल्यानंतर आपण त्याच त्या गोष्टींबाबत विचार मांडतो. हिवाळी अधिवेशन फक्त 10 दिवस असते. त्यापैकी 3 दिवस गोंधळामुळे वाया जातात. टी.व्ही.समोर गेल्यावर वर्तमानपत्रातून बातम्या छापून येतात, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या व लोकांच्या हातामध्ये काही पडत नाही असे माझे मत आहे. काल मी माननीय अर्थमंत्र्यांना भेटलो होतो. या अधिवेशनात अंधश्रध्दा निर्मूलनाचे विधेयक सभागृहात चर्चेसाठी आले पाहिजे असे बोलणारा मी सदस्य आहे.

मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना असे विचारले होते की, विदर्भातील अधिवेशनासाठी 200 कोटी रुपये खर्च होतात का, यावर ते म्हणाले की, 50-60 कोटी रुपये खर्च होतात. हा बजेटमधील खर्च आहे. परंतु इतर खर्च किती होतो याचा आज विचार करण्याची गरज आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर हे विदर्भातील शेतकऱ्यांचे नेते आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, ते विदर्भातील जनतेच्या फसवणुकीच्या चर्चा आता थांबल्या पाहिजेत. जेवढे शासन जबाबदार आहे तेवढेच आपणही जबाबदार आहोत, विरोधी पक्षाचा सत्ताधारी पक्षावर अंकुश राहिलेला नाही. सरकारवर अंकुश ठेवण्यासाठी असमर्थ ठरलेला मी आमदार आहे असे मला वाटू लागले आहे. विरोधी पक्ष सक्षमपणे काम करण्यासाठी कमी पडत आहे, दुर्दैवाने माझ्या पक्षाच्या आमदारांची संख्या कमी आहे. राज्य सरकारमार्फत अतिवृष्टीबाबत आकडेवारी दिली जाते, ती देण्याची त्यांची हिंमत कशी होऊ शकते ? कोकणातील अतिवृष्टीची आकडेवारी माझ्याकडे आहे. कोकणामध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीचा फटका 57,731 क्षेत्राला बसला आहे. 66 हेक्टर जमीन वाहून गेली आहे, 168 हेक्टर जमीन खरडल्यामुळे नुकसान झालेले आहे. जवळजवळ 15

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.जयंत प्र.पाटील.....

तालुक्यातील पंचनामे पूर्ण झाले आहेत. हे जिल्हाधिकाऱ्यांनी व कृषी विभागाने जाहीर केलेले आहे. पण त्यासाठी शेतकऱ्यांना एकही पैसा मिळालेला नाही. पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद केल्याचे सांगितले जाते. सभागृहात घोषणा केल्या जातात, प्रत्यक्षात काही दिले जात नाही आणि आपणही विसरुन जातो. त्याला आपणही जबाबदार आहोत. 6 हजार कोटी रुपये दिले गेले असे सांगितले जाते, प्रत्यक्षात वाटप केले जात नाही. अर्थ विभाग म्हणजे प्रायव्हेट लिमिटेड कंपनी झालेली आहे. कोणाला किती तरतूद दिली जाते त्याची आकडेवारी काढली तर भयानक परिस्थिती दिसून येईल. ठराविक लोकांना, ठराविक भागाला, ठराविक मतदार संघामध्ये मदत केली जाते. आम्ही शाळेत शिकत होतो तेव्हा 5 वर्षे मंत्री, मुख्यमंत्री बदलत नसत. (अडथळा)

नंतर श्री.शिगम.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

सभापती महोदय, या विषयावर बोलताना मी आकडेवारी देऊ इच्छित नाही. माझ्याकडे भरपूर आकडेवारी आहे. ही आकडेवारी मी उद्याच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी मांडणार आहे. आजची चर्चा आणि उद्याची नियम 260 अन्वये होणारी चर्चा, या दोन्ही चर्चेमध्ये फरक नाही. तीच तीच भाषणे केली जातात आणि तीच तीच उत्तरे दिली जातात. आकड्यांची फिरवाफिरव करुन जनतेच्या हातात खुळखुळा जातो अशी एकंदर परिस्थिती आहे.

सभापती महोदय, आता मंत्रिमंडळाच्या ज्या बैठका होतात त्यांचा दर्जा आमच्या गावकीच्या बैठकापेक्षाही कमी आहे. आमच्या गावकीच्या बैठका बऱ्या असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. मंत्रिमंडळाने गोपनीयतेची शपथ घेतलेली आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये घेतलेले निर्णय गोपनीय असले पाहिजेत. मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये काय बोलायचे आणि काय नाही याबाबत बंधने आहेत. मंत्रिमंडळातील प्रत्येक मंत्री गोपनीयतेच्या शपथेने बांधला गेलेला आहे. असे असताना कॅबिनेटमधील मंत्री टी.व्ही.वर जाऊन एकमेकांवर ताशेरे ओढत असतील तर ते योग्य नाही. आम्ही केव्हा टी.व्ही.वर गेलो नाही. आम्हाला टी.व्ही.वर जाण्याची हौस नाही. टी.व्ही.च्या प्रतिनिधींनी बातम्यासाठी आमच्याकडे आले पाहिजे. आपण त्यांच्याकडे जाता कामा नये. कॅबिनेटमध्ये घेतलेला निर्णय चुकीचा आहे असे सहकारी मंत्री सांगत असतील तर आम्ही तुमच्याकडे कोणत्या अपेक्षेने मदत मागायची असा प्रश्न आम्हाला पडतो. आपण करीत असलेली ही विदर्भाची फसवूणक आपण थांबवा. आपण विकासामध्ये अडथळा निर्माण करीत आहात असे मंत्रिमंडळातील आपले सहकारी मंत्री सांगतात. मग आपण आमचे पुनर्वसन कसे करणार ?

सभापती महोदय, आतापर्यंत विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष दूर करण्याच्या संदर्भात आणि विजेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी दिलेली उत्तरे आपण पहा. प्रत्येक चर्चेला तीच तीच उत्तरे दिली गेली आहेत. हे आता थांबले पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने माझी मंत्री महोदयाकडून एवढीच अपेक्षा आहे की, त्यांनी ठोस निर्णय घेऊन शेतकऱ्यांना काही तरी देऊन जावे. महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झालेली आहे. त्यामध्ये शेतकऱ्यांचे अपरिमित नुकसान झालेले आहे. एवढी अतिवृष्टी झाली की, मंत्री महोदयांना आणि सन्माननीय सदस्यांना त्यांच्या भागाची पाहणी करण्यासाठी पावसाळी अधिवेशन एक दिवस तहकूब करावे लागले होते.शेतक-यांना मदत केली जात आहे असे जरी शासन सांगत असले तरी शेतकऱ्यांच्या पदरात काहीच पडलेले नाही असे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. आता पुरवणी मागण्यामध्ये तरतूद करीत आहोत असे मंत्री महोदय सांगत आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

माणूस मेल्यानंतर त्याला जेवण देणार आहात काय, माणूस मेल्यानंतर त्याला औषध देणार आहात काय, या बाबतीत अपेक्षित बदल होतील अशी मी माननीय डॉ.पतंगराव कदम यांच्याकडून अपेक्षा व्यक्त करतो. तुम्ही ठोस आहात. मी तुम्हाला टायगर म्हणणार नाही. ते माझ्या वडिलांसारखे आहेत. मी त्यांच्या बाबतीत उपरोधक कधीही बोलणार नाही. परंतु ते बोलतात, त्यावर ते ठाम राहतात. मला वाटते की, तुमच्या सारखे कणखर नेतृत्व या महाराष्ट्राला मिळाले आहे.(अडथळा) माननीय डॉ.पतंगराव कदम यांना माहिती आहे की, या ठिकाणी मनापासून कोण बोलतो आहे आणि कोण बोलत नाही. डॉ.पतंगराव कदम साहेब, तुम्ही या बाबतीत निर्णय घ्यावा. आपल्यावर कितीही प्रेशर आणले तरी तुम्हाला या मंत्रिमंडळातून कोणी काढू शकले नाहीत ही गोष्ट आम्ही बघितलेली आहे. या संदर्भात ठोस असे निर्णय आपण आज जाहीर करावेत. कॉंग्रेस पक्ष आज गोत्यात आलेला आहे. त्यांच्यात तुमच्या सारखे समर्थ नेतृत्व असेल तर काही तरी मार्ग निघू शकतात. तुमच्या सारखे नेतृत्व नसेल तर दिल्ली सारखी कॉंग्रेस पक्षाची परिस्थिती होईल. दिल्ली येथे तिसरा पर्याय येतो आहे. जनता आता शहाणी झालेली आहे. जनता आपल्याकडे वेगळया दृष्टीने बघते आहे. जनतेला फसवून चालणार नाही. कोण आतून बोलतो आहे, कोण वरुन बोलतो आहे. डॉ.पतंगराव कदम यांच्या बरोबर गुपचुप कोण बोलतो आहे. माननीय श्री.शशिकांत शिंदे हे माझ्या कानात काय सांगता आहेत, या गोष्टी नवीन पिढीला कळू लागल्या आहेत.

सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, त्याच त्याच चर्चा, एक सारख्याच अर्थ निघणाऱ्या चर्चा एकाच दिवशी व एकाच अधिवेशनात घेतल्या जात आहेत म्हणजे ही लोकांची फसवणूक नाही तर काय आहे ? मी या बाबतीत बोलणार नव्हतो. पत्रकार मित्र म्हणाले की, हिवाळी अधिवेशनात या विषयी का बोलत नाहीत ? आम्ही तेच तेच बोलावयाचे आणि सभागृहाचा वेळ घालवावयाचा ही गोष्ट मला मान्य नाही. महोदय, हिवाळी अधिवेशन दिनांक 20 डिसेंबर 2013 रोजी संपणार आहे. हिवाळी अधिवेशन संपण्यापूर्वी विदर्भातील सर्व जिल्हयातील जिल्हाधिकाऱ्यांच्या तिजोरीत जमा होतील, विदर्भातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत करु अशा प्रकारच्या उत्तराची मला डॉ.पतंगराव कदम साहेबांकडून अपेक्षा आहे. विदर्भ सोडताना शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पैसे पोहचवू अशा प्रकारची घोषणा या चर्चेच्या उत्तराच्या निमित्ताने करण्यात यावी अशीही मी अपेक्षा व्यक्त करतो.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील...

सभापती महोदय, या राज्यात काय चाललेले आहे हे मला कळत नाही. सिंचनामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होतो आहे, कृषी विभागात भ्रष्टाचार होतो आहे, ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे, परंतु तेथे प्रकल्प नाहीत, या विषयी आपण आज सभागृहात चर्चा करीत आहोत. विविध विभागांनी केलेल्या भ्रष्टाचारासंबंधी बरीच कागदपत्रे माझ्याकडे आहेत. या ठिकाणी अशा चर्चेच्या निमित्ताने आपण नेहमी बोलतो. परंतु शासनाचे अधिकारी खूपच निर्ढावलेले आहेत. शासनातील अधिकारी निगरगट्ट झालेली आहे, त्यांना कशाचीही आणि कोणाचीही भीती राहिलेली नाही. सिंचन प्रकल्पाची किंमत 100 कोटी रुपये होती, त्या प्रकल्पाची किंमत 500 कोटी रुपयांवर गेलेली आहे. त्यासंबंधीची कागदपत्रे देखील मी सोबत आणलेली आहेत. माननीय श्री.शशिकांत शिंदे साहेब, आपणाकडे जलसंपदा विभागाचा काही भाग आलेला आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या बॉर्डरवर 4 कोटी रुपयांचे बंधाऱ्याचे काम 22 कोटी रुपयांपर्यंत गेलेले आहे. त्या बंधाऱ्याचे रुपांतर करण्यात आले. त्यासाठी 128 कोटी, त्यानंतर 122 कोटी, त्यानंतर 139 कोटी रुपये खर्च केला गेला. 4 ते 5 कोटी रुपयांच्या आतील बंधाऱ्याचे काम एकाच कंत्राटदाराला कशा प्रकारे दिले याची माहिती मी उद्या सांगणार आहे. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. आज सिंचनाचा विषय नसल्यामुळे त्या विषयावर मी बोलणार नाही. ग्लोबल वार्मिंगमुळे कोकण विभागात मोठया प्रमाणात फरक पडतो आहे. समुद्राचे आणि खाडीचे भरतीचे पाणी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतात शिरत आहे. कोकणात आज सुध्दा पाऊस पडतो आहे. मी अलिबाग शहर सोडले त्यावेळी त्या विभागातील सर्व शेती पाण्याने तुडुंब भरली होती. कोकणात अतिवृष्टी झाल्याने तेथील वाल, हरभरा, मूग, आंब्याचे मोहर यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानी बाबत शासकीय अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे काय, असल्यास त्यांनी अहवालात काय नमूद केले आहे याबाबतची माहिती या सभागृहाला दिली गेली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्यांना नुकसान भरपाई काय देणार हे या ठिकाणी सांगितले पाहिजे. ओरिसा आणि आंध्रप्रदेश राज्यात आलेल्या वादळाचा परिणाम राज्यातील हवामानावर झालेला आहे. आज सुध्दा कोकणात पाऊस पडत आहे. त्यामुळे उन्हाळी पीक नष्ट होणार आहे. या दृष्टीने शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे अशी या निमित्ताने मी मागणी करतो.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये ग्लोबल वॉर्मिंगची अनेकदा चर्चा झाली आहे. हवामानामध्ये होणारे बदल आपल्याला दिसून येत आहेत. जून महिन्याचा पाऊस जुलै महिन्यात पडतो आहे. सप्टेंबर महिन्यात संपणारा पाऊस डिसेंबरमध्ये पडतो आहे. या संदर्भात राज्य शासनाने अभ्यास केला आहे का हे या ठिकाणी सांगितले पाहिजे एवढी विनंती करुन माझे विचार संपवितो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, प्रामुख्याने विदर्भ आणि कोकण विभागात जी अतिवृष्टी झाली त्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती प्रस्तावामध्ये नमूद केली आहे. शेतकऱ्यांना शासनाने काय मदत दिली याचाही उल्लेख त्यात करण्यात आला आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला 18 जुलै रोजी विदर्भ आणि कोकणात अतिवृष्टी झाली. एकाच दिवशी 150 टक्के पाऊस पडला. गेल्या 25 वर्षातील अतिवृष्टीची आकडेवारी पाहिली असता एवढा प्रचंड पाऊस कोणत्याही वर्षी पडला नव्हता. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, बुलढाणा या सर्व जिल्हयांमध्ये अतिवृष्टी झाली. मागील वर्षाच्या सरासरीपेक्षा अडीच पट पाऊस या वर्षी पडला. सुरुवातीला शेतकऱ्यांना पेरणी करता आली नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपल्या भाषणामध्ये सरकारने कोणत्या घोषणा केल्या, लोकांपर्यंत किती आर्थिक मदत पोहोचली याबाबत विस्तृत आकडेवारी सांगितली असल्यामुळे मी आकडेवारीच्या खोलात जाणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी ग्लोबल वॉर्मिंगमुळे होणाऱ्या हवामानातील बदलाबाबत या सभागृहात चर्चा घडवून आणली होती. या ग्लोबल वॉर्मिंगमुळे हंगाम बदलत आहेत. जून जुलैमध्ये सुरु होणारा पावसाळा पुढे सरकत आहे. उन्हाळ्याचे, हिवाळयाचे दिवस बदलत आहेत. शेतकऱ्यांना पिके घेण्याचे धोरण बदलावे लागणार आहे. विदर्भातील शेतकरी हा परंपरागत शेती करणारा आहे. विदर्भातील शेतकरी हा परमेश्वराच्या भरवशावर शेती करणारा आहे. मी सुरुवातीला 1978 व 1980 मध्ये विधानसभेचा सदस्य होतो. या सभागृहात मी गेली 12 वर्षे सदस्य म्हणून काम करीत आहे.

नंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

गेल्या बारा वर्षात तीच ती चर्चा सुरू आहे. कधी विदर्भातील पाटबंधाऱ्यांसंबंधी, अनुशेषासंबंधी, दुष्काळासंबंधी तर कधी अतिवृष्टीसंबंधातील चर्चा सुरू आहे. कधी येताना पॅकेज जाहीर केले जाते, कधी जाताना पॅकेज जाहीर केले जाते. हे पॅकेजचे सत्र माननीय श्री.अंतुले यांच्या पासून सुरू आहे. माननीय श्री.अंतुले मुख्यमंत्री होते तेव्हा मी विधान सभेचा सदस्य होतो. विदर्भातील जनतेच्या समोर पॅकेजच्या रूपाने तुकडा फेकण्याचे काम तेव्हा पासून सुरू झालेले आहे. पण हा फेकलेला तुकडा शेतकऱ्यांच्या दारापर्यंत पोहचतच नाही.

विदर्भात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे माननीय पंतप्रधान विदर्भामध्ये आले होते. त्यावेळी पाच हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या. तेव्हा रूपये 3750.00 कोटींचे पॅकेज माननीय पंतप्रधानांनी जाहीर केले. आम्हाला वाटले की, हा पैसा थेट शेतकऱ्यांकडे जाईल. हा निधी येईल असे वाटले होते. परंतु, आपल्या सरकारने चलाखी केली की, बजेटचा जो पैसा असतो तो पॅकेजच्या माध्यमातून दाखविण्यात आला. मला त्या सर्व गोष्टींची पुनरावृत्ती करावयाची नाही. मी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कशा प्रकारे सामानाचे वाटप करण्यात आले हे सभागृहामध्ये आणून दाखविले होते. त्या पॅकेजने विदर्भातील शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. ते पॅकेज शेतकऱ्यांपर्यंत पोहचू शकले नाही. आपण जुलैमध्ये देखील घोषणा केली होती. काल आमच्या माननीय विरोधी पक्ष नेत्यांना काही पत्रकारांनी विचारले की, आता पर्यंत आपण चर्चा घडवून आणत होता आणि मग निधीची मागणी करत होता. यावेळी आधी पॅकेज जाहीर करा आणि मग चर्चा करू असे उलटे का केले ? माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने जुलैच्या अधिवेशनातील चर्चा काढावी. मुंबईतील अधिवेशनातील चर्चेचे प्रोसिडिंग काढले तर त्या चर्चेमध्ये आणि आजच्या चर्चेमध्ये काहीच फरक दिसणार नाही. तीच आकडेवारी आहे. पाऊस कोणत्या भागात किती से.मी.पडला, चंद्रपूर, गडचिरोली मध्ये किती पाऊस पडला, शेतकऱ्यांच्या पेरण्या झाल्या की नाही, त्याचे बियाणे कसे वाया गेले यावर आम्ही संपूर्ण चर्चा केली होती. त्याच वेळी आम्ही ओल्या दुष्काळाची मागणी केली होती. आताच ओला दुष्काळ जाहीर करावा म्हणून अनेकदा



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभागृहाचे कामकाज देखील बंद पाडले होते. त्यावेळी आम्हाला सांगितले होते की, पंचनामे केले जातील. आज आपण कशा प्रकारे पंचनामे करीत आहात ? 65 मि.मी.च्या वर पाऊस पडला की, अतिवृष्टी होते असे आपण आपल्या जी.आर.मध्ये नमूद केले आहे. आपले जी.आर.कुठल्या जमान्यातील आहेत हेच मला समजत नाही. एकदा यात काही तरी बदल केला पाहिजे.

निसर्गाच्या भरवशावर शेती करणारा शेतकरी अन्नदाता आहे. आज त्याची काय स्थिती आहे. त्याच्यासाठी शासन आणेवारीचे धोरण बदलत नाही. बाबा आदमच्या जमान्यापासून आणेवारीचे धोरण आहे. या धोरणाचा अभ्यास करण्यासाठी अनेक कमिट्या झाल्या. त्या कमिट्यांचे अहवाल आज धूळ खात पडले आहेत. आजही आणेवारीचे धोरण बदलले जात नाही. आपण आता पंचनामे केले आहेत. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले आहेत की, 50 टक्क्यांच्या आत पीक दाखवू नका. 50 टक्क्यांच्यावर पीक दाखवा. एवढी हुशारी केली की, 50 टक्यांच्या ऐवजी 51 टक्के पीक दाखवले. फक्त एकच टक्का वाढवला. आपण सर्व आकडेवारी मागवून घ्यावी. शेतकऱ्याला मदत देता येऊ नये म्हणून 51 टक्के आकडेवारी दाखविण्यात आली. कमीतकमी गावे या अतिवृष्टीमध्ये दाखविण्याचा प्रयत्न जिल्हाधिकाऱ्यांकडून झालेला आहे. 50 ऐवजी 51 टक्के लिहिण्यात आले आहे. या सर्व गोष्टी आपण कोणासाठी करत आहात ? शेतकऱ्यांसाठी.....? शेतकरी हा अन्नदाता आहे. आपला देश कृषि प्रधान आहे. या देशातील 70 टक्के जनता शेती करते आणि जगाला जगवते. त्या शेतकऱ्याशी शासन बदमाशी करत आहे. त्या शेतकऱ्याला मदत मिळू नये म्हणून 50 ऐवजी 51 टक्के लिहावे असे सांगण्यात येते. आपल्या अधिकाऱ्यांनी चुकीचे पंचनामे केले आहेत. माझा आरोप आहे की, जिल्हाधिकाऱ्यांनी पटवाऱ्यांच्या माध्यमातून जे पंचनामे केले ते चुकीचे केले. शेतकऱ्यांच्या घरामध्ये मदत जाता कामा नये यासाठी ही सर्व चलाखी करण्यात आली. हे सर्व आपण तपासून पाहणार आहात काय ? असे जे आकडे आपण जाहीर केले आहेत, त्याची आम्हाला शरम वाटते.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

आम्ही हेक्टरी 25 हजार रुपयांची मागणी केली असता शासनाने केवळ हेक्टरी 5 हजार रुपये जाहीर केले. येथे जनावरे नाही तर शेतकरी राहतात हे आपण पहिल्यांदा लक्षात घ्या. पश्चिम महाराष्ट्रात एक दुष्काळ पडल्या बरोबर मदत दिली जाते. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळासाठी निधी देऊ नका असे आम्हाला म्हणावयाचे नाही. महाराष्ट्रातील कृषीधन जगले पाहिजे ही आमची भावना आहे. कृषीधन जगल्याशिवाय शेती चांगली राहणार नाही त्यामुळे कृषीधन जगवले पाहिजे. कृषीधनासाठी 1800 कोटी रुपये नाही तर 2800 कोटी रुपये खर्च केले तरी चालतील परंतु कृषीधन जगले पाहिजे. पशुधनासाठी आमचा कधीही विरोध राहणार नाही. परंतु जेथे माणसे राहतात त्या ठिकाणी आपण केवळ 400 कोटी रुपये देता. आम्ही हेक्टरी 25 हजार रुपयांची मागणी केली होती परंतु शासनाने केवळ 5 हजार रुपये हेक्टरी दिले. परंतु हे 5 हजार रुपये तरी शेतकऱ्यांपर्यंत पोहचले का ?

विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी शासनाने शेतकऱ्यांना दिलेला 80 रुपयांचा चेक दाखविला आहे. या शासनाने पाच शेतकऱ्यांना अशाच प्रकारचे चेक दिलेले आहेत. एका शेतकऱ्याला 80 रुपयांचा चेक, दुसऱ्या शेतकऱ्याला 200 रुपयांचा चेक, तिसऱ्या शेतकऱ्याला 250 रुपयाचा चेक दिलेला आहे. हे शासन शेतकऱ्यांची आता थट्टा करावयास लागले आहे. एवढया कमी किमतीचे चेक आपण शेतकऱ्याला कशासाठी देता ? शेतकऱ्याच्या घरात जी मदत जाणार आहे ती मदत तुमचे अधिकारी अडवित आहेत. त्यामुळे झारीतील या शुक्राचार्यांचा पहिल्यांदा बंदोबस्त करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला आपल्याला खरोखरच मदत द्यावयाची असेल तर शेतकऱ्यांना पुरेशी मदत द्या. शेतकऱ्याला जगू द्या. जानेवारी महिन्यापासून आतापर्यंत 750 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सर्वात जास्त आत्महत्या महाराष्ट्रात होतात याची नोंद गीनेज बुकाने सुध्दा घेतलेली आहे. सर्व जगामध्ये सर्वात जास्त आत्महत्या करणारा भाग आता महाराष्ट्र झालेला आहे याची नोंद संपूर्ण जगाने घेतलेली आहे. आत्महत्येच्या संदर्भात या शासनाने चांगले रेकॉर्ड तोडले आहे. आत्महत्येच्या संदर्भात आपल्या राज्याचा क्रमांक कोणीही मोडू शकणार नाही. आपले सरकार आहे तोपर्यंत हे रेकॉर्ड कोणीही मोडू शकणार नाही.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, शेतकऱ्याने महागडे बियाणे पेरले होते. परंतु अतिवृष्टीमुळे ते वाहून गेले. आमच्याकडील ज्या शेतकऱ्यांची नदीच्या काठावर शेती आहे अशा शेतकऱ्याने सोयाबीनची कापणी करुन शेतामध्ये गंजी घातली. 100-100,150-150 क्विंटलच्या गंज्या एकदम आलेल्या पुरामुळे वाहून गेल्या. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनच्या गंज्या वाहून गेल्या अशा गंज्याचे पंचनामे आता कोण करणार आहे ? 65 मि.मी पेक्षा जास्त पाऊस झाला अशा शेतासाठी आपण 5 हजार रुपये हेक्टरी नुकसान भरपाई देणार आहात. परंतु ज्याच्या शेतातील सोयाबीन वाहून गेले त्याचा पंचनामा आपण कसे करणार आहात ? शेतकऱ्यांच्या गंजीचे केवळ पंचनामे करुन चालणार नाही तर यासंदर्भात डिटेल सर्व्हे होण्याची आवश्यकता आहे. शासनाने शेतकऱ्यांना मदत देण्यात विलंब केलेला आहे. त्यामुळे पंचनामे करण्याच्या संदर्भात शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना फेर पंचनामे करण्याच्या संदर्भात आदेश दिले पाहिजेत. ज्या शेतकऱ्याची शेती नदीच्या काठावर आहे अशा शेतकऱ्यांच्या सोयाबीनचे फेर पंचनामे झाले पाहिजेत. विदर्भातील शेतकऱ्यांचे पहिले पीक गेल्यानंतर त्याने हिंमतीने पुन्हा पेरणी केल्यानंतर ऑक्टोबरमध्ये पुन्हा अतिवृष्टी झाली व या अतिवृष्टीत सर्व पिकाचे नुकसान झाले.

सभापती महोदय, मी नागपूर अधिवेशनात येण्यापूर्वीही आमच्या भागात पाऊस झाला. आता पाऊस कधी पडेल हे सांगता येत नाही. आम्ही कापसाच्या भागात राहणारे आमदार आहोत आणि तुम्ही ऊसाच्या भागात राहणारे आमदार आहात. विदर्भातील शेतकरी कापसाचे पीक कोरडवाहू शेतीमध्ये घेत असतो. बीटी बियाण्यामुळे कापसाचे उत्पन्न थोडे जास्त येते. यावेळेस कापूस चांगला होईल असे वाटत असतांनाच आता लाल्या नावाचा रोग कपाशीवर पडल्यामुळे संपूर्ण कपाशीच्या पिकाचे नुकसान झाले आहे. सोयाबीनचे पीक अतिवृष्टीमुळे गेले आणि आता कापसाचे पीक लाल्या रोगामुळे गेले आहे. शेतकऱ्यांच्या घरात आता केवळ क्विंटल दीड क्विंटल कापूस आहे. राज्यात आणि केंद्रात एकाच पक्षाचे सरकार आहे. या शासनाने कृषी मूल्य आयोगाकडे कापसासाठी 6000 क्विंटलची मागणी केली होती. परंतु या शासनाने आता कपाशीसाठी 3800 रुपये क्विंटल हमीभाव जाहीर केलेला आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

कापसाला 3800 रुपयांचा हमीभाव जाहीर करुन कापसाची 100 केंद्र सुरु केली. मी एम.डी.ना विचारले की, आतापर्यंत किती केंद्रावर कापूस आला. त्यांनी मला सांगितले की, आतापर्यंत कापसाचा एकही बोंड आलेला नाही. मी त्याला याचे कारण विचारले असता त्यांनी मला सांगितले की, आपण पणन महासंघाचे अध्यक्ष होता, आपणास कारण माहीत आहे. सरकारने कापसाला 3800 रुपयांचा हमीभाव दिलेला आहे आणि व्यापारी कापसाला 4200 रुपये भाव देत आहे. तेव्हा सरकारच्या पणन महासंघाला शेतकरी कापूस देत नाही.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रामध्ये ऊसाला 2600 भाव मिळाला पाहिजे म्हणून आंदोलन पेटते. आमचा विदर्भातील शेतकरी तितका पॉवरफुल नाही. विदर्भातील शेतकरी गलितगात्र झालेला आहे. त्याची परिस्थिती आत्महत्यापर्यंत गेली आहे. तो ताकदीने आंदोलन करु शकत नाही म्हणून आपण त्याची थट्टा करणार आहात काय ? एक दबाब टाकला की ऊसाचा भाव वाढतो. त्यांना सात-सात हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले जाते. मी आजच्या वर्तमानपत्रात बातमी वाचली की, देशातील उद्योगपतींचे 1 लाख आणि काही हजार रुपयांचे कर्ज माफ करण्यात आले. शेतकऱ्यांचे कर्जमाफ करा असे आम्ही म्हणणार नाही. परंतु किमान उत्पादन खर्चावर आधारित भाव जाहीर करावा आणि तो आपण कधी करणार आहात ? शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव द्यावा अशी मागणी आम्ही गेली 25 वर्षे करीत आहोत. शेतकऱ्यांची एवढीच मागणी आहे की, त्यांना उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा. कारखान्यात निर्माण होणाऱ्या मालाची किंमत उत्पादन खर्चावर ठरत असेल तर शेती सुध्दा एक कारखाना आहे. तेव्हा शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित हमीभाव दिला पाहिजे तरच शेतकरी जिवंत राहील अन्यथा तो जिवंत राहणार नाही.

सभापती महोदय, आज कापूस, सोयाबीन आणि संत्रा उत्पादक शेतकरी उदध्वस्त झाला आहे. चंद्रपूर, गडचिरोली या भागातील धान उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. आपण त्यांना जगविण्यासाठी कोणत्या प्रकारची मदत केली ? माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, या शेतकऱ्यांना 400 कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली. माझा आपणास प्रश्न आहे की, यातील किती मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली ते आपण सांगावे. कोणकोणत्या जिल्ह्यात किती रुपयांची मदत दिली ते माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय,ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांच्या भाषणात एका शेतकऱ्याचे उदाहरण दिले. शासनाने तहसीलदाराकडे मदत पाठविली. तहसीलदाराने ते पैसे बँकेत ठेवले. परंतु बँकेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मागील कर्जाची रक्कम त्यातून वजा करुन घेतली आणि त्यांना एक पैसा देखील दिलेला नाही. या संदर्भातील माहिती मी उद्या आपणास सकाळी देतो. ज्या लीड बँकेत ही मदत पाठविली त्या बँकेने ते पैसे 10-20 दिवस स्वत: वापरले. लीड बँकेने ते पैसे इतर बँकेत पाठविले नाहीत. आपण बँकांना गावे दत्तक दिलेली आहेत. जिल्हाधिकाऱ्यांना जे पैसे देण्यात येतात ते पैसे लीड बँकेत पाठविले जातात. आमच्याकडे सेंट्रल बँक ही लीड बँक आहे. त्या लीड बँकेत पैसे जमा झाले. परंतु सेंट्रल बँकेने ते पैसे इतर बँकेत न पाठविल्यामुळे शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले नाहीत. त्या बँकेने 25 दिवस ते पैसे वापरले. तेव्हा आपण याची चौकशी करणार आहात काय ? 25 दिवस पैसे वापरले त्याचे व्याज कोण देणार आहे ? शेतकऱ्यांपर्यंत ते पैसे का पोहोचले नाहीत ? या प्रश्नांची उत्तरे आम्हाला मिळाली पाहिजेत. शासनाने केलेली मदत शेतकऱ्यांपर्यंत थेट पोहोचत नाही.तेव्हा शेतकऱ्यांना मदत करण्याच्या पध्दतीमध्ये बदल केला पाहिजे. ज्या बँकामध्ये रक्कम पाठविली जाते ती बँक शेतकऱ्यांच्या मागील कर्जाची रक्कम कापून घेते. त्यामुळे शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचत नाही त्यामुळे तो अडचणीत येतो. तो रब्बी पीकसुध्दा घेऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील आणि कोकणातील अतिवृष्टीची सविस्तर माहिती येथे दिलेली आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 17:45

श्री.पांडुरंग फुंडकर.....

महोदय, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आज एक प्रस्ताव मांडला. त्या प्रस्तावामध्ये विदर्भातील सिंचनाच्या अनुशेषाचा मुद्दा होता. शिवाय एम.एस.ई.बी.शी संबंधित एक-दोन मुद्दे सुध्दा त्यामध्ये होते. या बरोबरच त्या प्रस्तावाच्या विषयामध्ये ट्रान्सफॉर्मर आणि विजेच्या कनेक्शनचा सुध्दा मुद्दा समाविष्ट होता. परंतु आम्ही त्या बाबतीत बोलावयास गेलो तर युतीच्या काळात विजेचे एकही कनेक्शन दिले नाही असे सांगितले जाते. वास्तविक पाहता त्यांनी माहिती घेऊन बोलावयास पाहिजे होते. मुळात आज हे दोन्ही प्रस्ताव चर्चेसाठी यावयास नको होते. एकाच दिवशी दोन प्रस्ताव आणण्यामध्ये सरकारचा काय डाव आहे हे माहीत नाही. आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये या बाबतचा उल्लेख नाही. आमच्या प्रस्तावामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकरी उद्ध्वस्त झाल्याबाबतचा उल्लेख आहे.

महोदय, हे खरे आहे की, अतिवृष्टीमुळे राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. त्याचे पहिले पीक गेल्यामुळे तो रब्बीचे पीक घ्यावयास गेला. त्याच्या शेतामध्ये, विहिरीमध्ये, नदीमध्ये, तलावामध्ये पुरेसे पाणी असल्यामुळे त्याने हरभरा, गहू, सूर्यफूल, भुईमूग इत्यादी बियाणे पेरली. तो शेतीला पाणी देण्यासाठी पंप सुरु करण्यासाठी गेल्यानंतर तीन मिनिटांत त्याची मोटार बंद होते. अगोदरच्या प्रस्तावावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, विदर्भात अनेक ठिकाणी 100 हॉर्स पॉवर ऐवजी 60 हॉर्स पॉवरचे ट्रान्सफॉर्मर दिले. एका ट्रान्सफॉर्मरची कॅपॅसिटी 25 कनेक्शनची असताना त्या ट्रॉन्सफॉर्मरवर 50 कनेक्शन दिले. एवढेच नव्हे तर एकाच ट्रान्सफॉर्मरवर सर्व गावातील कनेक्शन दिले गेले. शेतकऱ्यांनी आपली मोटार सुरु केल्यानंतर ती तीन मिनिटांच्या वर त्याची मोटार चालत नाही. शेतकरी ट्रान्सफॉर्मर बदलून देण्याबाबत विनंती करण्यासाठी एम.एस.ई.बी.च्या कार्यालयात गेला तर तेथील कार्यकारी अभियंता त्याचे ऐकून घेण्यास तयार नसतो. ते सांगतात की, आम्हाला ट्रान्सफॉर्मर खरेदी करण्याचे अधिकार नाहीत. कधी असे सांगितले जाते की, ट्रान्सफॉर्मर हवा असल्यास बैलगाडी किंवा ट्रॅक्टर घेऊन ये. शेतकरी ट्रान्सफॉर्मर आणण्यासाठी बैलगाडी किंवा ट्रॅक्टर घेऊन जातो आणि स्वत: ट्रान्सफॉर्मर घेऊन येतो. एवढेच नव्हे तर विजेचे खांब सुध्दा तो घेऊन येतो. सर्व साहित्य गावात आल्यानंतर एम.एस.ई.बी. कार्यालयातील कर्मचारी येतो व फिटींग करुन जातो. परंतु ट्रान्सफॉर्मर व इतर साहित्याच्या वाहतुकीचा सर्व खर्च विजेच्या देयकात लावला जातो. अशी आज स्थिती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ D/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 17:45

श्री.पांडुरंग फुंडकर.....

महोदय, मी अकोला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनिमित्त अकोला येथे गेलो होतो. तेथे एक शेतकरी मला भेटला. त्याने सांगितले की, माझी 3 हॉर्स पॉवरची मोटार सहा महिन्यापासून बंद असताना मला 40 हजार रुपये बिल आले आहे. महोदय, त्या शेतकऱ्याने मला विजेचे देयक दाखविले. मी तर म्हणेन की, या सरकारकडून शेतकऱ्यांची एकप्रकारे लूट सुरु आहे. मुळात शेतकऱ्यांच्या शरीरात रक्त नसताना या सरकारकडून त्याची लूट केली जात आहे. जुने देयक भरल्याशिवाय नवीन कनेक्शन मिळणार नाही असे त्याला सांगितले जात आहे. सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या शेतकऱ्याकडे 3 हॉर्स पॉवरची मोटार असताना त्याला 5 हॉर्स पॉवरच्या मोटारीचे बिल आकारले गेले.

महोदय, आता एम.एस.ई.बी. कडून विजेच्या देयकात 10 टक्के अतिरिक्त आकार लावला जात आहे. आपल्या राज्यातील वीज संपल्यामुळे बाहेरच्या राज्यातून वीज आणण्यासाठी जास्त रक्कम द्यावी लागत असल्यामुळे त्याची भरपाई करण्यासाठी हा अतिरिक्त आकार लावला जात आहे. विजेची चोरी होते म्हणून जे ग्राहक नियमितपणे बिल भरतात त्यांच्यावर देखील हा आकार लावला जात आहे. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारतो की, हा 10 टक्के अतिरिक्त आकार कशासाठी लावला जात आहे ?

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी मांडलेल्या प्रस्तावावर मी उद्या केवळ ट्रॉन्सफॉर्मरच्या बाबतीत बोलणार आहे. महोदय, एका गावातील शेतकऱ्याने आपल्या शेतात गहू पेरलेला आहे. त्याच्या गावामध्ये 100 हॉर्स पॉवरच्या ट्रान्सफॉर्मरऐवजी केवळ 60 हॉर्स पॉवरचे ट्रॉन्सफॉर्मर पाठविले. पहिले ट्रान्सफॉर्मर जळालेले निघाल्यामुळे ते परत करण्यात आले. त्या गावात दुसरे ट्रान्सफॉर्मर पाठविण्यात आले आणि ते सुध्दा जळालेले निघाले. त्यांनी ते परत केले. तिसऱ्यांदा जेव्हा ट्रान्सफॉर्मर पाठविण्यात आले तेव्हा सुध्दा ते जळालेलेच निघाले. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम, पश्चिम महाराष्ट्रातील जळालेले सर्व ट्रान्सफॉर्मर आमच्या विदर्भात पाठविले आणि आमच्या विदर्भाचे चांगले ट्रान्सफॉर्मर पश्चिम महाराष्ट्रात तर नेले नाहीत ना, अशी शंका आम्हाला येते. मी पुन्हा एकदा निदर्शनास आणून देतो की, विदर्भाला सदोष ट्रान्सफॉमर पुरविले जातात. मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, विदर्भातील जनता सावत्र आईची लेकरे आहेत काय ?

नंतर श्री.कांबळे....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

महाराष्ट्रात सामील होताना लेखी करार करण्यात आले आहेत. आपण कधी तरी त्या कराराची जाणीव ठेवा. प्रत्येक वाईट गोष्ट विदर्भाच्या, मराठवाड्याच्या वाट्याला येते, हे बरोबर नाही. तुम्हाला वाटेल तसा आनंदी आनंद करा. आपण येथे अधिवेशनासाठी 10 दिवस येता. किमान एक महिना तरी येथील अधिवेशन चालवा. विदर्भातील प्रश्न येथेच सुटले पाहिजेत, अशा पध्दतीने अधिवेशन भरवा. नागपूरात 6 आठवडे अधिवेशन चालविण्याचा नागपूर करार आहे. पण नागपूरात अधिवेशन 6 आठवडे कधीच चालले नाही. आपण अधिवेशनाचा कालावधी कमी करत आता 2 आठवड्यांवर आणला आहे. मला भीती वाटते की, काही दिवसांनी अधिवेशनाचा कालावधी एक आठवड्यावर येईल. फक्त 1 आठवडा अधिवेशन चालवा, मजा करा, इकडे फिरा अणि निघून जा. विदर्भातील लोकांच्या तोंडाला पाने पुसा. मी सांगतो, आपण हे बंद करा. अधिवेशन भरविण्याच्या कराराला हरताळ फासायचा, विदर्भातील लोकांच्या तोंडाला पाने पुसायची, त्यांचा विश्वासघात करायचा, हे बंद झाले पाहिजे. येथे येऊन गंमत करायची आणि निघून जायचे, हे धंदे बंद करा. आपण विदर्भासाठी ठोस निर्णय घेणार का ?

सभापती महोदय, आमच्या येथे 25 वर्षांनंतर अतिवृष्टी झाली आहे. आम्ही त्यासाठी नुकसानभरपाई मागत आहोत. विदर्भात 25 वर्षांत इतका पाऊस पडला नाही, इतके नुकसान झाले नाही. 25 वर्षांनी नुकसान झालेला शेतकरी हेक्टरी 25 हजार रूपये मागणार असेल तर देण्यास काय हरकत आहे ? आमच्या सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितलेल्या हिशेबाप्रमाणे 6 हजार कोटी रूपये द्या. त्यामध्ये नुसते शेतकऱ्यांचे पैसे नाहीत. काही नागरिकांची घरे देखील पडली आहेत, सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले आहे. आमच्या विदर्भातील रस्ते पावसाने खराब झाले आहेत, आपण ते पहा. आपण हवाईमार्गे येता, त्यामुळे आपल्याला हे समजत नाही. आपण एकदा रोडने जा, मग समजेल. माझे तर असे म्हणणे आहे की, संपूर्ण मंत्रिमंडळातील माननीय मंत्र्यांना विदर्भातील रस्त्यांवरून फिरवत मुंबईला न्या. मग या पावसाळ्यात विदर्भातील किती रस्ते खराब झाले आहेत, याची जाणीव तुम्हाला होईल. मला वाटते की, तुम्हाला रस्त्यावरून चालण्याची सवयच राहिलेली नाही. आम्ही रस्त्यांवरून चालणारे लोक आहोत. विदर्भातील रस्त्यांची नासधूस

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

झाली आहे. 1 हजार कोटी रूपये सुध्दा कमी पडतील, अशी रस्त्यांची अवस्था आहे. विदर्भात पावसाने खराब झालेले रस्ते, एमएसईबीचे नुकसान यासाठी सुध्दा पैशांची गरज भासणार आहे. आपण पॅकेजमध्ये यासाठी पैसे दिले नाहीत तर शेतकऱ्यांचे रब्बीचे पीक येऊ शकणार नाही. त्यामुळे आपण 6 हजार कोटी रूपयांचे पॅकेज उद्या जाहीर केले पाहिजे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे आपण पॅकेज द्यावे तरच आपण इमानदारीने या विदर्भातील लोकांसाठी आला, त्यांच्यासाठी खरच काही तरी केले, असे लोक बोलतील. आता कोणीतरी सन्माननीय सदस्य म्हणाले की, माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम, एकदा आपण नाव करून जा. माननीय मंत्री महोदय आपण असे काही तरी करा की, लोक म्हणतील, एक माननीय मंत्री आले आणि त्यांनी बोलल्याप्रमाणे केले. विदर्भातील जनतेच्या पदरात भरघोस माप टाकले, त्यांना नुकसानभरपाई दिली. आपण एकदा हा निर्णय करूनच जा, अशी मी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र जैन (भंडारा-गोंदिया स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म.वि.प. नियम 97 अन्वये मांडलेल्या अल्पकालीन चर्चेवर बोलण्यासाठी मी उभा आहे. विदर्भात यावर्षी अतिवृष्टी झाली. त्यामध्ये शेतकऱ्यांचे फार नुकसान झाले. अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या नुकसानाच्या संदर्भात सांगितले. गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या धान उत्पादक जिल्ह्यांतील शेतकरी संकटात आले आहेत.

( नंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र जैन....

ज्या शेतकऱ्यांचे 50 टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे त्यांना हेक्टरी 7500 रुपयांची मदत दिली जाणार आहे. परंतु त्यांच्यापर्यंत मदत पोहोचली आहे काय ? जिल्हाधिकाऱ्यांकडे पैसे पोहोचले आहेत काय त्याची कोणतीही माहिती आमच्याकडे नाही. आम्ही मतदार संघात गेल्यानंतर लोक आम्हाला असे विचारतात की, आम्हाला मदतीचे पैसे कधी मिळणार आहेत ? महसूल विभागामार्फत सर्व्हे झाला आहे. त्या ठिकाणी खमारी नावाचे गाव आहे. एकाच गावातील 50 टक्के शेतकऱ्यांचे 50 टक्क्यांच्यावर व 50 टक्के शेतकऱ्यांचे 50 टक्क्यांपेक्षा कमी नुकसान झाल्याचे नमूद केलेले आहे. एकाच गावात पाऊस कमी अधिक प्रमाणात पडला आहे का ? एकाच्या शेतात जास्त पडला, दुसऱ्याच्या शेतात कमी पडला असे झाले आहे काय ? मी मुद्दाम खमारी गावाचे हे उदाहरण सांगितले आहे. सभापती महोदय, मी मराठी भाषेऐवजी हिंदी भाषेतून माझे विचार व्यक्त करावेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. हिंदी भाषेतून मी अधिक चांगल्या प्रकारे विचार मांडू शकतो. त्यामुळे मी आपल्या परवानगीने हिंदी भाषेतून माझे विचार व्यक्त करीत आहे.

सभापति महोदय, जब हम खमारी गांव के दौरे पर गए तो खमारी गांव के किसानों ने हमें घेर लिया. उन्होंने हमसे कहा कि इस खेत में 50 प्रतिशत से ज्यादा नुकसान और इस खेत में 50 प्रतिशत से कम नुकसान हुआ है. तो क्या जब नैसर्गिक विपत्ति आयी, भगवान का प्रकोप हुआ तो क्या आदमी को देखकर यह हुआ ? पटवारी या जिलाधिकारी ने किस तरह से सर्वे किया, इस पर क्या शासन ध्यान देगा ? सब से बड़ी बात यह है कि धान उत्पादक किसानों को 1310 और 1340 रुपये आधारभूत कीमत केंद्र सरकार ने मुकर्रर की है, वह कम है. अच्छी बात यह है कि हमारे बाजू के राज्य में 250 रुपये प्रति क्विंटल का बोनस और 150 रुपये प्रति क्विंटल का बोनस वहां की राज्य सरकार दे रही है. वहां पर दो-दो और ढ़ाई-ढ़ाई करोड़ क्विंटल धान की खरीदी हुई और हमारे यहां धान की खरीदी बिल्कुल नहीं हो रही है. यदि नुकसान का अंदाजा लगाना है, नुकसान कितना हुआ, अभी भी धान की जो आणेवारी दिखायी जा रही है वह धान की आणेवारी कहीं पर 53 प्रतिशत तो कहीं पर 54 प्रतिशत तो कहीं पर 60 प्रतिशत दिखायी जा रही है. पिछले साल धान खरीदी केंद्र पर जो धान की खरीदी हुई और इस साल जो धान की

....2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेंद्र जैन.....

खरीदी हुई इसके आंकडे सरकार देखेगी तो पता चलेगा कि किसानों का कितना नुकसान हुआ. इसकी जानकारी आप ले सकते है. पड़ोसी राज्य धान उत्पादक किसानों को मदद कर सकते है. पड़ोस के राज्य की इच्छा धान उत्पादक किसानों को मदद करने की है. पूरे राज्य में विदर्भ ऐसा प्रदेश है जहां धान का उत्पादन बडे पैमाने पर होता है. रायगड में भी कुछ मात्रा में धान उत्पादक किसान है. क्या राज्य सरकार यहां के किसानों को बोनस देने के बारे में सोच नहीं सकती ? जो सरकार राज्य के किसानों के हित में बात करने की सोचती है, इस नागपुर के सत्र में सरकार ने यदि निर्णय लिया और धान उत्पादक किसानों को सही मात्रा में मदद की तो नागपुर में जो विधानसभा का अधिवेशन होता है, वह सही मायने में होता है इस बात को माना जाएगा.

सभापति महोदय, सड़क और पुलों के बारे में सभी ने अपनी बात कही है. मंत्री महोदय से मेरा अनुरोध है कि आप मुझसे आँकड़े मत लीजिए. किसी सदस्य से आँकड़े मत लीजिए. मैं गोंदिया और भंडारा जिलों के आंकड़े बता सकता हूं. बाकी के आँकड़े मेरे पास उपलब्ध नहीं है. स्टेट ट्रान्सपोर्ट की जो बसे चलती हैं, उस बस डेपो के मॅनेजर से आप आँकड़े लीजिए. रास्ते बह गए, रास्ते खराब हो गए, पूल टूट गए तो कितनी बसों ने चलना बंद कर दिया, कितनी जगह पर बस जाना बंद हो गयी, इसके आँकडे आप लीजिए, उससे आपको जानकारी मिलेगी. विदर्भ में कितना बड़ा नुकसान हुआ है, रास्ते बह गए, पूल बह गए. शासन ने बड़े जोर-शोर से मदद की घोषणा की कि 25-25 करोड़ रुपये हर जिले को दे दिए गए. ये 25 करोड़ रुपये कहां पर खर्च होंगे ? जो रास्ते स्टेट पीडब्ल्यूडी के है वहां पर खर्च होंगे. जिला परिषद के अंतर्गत जो ग्रामीण रास्ते है उनके लिए कहां से पैसा आएगा ? उनको कहां से निधि उपलब्ध होगी ? उनके दुरुस्ती का काम कैसे होगा, इस ओर ध्यान देने की जरुरत है. क्योंकि ये मेरे आँकड़े नहीं है. स्टेट ट्रान्सपोर्ट की गाड़ियाँ बंद हो जाएगी, राज्य परिवहन की गाड़ियाँ बंद हो जाएगी तो गरीब लोगों को आवागमन के लिए असुविधा होगी.

.......इसके बाद श्री शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 6.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांच्या नंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री. विनायक राऊत हे भाषण करतील. या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मंत्री महोदय उद्या उत्तर देतील. सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री राजेन्द्र जैन : सभापति महोदय, भविष्य में होने वाले राज्य के मुख्यमंत्री आदरणीय श्री पतंगराव कदम जी से मेरा अनुरोध है कि आप स्टेट ट्रांसपोर्ट डिपार्टमेंट के आंकड़ों को देखिए. शासन के अंतर्गत यह डिपार्टमेंट काम करता है. इस डिपार्टमेंट से आप जानकारी लीजिए कि विदर्भ में कितनी बसें बंद हो गईं, कितनी बसें रास्ते खराब होने की वजह से बंद हो गईं ? आपको इस बात का ख्याल रखने की आवश्यकता है.

अध्यक्ष महोदय, हमारे गोंदिया, भंडारा और चंद्रपुर जिले में मच्छीमारी करने वाला एक समाज है, मच्छी का व्यवसाय करने वाला एक समाज है. इस व्यवसाय से इन लोगों के परिवार की रोजी-रोटी चलती है. बहुत सारे लोग मच्छीमारी का काम करते हैं. इस बार इतना ज्यादा पानी आया कि तालाब बह गये. इनके बीज बह गये. हम लोग जब शासन के पास निवेदन लेकर गये, शासन से बात करने के लिए गये एवं हमने शासन से विनती की तो पता चला कि शासन के पास 1976 का जी.आर. है. 1976 में मछली पकड़ने का जाल 25-30 रुपये में आता था परन्तु अब 2013 में इसकी कीमत कितनी हो गई, इस बात को ध्यान में रखने की जरुरत है. इन लोगों की मदद करने के लिए 1976 के जी.आर. की बात की जाती है. 37 साल में यह सरकार 1976 का जी.आर. परिवर्तित नहीं कर पायी. पिछले 37 सालों में मच्छीमार समाज कितना बढ़ा है और इस समाज के कितने परिवार मच्छीमारी पर अपना जीवनयापन करते हैं, इसके बारे में सरकार को गौर करना चाहिए. मेरा इस विरोधी पक्ष के प्रस्ताव के माध्यम से सरकार से अनुरोध है कि 1976 का जो जी.आर. है, उसको बदलकर 2012-2013 की जो सही कीमत है उसके हिसाब से इस नुकसान का आंकलन किया जाए एवं इस हिसाब से ही इन लोगों को मदद दी जाए. ये गरीब लोग हैं. इन लोगों का सारा जीवन इसी व्यवसाय पर चलता है. अतिवृष्टि की वजह से बहुत सारे तालाबों का नुकसान हुआ है. बीज बहने की वजह से उनका नुकसान हुआ है. इस पर

-2-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन......

सरकार को ध्यान देने की जरुरत है. अध्यक्ष महोदय, विदर्भ के संदर्भ में कई सम्माननीय सदस्यों ने अपने मुद्दे रखे हैं और मैंने भी अपनी बात आपके माध्यम से सरकार के पास पहुंचाने की कोशिश की है.

अध्यक्ष महोदय, अभी रबी की फसल लगाने का समय आ गया है. धान उत्पादक किसान अभी रबी की फसल लगायेंगे. माननीय श्री फुंडकर साहब ने विद्युत पुरवठा एवं विद्युत बिल के बारे में बताया है. श्री फुंडकर साहब ने कहा कि वे विद्युत बिल दिखा सकते हैं. मैं माननीय श्री पतंगराव कदम जी से कहना चाहूंगा कि मैं ऐसे 25 बिल दिखा सकता हूं कि जिनके पास 2 एकड़ खेती है और 2 हॉर्स पॉवर के पंप हैं लेकिन उनके 35 से 40 हजार रुपये के बिजली के बिल आ रहे हैं. आज जन प्रतिनिधि के पास कोई ताकत नहीं है. अगर कोई जन प्रतिनिधि महाराष्ट्र के बिजली विभाग के किसी अधिकारी को फोन करता है तो उसको कहा जाता है कि यह अधिकार अब उनके पास नहीं है. मुंबई में जो बड़े अधिकारी हैं आप उनसे बात कीजिए. वे आपको इस बारे में बतायेंगे. ऐसी परिस्थिति 2 एकड़ खेती वाले किसान की है. उसकी बिजली खंडित हो गई है. खरीफ की फसल का उसको नुकसान हो गया है. अब वह रबी की फसल कैसे लगायेगा ? खरीफ की फसल में किसानों का बहुत नुकसान हो गया. उनका सब कुछ बह गया है, उनको कोई मदद नहीं मिल रही है. आज ये लोग बहुत परेशानी में है. आज किसान की हालत बहुत खराब है. अब धान उत्पादक किसान भी बड़े पैमाने पर आत्महत्या कर रहे हैं. रोज कोई न कोई किस्सा हमारे गोंदिया, भंडारा और चंद्रपुर में हो रहा है. अब अगर रबी की फसल के लिए किसान को आगे बढ़ना है तो वह आगे कैसे बढ़ेगा ? उसका बिजली का कनेक्शन काट दिया जाता है. उसको बिजली के कनेक्शन के लिए 40 हजार रुपये भरने पड़ेंगे. जो आदमी सरकार की 2 हजार रुपये की मदद के लिए पिछले 4-5 महीने से जन प्रतिनिधियों के चक्कर लगा रहा है, जिलाधिकारी कार्यालय के चक्कर लगा रहा है, तहसील कार्यालय के चक्कर लगा रहा है, वह आदमी 40 हजार रुपये का बिल कैसे भरेगा ? वह 40 हजार रुपये कहां से लायेगा ? जिन लोगों के पास एक एकड़ की खेती है और वह ग्रामीण क्षेत्र एवं नक्सलग्रस्त क्षेत्र में है, अगर वह एक एकड़ खेती भी बेच देगा तो भी वह बिजली का बिल चुका नहीं सकता है.

-3-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री राजेन्द्र जैन......

इस तरह की व्यवस्था, इस तरह की परिस्थिति और इस तरह की स्थिति से विदर्भ का किसान गुजर रहा है. पश्चिम महाराष्ट्र के गन्ना उत्पादक किसानों के साथ क्या हो रहा है वह सभी लोगों ने बताया है. पश्चिम महाराष्ट्र पर सरकार का ज्यादा ध्यान है. मेरा मानना यह है कि विदर्भ के इस शीत सत्र में हम लोगों ने जो बातें कही हैं उसको देखते हुए सरकार किसानों के हित में जरुर निर्णय लेगी. इतना कहते हुए मैं अपनी बात यहीं समाप्त करता हूं. अध्यक्ष महोदय, आपने मुझे बोलने का मौका दिया उसके लिए मैं आपको धन्यवाद देता हूं.

---------

....यानंतर श्री गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,ज्यावेळी हिवाळी अधिवेशन होते त्यावेळी विदर्भातील प्रश्न नेहमीच मांडले जातात. परंतु विदर्भाला शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत दिली जात नाही. माननीय मंत्री महोदय हे पश्चिम महाराष्ट्रातील दणकट नेतृत्व आहे. आपण या विदर्भाला काही तरी देऊन जावे. विदर्भातील जनता आपल्याकडे मोठया अपेक्षेने बघते आहे. आम्हाला काही तरी मदत मिळेल, आमच्या पदरात काही तरी पडेल अशा भाबडया अपेक्षने विदर्भातील जनता आपल्याकडे पहात आहे. परंतु विदर्भ आणि कोकण विभागाच्या बाबतीत शासनाकडून नेहमीच अन्याच होत आलेला आहे. विदर्भ् आणि कोकणातील सिंचनाचा अनुशेष कधीच भरला जात नाही. या विभागातील लोकांच्या पदरात काहीच पडत नाही. कोकणात आंब्यावर खार पडली तर आंबा उत्पादकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. 7/12 उताऱ्यावर 15 नावे आहेत, तर त्यातील कोणकोणाला आर्थिक मदत देणार अशी वेगवेगळी कारणे सांगून कोकणाला देखील डावलले जाते.

महोदय, मी आपल्यासमोर आकडेवारी ठेवून मी माझे भाषण थोडक्यात संपविणार आहे. राज्यात अतिवृष्टीमुळे 365 मृत्यू झाले. त्यातील विदर्भात 150 मृत्यू झाले आहेत. 1989 जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. विदर्भात त्यातील 943 जनावरे मृत्युमुखी पडली आहेत. राज्यभरात 1.47 लाख घरे या अतिवृष्टीने नुकसानग्रस्त झाली. विदर्भात त्यातील 2338 घरे कोसळली आहेत, 63 हजार 37 लोक बेघर झाले आणि 48052 घरांचे नुकसान झाले. आपण राज्यातील आणि विदर्भातील आकडेवारी बघितली तर या अतिवृष्टीमुळे विदर्भात सगळयात जास्त नुकसान झाले आहे. तसेच 12402 हेक्टर जमीन या अतिवृष्टीमुळे खरडून गेली. 1420 हेक्टर जमीन वाहून गेली. 7944 कि.मी.रस्ते डॅमेज झाले.

महोदय, 1078 पुलांना या अतिवृष्टीचा फटका बसलेला आहे. 294 सिंचन प्रकल्पांना फटका बसलेला आहे. या अतिवृष्टीमुळे विदर्भात काय शिल्लक राहिले आहे? सप्टेंबर आणि ऑक्टोबर या महिन्यांमध्ये विदर्भात पाऊस पडला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय आणि आम्ही अधिवेशनात एक दिवस सुटी घेऊन या भागाची पाहणी करण्यासाठी आलो होतो. दूरदर्शनच्या अनेक वाहिन्यांवर आपण पाहिले असेल की, माननीय मुख्यमंत्री अतिवृष्टी झालेल्या विभागाची पाहणी करीत आहेत. आपणही पाहणी करीत होतात, माननीय श्री.अजित पवार हे देखील पाहणीच्या वेळी उपस्थित होते. विदर्भाच्या नुकसानग्रस्त लोकांच्या हाती काहीही पडले नाही, त्या

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

शेतकऱ्यांच्या हातात खुळखुळा पडला. शासनाने असे का केले याचा खुलासा झाला पाहिजे. आपण नुकसानग्रस्त भागासाठी किती मदत जाहीर केली होती, प्रत्यक्षात किती मदत देण्यात आली याची देखील माहिती सभागृहाला देण्यात यावी.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने या ठिकाणी वाचून दाखवितो. महाराष्ट्र टाईम्समध्ये बातमी छापण्यात आलेली आहे. ती बातमी आपणही कदाचित वाचलेली असेल. भंडारा जिल्हयातील दाभा गावाजवळ सूर नदी वाहत असल्यामुळे या गावातील भूभाग तसा संपन्न आहे.परंतु वाटणीत जमिनीचे लहान लहान तुकडे आले. श्री.राजु वैरागडे नावाचा एक गावकरी आहे. ते 1 आर जमिनीचे मालक आहेत. ते या तुकडयात कुटुंबासाठी तांदूळ पिकवितात. यंदाच्या अतिवृष्टीने भाताच्या पिकाचे नुकसान झाले. त्यांना मदत देण्यासाठी सरकार त्यांच्याकडे धाऊन गेले. नुकसानीचा पंचनामा करण्यात आला. श्री.वैरागडे यांना फक्त 75 रुपयांच्या नुकसान भरपाईचा चेक काढण्यात आला आहे. त्याचे नुकसान झाले असताना त्यांना तुमचा 75 रुपयाचा चेक घेण्यास तुमच्याकडे यावे हे बरोबर नाही. अशा गोष्टी कोठे तरी थांबल्या पाहिजेत. आपले जिल्हाधिकारी, तहसीलदार, तलाठी नुकसानीचे सर्वेक्षण करतात. त्या सर्वेक्षणात काहीही दम नसतो. ते फक्त कागदावर सर्वेक्षण करतात. ज्याची मजल मोठी त्याला जास्त मदत दिली जाते. जो गरीब शेतकरी आहे, त्याला मात्र कमी प्रमाणात मदत दिली जाते. यात अनेक गोष्टी सांगण्या सारख्या आहेत.

महोदय, महाराष्ट्र टाईम्सने खूपच चांगल्या बातम्या आज छापलेल्या आहेत. 43 लोक मृत्युमुखी पडले आहेत. त्यातील काही मृत्युमुखीचे पोस्टमार्टेम केले गेले नव्हते म्हणून मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत नाकारली गेली. माणूस मेला त्याचे काही नाही. पहिले पोस्टमार्टेम करा, त्यानंतर आर्थिक मदत घ्यावी अशा प्रकारचा आपल्या सरकारचा कायदा आहे. सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र जैन यांनी सांगितले की, मच्छीमारांच्या बाबतीत 1976 च्या कायद्याचा वापर केला जात आहे. मच्छीमारांची जाळी तुटली तर त्यांना जुन्या कायद्याप्रमाणेच पैसे दिले जातात. त्यामुळे या कायद्यात काही सुधारणा केल्या गेल्या पाहिजेत असे मत सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केले आहे.

3...



ABG/ D/ MMP/ प्रथम श्री.शिगम 18:05

डॉ.दीपक सावंत...

महोदय, आज एका शेतकऱ्याची व्यथा छापून आलेली आहे. अतिवृष्टीमुळे एका शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे त्या शेतकऱ्यावर खर्चाचा अतिरिक्त बोजा वाढला आहे. वर्धा येथील श्री.ज्ञानेश्वर लोखंडे यांनी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, राज्य शासन मला मदत करीत नसेल, राज्य शासनाकडून मला आर्थिक मदत मिळणार नसेल तर मी माझी किडनी विकण्यास तयार आहे.

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

ही तुमच्या राज्याची कथा आहे. स्वत:चा अवयव विकायला माणूस केव्हा तयार होतो? ज्यावेळी त्याला आत्महत्या देखील करता येत नाही तेव्हाच तो हे धाडस करतो याची मंत्री महोदयांना चांगली जाण आहे. ही विदर्भाची परिस्थिती आहे. ही परिस्थिती आजची नसून गेली 10-12 वर्षे प्रत्येक हिवाळी अधिवेशनात आम्ही सभागृहात अनुभव घेत आहोत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत किंवा कुपोषणाने बालके मरत आहेत. सभागृहाचे कामकाज सुरु होण्यापूर्वी माननीय सभापती आसनस्थ झाल्यानंतर आमच्या पक्षाचे गटनेते श्री.दिवाकर रावते हे दररोज आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव वाचून दाखवायचे. विदर्भावर आणखी किती वर्षे अन्याय होणार आहे?

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे 6459 कोटी रुपयांची गरज आहे. त्यामध्ये वीज, रस्ते, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, फळबागांचे झालेले नुकसान, सोयाबीनचे नुकसान या सर्व बाबींचा समावेश आहे. जी नुकसान भरपाई द्यावयाची आहे त्यासाठी एक खिडकी योजना अंमलात आणली पाहिजे. मदत मिळणाऱ्या माणसाने किती खेटे घालावेत? 75 रुपयांचा चेक मिळण्यासाठी त्याला 100 रुपये भरुन बँकेत खाते उघडावे लागते. बँक खाते उघडण्याकरिता आधार कार्डाची सक्ती केली जात आहे. विदर्भातील शेतकरी हा गरीब, आदिवासी आहे. त्याला हे कळत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, कोणत्याही योजनेचा लाभ मिळण्यासाठी आधार कार्डाची आवश्यकता नाही. परंतु योजनेचा लाभ मिळण्याकरिता अधिकारी वर्गाकडून आधार कार्डाची मागणी केली जाते. हे किती दिवस चालणार आहे?

सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, मुंबईला परतण्यापूर्वी चांगले पॅकेज देऊन आर्थिक मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचेल याची दक्षता घ्यावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, विदर्भात यावर्षी प्रचंड पाऊस पडल्यामुळे जुलैच्या अधिवेशनामध्ये आम्ही सविस्तर चर्चा घडवून आणली होती. ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यामध्ये देखील प्रचंड पाऊस झाला. दुर्दैव असे की, यावर्षी सोयाबीनचे पीक फारसे आले नाही. जे पीक हाती आले ते पावसात भिजल्यामुळे त्याला कोंब आल्याने मार्केटमध्ये विकले जाऊ शकत नाही. 2 ते 3 एकरच्या शेतकऱ्याने पिकविलेल्या धानाचे पीक दिवाळीच्या सुमारास आलेल्या पावसात भिजल्यामुळे नष्ट झाले आहे. या वर्षी शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात नुकसान सहन करावे लागले आहे. शासनाने नुकसान भरपाई घोषित केली. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम चंद्रपूरला आले. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री देखील चंद्रपूरला आले होते. आम्ही सगळे आमदार तेथे उपस्थित होतो. जुलैच्या अधिवेशनात आम्ही तुमचे कौतुक केले होते. आम्ही त्या ठिकाणी निक्षून सांगितले होते की, जुलैमध्ये सर्व्हे करीत आहात. अशा वेळी शेतकरी 10 आर क्षेत्रात पळे टाकतो आणि ते एका एकरामध्ये रोवतो. त्याला आम्ही रिप्लँटेशन म्हणतो. तुम्ही 10 आर क्षेत्राचा हिशोब न करता एक एकराचा हिशोब गृहित धरुन नुकसान भरपाई द्यावी. माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले होते. प्रत्यक्षात 10 पळ्याचा हिशोब गृहित धरुन नुकसान भरपाई देण्यात आली. ही शेतकऱ्यांची थट्टा आहे. त्यामुळेच नुकसान भरपाई म्हणून 75 रुपये, 80 रुपयांचा चेक दिला जात आहे. आमचे पूर्ण शेतीचे नुकसान झाले आहे.

सभापती महोदय, चंद्रपूरला केंद्रीय समिती पाहणी करण्यासाठी आली होती. केंद्रीय समितीचे आमचे म्हणणे ऐकले नाही असे मुख्यमंत्र्यांच्या वतीने आम्हाला कळले. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, आम्ही त्यांना समजावून सांगूनही त्यांनी ऐकले नाही. ऐकून घेण्याचा प्रश्न येतो कुठे? पश्चिम महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ पडल्यानंतर केंद्रीय समिती ऐकते.

नंतर श्री.भारवि.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

पश्चिम महाराष्ट्रासाठी केंद्रीय समिती 2500 कोटी रूपयाचे पॅकेज देते. विदर्भामध्ये धानाचे नुकसान झालेले असताना देखील आपण फक्त दहा हजार रूपयाची मदत देता. शत्रूला देखील अशा पद्धतीने कोणी चिडवणार नाही. अशा प्रकारे कोणीही कोणाचे हाल करणार नाही. आपणाला द्यायची असेल तर दहा हजार रूपयाची नुकसान भरपाई देऊ नका. एक एकराप्रमाणे आम्हाला सरसकट नुकसान भरपाई द्यावी. ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यामध्ये पाऊस झाला. आमच्या येथे 51 वेळा अतिवृष्टी झाली. 65 मि.मी.पाऊस झाला. विदर्भामध्ये सर्वात जास्त पाऊस झालेला आहे. आम्ही 100 टक्क्याची मर्यादा केव्हाच ओलांडली आहे. असे असताना आपण यावर्षी नुकसानीचा मोठा फटका देत आहात. हा फटका देत असताना आपण आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहात ते कृपा करून करू नका.

मघाशी मी माननीय मंत्र्यांचा वाघा सोबतचा फोटो पाहिला. वाघ आपल्याकडे बघत होता आणि आपण मात्र बाहेर बघत होता. मी वाघाला देखील भीत नाही. केवढा मी हिंमतवाला असे आपण फोटोमधून दाखवत असाल तर वाघापेक्षाही मोठी शक्ती दाखवून विदर्भाला मोठा निधी द्यावा अशी मी आपणाला विनंती करणार आहे.

पश्चिम महाराष्ट्र हे आपले लेकरू आहे हे मला माहीत आहे. येथील सगळेच नेते पॉवरफूल आहेत. ते दिल्लीवरून देखील पैसे आणू शकतात. विदर्भासाठी आम्ही कमी पडतो असे आपल्याला म्हणावयाचे तर नाही ना. संयुक्त महाराष्ट्रामध्ये विदर्भ विलीन झाला तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, संयुक्त महाराष्ट्रा बरोबर विदर्भाचा विकास करण्यात येईल. त्यावेळी आम्हाला लॉलीपॉप दाखविण्यात आले त्यामुळे आम्ही महाराष्ट्रात आलो. आज अशी स्थिती आहे की, आमच्याकडील सर्व आपण घेऊन गेलात. आज आम्ही खऱ्या अर्थाने गरिबीचे जीवन जगत आहोत. हे आपण मान्य केले पाहिजे.

मी परवाच पेपरमध्ये वाचले की, माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी विदर्भाचा दौरा केला. ते चंद्रपूरला आले नाहीत. त्यांनी सांगितले की, विदर्भामध्ये प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे केंद्र शासनाकडून रूपये 992 कोटी रूपये मिळवून देतो. हे रूपये 992 कोटी कुठे गेले आहेत ? हे पैसे आलेच नाहीत काय ? विदर्भातील लोकांना समाधान देण्यासाठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

रूपये 992 कोटी मंजूर केले होते काय ? राजा उदार झाला आणि आमच्या हाती भोपळा दिला असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

विदर्भामध्ये सर्वात जास्त पाऊस चंद्रपूर मध्ये पडला हे सर्वांना माहीत आहे. शासनाकडे नुकसान भरपाईसाठी रूपये 131 कोटींची मागणी करण्यात आली. त्यापैकी फक्त 81 कोटी रूपये मिळाले. हे 81 कोटी रूपये ऑक्टोबर महिन्यामध्ये आले आहेत. हा निधी अजून पर्यंत शेतकऱ्यां पर्यंत पोहोचलेला नाही. याचे कारण असे की, आपण जी.आर.चुकीचा काढला. आपण जी.आर.महसूल विभागातर्फे काढला आणि कृषि खात्याला वाटप करण्यास सांगितले. हे वाटप आम्हाला करायचे नाही असे कृषि खात्याने सांगितले. महसूल खात्याने सांगितले की, जी.आर.मध्ये आमचा उल्लेख नाही. त्यामुळे ते वाटप रोखण्यात आले. अधिवेशन नागपूरला आहे म्हणून 3 तारखेपासून वाटप करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यात फक्त दोन कोटी रूपयांचे वाटप झालेले आहे. विदर्भातील 11 जिल्ह्यांमध्ये फक्त 20 कोटी रूपयांचे वाटप झाले आहे. अजूनही पैशाचे वाटप झालेले नाही कारण आपला जी.आर.चुकीचा आहे. आपले अधिकारी वर्षानुवर्षे काम करीत आहेत. त्यांना जी.आर.कसा काढावा हे देखील कळत नाही. नुकसान झाले असल्यामुळे तो जी.आर.महसुल विभागामार्फत काढण्यात यावा. आपण कृषि विभागाचा जी.आर.कसा काय काढत आहात. आमच्या येथील शेतकऱ्यांची दिवाळी, दसरा अंधरात गेला. दिवाळीमध्ये दिवा लावण्याकरिता शेतकऱ्यांकडे एक पणतीसुद्धा नव्हती. मुलांनी मागितलेले नवीन कपडे सुद्धा आम्ही देऊ शकलो नाही. त्यांना फटाके फोडायला देऊ शकलो नाही. आता आपण आम्हाला पैसे देत आहात. मग आता आम्ही काय ख्रिसमसच्या मेणबत्त्या लावायच्या. अशा पद्धतीने आपण आम्हाला रडण्यासाठी मोकळे सोडलेले आहे. आज आमचा आत्मा तळतळ तुटतो आहे. आपण शेतकऱ्यांच्या घरी यावे. आपण पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी पाहिले असतीलच. तीन एकरची जमीन असलेले शेतकरी मोटार सायकरवरून फिरतात. मोठ्या प्रमाणावर मिशीला तूप लावून फिरतात. तसे आमच्याकडे नाही. आमच्याकडील शेतकरी लंगोट घालून फिरतो. एकदा मी आपणाला माझ्या आदिवासीचे आणि गरीब शेतकऱ्याचे घर दाखवते. ते घर पाहिल्यानंतर विदर्भाची स्थिती काय आहे हे आपल्याला कळेल. डोळ्याने पाहिल्या शिवाय काही समजत नाही. अशा प्रकारे आमची थट्टा करून आमच्या थडग्यावर फूल वाहण्यासाठी येथे आला आहात काय ?

यानंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

वो आये हमारी कबर पर, फूल चढ़ाना भूल गये,
दिये में जो तेल था, वो ही लगाकर चल दिए.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी जुलैच्या अधिवेशनात आमच्या भागातील मा.मा. तलावाच्या दुरुस्तीसाठी 50 कोटी रुपये दिले जातील अशी घोषणा केली होती. सर्व मा.मा. तलावाच्या दुरुस्तीसाठी आम्ही 13.5 कोटी रुपयांचे बजेट केले. परंतु या शासनाने अद्याप पर्यंत मा.मा. तलावाच्या दुरुस्तीसाठी एक पैसा सुध्दा दिला नाही.

सभापती महोदय, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आम्ही 265 कोटी रुपयांची मागणी केली असता 168 कोटी रुपये देण्यात येईल अशी घोषणा करण्यात आली परंतु आता 5 कोटी रुपये देण्यात येतील अशी माहिती मिळाली आहे. परंतु अद्याप पर्यंत एक पैसाही आम्हाला मिळालेला नाही.

सभापती महोदय, माझ्या भागातील एक रस्त्यावर सतत 8 अपघात झाले आहेत. हे अपघात केवळ खड्डे पडल्यामुळे झालेले आहेत. या रस्त्यावरुन आजारी माणूस नेऊ शकत नाही अशी अवस्था आहे. या रस्त्यावरुन सायकल जाऊ शकत नाही, लहान मुलांना शाळेत नेऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. अतिपावसामुळे रस्ते खराब झालेले असतांनाही आम्हाला एक पैसाही देण्यात आला नाही.

सभापती महोदय, 1976 च्या जीआर मध्ये अशी अट आहे की, 65 मि.मी. पाऊस पडला आणि 60 से.मी. पाणी वेस्टवरुन वाहिले अशा प्रकारचे प्रमाणपत्र पाटबंधारे खात्याने दिले तर 1000 रुपये दिले जातात. 1976 पासून आतापर्यंत मच्छीमारांचे कमीतकमी 10 हजार रुपयांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे मच्छीमारांना 10 हजार रुपयांचे पॅकेज मंजूर करावे एवढे सांगते व मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

-------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, विधान परिषद नियम 97 अन्वये प्रस्तावावर चर्चा सुरु असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, विदर्भाबरोबर कोकणामध्ये जी अतिवृष्टी झाली त्यासंदर्भात या ठिकाणी चांगली चर्चा झालेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात कोकण भाग दुर्लक्षित राहिलेला आहे. ना घरका, ना घाटका अशी कोकणाची परिस्थिती झाली आहे. आमच्या कोकणात मालदार, वजनदार नेते नाहीत. आमच्याकडे कितीही पाऊस पडला किंवा कितीही नैसर्गिक आपत्ती आली तरी सुध्दा कोकणात पंतप्रधान येत नाहीत, मुख्यमंत्री येत नाहीत किंवा कृषी मंत्री येत नाहीत. कोकण हा आता दुर्लक्षित भाग झाला आहे. राज्यकर्त्यांच्या दृष्टीने उपेक्षित असलेला भाग म्हणजे कोकण. दुर्दैवाने या वर्षी विदर्भापेक्षाही कोकणामध्ये अतिवृष्टी झाली. कोकणातील संगमेश्वर, राजापूर, कुडाळ या भागामध्ये विदर्भापेक्षाही अतिवृष्टी झाली आहे. मागच्या 35 वर्षात झाली नाही एवढी अतिवृष्टी कोकणात झ ाली आहे. कोकणातील अर्ध्या भागात सहयाद्रीच्या रांगा आहेत व अर्ध्या भागात समुद्र किनारपट्टी आहे. सहयाद्रीच्या पर्वत रांगामध्ये होणारा पाऊस आणि नद्यांना येणारे पूर यामध्ये दोन्ही ठिकाणची वस्ती अडकली जाते व एकदा पूर आल्यानंतर 15-15, 20-20 दिवस पुराच्या पाण्यात गावे वेढली जातात, ही बाब शासनकर्त्या पक्षामधील बहुतेकांना माहिती नसावी. संपूर्ण कोकण हा भात शेतीवर अवलंबून आहे. कोकणामध्ये भात शेती सोडली तर दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. कोकणामध्ये थोडयाच भागात आंबा आणि नारळाच्या बागा आहेत. परंतु संपूर्ण कोकणातील मुख्य उत्पादन हे भात शेतीचे आहे. 1 जून पासून सुरु झालेला पाऊस कार्तिकी एकादशी पर्यंत सुरु होता. पेरणीपासून ते भात कापणी पर्यत कोकणात पाऊस पडत होता. दररोज पडणाऱ्या पावसामुळे भात शेतीचे जे नुकसान झालेले आहे त्याची नोंद महाराष्ट्र शासनातील कोणत्याही विभागाने घेतली नाही अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.विनायक राऊत...

कोकणातील शेतकरी भांडखोर नाही. त्याच्या अंगी तेवढा आक्रमकपणा वळलेला नाही. सरकारला ते आपले मायबाप समजतात. सरकारने काही मदत दिली तर दिली, नाही दिली तर त्यासाठी भांडायचे नाही अशी त्यांची वृत्ती असल्यामुळे या भागातील शेतकऱ्यांच्या कानावर पॅकेज हा शब्द कधी गेलाच नाही. मागील 15 वर्षामध्ये कोकणात फक्त दोन वेळा मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्या दोन्ही बैठकांमध्ये कोकणासाठी हजारो कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणा करण्यात आली. परंतु आजपर्यंत त्या पॅकेजमधील एक पैसा देखील कोकणासाठी मिळालेला नाही आणि याचे उत्तर माननीय मंत्री डॉ.पंतगराव कदम देतील.

सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील लांजा तालुक्यामध्ये माचाळ नावाचे गाव आहे. हे गाव समुद्र सपाटीपासून हजारो फूट उंचीवर असून मुख्य रस्त्यापासून किमान 65 कि.मी.अंतरावर आहे. कोकणात झालेल्या अतिवृष्टीमुळे त्या गावातील 34 जनावरे थंडीत कुडकुडून मरण पावली. त्या ठिकाणी डॉक्टर जाऊ शकले नाहीत म्हणून त्या जनावरांचा पंचनामा होऊ शकला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना मदत मिळू शकली नाही. ही बाब मी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना सांगितली. त्यांनी तातडीने आदेश दिले. परंतु दुर्दैवाने जनावरांचे पंचनामे न झाल्यामुळे 25 हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना मिळू शकली नाही. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी आपल्या अधिकाराचा वापर करुन माचाळ सारख्या दुर्गम भागातील शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी आदेश द्यावेत.

सभापती महोदय, कोकणात झालेल्या अतिवृष्टीमुळे भात शेतीचे नुकसान झालेच. त्या शिवाय नारळ, सुपारी आणि आंबा पिकांचे देखील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. कोकणात माडांच्या झाडांची नुकसान भरपाई 150 ते 200 रुपयांच्यावर गेली नाही. इतर ठिकाणी फळबांगाची नुकसान भरपाई देताना झाडाच्या आयुष्यमानाचे कॅल्क्युलेशन करुन नुकसान भरपाई दिली जाते. परंतु ज्याला आपण कल्पवृक्ष म्हणतो त्या माडाचे नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाल्यास त्याची नुकसान भरपाई 150 ते 200 रुपयांच्यावर जात नाही.



11-12-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 4K-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक राऊत.....

सभापती महोदय, कोकणात झालेल्या अतिवृष्टीमुळे तेथील जमीन खरडून गेली आहे. डोंगरावरुन जोराने वाहून येणाऱ्या पाण्यामुळे जमीन खरडून गेली आहे. नदीला पूर आल्यामुळे नदी शेजारी असलेली शेती वाहून गेली आहे. तेव्हा कोकणातील शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी जे पॅकेज प्रलंबित आहे ते या चर्चेच्या माध्यमातून जाहीर करावे अशी कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, भविष्यामध्ये अशी पूर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून काही नद्यांना धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याची आवश्यकता आहे. पूर प्रतिबंधक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण येथील तालुक्यात देवबाग नावाचे गाव आहे. हे गाव समुद्र आणि खाडीच्या संगमावर बसले आहे. या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमध्ये हे गाव केवळ ईश्वराच्या कृपेने वाचले आहे. या पावसाळ्यात मोठी लाट आली आणि त्या लाटेने जवळपास 30-35 घरांचे नुकसान केले. त्या लाटेनंतर दुसरी लाट आली नाही म्हणून ते गाव नशिबाने वाचले. अन्यथा ते गाव संपूर्ण सपाट झाले असते.

सभापती महोदय, या निमित्ताने माझी मागणी आहे की, कोकणातील नद्यातील गाळ काढावा. तसेच ज्या ज्या ठिकाणी पूर परिस्थिती आहे त्या ठिकाणी पूरप्रतिबंधक बंधाऱ्याची व्यवस्था करावी एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-----

**उप सभापती** : या चर्चेवर आणखी कोणाला बोलायचे आहे काय ? कारण उद्या या चर्चेवर कोणाला बोलण्याची संधी मिळणार नाही. उद्या या चर्चेवर माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या, गुरुवार, दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत सकाळी 11.00 ते दुपारी 1.00 या वेळेत लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 30 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 12 डिसेंबर, 2013 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

अपृष्ठांकित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही